# अभंग-संकीर्तन

१९६३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय ७१८२।
2023

भाग १ ला

तृतीयावृत्ति

शंकर वामन दांडेकर
एम्. ए.

REFBK-0013509

किंमत २॥ रुपये

६४८२९
१५/३/६७

# अभंग-संकीर्तन

शंकर वामन दांडेकर,

एम्. ए.

REFBK-0013509

तृतीयावृत्ति

चैत्र शुद्ध एकादशी शके १८८५

किंमत रु. २–५० न. पैसे

प्रकाशक :
**यशवंत गोपाळ जोशी,**
' प्रसाद ' प्रकाशन,
६८९/२३ सदाशिव, पुणें २

* * *

[ सर्व हक्क स्वाधीन ]

* * *

मुद्रक :
**भाऊ लक्ष्मणराव कोकाटे,**
हनुमान छापखाना,
७१८ सदाशिव पेठ, पुणें २

## महाराष्ट्राचें आवडतें मासिक

# प्रसाद

संपादक :
प्रा. सोनोपंत दांडेकर
श्री. य. गो. जोशी

**ऑगस्ट १९६२ पासून १६ वें वर्ष सुरू.**

**वार्षिक वर्गणी पोस्टेजसुद्धां १० रुपये फक्त.**

* १. प्रा. सोनोपंत दांडेकर, २. प्रा. के. व्ही. वेलसरे, ३. प्रा. नारायणशास्त्री द्रवीड, ४. बाबासाहेब खापर्डे, ५. श्री धुंडा-महाराज, ६. श्री. य. गो. जोशी हे प्रसादचे प्रमुख लेखक असून शिवाय महाराष्ट्र संस्कृतीला शोभेशा कथा, कविता दर अंकांत येत असतात. किरकोळ अंकाची किमत १ रुपया.

पण प्रसाद प्रकाशन संस्थेकडे आपण १५० रुपये दहा वर्षांच्या मुदतीनें ठेव म्हणून ठेविल्यास त्याचें व्याज म्हणून प्रसाद मासिक आपणांस दहा वर्षें मिळत राहील व दहा वर्षांनीं आपली रक्कम आपणांस परत मिळेल. शिवाय प्रसादचीं आजपर्यंत झालेलीं आणि पुढें दहा वर्षांत होणारीं सर्व प्रकाशनें आपणांस पाऊणपट किमतीस मिळतील. पोस्टेज निराळें.

* ठेवीचा फॉर्म व प्रसाद प्रकाशनाची यादी मागवा. *

यशवंत गोपाळ जोशी :
प्रसाद प्रकाशन, $\frac{६८१}{२३}$ सदाशिव, पुणें २.

# तीन संत चरित्रें :

१ श्री गोंदवलेकर महाराज ले. प्रा. के. व्ही. बेलसरे
( यांचें चरित्र व बोधवचनें ) किं. १० रुपये. पोस्टेज १॥ रु.

२ श्री वासुदेवानंद सरस्वती ले. श्रीपादशास्त्री किंजवडेकर
( टेंबे स्वामी ) यांचें चरित्र किं. ७॥ रुपये. पोस्टेज १॥ रु.

३ श्री दत्तावतार ले. श्रीपादशास्त्री किंजवडेकर
श्रीनृसिंहसरस्वती ( गाणगापूर ) किंमत ३ रुपये.
यांचें चरित्र पोस्टेज १२ आणे

* हीं एकूण साडेवीस रुपयांचीं पुस्तकें मनीऑर्डर पाठवून एकदम मागविल्यास आमचे खर्चानें पाठवूं.

य. गो. जोशी : प्रसाद प्रकाशन, ६८९/२३ सदाशिव, पुणें २.

# ग्रंथकर्त्याचें निवेदन

तुकोबांचे अभंग आपल्या अंगच्या गुणांनीं गेलीं तीनशें वर्षें महाराष्ट्रीयांच्या समोर तळपत आहेतच. महाराष्ट्रांत आबालवृद्धांच्या तोंडांत तुकोबांच्या अभंगांपैकीं एखादें तरी कडवें सांपडावयाचेंच असें म्हटल्यास हरकत नाहीं, इतकी महाराष्ट्रावर तुकोबांच्या वाणीची छाप आहे.

अर्थातच प्रस्तुतचें अभंग-संकीर्तन तुकोबांची वाणी जगापुढें आणण्याकरितां नव्हे हें वाचकांस सांगण्याचें कारण नाहीं. ह्या संकीर्तनाचा उद्देश वारकऱ्यांत या अभंगांवर निरूपण करण्याची जी पद्धत आहे ती अ-वारकरी जिज्ञासूंच्या समोर मांडावी असा आहे. हरिदासी कीर्तनपद्धति व अभंगी निरूपण यांत थोडा फरक आहे. कीर्तन देवाचेंच, पण पद्धतींत फरक. हरिदासी पद्धतींत कीर्तनाचे पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग असतात. पूर्वरंगांत तत्त्वविवेचन व उत्तररंगांत विवेचन केलेल्या तत्त्वास अनुसरून दाखला म्हणून कथा अथवा गोष्ट. अभंगी निरूपणांत प्रथम भावार्थ, नंतर अभंगांतील प्रमेयांची चर्चा. ही चर्चा करतांना दाखले म्हणून साधूंच्या अगर देवाच्या गोष्टी प्रसंगोपात्त सांगितल्या जातात; पण मुख्य भाग तत्त्वनिरूपण हा असतो.

वारकरी पंथांतील अर्वाचीन कालांतील संत गु० कै० जोगमहाराज हे तुकोबांच्या गाथ्याचा अर्थ लावणें व त्यांवर कीर्तन करणें या बाबतींत फार थोर अधिकारी पुरुष होऊन गेले. ज्ञानेश्वरीच्या सार्थ प्रती पुष्कळ आहेत. तुकोबांच्या सार्थ गाथ्याची एकच प्रत आहे व ती गु. कै. जोग-महाराज यांचीच. तसेंच त्यांची कीर्तनपद्धतीहि असामान्य होती. त्यांचीं कीर्तनें ज्यांनीं ऐकलीं आहेत त्यांच्या कानांत तीं अजून गुणगुणत असतील, अशी प्रस्तुत लेखकाची खात्री आहे. निदान त्याच्या तरी कानांत तीं अजून गुणगुणत आहेत हें खरें. प्रस्तुत लेखकास त्यांचीं कीर्तनें बहुत वर्षें श्रवण करण्याचें भाग्य लाधल्यानें त्याचा त्यांच्या कीर्तनपद्धतीशीं थोडासा परिचय झाला व त्यांचें जें उच्छिष्ट लाभलें त्याच्यावरच ही संकीर्तन-माला तयार झाली आहे, हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें प्रस्तुत लेखकाचें कर्तव्य आहे.

कै. जोगमहाराज यांच्या पद्धतीचा विशेष असा असे कीं, ते संपूर्ण अभंगाकडे तो एका कल्पनेचा विकास आहे या दृष्टीनें बघत व

कीर्तनांतून एका कडव्यांतून दुसरें कसें निर्माण होतें हें मोठ्या कौशल्यानें दाखवीत. एका कड्यांत दुसरें कडें गुंफावें व अशा अनेक कड्यांची जशी सांखळी करावी, तशाच अनेक कडव्यांचा अभंग तयार होतो अशा रीतीनें ते त्याची मांडणी करीत. या संकीर्तनांतून असेंच दाखविण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकांत संगृहीत केलेलीं संकीर्तनें ' प्रसाद ' या मासिकांतून आगाऊच प्रसिद्ध झालेलीं आहेत. हीं संकीर्तनें मासिकांतून दरमहा प्रसिद्ध झाल्यानें व यांची स्फूर्ति संपादकांच्या चर्चेतून झाल्यानें ह्या अभंगांची निवड करतांना एकच गोष्ट डोळ्यांसमोर ठेवली गेली व ती म्हणजे अभंगाच्या कडव्यांची सांखळी. तरी सुद्धां जे अभंग निवडले आहेत त्यांतहि जरा खोल जाऊन बघितलें तर असें आढळून येईल कीं, त्यांत अद्वैतपर, भक्तपर, संतपर, नामपर असे वेगवेगळ्या प्रकरणांत पडणारे अभंग आहेत.

प्रत्येक अभंगाच्या पूर्वी एक भूमिका म्हणून दिली आहे. तुकोबांच्या अभंगांचा अर्थ लावतांना याची फार आवश्यकता आहे. पण येथें येवढें नमूद करणें अवश्य आहे कीं, अभंगांपूर्वी ज्या भूमिका दिल्या आहेत त्या प्रस्तुत लेखकास एकंदर अभंग वाचून जशा असाव्यात असें वाटलें तशा दिल्या आहेत. त्या तशाच असाव्यात असा त्याचा आग्रह नाहीं.

हें अभंग-संकीर्तन प्रसिद्ध होत आहे याचें श्रेय ' प्रसाद ' मासिक व माझे सहकारी संपादक श्री. य. गो. जोशी व श्री. स. आ. जोगळेकर यांना आहे. ' प्रसाद ' मासिक न निघतें, श्री. जोशांनीं व श्री. जोगळेकरांनीं हें छापण्याचा आग्रह धरला नसता तर हें अभंग-संकीर्तन केव्हां प्रसिद्ध झालें असतें कोणास ठाऊक ! कदाचित् झालें सुद्धां नसतें !

ज्यांच्या अभंगवाणीच्या श्रवणानें मनास आजहि समाधान प्राप्त होतें त्या श्रीतुकोबांच्या चरणीं ही संकीर्तन-माला अर्पण करण्यास प्रस्तुत लेखकास आनंद वाटत आहे.

---

शं. वा. दांडेकर

पुण्यपत्तन; आषाढ शु॥ ११, शके १८७४

## अभंग-संकीर्तन

आज प्रसिद्ध होत आहे. **अभंग-संकीर्तन** पहिल्यांदा आमच्या **प्रसाद मासिकांत** प्रसिद्ध झालें आणि आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहे.

प्रसाद मासिक गेलीं पांच वर्षें आम्ही एका विशिष्ट ध्येयानें प्रसिद्ध करीत आहोंत. प्रसाद मासिकाची वार्षिक वर्गणी केवळ आठ रुपये आहे. प्रसाद मासिकांत प्रा. दांडेकर नियमानें लिहीत असतात. प्रसादचे आणखी ग्राहक वाढल्यास प्रसाद मासिक आम्हांला अधिक चांगल्या तऱ्हेनें काढतां येईल. तरी आपण प्रसाद मासिकाचे अवश्य वर्गणीदार होऊन चांगल्या वाङ्मयाच्या प्रकाशनास हातभार लावावा.

प्रा. सोनोपंत दांडेकर यांचा माझ्या आयुष्याशीं जो संबंध आला—मला माझी ती श्रीमंती वाटते. यापेक्षां काय लिहूं ? केवळ मी निमित्तमात्र होऊन प्रा. सोनोपंत दांडेकरांचें मौलिक लेखन मराठी वाङ्मय-रसिकांस देऊं शकतों—हाच माझा आनंद आणि अभिमान—उत्तरोत्तर वृद्धिंगत होवो हीच जगन्नियंत्याजवळ प्रार्थना !

—**यशवंत गोपाळ जोशी**

दुसरी आवृत्ति संपल्यामुळें ही तिसरी आवृत्ति जशीच्या तशीच काढली आहे.

**प्रकाशक**

# अनुक्रमणिका

१. हेचि थोर भक्ति .... .... .... १
२. आतां पाविजेल घरा .... .... .... १५
३. धर्म रक्षावयासाठीं .... .... .... ३०
४. चाले हें शरीर कोणाचिये सत्तें .... .... ४७
५. देव घ्या कोणी देव घ्या कोणी .... .... ५८
६. आपुला तो एक देव करुनी घ्यावा .... .... ७१
७. अधिकार तैसा दावियेला मार्ग .... .... ८७
८. संतांचिया पायीं हा माझा विश्वास .... .... १०९
९. सदा नामघोष करूं हरिकथा .... .... १३०
१०. भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग .... .... १४५
११. हेंचि दान दे गा देवा .... .... .... १६५

# अभंग-संकीर्तन

१३५०२

## हेचि थोर भक्ति:—

हेचि थोर भक्ति आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची ॥१॥
ठेविलें अनन्तें तैसेंची रहावें। चित्तीं असों द्यावें समाधान ॥२॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ। भोगणें तें फळ संचिताचें ॥३॥
तुका म्हणे घालूं तयावरी भार। वाहूं हा संसार देवापायीं ॥४॥

हा तुकाराममहाराजांचा अभंग आहे. सांप्रदायिक व तात्त्विक दृष्टींनीं त्याचा अर्थ आपणांस समजावून घ्यावयाचा आहे.

तुकाराममहाराजांच्या अभंगांचें मर्म समजावून घेणें अनेक दृष्टींनीं कठीण असतें. त्यांचे बहुतेक सर्व अभंग स्फुट असल्यामुळें संदर्भाचे अभावीं त्यांचा अर्थ लावणें कठीण वाटतें. ज्ञानेश्वरीची भाषा जुनी असल्यामुळें व विचार आणि विषय गहन असल्यामुळें तिचा अर्थ लावणें आधुनिक अशिक्षितांनाच नव्हे तर सुशिक्षितांनाही अवघड वाटतें. पण ज्ञानेश्वरी ही श्रीभगवद्गीतेवरील टीका असल्यामुळें कोठें अडलें तर मूळ श्लोकाच्या आधारानें ओव्यांच्या अर्थाचा उलगडा करतां येतो. अभंगांचे बाबतींत अशी सोय उपलब्ध नाहीं. तुकाराममहाराज अधिकांत अधिक अर्थ कमींत कमी शब्दांत व्यक्त करतात. यामुळें हे अभंग वरवर वाचणारास त्यांचें मर्म समजत नाहीं.

भगवद्गीतेंतील तत्त्वज्ञानही अशाच सूत्रमय रीतीनें मांडलेलं आहे. पण ही मांडणी सूत्रमय असली तरी सूत्राचा आधार असल्यामुळें विषयाचा उलगडा होऊं शकतो. अशी व्यवस्था त्या अभंगांचे बाबतींत केलेली असावी, असें कांहीं विद्वानांचें अनुमान आहे; तथापि हा विषय अजून विवाद्य आहे. एवढें मात्र खरें कीं, तुकाराम-महाराजांच्या प्रत्येक अभंगांत एकच विषय घेतलेला असतो आणि अभंगाचीं कडवीं या सूत्रांत गुंफलेलीं असतात. म्हणून तुकाराम-महाराजांच्या अभंगाचा अर्थ लावतांना प्रत्येक शब्द विचारांत घेतला पाहिजे आणि कडव्यांचा एकमेकांशीं असलेला संबंध ध्यानीं घेतला पाहिजे. शिवाय प्रत्येक अभंगाचा अर्थ लावतांना त्यांतील विचार त्यांच्या अंतःकरणांत कां स्फुरण पावले याचाही विचार केला पाहिजे.

तुकाराममहाराजांनीं सभोंवार पाहिलें तेव्हां त्यांना आढळून आलें कीं, लोक भक्ति करतातसे दिसतात, पण भक्तिशास्त्रांत भक्तीचें जें फळ म्हणून सांगितलें आहे तें मात्र त्यांच्या पदरांत पडलेलें दिसत नाहीं. भक्तिसांप्रदायाचे आचार्य नारद आपल्या भक्तिसूत्रांत म्हणतात :--

**यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवति अमृतो भवति तृप्तो भवति ॥ ४ ॥**
**यत्प्राप्य न किंचित् वाञ्छति न शोचति न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति ॥ ५ ॥**

याचा अर्थ असा कीं, भक्ति प्राप्त झाली असतां पुरुष सिद्ध होतो, कृतकृत्य होतो, अमर होतो, तृप्त होतो; दुसऱ्या कशाचीहि इच्छा करीत नाहीं, ऐहिक विषयांच्या ठायीं रमत नाहीं किंवा कसलाहि हव्यास धरीत नाहीं. भक्त हा तृप्त असतो. त्याचा चेहरा उमललेल्या गुलाबासारखा असावा, कीं ज्याच्याकडे पाहून इतर लोकांनीं आपलीं

दुःखें विसरावींत. तुकारामबुवांना आढळलें, कीं लोक भक्ति करतांना दिसतात; पण त्यांचे चेहरे सुतक्यासारखे दिसतात, 'मोडिली गोवरी । तैसा दिसे तोंडावरी' असें या भक्त म्हणवून घेणारांचें ध्यान कां असावें? भक्ति तर करतात, मग फळ कां नाहीं? फळ खोटें म्हणावें तर तुकारामबुवांचा अनुभव त्यांना सांगे कीं, जें भक्तिशास्त्रांत लिहिलेलें आहे तें खरें आहे.

**" तुका म्हणे चाखुनि सांगे । मज अनुभव आहे अंगें ॥**
**काम नाहीं काम नाहीं । झालों पाही रिकामा ॥ "**

अशी निष्कामता व वृत्ति त्यांना स्वतःला भक्तीमुळें प्राप्त झाली होती. तेव्हां शास्त्रांत सांगितलेलें खोटें म्हणतां येत नाहीं. म्हणून त्यांनीं निष्कर्ष काढला कीं, या भक्ति करणारांचेंच कोठें तरी चुकत असलें पाहिजे.

व्यवहारांत नेहमीं आढळणाऱ्या विद्यार्थ्यांचें उदाहरण पहा. परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे तीन वर्ग करतां येतात. हमखास पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होणारांचा पहिला वर्ग. असें सांगतात कीं, कै. चिंतामणराव वैद्य हे एम्. ए. च्या परीक्षेकरितां मुंबईस जात असतां त्यांच्या सहप्रवासी सहाध्यायांमध्यें चर्चा सुरू झाली कीं, यंदा कुलपतीचें पदक कोणाला मिळणार? कोणी म्हणत होते अमक्याला, कोणी म्हणत होते तमक्याला. चिंतामणराव म्हणाले, 'मी यंदां परीक्षेला बसणार आहें, तेव्हां चर्चा कशाला करतां? कारण पदक मलाच मिळणार!' ह्या वर्गांतील विद्यार्थ्यांचा निकाल त्यांच्याच हातीं असतो; त्यांच्या बाबतींत निकालाचा प्रश्नच उद्भवत नाहीं. विद्यार्थ्यांचा आणखी एक असा वर्ग असतो कीं, त्यांच्याही बाबतींत निकालाचा प्रश्न उत्पन्न होत नाहीं. हा वर्ग परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीं परीक्षेला बसलेलाच नसतो. परीक्षकांचा व यांचा

मतभेद होतच नाहीं. प्रतिकूल निकालाबद्दल यांना आश्चर्य वाटत नाहीं, दुःखही होत नाहीं; पण तिसरा एक वर्ग विद्यार्थ्यांचा आहे. या वर्गांतील विद्यार्थी छाती फुटेपर्यंत अभ्यास करतो. त्याला वाटत असतें कीं, आपण उत्तीर्ण होणार. पण शेवटीं अनुभव मात्र वेगळाच येतो. परीक्षकांचा व यांचा वारंवार मतभेद होतो. यांच्यासंबंधीं कळकळ बाळगणाऱ्यांच्या मनांत प्रश्न उपस्थित होतो कीं, हीं मुलें एवढा अभ्यास करतात, मग उत्तीर्ण कां होत नाहींत? त्यांच्या अभ्यासाच्या पद्धतींत कांहीं तरी चुकत असावें असाच निष्कर्ष अनुभवी मनुष्य काढतो.

तसाच भक्ति करूनही तृप्ति हें भक्तीचें फल मिळालेलें दिसत नाहीं. तेव्हां तुकाराममहाराजांना प्रश्न पडला कीं, हे लोक भक्तीसाठीं रात्रीं जागरणें करतात, हाडाचीं काडें करतात, घसा फुटेपर्यंत भजनें करतात, पण यांना भक्तीचें फळ कां मिळत नाहीं? तृप्ति राहिली बाजूला, उलट वीण्याकरितां व भजनाच्या हक्काकरितां तंटा करतात! ही परिस्थिति पाहून त्यांनीं निष्कर्ष काढला कीं, या लोकांना भक्तीचें रहस्य कळलेलें नाहीं. मनाला रुचेल, इतरांना दिसेल अशा रीतीनें ते कांहीं तरी धामधूम करतात आणि आपण भक्ति करतों असें मानतात. श्रीएकनाथांनाही असेंच आढळून आलें कीं, या लोकांना मुळांत 'देव' काय आहे हें समजलेलें नसतें. ते म्हणतातः—

**शिळा तांब्याचें बाहुलें केलें । पाट मांडुनी वरी बैसाविलें ॥**
**गंध अक्षता झांकोळिलें । मना आलें तें नाम ठेविलें ॥**
**या जनांसि लागलें वेड ॥**

तुकाराममहाराजांना दिसून आलें कीं, या लोकांना देव समजत नाहीं व देवाच्या प्राप्तीचें साधन जी भक्ति तीहि उमजत नाहीं. अज्ञानामुळें भक्तीच्या नांवाखालीं ते कांहीं अज्ञात क्रिया मात्र

करतात. भक्ति ही परमात्म्याची प्रीति संपादन करण्याची क्रिया. देवाला जें आवडेल तें करणें हीच देवाची सेवा. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :—

**" तेंस स्वामीचिया मनोभावा। न चुकिजे हेंचि परम सेवा ॥ "**

ज्ञा. अ. १८–९१३

आपला जो मालक त्याच्या मनोगताप्रमाणें वागणें हीच सेवा. अलीकडच्या एका मुलीचा विवाह झाला. नागरी बाईला घटके-घटकेला चहा लागायचा आणि खेडवळ नवऱ्याला चहाचें वावडें. सासरीं आल्यावर तिनें मोठ्या हौसेनें चहा केला व नवऱ्याला नेऊन दिला. तो बिचारा या बाबतींत अनभिज्ञ. म्हणूं लागला, ' मला हें चालत नाहीं. नुसतें दूध तापवून दे. वेलदोड्याची पूड नको, केशराची काडी नको किंवा आटवावयास नको. ' पतीची सेवा म्हणजे त्याला आवडेल, रुचेल तें करणें. उच्च-नीच भाव व्यक्त करण्यासाठीं हें सांगितलेलें नाहीं. एकूण आपला स्वामी जो परमेश्वर त्याची भक्ति, सेवा करणें असेल तर त्याला जें आवडेल तेंच केलें पाहिजे, हें उघड आहे. तुकारामबोवा म्हणतात :—

**" तुका म्हणे देवा। मानें ऐसी करूं सेवा ॥ "**

प्रारंभीं दिलेल्या अभंगांत तुकाराममहाराजांनीं याच भक्तीचें वर्णन केलेलें असल्यामुळें त्याला अग्रस्थान दिलेलें आहे. या अभंगाचा आरंभ पहा:—

**" हेचि थोर भक्ति आवडते देवा। "**

तुकाराममहाराज ' च ' कारानें विशिष्ट विधानावर जोर देऊन सांगतात कीं, देवाला आवडणारी थोर म्हणजे मोठी भक्ति हीच. म्हणजे कोणती ? हें ते या कडव्याच्या उत्तरार्धांत सांगतात :—

**" संकल्पावी माया संसाराची " ॥ १ ॥**

संकल्पिणें म्हणजे अर्पण करणें. माया म्हणजे प्रेम, आसक्ति. अर्थात् संसारावरची आसक्ति देवाला अर्पण करणें हीच देवाची मोठी सेवा आहे. शब्द नीट लक्षांत घ्या. ' संसार टाकणें ही देवाची सेवा ' असें महाराज म्हणत नाहींत; ' संसारावरचें प्रेम ' अर्पण करणं ही सेवा आहे असें त्यांचें स्पष्ट सांगणें आहे.

तुकाराममहाराजांच्या अभंगांचीं निरनिराळीं कडवीं एकमेकांत सांखळीसारखीं गुंतलेलीं आहेत पहिल्या कडव्यांतून दुसरें निर्माण होतें आणि त्यांतून तिसरें, अशी त्यांची संगति आहे.

पहिल्या कडव्यांत तुकाराममहाराजांनीं संसारावरचें प्रेम देवाला अर्पण करावयास सांगितलें. आतां श्रोता म्हणेल कीं, बोवा, संसारावरचें प्रेम देवाला दिलें तर संसार चालवावयाचा कसा ? सर्वांचे संसार चाललेले असतात कारण, आपला जीव संसारांत रंगलेला असतो, प्रेम गुंतलेलें असतें. साखर व रवा यांचा तुपामुळें एकजीव होऊन लाडू तयार होतो. भिन्न स्वभावांचीं माणसें एकत्र येतात आणि प्रपंच चालवितात; प्रपंच चालतो. कारण त्या त्या व्यक्तीचा स्नेह त्यांत गुंतलेला असतो. हा स्नेहच देवाला अर्पण केला तर संसार चालणार कसा ?

याचें उत्तर तुकाराममहाराजांनीं दुसऱ्या कडव्यांत दिलेलें आहे.

**" ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥ "**

परमात्मा सत्ताधीश आहे. तो ठेवील तसें रहावें. यावर शंका उत्पन्न होते कीं, देव जर सर्वसत्ताधीश आहे तर तो ठेवील तसें रहावें, हें सांगावयास कशाला हवें ? माणसाला तसें राहिलेंच पाहिजे. डोळ्यांनीं पहा, कानांनीं ऐका हें म्हणणें व्यर्थ आहे; कारण, पहावयाचें तें डोळ्यांनींच पाहिलें पाहिजे; पाहण्याचें दुसरें साधनच नाहीं.

‘ वृक्षाचेंहि पान हाले ज्याची सत्ता ’

एवढी ज्याची अकुंठित सत्ता तो परमेश्वर जसें ठेवील तसें रहा हें सांगणेंच व्यर्थ आहे. तुकाराममहाराजांना हा आक्षेप अनपेक्षित नव्हता; म्हणूनच ते या कडव्याच्या उत्तरार्धांत स्पष्टीकरण करतात—

“ चित्तीं असो द्यावें समाधान ॥ २ ॥

माणसें देव ठेवील तशींच राहतात. त्याच्या इच्छेपलीकडे जाऊं शकतच नाहींत. पण बहुतेक लोक अनंतानें ठेवलें तसेंच राहत असले तरी ते रडतखडत, चडफडत राहत असतात संसारांत बरे-वाईट प्रसंग यावयाचेच. मनुष्याला परमेश्वर ठेवील तसें राहावेंच लागतें; मग हर्षखेद कां ? तुकाराममहाराज सांगतात, आपलें कर्तव्य करीत असतांना जी परिस्थिति प्राप्त होईल ती आनंदानें समाधानपूर्वक भोगा. चित्ताचें समाधान ढळूं देऊं नका. कर्तव्य करीत असतांना जी परिस्थिति प्राप्त होईल ती देवाची कृपा मानून आनंदानें रहा; म्हणजेच देव ठेवील तसें रहा.

काय, तुम्ही आमचें ऐकत नाहीं ? काळजीच करीत बसणार? याचा परिणाम काय होणार ? आमच्यावर आपत्ति कां आल्या, अशा विचारानें फुरंगटून बसणार ? महाराज सांगतात :

“ वाहिल्या उद्वेग दुःखाचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥३॥

उद्वेग म्हणजे काळजी, चिंता; ती वाहिली तर फळ दुःख. प्रारब्धानें भोग आधींच ठरवून ठेवलेला असतो. तुकाराममहाराज दैववादी [ Fatalist ] होते, त्यांनीं निष्क्रियतेचा [ Quietism ] उपदेश केला अशी टीका ऐकण्यांत येते; पण त्यांच्या लक्षांत हें येत नाहीं कीं, तुकाराममहाराज ‘ करणें तें फळ संचिताचें, ’ असें म्हणत नाहींत, ‘ भोगणें तें फळ संचिताचें, ’ असें म्हणतात.

ज्ञानदेव, तुकारामबोवा यांच्या दर्जाचे कवि शब्द कसे तोलून वापरतात. श्रीज्ञानदेव सांगतात :

**'तुकोनि घेतलीं मोतियें जैसी'**

शब्द वापरावयाचे ते मोत्याचे मापानें. गाजराचें माप वेगळें, मोत्याचें वेगळें. गाजरें तोलतांना मालाचें पारडें कलेपर्यंत गिऱ्हाइकाचें समाधान होत नाहीं; माल स्वस्त म्हणून व्यापारीही तराजूला मनगट लावण्याची चलाखी करीत नाहीं. मोत्याचें मोल दाण्याच्या तेजावर असतें, त्याचें वजन चवानें मोजलें जातें. तसेंच या श्रेष्ठांच्या शब्दांचें आहे. त्यांचे शब्द सतेज व मौल्यवान ! इतकेंच नव्हे, ज्या त्या जागीं योग्य तोच व जरूर तेवढ्याच वजनाचा शब्द ते वापरतात. 'भोगणें तें फळ संचिताचें' आणि 'करणें तें फळ संचिताचें' यांमधील भेद आणखी स्पष्ट करून सांगितला पाहिजे.

वेदान्तशास्त्राप्रमाणें या साधुसन्तांचें मत आहे कीं, मनुष्यानें केलेल्या कर्मापासून दोन अंकुर उत्पन्न होतात; एक वासनात्मक व एक भोगात्मक. जीव हा भोगात्मक भागाला बांधला गेलेला आहे. कारण ज्या कर्माचा भोग त्याला व्हावयाचा तें कर्म त्यानेंच केलेलें असतें. यांतून प्रत्यक्ष देवसुद्धां त्याला सोडवूं शकत नाहीं. श्रीएकनाथमहाराज सांगतातः—

**'अदृष्टा आधीन शरीर । तेथ आलिया हि हरिहर ।**
**अन्यथा न करवे अणुमात्र । वेदशास्त्रार्थ संमत ।'**

कोणी देवाची भक्ति करूं लागला रे लागला, कीं त्याच्यावर कोणतीही आपत्ति येणार नाहींच असें नाहीं. दारिद्र्य, भय, शोक हीं भोगावींच लागतात. सुखदुःखाचा भोग अटळ आहे. कनिष्ठ गोष्टींचें कर्तृत्व देवावर लादण्याची वृत्ति अज्ञानाची द्योतक आहे. एका म्हाताऱ्याचा एकुलता एक मुलगा मेला. लोक म्हणूं लागले,

देवाला पाहवलें नाहीं. ही वेडी समजूत आहे. सुखदुःखांचे भोग मनुष्यमात्रानें आपल्याच कर्मानें आधींच ठरवून ठेवलेले असतात. वासनात्मक अंकुराबद्दल मात्र मनुष्याला स्वतंत्रता असते. परमार्थांतील पुरुषार्थ तो हाच. सत्-शास्त्र श्रवण, सत्समागम, सदिच्छा व स्वतःचा प्रयत्न यांच्या सातत्यानें मनुष्य वासना बदलूं शकतो आणि हलकें हलकें उच्च स्थितीप्रत पोंचूं शकतो. तुकाराममहाराज म्हणतात:—

**" येथें नघली नघली आड । संचितसा शब्द नाड ।**
**उठाउठी गोड । वीजें बीज वाढवी ॥**
**आपुलें आपण न करूं हित । करूं हें प्रमाण संचित ।**
**तरी मी नष्टचि पतित । तुका म्हणे संत मज हांसतील ॥ "**

तात्पर्य, संतांनीं जो परतंत्रतावाद ( Determinism ) मांडला तो मनुष्याच्या क्रियेच्या, कर्तव्याच्या आड येणारा नव्हे. कर्तव्य करण्याच्या आड येईल असा वाद कोणी मांडील तर त्याला शास्त्र समजलेंच नाहीं, असें म्हणावें लागेल. एवढेंच नव्हे, तो आपण होऊन आपल्या पायांवर धोंडा पाडून घेत आहे व हेंही न कळण्याइतका तो अज्ञ आहे, इतरांच्या पायांवर धोंडा घालीत आहे व याचे परिणाम न जाणण्याइतका आततायी आहे, असें म्हणावें लागेल. "आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः" अथवा 'दद्यात्,' 'जुहुयात्' असा उपनिषदादि शास्त्रांचा उपदेश आहे. त्याचा अर्थच असा आहे कीं, कर्म करण्याची मनुष्याला स्वतंत्रता आहे.

प्लेटोच्या थिएटिटस् नांवाच्या एका उत्कृष्ट संवादांतला प्रसंग सांगतों. कारण यानें या प्रश्नावर प्रकाश पडणार आहे. या संवादांत प्लेटोनें प्रोटॅगोरास या पंडिताच्या मतांवर टीका केलेली आहे.

प्रोटॅगोरास हा नीति, भाषा वगैरे शास्त्रांवर गांवोगांव व्याख्यानें देई आणि श्रोत्यांकडून व शिष्यगणांकडून द्रव्य घेई. मनुष्य हीच सर्व मूल्यांची कसोटी आहे (Man is the measure of all things) असें तो लोकांना सांगे. प्लेटोनें यावर फार मार्मिक टीका केली आहे. प्लेटो म्हणतो, प्रत्येक मनुष्य स्वतःच कसोटी आहे, मग प्रोटॅगोरास हा लोकांना नीतिशास्त्रांचे धडे शिकविण्याचे श्रम कां घेतो व त्याबद्दल पैसे कां घेतो ?

लोक समजतात त्या अर्थानें तुकाराममहाराजादि संत व शास्त्रें प्रारब्धवाद शिकवूं लागले तर श्रोतेलोक त्यांना उलट विचारतील, " बोवा, तुम्ही आम्हाला भजन करायला कशाला सांगतां ? अहो, तें आमच्या प्रारब्धांतच नाहीं. तुम्ही सांगून काय उपयोग ? तुमच्या प्रारब्धांत आहे म्हणूनच तुमच्या हातून तें होतें. " हे साधू आपल्याच हातानें आपल्या पायांवर धोंडा पाडून घेणारे नव्हते. प्रारब्धाची सबब सांगणारे लोक किती धूर्त आहेत तें त्यांना माहीत होतें. जें त्यांना नको असेल तेव्हां प्रारब्धाचें बुजगावणें पुढें करावयाचें आणि जें मनास येईल तें करतांना मात्र प्रारब्ध खुशाल गुंडाळून ठेवावयाचें, तेथें प्रारब्धाची चिंता करावयाची नाहीं, असा यांचा शिरस्ता असतो. तुकाराममहाराज म्हणतात :—

**" भजन घालीं भोगावरी । अकर्तव्य मनीं धरीं "**

स्वातंत्र्य व पारतंत्र्य यांची संगति तुकाराममहाराजांनीं एका कडव्यांत स्पष्ट करून सांगितलेली आहे.

**" भविष्य न सुटे भोगल्यावांचूनि । संचित जाणोनि शुद्ध करा ॥"**

आपण पूर्वीं कर्म करून संचित तयार केलें. तेंच आतां भोगावें लागतें; तसेंच आज जें करूं तें पुढें भोगावें लागणार; येवढ्याकरितां पुढची तयारी म्हणून चांगलें कर्म करा. या विचारपरंपरेला इंग्रजींत

Self-determinism अशी संज्ञा आहे. मनुष्य कर्मानें बांधला जातो व कर्मानेंच मुक्त होतो. तात्पर्य, तुकाराममहाराजांच्या मतें जीव सुखदु:खाला बांधलेला आहे, पण कर्म करण्याला स्वतंत्र आहे. गीतासुद्धां याच अर्थानें सांगते—

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥ गी. अ. २–४७**
**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।**
**ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ गी.अ.२–३८**

भोग हा बनून गेलेला आहे, हें न कळल्यामुळें काळजी वाहिली तरी भोग बदलत नाहीं, दु:ख मात्र पदरांत पडतें. चिता माणसाला एकदांच व मेल्यावर जाळते, चिंता जितेपणीं रोज सारखी जाळीत असते.

यासंबंधीं एक गोष्ट सांगतों :—

एक बैरागी असा होता कीं, तो आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर हत्तीला जागचे जागीं बसवूं शकत असे. एकदां तो रस्त्यांत पडला होता. त्याच रस्त्यानें राजाची स्वारी जाणार होती.

**' राजा चाले तेथें वैभव सांगातें '**

चतुरंग सैन्य जाणार म्हणून रस्ता साफ व मोकळा आहे कीं नाहीं, याची तपासणी करीत शिपाई चालले होते. त्यांना हा बैरागी रस्त्यावर पडलेला दिसला. शिपाई म्हणाले, ' अरे, राजाची स्वारी येत आहे. ऊठ, बाजूला हो. ' बैरागी म्हणाला, ' राजाची मातबरी मला काय सांगतां ? जाईल बाजूनें. ' ज्याला हात पसरावयाचा नाहीं तो पाय कशाला आवरील ? स्वारी जवळ आलेली पाहून शिपायांनीं विचार केला, या अडाण्याशीं घासाघीस करावयाला सवड नाहीं. त्यांनीं हातपाय धरून त्याला उचललें आणि दूर नेऊन ठेवलें. त्यांच्या या आंगचटीमुळें बैरागी चिडला. तो मनांत म्हणाला,

मी कोणाच्या अध्यांत नाहीं, मध्यांत नाहीं. या लोकांनीं काय म्हणून मला उचलून बाजूला टाकावें ? तो उठला, गर्दींत शिरला आणि त्यानें राजाच्या हत्तीचें शेंपूट धरून त्याला खालीं बसविलें. माहुतानें शिताफी करून अंबारीचा तोल संभाळला व राजेसाहेबांना सांवरलें. हत्ती एकाएकीं खालीं बसलेला पाहून हुजूर चौकशी करूं लागले. तेव्हां त्यांना सांगण्यांत आलें कीं, हें एका माथेफिरू बैराग्याचें काम आहे. राजेसाहेब प्रथम बरेच रागावले, पण मागाहून शांत झाले. त्यांनीं बैराग्याला विचारलें, ' महाराज, तुमची एवढी शक्ति, खुराक काय ? काय बदाम-पिस्ते खातां ? मेहनत कोठें करतां ? ' बुवाजी म्हणतात, ' राजाजी, बदाम-पिस्ते कोठले ? शेंगदाणेसुद्धां वेळेवर मिळत नाहींत ! ' प्रधानजी जवळच होते. ते म्हणाले, ' सरकार, आतां स्वारी पुढें चालू द्या, यांच्या शक्तीचें कारण मी तुम्हांला नंतर सांगेन. ' दुसऱ्या दिवशीं प्रधानानें बैराग्याला बोलावून घेतलें व विचारलें, ' बोवाजी, राहतां कोठें ? जेवतां कोठें ? ' बैरागी म्हणाला, ' देवळांत पडतों, भिक्षेवर निर्वाह करतों. ' प्रधान म्हणाला, ' बावाजी, आम्ही तुमची जेवणाखाणाची सोय करतों. ' पण तम्हीं सरकारचें एक काम केलें पाहिजे. ' बैरागी म्हणाला, ' काम झेपण्यासारखें असलें तर जरूर करीन. ' प्रधान म्हणाला, ' काम सोपें आहे, देवाचें आहे. नाहीं म्हणूं नका. गांवाच्या बाहेर मारुतीचें देऊळ आहे, तेथें रोज सायंकाळीं दिवा लावावयाचा. लागेल तें सामान कोठींतून घ्यावयाचें. मात्र दिवा रोजच्या रोज, बरोबर सूर्यास्ताला लागला पाहिजे. एवढें काम करावें आणि दुसऱ्या दिवसासाठीं लागेल तेवढा शिधा कोठींतून काढून घ्यावा. बैराग्यानें विचार केला, काम सोपें आहे, शिवाय देवाचें आहे, कबूल करावें, दगदग मिटेल. असा विचार करून त्यानें काम करावयाचें कबूल केलें. मनुष्य जंजाळांत गुंततो तो सुखाच्या आशेनें, स्वास्थ्याच्या

लालचीनें. बैरागी रोजच्या रोज दिवाबत्ती करूं लागला. पहिले कांहीं दिवस बरे गेले. पुढें त्याला आढळून आलें कीं, राजाच्या नोकरांकडून रोजच्या रोज तेल, वात वगैरे सामान मिळवावयाचें हें काम सामान्य नाहीं. प्रधानाचा हुकूम ताजा होता तोंवर सामान वेळचे वेळीं मिळावयाचें. हुकूम शिळा झाला. टंगळमंगळ होऊं लागली. नोकर भेटतात कीं नाहीं, सामान मिळतें कीं नाहीं, याची त्याला चिंता वाटूं लागली. पूर्वीं भिक्षेचें अन्न खाऊन निश्चिंतपणें देवळांत ताणून देणारा बैरागी आतां जेवणानंतर नोकरांची मार्ग-प्रतीक्षा करीत, मनधरणी करीत, बसून राहूं लागला. त्याचा निवांतपणा नष्ट झाला. काळजीनें तो खंगूं लागला. चार-सहा महिन्यांनंतर प्रधानजींनीं बैराग्याला बोलावून घेतलें व सांगितलें कीं, 'पूर्वीं तूं हत्ती बसविला होतास असें आम्हीं ऐकलें आहे; आम्हांला कांहीं तें खरें वाटलें नाहीं; कोणी तर सांगतात कीं, स्वारीचा हत्ती त्या वेळीं आपखुषीनें खालीं बसला. तें कसेंहि असो, तुझ्या शक्तीचा प्रयोग हुजुरांना पाहावयाचा आहे. तुझी तयारी असेल तेव्हां वेळ ठरवूं.' बैरागी हुशार होता. त्याला आपल्या ओसरत्या ताकतीचा अंदाज आलेला होताच. तो म्हणाला, 'महाराज, तेव्हां मीं हत्ती ताकतीनें बसविला हें खरें; पण आतां ती ताकत राहिली नाहीं. हत्ती काय, कुत्रेंहि मला आवरणार नाहीं. प्रधानानें विचारलें, 'कशानें?' बैरागी म्हणाला, 'बत्तीच्या काळजीनें!' एवढ्याशा कामाची इतकी काळजी, मग प्रपंचांतील कर्तव्यें व अडचणी यांमुळें मनुष्य किती खंगत असेल? तुकारामबोवा म्हणतात, 'खंगूं नका. समाधानानें रहा, प्रयत्न करा. यश येणें न येणें तुमच्या हातांत नाहीं. भोग ठरून गेलेला आहे.'

**वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ। भोगणें तें फळ संचिताचें ॥३॥**

यावर एखादा श्रोता म्हणेल, ‘ बोवा, संसारावरलें प्रेम देवाला वहा, हें सांगणें सोपें आहे. तुमचें स्वतःचें कसें काय आहे ?’ त्यावर महाराज आपली स्थिति शेंवटच्या कडव्यांत सांगतात:—

**तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥४॥**

‘ आमच्या संसाराचा सारा भार आम्हीं केव्हांच देवावर टाकलेला आहे; त्याच्या पायांवर संसार वाहून आम्ही केव्हांच मोकळे झालों आहोंत. ’

**तुका म्हणे देवा । अवघा निरसिला हेवा ।**
**कुटुंबाची सेवा । तोचि करी आमुच्या ॥**

‘ बोले तैसा चाले ’ या वर्गांतील बोवा होते. त्यांनीं प्रपंच नांवापुरता केला. प्रपंचाची काळजी अशी कधींच केली नाहीं. एका अभंगांत ते आपलें ऐश्वर्य सांगतात :—

**‘ आम्ही सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके ।**
**जाऊं पुढती भिके । कुत्रीं घर राखती ॥ ’**

आम्ही दैववान् खरे; आमच्या अंगावर सुतळीचा तोडा नाहीं. बाहेर भीक मागायला गेलों तर घराचें संरक्षण कुत्रीं करतात; कारण कुत्र्याला तोंड लावावें असें वाटावें असें कांहींहि घरांत नाहीं. बोवांचें घर चंद्रमौळी; चंद्रदर्शनासाठीं घराबाहेर येण्याची जरूरच नाहीं. असें जरी असलें तरी आमचा दरारा एवढा कीं, चोरसुद्धां आम्हांला भितात. चोराजवळ हत्यारें असतात, मग ते यांना कां भितात ? काय यांच्या संरक्षणाची सरकारनें तजवीज केली होती ? नव्हे. यांच्याजवळ कांहीं नाहीं, हें पाहून आपलेंच कांबळें यांना देण्याची बुद्धि होईल म्हणून ! त्यापेक्षां यांच्या वाटेला जावेंच कशाला ?

तात्पर्य, तुकाराममहाराजांनीं आपला सर्व प्रपंच देवावरच ठेवला.

ते भिकारी झाले व भिकारी राहिले. जाणूनबुजून देवाचें चिंतन, देवाचें कार्य, देव ठेवील त्यांत समाधान.

त्रिभुवनविभवहेतवेऽप्यकुंठस्मृतिरजितात्मसुरादिभिर्विमृग्यात् ।
न चलति भगवत्पदारविंदाल्लवनिमिषार्धमपि यःसवैष्णवाग्र्यः॥
भा. स्कं. ११ अ. २–५३

या श्लोकांत वर्णन केलेल्या वैष्णवाग्रणींपैकीं तुकारामबोवा होते, म्हणूनच त्यांनीं आपला प्रपंचभार देवावर ठेवला होता.

तात्पर्य, या अभंगांतील त्यांच्या उपदेशाचें सार असें आहे कीं, आपलें कर्तव्यकर्म करीत असतांना जे जे प्रसंग येतील ती देवाची कृपा असें मानून मनाचें समाधान ढळूं न देतां कार्य करीत राहणें हीच देवाची मोठी भक्ति आहे.

●❁●

## आतां पाविजेल घरा:— : : ? : :

**आतां पाविजेल घरा । या दातारा संगती ॥ १ ॥**
**पायांवरी ठेवूं माथा । सर्वथा हा नुपेक्षी ॥ २ ॥**
**येथूनिया तेथवरी आतां । नाहीं सत्ता आणिकांची ॥ ३ ॥**
**तुका म्हणे चक्रपाणी । शिरोमणी बळियांचा ॥ ४ ॥**

मराठी संतवाङ्मयांत तुकारामबुवांच्या अभंगांचें एक वैशिष्ट्यपूर्ण महत्त्वाचें असें स्थान आहे. त्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं एक महत्त्वाचें कारण हें आहे कीं, तुकारामबुवांनीं आपलें आध्यात्मिक चरित्र आपल्या अभंगांतून उघडपणानें सांगितलें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें वर्णन त्यांची उत्कृष्ट आरती करणारे

श्रीएकनाथांचे गुरुबंधु रामाजनार्दन यांनीं " प्रगट गुह्य बोले " असें केलें आहे व तें एका अर्थानें खरेंहि आहे. पण याचा अर्थ श्रीज्ञानदेवांनीं आपण परमार्थांत काय साधनें केलीं, कशीं केलीं, यांत अडचणी कोठल्या आल्या, त्या आपण कोणाच्या साहाय्यानें दूर केल्या इत्यादि गोष्टी स्पष्ट तऱ्हेनें सांगितल्या आहेत असा जर केला तर चुकीचा होईल. त्यांच्या वाङ्मयांत " सत्यवादाचें तप। वाचा केले बहुत कल्प। " अथवा " पुण्यें पोषिलीं; असाधारणें।" यांसारखे कांहीं तुरळक उद्गार आढळून येतील एवढेंच. बाकी दुसरें आपणांस कांहीं आढळून येत नाहीं. तुकारामबोवांचें तसें नाहीं. " पापाची मी राशी " अथवा " अपराधाचा केलो " येथपासून तों " तुका म्हणे आम्ही देवाहूनि बळी " येथपर्यंत त्यांचा इतिहास आपणांस त्यांच्या अभंगांत सांपडतो. श्रीज्ञानदेवांचे ग्रंथ हे मिटलेल्या मुठीसारखे म्हटले, तर श्रीतुकोबांचे अभंग उघडलेल्या मुठीसारखे आहेत. साधकाच्या दृष्टीनें याचा फारच उपयोग आहे, व याच कारणाकरितां श्रीज्ञानदेवांपेक्षांसुद्धां तुकारामबोवा हे अधिक आपलेसे वाटतात.

ही प्रस्तावना करण्याचें कारण असें कीं, " संकीर्तनास " जो आज अभंग घेतला आहे त्यांत तुकारामबोवा हा अभंग रचण्याच्या वेळीं परमार्थपथावरील कोणत्या टप्प्यापर्यंत येऊन पोंचले होते, त्यांना मुक्काम कोठचा गांठावयाचा होता, त्यांस साहाय्य कोणाचें होणार होतें हें त्यांनीं त्यांच्याच शब्दांत सुंदर सांगितलेलें असल्यामुळें तुकारामबोवांचा आध्यात्मिक उन्नतीचा इतिहास या दृष्टीनें या अभंगास फार महत्त्व आहे. आपण प्रथम या अभंगाचा भावार्थ पाहूं व तदनंतर त्याचा अधिक तपशीलवार विचार करूं.

एखादा परगांवीं गेलेला मनुष्य घराकडे येऊं लागला असतां आपण मुक्कामाला कसे पोहोंचूं, अशा अडचणींत असतां त्याला कोणी

एखादा सद्बुद्धीचा व समर्थ मार्गदर्शक भेटावा व त्यानें सांगावें कीं, मी तुला तुझ्या घरीं पोहोंचवतों म्हणजे त्याला आनंद होतो व त्याच्या तोंडांतून असे उद्गार निघतात कीं, आतां आपण आपल्या घराला खास पोहोंचणार. तसेंच या अभंगांतील तुकोबांचे उद्गार आहेत. आंत खूप आनंद अथवा दुःख झालें, कीं तें बाहेर पडायला बाह्य कारणाची अपेक्षा करीत नाहीं. तुकारामबोवाच म्हणतात, "अंतरींचें धावे स्वभावें बाहेरी। धरितांही परी आवरेना ॥" तसेंच तुकारामबोवांना घरीं जाणार म्हणून आनंद होऊन ते म्हणतात,

**आतां पाविजेल घरा । या दातारा संगती ॥ १ ॥**
**पायांवरी ठेवूं माथा । सर्वथा हा नुपेक्षी ॥ २ ॥**

तुकोबा म्हणतात कीं, 'आतां या दाताराची सोबत मिळाल्या-मुळें त्याच्या संगतीनें घराला खास पोहोंचतां येईल. तेव्हां आतां याच्या पायांवर मस्तक ठेवूं या. कारण हा आपली उपेक्षा मुळींच करणार नाहीं. हा दातार उपेक्षा करणार नाहीं, त्याच्या मनांत शरण आलेल्यासंबंधीं कळकळ असेल व त्याच्याजवळ मदत करण्याची बुद्धि असेल, पण जर अडचणी दूर करण्याची सत्ता त्याच्याजवळ नसेल तर त्याला शरण जाऊन काय उपयोग होणार? असा प्रश्न उत्पन्न झाल्यास त्यांचें उत्तर तुकोबा या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यांत देतात.

**"येथूनिया तेथवरी आतां । नाहीं सत्ता आणिकांची" ॥ ३ ॥**

'आतां या ठिकाणापासून तों माझ्या मुक्कामापर्यंत दुसऱ्याची सत्ता नाहीं, याचीच सत्ता आहे. यावर सुद्धां अशी शंका येण्याचा संभव आहे कीं, या दाताराची सत्ता आहे हें ठीक आहे; पण असें होण्याचा संभव आहे कीं, दुसऱ्याच्या प्रांतांतील व्यक्ति याच्या

राज्यांत आली तर जेथून ती व्यक्ति आली तेथला सत्ताधीश या सत्तेला त्रास देईल व आपलें माणूस आपल्याकडे ओढून नेईल व ही परकीय सत्ता जर प्रबळ असेल तर नुसती याची सत्ता असून उपयोग नाहीं. तेव्हां नुसती याची सत्ता आहे एवढें कळल्यानें मुक्कामास खास पोंचतां येईलच असें सांगतां येत नाहीं. एवढ्या-करतां शेवटच्या कडव्यांत तुकारामबोवा ज्या दाताराचें साहाय्य मिळालें त्याच्या सर्वशक्तिमत्वाचें वर्णन करतात. याची नुसती सत्ता आहे असें नव्हे, याच्या विरुद्ध जाऊन याला त्रास देण्याचें कोणाचें सामर्थ्य नाहीं.

**तुका म्हणे चक्रपाणी । शिरोमणी बळियांचा ॥ ४ ॥**

तुकाराममहाराजांनीं या शेवटल्या कडव्यांत दातार कोण याचा उल्लेख केला आहे व तो उल्लेख करतांना त्याला 'चक्रपाणी' असें म्हटलें आहे. यांत रहस्य आहे. कारण हा चक्रधर पांडुरंग सर्व बळियांत श्रेष्ठ असा आहे. हा सर्वांचा मुकुटमणि आहे. यामुळें शत्रूपासून भिण्याचें कारण नाहीं असें त्यांत दर्शविलें आहे.

आपण आतां या अभंगांतील प्रश्नांचा तपशीलवार विचार करूं. प्रथम तुकोबा हे कोणत्या घराला निश्चित पोहोंचतां येईल असें म्हणतात तें पाहूं. घर हा शब्द सांकेतिक आहे. त्यांच्या देहू गांवांतील राहत्या घराचा उल्लेख या ठिकाणीं नाहीं हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्याबद्दलची आसक्ति सुटल्यानंतरच्या पुढच्या प्रवासाचा हा प्रश्न आहे. या अभंगांतील उद्गार परमार्थपथावर चालूं लागल्यावर त्यांत येणारी अडचण दूर झाली असें वाटल्यावेळचे आहेत. साधुसंतांच्या वाङ्मयांतील सांकेतिक शब्दांचा अर्थ करतांना ज्याच्या ग्रंथांतील शब्दांचा अर्थ लावणें असतो तो साधू कोणत्या परंपरेचा अथवा संप्रदायाचा होता, त्याचें तत्त्वज्ञान कोणतें होतें,

त्याच्या संप्रदायांतील पूर्वींच्या श्रेष्ठांनीं तो शब्द कोणत्या अर्थानें उपयोगांत आणला आहे, त्या साधूच्या ग्रंथांत इतरत्र त्यानें तो शब्द कोणत्या अर्थानें वापरला आहे इत्यादि गोष्टींचा विचार करणें आवश्यक असतें. येऱ्हवीं अर्थाचा अनर्थ होण्याचा फार संभव असतो.

उदाहरणार्थ म्हणून एक मौजेचा अभंगार्थ देतों.

तुकाराममहाराजांचें खालील कडवें प्रसिद्ध आहे :

**सारी झाली मेली लटिकें वचन । बद्धमुक्त शीण तुका म्हणे ॥**

या ठिकाणीं वरच्या कडव्यांचा संदर्भ पाहिला असतां अर्थ असा दिसतो कीं, बद्ध व मुक्त या दोन्ही कल्पनाच असल्यानें मुक्तीकरितां प्रयत्न करणें हे फुकट कष्ट होत. कारण मुळांत बद्धताच खोटी !

' बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ' असें भागवतांत म्हटलें आहे. तशाच तऱ्हेचें हें कडवें. तुकाराममहाराजांनीं हें प्रमेय स्पष्ट करण्याकरितां पूर्वार्धांत दृष्टान्त दिला आहे. सारी म्हणजे सोंगटी. सारीपाटाच्या डावांत ' सोंगटी मेली ' अशी भाषा जरी वापरलेली दिसली तरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, ' सोंगटी जन्मास आली अथवा मेली ' हें सर्वच खोटें आहे. तुकारामबोवा म्हणतात, अगदीं असेंच आत्म्यासंबंधीं आहे. तो बद्ध होता आणि मुक्त झाला हें सर्वच खोटें !

श्रीएकनाथांनीं हाच दृष्टान्त देऊन हेंच प्रमेय सिद्ध केलें व नाथभागवताची तुकोबांच्या वाङ्मयावर मोठी छाप पडली आहे हें प्रसिद्धच आहे.

**सारी निमालियापाठीं । कवण पुण्यात्मा चढे वैकुंठीं ।**
**कोण पडे नरकसंकटीं । तैसा जाण सृष्टी बंध मोक्ष ॥**

पण हे सर्व सांप्रदायिक म्हणून ज्यांनीं पाहिलेंच नाहीं त्यांनीं या कडव्याचा अर्थ पुढीलप्रमाणें केला आहे :—

'सारी म्हणजे सर्व. सर्व झाले व मेले हें खोटेंच !'

आपणांस या अभंगांतील 'घर' या शब्दाचा अर्थ ठरवायचा आहे. तेव्हां तुकोबा कोणत्या संप्रदायाचे, त्यांचें तत्त्वज्ञान कशा प्रकारचें, त्यांच्या अभंगांत हा शब्द इतरत्र कोणत्या अर्थानें उपयोगांत आणला आहे इत्यादि गोष्टींचा विचार करणें अवश्य आहे.

तुकाराममहाराज हे अद्वैतवेदान्ती होते. तुकाराममहाराज ज्या चैतन्य संप्रदायाचे तो संप्रदाय अद्वैती. त्यांचें ज्या श्रीज्ञानेश्वरी-एकनाथी भागवतादि ग्रंथांचें अध्ययन तेहि सर्व अद्वैतप्रतिपादकच ग्रंथ. यास पुरावा म्हणून त्यांच्या अभंगांतून कितीतरी कडवीं उद्धृत करतां येतील.

**हरि हा व्यापक सर्वगत । हा तंव मुख्यत्वें वेदान्त ।।**
**भूतीं भगवद्भाव । मात्रासहित जीव ।।**
**अद्वैतीं तो ठाव । निरंजनीं एकला ।।**
**कुंभपाक लागे तयासी भोगणें । अवघाचि नेणें देव ऐसा ।।**

अद्वैतवेदान्ताप्रमाणें तुकाराममहाराजांचा सिद्धान्त असा होता कीं, जीव हा मूळचा परमात्माच. "तुका म्हणे हा तो स्वयें परब्रह्म । मूर्ख नेणें वर्म संतचरण ।।" तुकारामबोवा सर्व जीवांना उपदेश करतात, "देवचि बरें देवचि बरें । तुका म्हणे खरें तुम्हीं ।।" सत्‌शास्त्रश्रवणानें व सत्समागमानें मनुष्यास हें कळलें व पटलें म्हणजे त्याच्या मनाची ओढ मूळच्या आपल्या स्वरूपदर्शनाकडे लागते. त्यालाच संतकवि काव्यात्मक भाषेंत रूपकाचा उपयोग करून "घरा" कडे ओढ असें वर्णन करतात. ईश्वराला 'देश' अथवा 'घर' व ईश्वराकडे मनाची ओढ ती 'घराची ओढ' म्हणण्याचा प्रघात

पाश्चात्य, पौर्वात्य सर्व साक्षात्कारी महात्म्यांच्या ग्रंथांत आढळून येतो. उदाहरणार्थ, साधु आगस्टाइन् म्हणे कीं, ईश्वर हा जीवाचा मूळचा देश आहे. ( God is the country of the Soul. ) तर रुइस्ब्रॉक म्हणे, ईश्वर हा त्याचें घर आहे. ( God is his Home. ) एका दृष्टीनें हें रूपक उत्तम आहे. घरांत प्राण्याचा जन्म होतो व तेथें तो स्वभावतः मालक म्हणून वावरतो. तो बाहेर किती जरी हिंडला तरी घरचें स्वातंत्र्य व मालकी त्यास बाहेर अनुभवण्यास मिळत नाहीं. घराबाहेर पारतंत्र्य व तज्जन्य दुःखच भोगावें लागतें. पारतंत्र्य म्हटलें मग तें कोणत्या प्रकारचें का असेना, त्यांत दुःख आहे. " गां दुग्ध दोहामसतीं च भार्यां देहं पराधीनं असत् प्रजां च " ह्या श्लोकावर टीका करतांना श्रीएकनाथांनीं म्हटलें आहे, 'ज्याचें देह पराधीन । तो जीवें जिता सदा दीन । पराधीना समाधान । नव्हे जाण कल्पांतीं ॥ ' जे नेहमीं प्रवास करणारे आहेत त्यांना दुसऱ्याच्या घरीं एक दिवस पाहुणे गेलें असतां कसा संकोच प्राप्त होतो याची कल्पना आहे. सत्शास्त्रश्रवणानें व सत्समागमानें मनुष्यास ब्रह्मस्वरूप हें आपलें मूळचें स्वरूप व तें नित्य, अचल, शाश्वत, सदोदित, ज्ञानघन, आनंदरूप असें आहे असें समजलें व पटलें कीं, त्याला या प्रकृतीच्या राज्यांतील पारतंत्र्यजन्य दुःखाची – म्हणजे जन्ममृत्यु व तज्जन्य दुःख यांची – फार तीव्रतेनें जाणीव होऊं लागते व आपण हरप्रयत्नानें आपल्या मूळच्या स्वरूपाकडे जावें याकरितां तो प्रयत्न करतो व या मार्गांत जो कोणी मदत करील असें त्याला वाटतें त्याची मदत मागतो. तुकाराममहाराज हे स्वतः ब्रह्मस्वरूपांतून जीवदशेंत आल्यानें होणारी जी ब्रह्माची ( आपली ) स्थिति त्याचें परदेशप्रवासाच्या रूपकानें एका अभंगांत फारच सुंदर वर्णन करतात. तो अभंग असा :

" देश वेष नव्हे माझा । सहज फिरत आलों ॥

करूं सत्ता कवणावरी । कोठें स्थिर राहिलों ॥
पाय डोळे म्हणतां माझे । तिहीं कैसा मोकलिलों ।
परदेशी नाहीं कोणी । अंधपांगुळ झालों ॥ १ ॥
आतां माझी करी चिंता । दान देई भगवंता ।
पाठीं पोटीं नाहीं कोणी । निरवी सज्जन संता ॥ २ ॥

जीवात्मा हा आपणास ज्या स्वरूपाचा देह असेल तसें आपण आहोंत असें समजतो व आपण मृत्युलोकांतील एक प्राणी अशी कल्पना करून घेतो. तुकारामबोवा वरील कडव्यांत जेव्हां म्हणतात, "हा" माझा देश नाहीं व "हा" माझा वेषही नाहीं. त्याचा अर्थ असा आहे कीं, मी मृत्युलोकांतील नव्हें, मी "ब्रह्म-देशांतील" रहिवासी आहें. त्याचप्रमाणें माझा खरा वेष हा नव्हे. म्हणजे शरीरावरून जे माणूसपणादि धर्म मजकडे लावले जातात तेही माझे खरे गुण नव्हेत. शरीरावर कपड्यांचें रूपक केलेलें गीतेंत प्रसिद्धच आहे. "वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥ तथा शरीराणि विहाय जीर्णान्यनानि संयाति नवानि देही ॥" गीता अ. २–२२.

असेंच रूपक करून प्रसिद्ध इंग्रज लेखक कालाईल यानें आपल्या सार्टर रिझार्टस् या पुस्तकांत शिप्याचें तत्त्वज्ञान सांगितलें आहे.

तुकारामबोवांचा 'हा देह माझा नव्हे, हा वेष माझा नव्हे' या म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं, 'मी माणूस नव्हें व म्हणून माणूस समजल्यानें येणारे जे विकार 'अस्ति जायते' इ० म्हणजे अस्तित्व, जन्म, मृत्यु हेहि मला नाहींत' याच अर्थाचें 'नाहं मनुष्यः' हे हस्तामलकाचे उद्गार प्रसिद्धच आहेत. मी मूळचा नित्य शुद्ध आनंदस्वरूप आहें.

यावर असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, आपलें आनंदानें भरलेलें घर सोडून बाहेरची हवा खाण्यास कां आलांत? तुकारामबोवांनीं

या महत्त्वाच्या प्रश्नास एक लहानसा सूचक शब्द घालून फारच मार्मिक व मला वाटतें शेवटचें असें उत्तर दिलें आहे. ते म्हणतात, ‘ सहज फिरत आलों. ’ मौज म्हणून आलों. वाटलें, इकडची हवा खावी एवढेंच. यापरतें कांहीं कारण सांगतां येत नाहीं. जीवदशेच्या उगमाचें कारण यापेक्षां वेगळें सांगतां येईल असें वाटत नाहीं.

मौज म्हणून घर सोडून आलों खरा व येथें अधिक सुख होईल म्हणून आशा होती; पण प्रकार दुसराच आढळून आला. येथें सगळेच परके आहेत. दासदासी, चाकर सेवेला पुष्कळ आहेत; पण त्यांची मालकीण दुसरीच आहे. हा नोकरवर्ग तिच्या हुकमतीनें चालतो. तिची मर्जी आहे तोंपर्यंत सेवा करतो; पण तिचा हुकूम सुटला, कीं सेवा बंद व मग माझी इच्छा तशीच राहते. मला कोणी विचारीत नाहीं.

**करूं सत्ता कोणावरी । कोठें स्थिर राहिलों ।**
**पाय डोळे म्हणतां माझे । तिहीं कैसा मोकलिलों ॥**

अभिप्राय असा कीं, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें व मनबुद्ध्यादि संच जीवाची सेवा करण्यास तयार आहे; पण यांचें सेवेचें सामर्थ्य केव्हां खुंटेल हें, माझ्या ताब्यांत हीं इंद्रियें नसल्यामुळें, मला सांगतां येत नाहीं. मी त्यांना माझें म्हणून म्हणतों, पण त्यांच्यावर माझी सत्ता नाहीं. त्यांच्यावर प्रकृतीची सत्ता आहे. ज्या प्रारब्धकर्मानें या शरीरास प्रारंभ झाला आहे त्या कर्माच्या ताब्यांत यांचें जीवित आहे. तें प्रारब्ध संपलें, कीं यांचें काम एकदम स्थगित होतें. डोळे जावेत, कानांना ऐकूं येऊं नये, पायांवरून वारें जावें याकरितां कोणी प्रयत्न करतो का ? ‘ देवा, पन्नास वर्षे या डोळ्यांनीं जगतां-तील मौज पाहिली. आतां हे डोळे जाऊं देत अथवा गेले तरी हरकत नाहीं ’ असें कोणी मागत नाहीं, म्हणत नाहीं, या दिशेनें

कोणी प्रयत्न करीत नाहीं. प्रयत्नच असले तर ते ह्याच्या उलट. डोळे, कान, हात, पाय यांच्या क्रिया व्यवस्थित चालाव्यात म्हणून. अशा स्थितींत हा इंद्रियसमुदाय जीवास सोडून जातो. याचा अर्थच असा कीं, जीव हा परतंत्र आहे. भागवतांतील पुढील श्लोक याबाबत प्रसिद्ध आहे.

**अत्रापि कर्मणां कर्तुरस्वातंत्र्यं च लक्ष्यते ।**

यावर श्रीएकनाथांनीं पुढील सुंदर ओव्या लिहिल्या आहेत :

**जीवासी असती स्वतंत्रता। तरी तो दुःखभोगू न भोगितां। ....**

■ ■ ■

**मजलागीं दुःख व्हावें । ऐसें कोणी भावीना जीवें ।**
**न वांछितां दुःख पावे । येणें संभवे स्वतंत्रता ।।**

श्रीज्ञानदेवांनींहि पुढीलप्रमाणें म्हटलें आहे :

**हा गा रोग काय रोगियां। आवडे दरिद्र दरिद्रियां।**
**परि भोगविजे बळियां। अदृष्टें येणें।।**

तात्पर्य, जीवात्मा हा देहांत राहतो आणि देहाला व त्यांतील इंद्रियांना आपलें म्हणतो; पण यांपैकीं एकावरहि त्याची सत्ता नाहीं. आपण देह आपला म्हणतों; पण तो केव्हां सोडावयाचा हें आपल्या हातांत आहे का ? देह सोडण्याकरितां विहिरींत जीव दिलेलीं अथवा अफू खाल्लेलीं माणसें जिवंत राहिलेलीं दिसतात. उलट तरणींताठीं माणसें, ज्यांना मरणाची कल्पना नाहीं तीं ठेंच लागून अगर ' हार्टफेल ' होऊन मेलेलीं दिसतात. याचा अभिप्राय असा कीं, हीं सर्व ' परकीय '; यांच्यावर सत्ता दुसऱ्याची व वरतीं म्हटल्याप्रमाणें जें ' परतंत्र ' तें दुःखाला कारण. ' यत् स्वायत्तं तत् सुखं यत्परायत्तं तद्दुःखम् ।' हाच विचार तुकारामबोवा प्रथम कडव्याच्या वर दिलेल्या भागांत व्यक्त करतात. ' पाय डोळे म्हणतां माझे ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वरूप २५

तिहीं कैसा मोकलिलों।''पाय-डोळे माझे म्हणतों पण तीं तर मला सोडून गेलीं. तात्पर्य, 'मी परदेशी आहें.' मला घरीं जाण्याचा मार्ग दिसत नाहीं व चालावयास पायहि नाहींत. तेव्हां हे देवा, मला दृष्टि दे, मार्ग दिसूं दे.

तात्पर्य, मूळ स्वरूपाकडे गेल्यानें स्वायत्त, अखंड असा आनंद प्राप्त होतो म्हणून मूळ स्वरूपास 'स्वदेश', 'आपलें घर' असें रूपकानें म्हणतात व तुकाराममहाराज संकीर्तनाच्या अभंगांत 'घर' हा शब्द याच अर्थानें वापरतात.

भागवतसंप्रदायांत जिला 'माउली' म्हणतात त्या ज्ञानेश्वरींतहि मूळ स्वरूपास घर म्हटलें आहे :

**अगा पैं पांडुकुमरा। येतां स्वरूपाचिया घरा।**
**करीतसे आडवारा विश्वाभास जो॥** अ. १५

भगवद्गीतेंतील —

**ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः।**
**तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी॥**
अ. १५, श्लो. ४.

यांतील 'आद्य पुरुषं' व 'यस्मिन् गता निवर्तन्ति भूयः' यावर लिहितांना श्रीज्ञानेश्वरमहाराज लिहितात :

**पैं भवस्वर्गा उबगले। मुमुक्षु योगज्ञाना वळघले।**
**पुढती न यों इया निगाले। पैजा जेथ॥**
**संसाराचिया पायां पुढां। पळती वीतराग होडा।**
**ओलांडोनि ब्रह्मपदाचा कर्मकडा। घालिती मागां॥**
**अहंतादिभावा आपुलिया। झाडा देऊनि आघवेयां।**
**पत्र घेती ज्ञानिये जया। मूळ घरासी॥** २७७–२८०

येथें 'आद्यवस्तूला' 'मूळघर' असें म्हटलें आहे. या ओव्यांतून

ज्ञानराजांनीं परमार्थपथ कोण आक्रमण करतात, त्यांना अडथळा कोण करतो व साधक आपल्या मूळ स्वरूपस्थितीला कसा पोहोंचतो याचें फारच उत्कृष्ट वर्णन केलें आहे.

संसारांतील सुखाचें मोजमाप घेऊन तें हलुवट आहे असें ज्यांना पटलें ते या स्वर्गसंसाराला कंटाळून आत्मस्वरूपाकडे नेणाऱ्या योग-ज्ञानाच्या मार्गाकडे वळतात. पण संसार त्यांना सोडीत नाहीं. व्यवहारांतला दृष्टान्त द्यावयाचा तर आपलें गिऱ्हाईक जावें असें कोणाहि दुकानदारास वाटत नाहीं. गिऱ्हाईक जाऊं लागलें तर तो हरप्रयत्नानें तें टिकविण्याचा प्रयत्न करतो. तसेंच तुम्ही आम्ही सर्व संसाराचीं गिऱ्हाइकें. यांपैकीं एखादें त्याला सोडून जाऊं लागलें तर संसार त्याला सुखासुखी जाऊं देत नाहीं. साधक संसारापासून दूर पळण्याचा प्रयत्न करतो. संसार त्याच्या मागें लागतो. उदाहरणार्थ, परमार्थी साधक संसार नको म्हणून लग्न करीत नाहीं, घरदार इत्यादि इस्टेटीच्या मागें लागत नाहीं, बोवा होतो. पण त्याला संसार कोठें सोडतो? घर नाहीं तर तो मठाच्या रूपानें आडवा येतो. मुलेंमुली नाहींत तर शिष्यशिष्यिणींच्या रूपानें पुढें येतो. शेताच्या तंट्याऐवजीं मठाच्या जमिनीचे तंटे हा साधक भांडूं लागतो. ज्ञानेश्वरमहाराजांनीं म्हटलें आहे :

देखें विषय हे तैसे। पावती ऋद्धिसिद्धिचेनि मिषें।
मग आकळिती स्पर्शें। इंद्रियांचेनी॥
तियें संधी मन जाये। मग अभ्यासीं ठोठावलें ठाये।
.................... अ. २, ३१३–१४

शिष्यशास्त्रादि विलासें। मठादिमुद्रेचेनि मिसें।
घातले आहाती फांसे। निसंगा जेणें॥
घरीं कुटुंबणें सरे। तरी वनीं वन्य होऊनि अवतरे।
नागवीयाही शरीरें। लागला आहे॥ १८– १०६४–६५

तात्पर्य, साधक प्रपंच सोडूं लागला तर प्रपंच वेष पालटून त्याच्या समोर उभा राहतो. नव्या स्वरूपांत विलोभन तयार होतें व मग साधक त्याच्यांतच अडकला जातो व पुढचें परमार्थ-पथावरील चालणें तसेंच राहतें. हा प्रपंच बाहेरून शिष्य-शाखांच्या रूपानें साधकाला अडवीत असला तरी त्याचीं अडविण्याचीं खरीं रूपें अहंकारादि विकार हींच आहेत. साधक बाहेरच्या उपाधीचा त्याग करील; पण हे जे आंतरशत्रु आहेत त्यांचें निर्मूलन करणें फारच कठीण आहे. साधक स्वपराक्रमानें तें करूं शकत नाहीं. तुकारामबोवा म्हणतात :

**एकाचेंही मज न घडे दमन । अवघींच नेमून राखूं कैसीं ॥**
**कामें नेलें चित्त नेदीं अवलोकूं मुख ।**
**बहु वाटे दुःख फुटों पाहे हृदय ॥**
**काम क्रोध आड पडले पर्वत । ........**

अशा अडचणींत असतांना त्यांतून कोण सोडवील असा विचार करतांना त्यांना आढळून आलें कीं, या शत्रूपासून सोडविणारा एक परमात्मा श्रीहरि आहे. म्हणून ते त्याची प्रार्थना करूं लागले :

**संसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥**

■ ■ ■

**वेढियलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥**

■ ■ ■

**म्हणऊनी तुझे आठवले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥**

वर उद्धृत केलेल्या 'देश वेष नव्हे माझा' या अभंगांतसुद्धां अशीच प्रार्थना आहे.

तुकाराममहाराजांच्या प्रार्थनेस भगवंतांनीं ओ दिली. त्यांच्यावर सगुणपरमात्म्याची कृपा झाली. तेव्हां तुकारामबोवांना आपण स्वरूप-स्थितीच्या मुक्कामापर्यंत पोंचूं अशी खात्री झाली व ते म्हणतात :

आतां पाविजेल घरा । या दातारा संगतीं ॥

या अभंगाच्या शेवटच्या कडव्यांत ' दाताराला ' चक्रपाणी या नांवानें संबोधिलें आहे तें सहेतुक आहे हें वरतीं म्हटलें आहे. श्रीएकनाथांच्या खालील ओव्या आपण लक्षांत घेतल्या, कीं त्या विशेषणाचें मर्म आपल्या लक्षांत येईल. ते म्हणतात, ' या भक्तिमार्गांत पांथिकाचें रक्षण करण्याचें काम स्वतः परमात्मा जातीनें करतात. '

यापरी हरिकीर्तन । देत परम समाधान ।
हा भक्तिराजमार्ग पूर्ण । इये मार्गीं संरक्षण ।
चक्रपाणी करता ॥ चक्र घेउनी भक्तांचे ठायीं ।
म्हणसी तुझें कार्य कायी । मज जगीं वैरिया नाहीं ।
भक्तद्वेषी पाहीं । निजशस्त्रें नाशी ॥

देव भक्तांच्या कोणत्या शत्रूचा नाश करतो व कोणत्या साधनानें करतो त्याचा विचार पुढील ओवींत ते सांगतात :

चक्रें अभिमानाचा करी चेंदा । मोहममता छेदी गदा ।
शंखें उद्बोधीं निजबोधा । निजकमळें सदा निजभक्त पूजी ॥

हें सांगण्याचा हेतु असा कीं, तुकारामबोवांना स्वरूपदर्शनाच्या आड येणारे अहंतादि विकार नाहींसे व्हावे असें वाटूं लागलें. या चक्रपाणी दाताराचें साहाय्य मिळालें. म्हणून ते म्हणतात, " दातारांची गांठ पडल्यापासून तों निर्गुणस्वरूपाचा बोध होईपर्यंत सर्व स्थानांवर याचीच मालकी. हा सर्व अडचणींना दूर करणारा असा रक्षक मिळाला; आतां भीति कसली ?

तुकोबा पुढील कडव्यांत भगवंतांचें फारच सुंदर वर्णन करतात :

चतुरां तूं शिरोमणी । गुण लावण्याची खाणी ।
मुगुट सकळांमणी । धन्य तूंचि विठोबा ॥

साधकांस तारण्यास चतुर व सकळ गुणसंपन्न आणि शक्तिमान् अशा प्रभूची कृपा झाल्यावर अडचण कसली ?

**तुका म्हणे चक्रपाणी । शिरोमणी बळियांचा ।**

तुकाराममहाराजांनीं नुसती या अभंगांत आशाच प्रकट केली आहे असें नव्हे, तर त्यांनीं स्वरूपाच्या ठिकाणीं कायमची वस्तीच केली. ते म्हणतात :

**निरंजनीं आम्हीं बांधियेलें घर । निराकारी निरंतर राहिलोंसें ॥**

वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं, आरंभीं उपस्थित केलेल्या तपशिलाच्या बहुतेक मुद्यांचें विवेचन झालें आहे. शेवटीं या अभंगांत प्रत्यक्ष न उल्लेखिलेल्या पण या अभंगांतील विषयाच्या पूर्ततेकरितां ज्याची आवश्यकता आहे असा एक मुद्दा मांडून हें संकीर्तन पुरें करतों.

तुकोबांना ' दातारचें ' साहाय्य मिळालें व त्यांचें काम झालें. पण त्यांना हें साहाय्य कशानें मिळालें व कशाच्या बळावर शेवटपर्यंत त्यांचें मार्गदर्शन लाभलें याचा विचार करणें अवश्य आहे. पण यासंबंधीं फार शोध घेण्याचें कारणच नाहीं. तुकारामबोवाच एका अभंगांत हें सर्व सांगतात :

**आतां येणें बळें पंढरिनाथ । जवळीं राहिला तिष्ठत ।**
**पाहतां न कळे जयाचा अंत । तोचि हृदयांत घालूं आतां ॥ १ ॥**
**विसरोनि आपला देहपण भावो । नामेंचि भुलविला पंढरिरावो ।**
**न विचारी याति कुळ ठावो । लागावया पावो संतांचे ॥ २ ॥**
**वरें वर्म आलें आमुच्या हातां । हिंडावें धुंडावें न लगतां ।**
**होय अविनाश साहाकारी दाता । चतुर्भुज संतां परि धाके ॥ ३ ॥**

• • •

# धर्म रक्षावयासाठीं —: ::३::

धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हांसी ॥ १ ॥
वाचा बोलों वेदनीति । करूं संतीं केलें तें ॥ २ ॥
न बाणतां स्थिति अंगीं । कर्म त्यागी लंड तो ॥ ३ ॥
तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ॥ ४ ॥

आजचा जो संकीर्तनाचा अभंग आहे याला तुकारामबोवांचें अवतारकार्य अथवा त्यांची शिकवण या दृष्टीनें विचार करतां फार महत्त्व आहे. तुकारामबोवा धर्मरक्षण करणें या कार्यास किती महत्त्व देत होते याची कल्पना देण्याकरितां तुकारामबोवा कोणत्या भूमिकेस प्राप्त झाले होते याची थोडीशी कल्पना वाचकांना आणून देणें अवश्य आहे.

तुकाराममहाराजांच्या सान्निध्यांत राहणाऱ्या मनुष्यास त्यांच्या बोलण्यांत व कृतींत विरोध दिसून येऊं लागला. तोंडानें ते म्हणत :

" तुका म्हणे मुक्ति परिणली नोवरी ।
आतां दिवस चारी खेळीमेळी ॥

■ ■ ■

काम नाहीं काम नाहीं । झालों पाहीं रिकामा ॥ "

व्यवहारांत जसा एखादा मनुष्य आपल्या मुलाचें लग्न झालें व तो धंद्याला लागला कीं ' गंगेंत घोडें नाहिलें ! ' ' आमचें काम संपलें ! ' असे कृतकृत्यतेचे उद्‌गार काढतो, तसेंच, पण पारमार्थिक क्षेत्रांतले तुकारामबोवांचे हे उद्‌गार आहेत.

" ज्ञानामृतेन तृप्तस्य कृतकृत्यस्य योगिनः ।

नैवास्ति किंचित् कर्तव्यं अस्ति चेत् न स तत्त्ववित् ॥"
अथवा गीता सांगते :

"कृतकृत्यश्च भारत ।"

ज्ञानेश्वरमहाराज लिहितात :

"ज्ञानिया पुरुखा । कर्तव्य करूं सरले देखा ।
ऐसा अनाथाचा सखा । बोलिला तो ॥"
"अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः"

अशा पूर्णाच्या कृतकृत्यतेच्या भूमिकेवर आपण आरूढ झालों असें त्यांनीं म्हणावें.

पण प्रत्यक्ष कृति पाहिली तर अहोरात्र भजन-कीर्तन करावें, गांवोगांवीं हिंडून लोकांना उपदेश करावा, रात्रीचा दिवस करावा; पण दिवसाची रात्र करूं नये.

"दिनरजनी हाचि धंदा । गोविंदाचें पवाडे ॥"

बरें, इतकें करून कीर्तन व भजनें करून पैसा मिळवतात म्हणावें तर तेंहि नाहीं. कीर्तनावर पैसे घेणें म्हणजे त्यांच्याच भाषेंत बोलावयाचें तर 'मातेचा विक्रय' करण्याइतकें ते निंद्य समजत.

कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥

■ ■ ■

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥ १ ॥
बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ॥ २ ॥
तट्टा-वृषभासी दाणा । तृणा मागों नये जाणा ॥ ३ ॥
तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ॥ ४ ॥

तात्पर्य, कीर्तन करावें पण द्रव्य घेऊं नये. 'माळ घाल,' 'भजन कर' असें शिकविल्याबद्दल मिळालाच लाभ तर शिष्यांचा! दुसरा कांहीं दृश्य लाभ नाहीं. बरें, स्वतः कांहीं मिळवावयाची

हौस असावी कीं त्या आशेनें कष्ट करावेत, तर वर म्हटल्याप्रमाणें आपण निष्काम, कर्तव्यशून्य झालों असे ते उद्गार काढीत. बोलणें कृतकृत्यतेचें व क्रिया तर अखंड व तीहि अशी कीं, ज्यांत पोटास उपयोगी येईल, घरचें दारिद्र्य दूर होईल असा लाभ कांहींच नाहीं. तेव्हां हें पाहून त्या गृहस्थानें प्रश्न केला कीं, ' महाराज, येवढा हा खटाटोप चालवलेला आहे हा कशाकरितां ? ' त्यास बोवा या अभंगांत उत्तर देतात :

**धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हांसी ॥ १ ॥**

आटी म्हणजे आटाटी, श्रम, खटाटोप, अट्टाहास. आम्ही जो हा खटाटोप करतों तो ' धर्म रक्षण्याकरितां. ' वर जी भूमिका म्हणून सांगितली तिचा हेतु असा कीं, ' तस्य कार्यं न विद्यते ' या स्थितीस प्राप्त झालेले तुकारामबोवा यांनाहि धर्म रक्षण करण्यायोग्य वाटतो ! इतका धर्म हा महत्त्वाचा आहे कीं, कर्तव्यशून्य झालेल्यांनींहि आपली नैष्कर्म्य स्थिति बाजूला ठेवून तो नांदावा याकरितां प्रयत्न करावा ? तें आपण पुढें पाहूं. तूर्त भावार्थाचा विचार करूं.

तुकारामबोवांनीं धर्म रक्षण्याकरितां आपण हा अट्टाहास करतों असें जेव्हां सांगितलें, त्यावर असा प्रश्न केला गेला असावा कीं, धर्म रक्षण्याकरितां प्रयत्न करतां हें समजलें; पण कोणत्या धर्माचें तुम्ही रक्षण करणार ? का एखादा नवीन धर्म अथवा अलीकडील भाषेंत बोलावयाचें तर ' समाज ' स्थापन करणार ?

वास्तविक धर्माचें ' रक्षण ' करणार असें ते म्हणत असल्यानें नवीन धर्म स्थापणार का, असा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. या दृष्टीनें नवीन धर्म स्थापणार का, हा प्रश्न चुकीचाच ठरेल; पण तसें वाटण्याचें कारण नाहीं. हा प्रश्न करतांना ' धर्म ' हा शब्द व्यापक अर्थानें श्रोता समजतो येवढें लक्षांत घेतलें म्हणजे झालें.

तुकारामबोवा त्याच्या या प्रश्नाला उत्तर म्हणून पुढचें कडवें देतात :

**वाचा बोलूं वेदनीति । करूं संतीं केलें तें ॥ २ ॥**

या कडव्याचा सरळ अर्थ असा आहे कीं, आम्ही तोंडानें उपदेश करतांना वेदांत सांगितलेल्या नीतीचा अवलंब करूं व संतांनीं केलें तें करूं. या दोन्ही कडव्यांच्या अर्थाकडे नजर देणें अवश्य आहे. कारण वर जो प्रश्न मांडला आहे त्यास या कडव्यांत उत्तर आहे. ' वेदनीति सांगूं ' असें म्हणण्यांत तुकारामबोवांना असें सुचवावयाचें आहे कीं, आपण वैदिक धर्माचें रक्षण करूं.

आमच्याकडील परंपराच अशी आहे कीं, सर्व मोठे धर्मप्रसारक अथवा धर्माची घडी नीट बसाविणारे नवीन धर्म स्थापूं असें म्हणत नाहींत. अनादि कालापासून चालत आलेला जो वैदिक धर्म त्याला उजळा देऊं, असेंच ते म्हणतात. खुद्द भगवान् श्रीकृष्ण गीतेंत आपण ' धर्मसंस्थापने ' करितां – ' स्थापनेकरितां ' नव्हे – आलों असें सांगतात.

**" धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ "**

असे गीतेंत शब्द आहेत.

आमच्याकडील नास्तिक व आस्तिक या शब्दांच्या व्याख्यासुद्धां याबाबत लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. ईश्वराचें अस्तित्व मानीत नाहीं तो नास्तिक, अशी आमच्याकडील नास्तिकाची व्याख्या नाहीं. वेदप्रामाण्य मानीत नाहीं तो नास्तिक व जो तें मानतो तो आस्तिक अशा आमच्या व्याख्या आहेत. ' नास्तिको वेदनिंदकः ' कपिलांचें सांख्यशास्त्र ईश्वर मानीत नसतांनासुद्धां त्या शास्त्राचा आस्तिक-दर्शनांत अंतर्भाव केला जातो; कारण तें शास्त्र वेदप्रामाण्य मानतें. श्रीज्ञानदेवांनीं ' ज्ञानेश्वरी ' च्या

तेराव्या अध्यायांतसुद्धां वेदप्रामाण्य न मानणारा तो नास्तिक असेंच सुचविलें आहे.

**नास्तिका द्यावया तोंड । वेदांचें गाढें बंड ।।**
**तें देखोनि पाखांड । आनचि वाजे ।। ........**

तुकारामबोवासुद्धां नास्तिकाची व्याख्या अशीच करतात. ते म्हणतात,

**वेदबाह्य लंड बोले तो पाषांड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ।।**

तुकारामबोवांना वेदासंबंधानें परमादर होता, हें त्यांच्या खालील उक्तीवरून स्पष्ट होणारें आहे :

**मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ।।**
**वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकिया खळ ।।**

ते आणखी एके ठिकाणीं म्हणतात :

**वेदाज्ञें करोनि न करिती स्वहित । नव्हती अलिप्त देहाहूनि ।।**

तात्पर्य, या त्यांच्या उक्तीवरून स्पष्ट होणारें आहे कीं, तुकारामबोवा वैदिक होते व ते वैदिक धर्माचें रक्षण करण्याकरितां खटपट करतों असें म्हणतात.

रस्ता जुनाच, पण लोकांची रहदारी थांबली म्हणजे कालांतरानें त्यावर धूळ जमा होते व मग तो मार्ग दिसेनासा होतो. पण ज्याला त्या मार्गाची ओळख आहे असा कोणी निर्माण झाला कीं तो म्हणतो, "अहो, हा मार्ग जुनाच आहे. धूळ वर फार झाल्यानें तुम्हांला दिसत नाहीं. मी धूळ काढतों म्हणजे तुम्हांस दिसेल." ज्ञानेश्वरमहाराज असेंच म्हणतात. धर्ममार्ग जुनाच; पण प्राण्यांचा भर कामावर पडल्यानें आत्मविस्मृति होते.

**" जे प्राणियां कामीं भरू । देहाचि वरी आदरू ।**
**म्हणौनि पडिला विसरू । आत्मबोधाचा ।। "**

तुकारामबोवा आपल्या वेळच्या स्थितीचें एके ठिकाणीं पुढील-प्रमाणें वर्णन करतात :

अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।।
विषयलोभी मनें । साधनेंहि बुडविलीं ।।

पुराणें शब्दरूपानें जिवंत आहेत; पण त्यांचा अर्थ लोकांना कळेनासा झाला. लोक तोंडानें ब्रह्मज्ञानाच्या गप्पा मारूं लागले; पण साधन कोणी करीना.

म्हणून तुकारामबोवा म्हणतात कीं, आम्ही वैकुंठांत राहणारे, लोकांना ऋषींनीं घालून दिलेले मार्ग कळावे म्हणून या मृत्युलोकांत अवतरलों.

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।।
बोलिले ते ऋषि । साच भावें वर्ताया ।।
झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग ।।
उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ।।

■ ■ ■

उजळावया आलों वाटा । खराखोटा निवाड ।।

तात्पर्य, तुकाराममहाराज हे नवीन धर्म स्थापन करण्याच्या भानगडींत न पडतां ऋषिप्रणीत जो सनातन धर्म त्याचें रक्षण करणार असें सुचवितात.

पण पुढें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, तोंडानें वेदनीति सांगणार पण संतांनीं केलें तें करणार असा भेद कां ? त्याचाहि अभिप्राय विचार करण्यासारखाच आहे. आपल्या या धर्माच्या इतिहासाकडे आपण जर पाहिलें तर आपणांला असें आढळून येईल कीं, वैदिक धर्माचें रक्षण करण्याकरितां वेगवेगळ्या वेळीं धर्माच्या वेगवेगळ्या अंगांवर धर्मरक्षकांनीं जोर दिला. बौद्ध धर्माची

लाट उसळली त्या वेळीं कुमारिलभट्टांनीं लुप्त झालेल्या कर्ममार्गावर जोर दिला व लोकांची दृष्टि तिकडे वळविली. पुढें लोक कर्मजड बनत चालले, तेव्हां शंकराचार्यांनीं लोकांना ज्ञान सांगून पुन्हा वैदिक धर्माची संस्थापना केली. संतांचा काल असा आला कीं, त्या वेळीं कर्मजाड्य व ज्ञानपाखंड माजलें. संतांनीं भक्तिमार्गावर जोर दिला व आपण ज्याला 'संघटना' म्हणतों ती केली. समाजाचे सर्व थर एकत्र आणून तो सुसंघटित करण्यास भक्तिमार्गाचा फार उपयोग झाला. तुकारामबुवा म्हणतात :

**झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग ॥**
**उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ॥**
**पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ॥**
**तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥**

भक्ति ही सर्वसंग्राहक आहे. तींत सर्वांना सारखाच अधिकार.

**सकळांसी येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिच्या नामें ॥**
**यारे यारे लहान थोर । याती भलते नारीनर ॥**
**करावा विचार । नलगे चिंता कोणासी ॥**

उच्छिष्टाचा भाग सेवूं यांचा अर्थ शेष राहिलेला जो भक्तिमार्ग त्याचा प्रसार करूं.

तात्पर्य, दुसऱ्या कडव्यांत तुकाराममहाराज सुचवितात कीं, आपण वैदिक धर्माचें रक्षण करणार व तें संतांच्या मार्गानें जाऊन करणार. तुकारामबोवा भक्तीचा डांगोरा पिटणार म्हणजे निवृत्तीच नुसती शिकवणार असें वाटण्याचा संभव. संभव कसला, तुकारामबोवांच्या शिकवणुकीचें रहस्य न समजून कित्येक जाणत्या लोकांनीं "या संतांनीं देश बुडविला !" अशी हांकाटी कित्येक वर्षेंपर्यंत केली; परवांपरवांपर्यंत करीत होते.

तुकारामबोवांना याची कल्पना होती. यांच्या पुढच्या दोन कडव्यांतून आपण वैदिक धर्माच्या दोन्ही अंगांचें रक्षण करणार असें ते सुचवितात :

**न बाणतां स्थिति अंगीं। कर्म त्यागी लंड तो ॥ ३ ॥**
**तुका म्हणे अधम त्यासी। भक्ति दूषी हरीची ॥ ४ ॥**

या दोन्ही कडव्यांतील तुकारामबोवांचे उद्‌गार रागावून निघालेले दिसतात. आत्मस्थिति अंगीं न बाणतां आपल्या कर्मांचा त्याग करतो त्याला तुकारामबोवा कर्मलंड म्हणजे कर्मपाखंडी – नास्तिक – म्हणतात व जो भगवंताच्या भक्तीला नांवें ठेवतो त्याला अधम म्हणतात. याबाबत जातां जातांना एवढेंच सांगावयाचें आहे कीं, तुकारामबोवांचा हा राग आईच्या रागासारखा आहे. मोहानें अंध झालेल्या लोकांच्या डोळ्यांवरची झांपड जावी म्हणून ही शाब्दिक चपराक आहे. आई जरी रागावून 'मर!' म्हणाली तरी त्याचा अर्थ 'जग!' असाच असतो. रागांत दोन प्रकार करावे लागतात: एक मत्सरादि विकारजनित व दुसरा प्रेमजनित. तुकारामबोवांनींच एके ठिकाणीं म्हटलें आहे :

**क्षोभ आणि कृपा मातेची समान।**

देवसुद्धां गीतेंत एके ठिकाणीं रागावून बोलतांना दिसतात :

**"न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ॥"**
(अ. ७)

तात्पर्य, तुकारामबोवांनीं कामक्रोध जिंकले होते. मंमाजीबोवांनीं घेतलेल्या परीक्षेंत तुकारामबोवा उतरले हें प्रसिद्धच आहे. पण गोड बोलून सर्व कामें होत नाहींत, तेथें रागवावेंच लागतें, हें जाणून कठोर शब्द वापरतात. रोगी ओरडला तरीसुद्धां वैद्यानें शस्त्र उपयोगांत आणून त्याचें गळूं कापून त्याला तोंड फोडणें अवश्य.

कारण, जर रोग्याची कींव करून रोगाला गोंजारीत बसलें तर रोगी मरेल.

**पोभाळितां चरे अंतरींचें दुःख । लांसे फांसे मुख उघडावें ॥**

■ ■ ■

**तुका म्हणे लासूं फासूं देऊं डाव । सुखाचा उपाव पुढें आहे ॥**

ज्याला खरें कार्य करावयाचें आहे, लोकांचे दुर्गुण घालवावयाचे आहेत त्यानें लोकांच्या हृदयाला जाऊन बोंचेल अशी कडक भाषाच वापरावयास पाहिजे.

तुकारामबोवा अक्रोधस्थितीला प्राप्त झालेले खरे.तेच म्हणतात :

**काम क्रोध लोभ निमाले ठायींची।अवघी आनंदाची सृष्टि झाली॥**

■ ■ ■

**काम क्रोध बंदिखानीं । तुका म्हणे दिले दोन्ही ।**
**इंद्रियाचे धनी । आम्ही झालों गोसावी ॥**

असें असूनहि लोकांच्या कल्याणाकरितां उसना राग आणून बोलतात. खरें पाहिलें असतां आपणांस आढळून येईल कीं, पुष्कळ वेळेला ज्याचें आंतडें तुटतें तोच रागावतो. इतरांना राग येतच नाहीं. राग हा हितविषयक कळकळीचा परिणाम आहे. बायबल-मध्येंसुद्धां येशूनें Vipers, Serpents असे उद्‌गार रागावून काढलेले आढळून येतात. तात्पर्य, तुकारामबोवा ‘ लंड ’, ‘ अधम ’ म्हणतात, यावरून ते रागीट अथवा क्रोधी होते अशी कल्पना करण्याचें कारण नाहीं. त्यांच्याच शब्दांत त्यांचें वर्णन करावयाचें झालें तर ते ‘ कृपावंत मायबाप संत ’ होते व म्हणूनच कळकळीनें असे कडक शब्द वापरतात. असो. हा जातां जातांना सांगण्याचा भाग झाला.

तुकारामबोवा प्रवृत्ति आणि निवृत्ति हीं आपल्या धर्माचीं जीं

दोन अंगें आहेत त्या दोहोंच्या रक्षणाचा प्रयत्न करतात. **निवृत्तिविना प्रवृत्ति आंधळी** आहे. **प्रवृत्तीविना निवृत्ति पांगळी आहे.** ह्या दोन्ही एकमेकांच्या पोषक आहेत. कणादांनीं धर्माची जी व्याख्या केली आहे ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ते म्हणतात :

**" यतोऽभ्युदयनिःश्रेयसिद्धिः स धर्मः "**

ज्याच्या योगानें इहलोकांतील वैभव व परम कल्याण दोन्ही प्राप्त होतात तो धर्म.

महाभारतांतसुद्धां —

**" धारणात् धर्ममित्याहुः धर्मेण विधृताः प्रजाः ।**
**यः स्यात् धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥ "**

अशीच धर्माची व्याख्या केलेली आहे.

प्रवृत्ति आणि निवृत्ति हीं धर्माचीं दोन अंगें असल्यानें ज्याला धर्माचें रक्षण करावयाचें आहे त्याला दोन्ही अंगांचें रक्षण करणेंच अवश्य आहे. एक अंग लुळें ठेवून शरीर जसें योग्य काम देणार नाहीं, तसा धर्म हा एकाच अंगाचें रक्षण केलें तर लुळापांगळा होईल; म्हणजे जगाची धारणा करण्यास समर्थ होणार नाहीं, याची तुकारामबोवांना जाणीव होती. शरीराचें रक्षण करावयाचें म्हणजे उजव्या व डाव्या दोन्ही अंगांचें रक्षण करणेंच अवश्य. याची कल्पना येण्याकरितां थोडक्यांत एक गोष्ट सांगतों :

एक महाराज होते. त्यांनीं आपल्या उजव्या-डाव्या अंगांची सेवा करण्याकरितां दोन शिष्य ठेवले होते. पण ते शिष्य मूर्ख होते. एक दुसऱ्याचें काम करावयाचा नाहीं असे होते. एकदां महाराजांचा उजवा हात दुखूं लागला; पण त्याची सेवा करणारा शिष्य गैरहजर होता. तेव्हां डाव्या हाताची सेवा करणाऱ्या शिष्याला त्यांनीं उजवा

हात दाबण्यास सांगितलें. यावर तो म्हणाला, ‘ मी डाव्या हाताचा सेवक आहें. मी उजव्या हाताची सेवा करणार नाहीं.’ हात फार दुखत असल्यानें व शिष्याच्या बुद्धीची खोली न कळल्यामुळें त्या डाव्या हाताच्या सेवेकरी शिष्याला गुरुजींनीं उजव्या हाताची सेवा करण्याचा फारच आग्रह केला.

अखेर त्या शिष्यानें उजव्या हाताची सेवा केली; पण दांतओंठ चावून अशी केली कीं, तो उजवा हात बरा होण्याऐवजीं अधिकच दुखूं लागला. दुसऱ्या दिवशीं उजव्या हाताची सेवा करणारा नेहमींचा शिष्य आला. तेव्हा गुरुजींनीं मोठ्या कळकळीनें आदल्या दिवशींची घडलेली हकीकत त्याला सांगितली. त्यावर तो मूर्ख शिष्य म्हणूं लागला, “ ठीक आहे ! माझा ( सेवेचा ) उजवा हात त्यानें अधिक बिघडवला, त्याचा ( सेवेचा ) डावा हात तरी आतां चांगला कसा राहतो तें मी बघतों ! ” त्यावर गुरुजी म्हणाले, “ अरे बाबा, दोन्ही माझींच अंगें आहेत; दोन्ही मिळून मीच. ”

तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात :

**वाम सव्य भाग । तुका म्हणे एकचि अंग ।।**

या गोष्टीचें तात्पर्य असें आहे कीं, संपूर्ण शरीराचें रक्षण करावयाचें असेल तर एकाच अंगाचें रक्षण करून चालणार नाहीं. तसेंच जर धर्माचें रक्षण करावयाचें असेल तर नुसत्या प्रवृत्ति या अंगाचें अथवा नुसत्या निवृत्ति या अंगाचें रक्षण करून काम भागणार नाहीं. दोन्ही अंगांचें रक्षण करणें अवश्य आहे.

तुकारामबोवा आपल्या स्वतःसंबंधानें सांगतांना म्हणतात कीं, “ मी प्रवृत्ति-निवृत्तीची कावड चालवितों. ”

**तुका चालवितो कावडी । प्रवृत्ति निवृत्ति चोखडी ।**
**पुढती पुढती अधिक गोडी । भरूनि कळस भजन आवडी ।**
**केशवदास नटतसे ।।**

तुकारामबोवा संकीर्तनाच्या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यांत प्रवृत्तिरूप धर्माचें अंग त्याचा प्रथम उल्लेख करतात व ती जो टाकतो तो नास्तिक असें म्हणतात. या कडव्यांत जें प्रमेय बोवांना सांगावयाचें आहे तेंहि महत्त्वाचें आहे. आपल्याकडील साधुसंतांचा कर्माविषयींचा सिद्धान्त लक्षांत घेण्याजोगा आहे. ते म्हणतात, " कर्म सुटतें. " कर्म टाकावें असें कोणीच सांगत नाहीं. ज्ञानेश्वर-महाराजांनीं पंधराव्या अध्यायांतील ' निर्मानमोहा: ' या श्लोकावर लिहीत असतांना खालील ओवींत कर्म कसें व कां सुटतें याचें मोठें सुंदर विवेचन केलें आहे. ते म्हणतात :

**" फळली केळी उन्मळे । तैसी आत्मलाभें प्रबळें ।**
**जयांची क्रिया ढाळें ढाळें । गळती आहे ।। "**

केळीला एकदां लोंगर लागले कीं तिचा परिपाक झाला. त्यानंतर ती जशी उन्मळून पडते तसा प्रबळ आत्मलाभ झाला कीं क्रिया आपोआप हलके हलके गळतच जाते. जवळचा दृष्टान्त जर द्यावयाचा तर झोंपेच्या जवळ जसजसा मनुष्य येतो तसतसें त्याचें बोलणें वगैरे व्यवहार बंद पडतात. तसेंच झोंपेच्या—आनंदमय कोशाच्या—पलीकडे असणारी आत्मस्थिति तेथें वृत्ति नाहींशी झाली, कीं क्रिया थांबते. अर्थातच याचा अर्थ असा कोणी समजणार नाहीं, कीं आत्मस्थिति म्हणजे झोंपच आहे. या दोहोंत वेदान्त-शास्त्रदृष्ट्या दोन फरक आहेत. पहिला असा कीं, झोंपेंत अज्ञानाचें आवरण आहे. आत्मस्थिति ज्ञान-प्रकाशमय आहे. झोंपेच्या पाठीमागें जागणें आहे. या स्थितीच्या मागें बदल नाहीं, ही अखंड जागृति आहे. म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांनीं या अवस्थेचें ( चांगदेव-पांसष्टींत ) खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे :

**" निद्रे परौतें निदैजणें । जागृति गिळोनि जागणें ।**
**केलें तैसें गुंफणें । ज्ञानदेवो म्हणे ।। "**

झोंप व ही स्थिति यांत साम्य एवढेंच आहे कीं, या दोन्ही अवस्थांत वृत्ति देहाला सोडून गेलेली असते. दोहोंत मोठा फरक – झोंपेंत ती अज्ञानांत लीन झालेली असते व आत्मस्थितींत परमात्म-स्वरूपांत नाहींशी झालेली असते. तुकारामबोवांनीं या अवस्थेचें वर्णन एका ' आंधळ्यां ' त फारच उत्कृष्ट केलें आहे. अभंगाचें नांव ' आंधळा ' आहे; पण विचार करतां असें आढळून येईल कीं, हा आंधळा डोळसाहून डोळस आहे.

**सहज मी आंधळा गा । निज निराकार पंथें ।**
**वृत्ति हे निवृत्ति झाली । जन दिसे तेथें ।**
**मी माझें हरपलें । ठायीं जेथींच्या तेथें ।**
**अदृश्य तेंचि झालें । कांहीं दृश्य जें होतें ।। १ ।।**
**सुखें मी निजलों गा । शून्य सारूनि तेथें ।। ........**

ही अवस्था प्राप्त झाली, देहतादात्म्यच गेलें कीं स्वभावतःच क्रिया थांबतात. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात : " जोंपर्यंत मन उन्मन अवस्थेला ( वरतीं सांगितलेल्या आत्मस्थितीला ) प्राप्त झालें नाहीं तोंपर्यंत मनुष्यानें विधीची आज्ञा पाळणें अवश्य आहे. नाहीं पाळली तर दंड भोगला पाहिजे.

**तुका म्हणे मन उन्मन जंव होये । तंववरी हे सोय विधि पाळी ।।**

देहतादात्म्य आहे तोंपर्यंत कर्मे अवश्य केलींच पाहिजेत. देह-तादात्म्य सुटलें कीं प्रश्नच खुंटला. जोंपर्यंत देहतादात्म्य आहे तोंपर्यंत कर्म न करणारा हा नास्तिक. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात, " या पाखंड्याचा समाचार घेणें हें आमचें कार्य आहे."

**धर्माचें पाळण । करणें पाषांडखंडण ।। १ ।।**

हीच गोष्ट या अभंगांत कडक शब्द वापरून सुचवतात :

**न बाणतां स्थिति अंगीं । कर्म त्यागी लंड तो ।।**

शेवटच्या कडव्यांत वैदिक धर्माचें दुसरें अंग निवृत्ति. त्याचेंहि रक्षण करूं म्हणून सुचवतात :

**तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ॥**

जीवाचें कल्याण करणारी भगवद्भक्ति होय. तिची जो निंदा करतो तो नीच होय.

तात्पर्य, वैदिक धर्माच्या दोन्ही अंगांचें रक्षण करण्याकरितां मी खटपट करीत आहें, असा या अभंगाचा इत्यर्थ आहे.

या अभंगांतील धर्माचीं दोन अंगें कोणतीं वगैरे प्रश्नांची चर्चा करण्यापूर्वी प्रस्तुतच्या प्रसंगीं एक-दोन महत्त्वाच्या मुद्द्यांचें विवरण करणें अवश्य वाटतें. पैकीं पहिला असा कीं, निवृत्तिमार्गी म्हणून ओळखले जाणारे, नैष्कर्म्यबोधाला प्राप्त झालेले तुकारामबोवा यांनाही धर्मरक्षण करावेंसें वाटतें असें धर्मांत काय आहे ? अलीकडे तर धर्म ही अफूची गोळी आहे असें लोक म्हणूं लागले आहेत. लोक असें म्हणतात म्हणूनच या गोष्टीचा — धर्म या मूल्याचा — थोडया विस्तारानें विचार करणें अवश्य झालें आहे.

लोक ज्या वेळेला धर्म ही अफूची गोळी असें म्हणतात त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांसमोर धर्म म्हणून केल्या जाणाऱ्या कांहीं क्रिया असतात. उदाहरणार्थ, घरांतील कोणी आजारी पडला तर देवाला एकादशणी करणें, सत्यनारायणाची पूजा करणें, नवस करणें वगैरे. ज्याप्रमाणें कित्येक वेळां घरांतील दुःखद परिस्थिति पालटतां येत नाहीं व ती बघवत नाहीं अशा स्थितींत अनिर्वाह पक्ष म्हणून माणसें सिनेमा बघावयास जातात; त्याप्रमाणें औषधानें वगैरे गुण येत नाहीं, “ करा देवाची आराधना ” अशा समजुतीनें दुःख-कारक परिस्थितींत वर उल्लेखिलेल्या क्रिया केल्या जातात व त्या दुबळ्या मनाच्या निदर्शक होत असें समजलें जातें. या उदाहरणा-वरून धर्म म्हणजे हाच अशी समजूत करून घेऊन कांहीं लोक

धर्माचरण मनुष्यास दुबळें करणारें आहे असा निष्कर्ष काढतात व तो निष्कर्ष " धर्म ही अफूची गोळी आहे " या म्हणण्यानें व्यक्त करतात.

याच्या अगदीं उलट ऋषिमुनींची, साधुसंतांची, आमच्याकडील धर्मज्ञांची समजूत आहे. उपनिषदांत ' धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा । ' असें धर्माचें वर्णन केलें आहे. महाभारतांत वरतीं म्हटल्याप्रमाणें ' धर्मो धारयते प्रजाः । ' असें वर्णन आहे. कणाद ' यतः अभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः । ' असें म्हणतात. शंकराचार्य गीताभाष्याच्या प्रारंभीं

" द्विविधो हि वेदोक्तो धर्मः प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणश्च ।
जगतः स्थितिकारणं प्राणिनां साक्षात् अभ्युदयनिःश्रेयसहेतुः
यः स धर्मः ……… ॥ "

असें म्हणतात.

ज्ञानेश्वरमहाराज तर म्हणतात :

" हा निजधर्म जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ति न घडे ।
ऐका प्रजा हो फुडे । विरंची म्हणे ॥ …………
जळचरां जळ सांडे । तत्क्षणीं मरण मांडे ।
हा स्वधर्म तेणें पाडे । विसंबों नये ॥ "

याचा अर्थ असा कीं, दोघांच्या धर्माच्या मुळांतल्या कल्पनाच भिन्न आहेत.

नवीन शिकलेलीं पुष्कळशीं माणसें ' धर्म ' शब्दाचा अर्थ इंग्रजींतील Religion या शब्दावरून सुचणाऱ्या अर्थानें करतात. ' धर्म ' या संस्कृत शब्दाचे कर्तव्य, कायदा, न्याय वगैरे अनेक अर्थ आहेत. हे जे अर्थ आहेत ते संकोचित अर्थ आहेत. पण आपल्याकडे यापेक्षां अगदीं वेगळ्या व्यापक अर्थानें तो शब्द उपयोगांत

आणला गेला आहे. या अर्थानें धर्म शब्द उपयोजिल्यास त्यांत नीति, राजकारण ईश्वरप्राप्तिविषयक क्रिया या सर्वांचा अंतर्भाव होतो.

नीतीविना धर्म हा सुप्रतिष्ठित होणार नाहीं. नीतीला धर्मांत इतकें महत्त्वाचें स्थान आहे कीं, 'धर्मसंस्थापना' हें जें आपलें अवतारकार्य भगवंतांनीं गीतेंत सांगितलें त्यावर टीका करतांना ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, देव अवतार घेऊन 'धर्मासीं नीतीशीं शेजभरी' म्हणजे धर्माची व नीतीची सांगड घालतो. नीति, न्याय यांच्या रक्षणार्थ योग्य राज्यकारभाराची आवश्यकता आहे. राजा हा काळाचें कारण म्हटलें जातें हें एका दृष्टीनें खरें आहे. खुद्द तुकाराममहाराजांनीं खालीलप्रमाणें महत्त्वपूर्ण उद्गार काढले आहेत :

**अन्यायासी राजा जरी न करी दंड। बहुच ते लंड माजतील ।।**
**पाप त्याचें नांव न विचारी नीत। भलतेंचि उन्मत्त करी सदा ।।**
**काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति। दंडूनि पुढती वाटे लावूं ।।**

तात्पर्य, तुकारामबोवादि साधुसंत व पूर्वीचे आमच्याकडील शास्त्रज्ञ यांना ठाऊक होतें कीं, नीति व राजकारण यांचे संबंध अविभाज्य आहेत. तसेंच या दोहोंना देवाच्या अधिष्ठानाची गरज आहे हेंहि ते जाणत होते. धर्म हा सर्वांचा संग्राहक शब्द आहे. धर्म हा या व्यापक अर्थानें ते जाणत असल्यानें धर्माविना समाज टिकूं शकत नाहीं असें ते मानीत व म्हणून समाजरक्षणार्थ धर्माच्या रक्षणाचा अट्टाहास करीत.

धर्माचरणानें व्यक्ति ही दुर्बळ होत नाहीं. धर्माचरणानें व्यक्ति ही ईश्वराच्या सत्तेंत, तेजांत अंशभागी होते. असा ज्ञानबळादिकांचा योग करून देणारा धर्म हा दुर्बळ करणारा कसा होईल ? धर्माची विपरीत कल्पना करून घेऊन धर्मावर ताशेरे ओढले जातात. भगवान् श्रीकृष्ण आपला अवतार धर्मसंस्थापनेकरितां आहे असें सांगतात. तात्पर्य, श्रीज्ञानदेव-तुकारामबोवादि संतांना धर्म हा 'प्राण'

वाटत असल्यानें धर्मरक्षणार्थ खटपट करणें, अट्टाहास करणें हें ते आपलें कर्तव्य समजत व म्हणून तुकारामबोवा आपलें कार्य सांगतांना सांगतात :

**धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हांसी ॥ १ ॥**

या त्यांच्या घोषणेच्या मागें धर्माची केवढी व्यापक कल्पना व समाजाची केवढी कळकळ आहे हें स्पष्ट होईल. तसेंच या घोषणेमागें त्यांचें धैर्यहि दिसून येतें, त्याकडेही वाचकांचें लक्ष वेधणें अवश्य आहे. आपल्या देशांतील लोकांचें, पण निधर्मी म्हणवून घेण्यांत भूषण मानणाऱ्यांचें राज्य असतांना आपण हिंदु आहोंत असें म्हणणें म्हणजे धाडसाचें, कमीपणाचें लोकांना वाटूं लागलें आहे. तुकारामबोवांच्या वेळीं तर धर्मवेड्या परधर्मीय परकीयांचें राज्य ! त्यांच्या धर्मवेडाचे परिणाम या सुधारलेल्या शतकांत पाकिस्तान निर्मितीनंतर इतके नागड्या रूपानें आपल्या देशासमोर उभे आहेत, कीं ते लिहून त्यांची आठवण करून देण्याचें कारण नाहीं. अशा लोकांचें राज्य असतांना आमचा सर्व खटाटोप ' वैदिक धर्माच्या ' रक्षणाकरितां आहे असे छातीठोक समाजासमोर गर्जना करून सांगणाऱ्या पुरुषांच्या ठिकाणीं सात्त्विक धैर्य केवढें असावयास पाहिजे याची वाचकांस सहज कल्पना येईल ! तुकारामबोवा निवृत्तिमार्गी, या संताळ्यांनीं देशाला दुबळें बनवलें, बुडवलें वगैरे म्हणणाऱ्यांनीं तुकारामबोवांची व त्यांच्या शिकवणुकीची एकदेशी विपरीत कल्पना केली एवढेंच म्हटलें म्हणजे पुरे. त्यांच्याच भाषेंत सांगावयाचें तर —

**संसाराच्या नांवें घालोनिया शून्य । वाढता हा पुण्यधर्म केला ॥**

म्हणूनच या धामधुमींत ' मराठा ' टिकला. केवढे उपकार या संतांचे ! तात्पर्य, तुकारामबोवांची मुख्य कामगिरी व शिकवणूक व्यापक अर्थानें धर्मक्षेत्रांतील होती व त्यामुळें राष्ट्राचें कल्याणच झालें.

या अभंगाच्या वर उल्लेखिलेल्या तपशिलाचा विचार करावयाचा म्हणजे वैदिक धर्मांतील प्रवृत्ति-निवृत्ति-अंगांचा विचार करावयाचा व तो एक स्वतंत्र निबंधाचाच विषय होईल. म्हणून त्यांचा तूर्त नुसता अर्थ सांगून हें संकीर्तन पूर्ण करूं. प्रवृत्ति या अभंगांत इहपरलोकींच्या विषयसुखार्थ वर्णाश्रमधर्मानुरूप करावयास लागणाऱ्या कर्मांचा प्रामुख्यानें विचार येतो. निवृत्तीमध्यें परमात्मप्राप्त्यर्थ म्हणजे मोक्षप्राप्त्यर्थ केल्या जाणाऱ्या वर्णाश्रमोचित क्रिया. यांत भक्ति-ज्ञानादिकांचा समावेश होतो. तुकारामबोवा या दोन्ही अंगांचें रक्षण करूं असें म्हणतात. याचें अधिक विवेचन पुढील एखादे प्रसंगीं करूं.

◆ ◆ ◆

# चाले हें शरीर कोणाचिये सत्ते-: ४ :

**चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीवीण ॥१॥**
**देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥२॥**
**मानसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणोनिया ॥३॥**
**वृक्षाचेंही पान हाले ज्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥४॥**
**तुका म्हणे विठो भरला सबाहीं । तया उणें कांहीं चराचरीं ॥५॥**

तुकाराममहाराजांच्या अवतारकार्यांपैकीं मुख्य कार्य लोकांचें लक्ष भगवंताच्या भजनाकडे लावणें. अर्थातच तुकाराममहाराज सर्वांना ह्याचाच उपदेश करीत; पण तो उपदेश करीत असतांना ज्याला उपदेश करीत त्याची योग्यता, उपदेश करण्याचा प्रसंग हें विचारांत घेतल्यावांचून ते कधीं राहत नसत. त्यांनींच म्हटलें आहे :

अधिकार तैसा करूं उपदेश ।
साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ १ ॥
मुंगीवरी भा र गजाचें पालाण ।
घालतां ते कोण कार्यसिद्धि ॥ २ ॥

■ ■ ■

अधिकार तैसा दावियेला मारग ।
चालतां हें मग कळों येतें ॥

याचा अर्थ एवढाच नव्हे कीं, जो कर्माचा, उपासनेचा अथवा ज्ञानाचा अधिकारी भेटेल त्याला अनुक्रमें कर्माचा, उपासनेचा अथवा ज्ञानाचा उपदेश करीत. साधु हे खरे शिक्षक असतात. त्यांना जगाची खरी कळकळ असल्यामुळें आपल्याकडे येणाऱ्या मनुष्यास तोलेल, पचेल अशाच तत्त्वांचा ते उपदेश करतात. मोठ्या माणसाची समजूत पटेल अशी भाषा पोराशीं बोलतांना वापरून उपयोगी नाहीं. उलटपक्षीं पोराची बोलण्याची भाषा थोराशीं वापरून चालणार नाहीं. कल्पना करा, एखाद्या लहानग्या नातवानें आपल्या आजीला विचारलें कीं, 'आजी, हें आकाश वरतीं ग कसें गेलें ?' आजीबाई त्याला पटेल असें पुढीलप्रमाणें चटकन् उत्तर देते : "अरे ! हें आकाश किती अगदीं अस्सं खालीं होतं. एकदां मी झाडीत असतांना तें माझ्या पाठीला लागलं व पाठीला खरचटलं. मला आला राग आणि हातांत होती केरसुणी ! ती जी मारली कीं, जें आकाश वरतीं गेलं तें तिथंच राहिलं." हें उत्तर नातवाच्या वडिलांना देणें उचित होणार नाहीं, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

तत्त्व जरी साधें असलें पण जर अवजड, कठीण अशा पद्धतीनें तें मांडलें तर सोप्याचें तें कठीण होऊन बसावयाचें. उलट, कठीण तत्त्व

पण सोप्या भाषेंत पटेल अशी मीमांसा करून सांगितलें तर पटण्याचा अधिक संभव. तुकारामबोवा हे खरे साधु असल्यानें त्यांच्याकडे येणारा श्रोता ज्या अधिकाराचा व जसा असेल तें सर्व लक्षांत घेऊन ते उपदेश करीत; यामुळें एकच भजन करा हें सांगण्याकरितां वेगवेगळ्या प्रसंगीं त्यांनीं वेगवेगळीं कारणें दिलेलीं आढळून येतात. उदाहरणार्थ खालील प्रसंग पाहा :

आतां तरी पुढें हाचि उपदेश ।
नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥

■ ■ ■

हित तें करावें देवाचें चिंतन ।
करोनिया मन शुद्धभावें ॥ ३ ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार
करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

यांतील कारणापेक्षां पुढील अभंगांत भगवद्भजन कां करावें याचें वेगळें कारण सांगितलें आहे.

वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ॥ १ ॥
विठोबासी शरण जावें । निजनिष्ठां नाम गावें ॥ २ ॥

प्रस्तुतच्या संकीर्तनाच्या अभंगांतहि तुकाराममहाराज ‘ देवाच्या भजनांत चूक पडूं देऊं नका ’ असा उपदेश करतात; पण कारण वेगळें सांगतात. तें कारण श्रोत्यास ते प्रश्न मांडून सांगतात :

चाले हें शरीर कोणाचिया सत्ते । —

त्यांच्यासमोर तत्त्वविचार करणारा असा श्रोता असावा कीं, त्याच्या विचारशक्तीस धक्का देऊन, जागें करून, तुकारामबोवा त्याला या अभंगांत भजन कां करावें, त्यांत कां चूक होऊं देऊं नये हें पटवितात.

वरील प्रकारचा एक प्रश्न टाकून तुकाराममहाराजांनीं जीवन-विषयक एक फार मोठा विचार लोकांच्यासमोर मांडला आहे. या प्रश्नाच्या उत्तराच्या द्वारां ते एक मोठें आध्यात्मिक मूल्य लोकांना पटवून देत आहेत.

कुणी म्हणेल, आध्यात्मिक मूल्य म्हणजे काय ? तर अगदीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, दिसतें त्यापलीकडचा विचार. एका दृष्टान्तानें हें स्पष्ट होईल. 'रुपयाची किंमत किती ?' असा प्रश्न जर मुलाला केला तर तो म्हणेल, सोळा आणे. पण रेशनिंगच्या काळांत रुपयाची किंमत सोळा आणे आहे का ? आजच्या राक्षसी महागाईच्या काळांत रुपयाची किंमत चार आणे असें आपण जें म्हणतों त्याचा अर्थ रुपयाचे आपणांला चार आणे मिळतात असा नव्हे, तर आज रुपयांत पूर्वीं चार आण्यांत जें मिळे तेवढेंच मिळतें. याचाच अर्थ रुपयाचे आणे सोळा हें उत्तर गणिती दृष्टीनें बरोबर, पण व्यवहारी दृष्टीनें तें खरें नाहीं. आध्यात्मिक मूल्यांचा विचार करतांना हीच दृष्टि हवी. नाहींतर पेढे आणावयाला सांगितलेल्या नोकरानें जसा मालकासमोर, "तूं दोन पेढे खाल्लेस तरी कसे ?" असा त्यानें प्रश्न केला असतां, "असा !" म्हणून तिसरा पेढा मटकावला; तसें, तुकाराममहाराजांच्या "चाले हें शरीर कोणाचिये सत्ते" याला उत्तर "पायानें !" असें देण्यांत येईल. प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, येथें चालणें याचा अर्थ नुसतें पायानें चालणें नव्हे. निराळा आहे. शरीर पायानें चालतें हें काय तुकाराममहाराजांना कळत नव्हतें ? पण येथें चालणें याचा अर्थ व्यापक घ्यावयाचा आहे. येथें चालणें याचा अर्थ चलन-वलनात्मक क्रिया हा आहे.

**परी देहाचें मोटकें उभें । आणि चेतना तेथ उपलभे ।**

93508

तिये चळवळीचेनि लोभें । आला म्हणती ॥"
—( ज्ञानेश्वरी १५–२७३ )

चालणें ही चेतनात्मक क्रिया आहे. जीवांत जीव असणें, हा त्याचा अर्थ आहे. शरीराचें जें चलनवलन तें कोणाच्या सत्तेंत आहे याचा विचार करा, असें तुकाराममहाराज आग्रहानें सांगतात आणि ज्याच्या सत्तेनें हें चालतें त्याचें भजन करावयास चुकूं नका हें त्यांना मुख्यतः सांगावयाचें आहे. त्यासाठीं ते पहिल्या चरणांतील दुसरा भाग आणि दुसऱ्यांतील पहिला भाग लोकांसमोर मांडतात :

**चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवीते हरीविण ॥**
**देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥**

आपल्या देहावर, आपल्या इंद्रियांवर आपली सत्ता नाहीं. असती तर पहिल्या वर्गाचें तिकीट काढून सुखानें प्रवास करणाऱ्या माणसाच्या पोटांत कळ कां यावी ? आणि आली असली तरी त्याला ती हुकमी कां बंद करतां येऊं नये ? झोंपेचीं औषधें घेऊनहि झोंप येत नाहीं, हें आपणांला दिसून येत नाहीं का ? तुकाराममहाराज याचसाठीं म्हणतात :

**कोण बोलवीते हरीविण ।**

बोलणें हें तोंडानें होतें, हें जिभेचें काम आहे हें काय तुकाराममहाराज समजत नव्हते ? आजच्या शरीरशास्त्रादि भौतिक शास्त्रांचे शोध काय सिद्ध करतात ? इंद्रियांचे व्यापार अर्थपूर्ण व्हावयाला मस्तिष्क केंद्रें ( ब्रेन सेंटर्स ) शाबूत हवींत; नाहींतर डोळे असूनहि काय उपयोग ? पण या मस्तिष्क केंद्रांच्याहि मागें जर मनाचें अधिष्ठान नसेल तर तुकाराममहाराज म्हणतील,

**" जवळीं नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ॥ "**

यासंबंधांत एका इंग्रजी लेखकानें फार चांगलें लिहिलें आहे. तो म्हणतो :

" Eyes and ears are bad witnesses to men if they have souls that understand not their language." ( डोळे आणि कान हे, त्यांची भाषा जर माणसांच्या आत्म्यांना कळत नसेल तर बेभरंवशी साक्षीदार होत. ) पण या मनाच्या पलीकडेहि असणारी एक सत्ता आहे.

गीतेंत तिचें वर्णन " ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते । ( अ. १३–१७ ) असें केलें आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीं यावर लिहितांना खालीलप्रमाणें लिहिलें आहे :

**" जें आदीची आदी । जें वृद्धीची वृद्धी । जें बुद्धीची बुद्धी । जीवाचा जीवु ।। जें मनाचें मन । जें नेत्राचे नयन । कानाचे कान । वाचेची वाचा ।। जें प्राणाचे प्राण । जें गतीचे चरण । क्रियेचें कर्तेपण । जयाचेनि ।। "**

उपनिषदांतूनहि जिचें वर्णन " यद्वाचा नाभ्युदितम् येन वागभ्युदेति " असें केलें आहे. ती सत्ता काय आहे हें समजून घेणें जरूर आहे. तुकाराममहाराज म्हणतात :

**" ज्याचे गांवीं केला वास । त्यासी नसावें उदास ।। "**

ज्या राज्यांत आपणांस राहावयाचें आहे त्याचे कायदेकानू आपण समजून घेऊन त्याच्या सत्तेंत राहिलें पाहिजे. त्याचप्रमाणें सत्ताधीश जो परमात्मा तो स्वतःस

**" गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् । "**

( गीता ९–१८ )

असें सांगून राहिला आहे. त्याची जाणीव ठेवून त्याच्या सत्तेंत राहणेंच योग्य आहे.

पण पुष्कळ वेळां जगांत अनुभव असा येतो कीं, मानव म्हणेल

तें करतो. बोलतो तसें घडतें. ठरवतो तसें पार पाडतो. मग ही सत्ता माना कां ? या सत्तेची शरणागति कशाला ? असा कोणी प्रश्न करील, तर त्याला उत्तर तुकाराममहाराजांनीं तिसऱ्या कडव्यांत दिलें आहे.

**मानसाची देव चालवी अहंता । मीच एक कर्ता म्हणोनिया ॥३॥**

देव " पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः । " असल्यानें मुलाचे लाड पुरवितो. पण त्याचा अर्थ त्याला विरुद्ध करतां येणार नाहीं असें नाहीं. व्यवहारांतील एका उदाहरणानें हें स्पष्ट होईल :

मुलाला ' घोडा घोडा ' खेळण्यासाठीं बाप ज्या वेळीं पाठीवर घेऊन रांगतो तेव्हां काय मुलाच्या सत्तेनें वा इच्छेनें हें चालतें ? बापाच्या मनांत मुलाचे लाड पुरवावयाचे असतात म्हणून.

तसाच देव. तोहि – मानसाची देव चालवी अहंता ॥

खरें सांगावयाचें म्हणजे प्रारब्ध जोंपर्यंत अनुकूल तोंपर्यंत हवें तें होतें आणि एकदां प्रारब्ध फिरलें कीं, मग ' मीच एक कर्ता म्हणोनिया' हें खोटें ठरतें. गेल्या युद्धांत हिटलरची सरशी कोठपर्यंत तर त्याची सद्दी होती तोंपयत. पण मानवाला हें कळत नाहीं कीं, आपली आपल्यावर अथवा विश्वांतील चराचर वस्तूंवर सत्ता नाहीं. विश्वांत होणारे भयंकर प्रलय, भूकंप, सांथीचे रोग काय मानवाला हवे आहेत म्हणून होतात ? म्हणून तुकाराममहाराज पुढच्या कडव्यांत सांगतात :

**वृक्षाचेंहि पान हाले ज्याची सत्ता ।**
**राहिली अहंता मग कोठें ॥ ४ ॥**

मानवानें ही घमेंड मारूं नये कीं, हें सर्व आपण करतों म्हणून होतें. आपण जी सत्ता सत्ता म्हणतों ती आहे तरी कोठें, असें कोणी विचारील. तो देव कोठें तरी दूर असेल, असें कदाचित्

लोकांना वाटेल. म्हणून तुकाराममहाराज शेवटच्या कडव्यांत एक मोठा सिद्धान्त मांडतात :

**तुका म्हणे विठो भरला सबाहीं। तया उणें कांहीं चराचरीं ॥**

गीतेंतील पुढील श्लोकांत तेंच सांगितलें आहे :

**बहिरंतश्च भूतानां अचरं चरमेव च ॥ ( १३-१५ )**

**" ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ " ( १८-६१ )**

ज्ञानेश्वरांच्या हरिपाठांतहि हेंच सांगितलें आहे :

**सर्वां घटीं राम देहादेहीं एक। सूर्य प्रकाशक सहस्ररश्मी ॥**

येथपर्यंत आपण भावार्थाचा विचार केला. आतां थोडा तपशील पाहूं. तुकाराममहाराजांना या अभंगांतून सर्व लोकांचें लक्ष जगाच्या बुडाशीं असणाऱ्या सत्तेकडे वेधावयाचें होतें. तिची कांहीं उपासना लोकांनीं करावी, असें त्यांना वाटत होतें. म्हणून त्यांनीं मानवाला अगदीं जवळचा असा जो देह त्याच्यावरच लोकांचें लक्ष केंद्रित करून आपला सिद्धान्त गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. गीतेंतहि " अधिष्ठानं तथा कर्ता—" या श्लोकांत ( १८-१४ ) देह हाच अधिष्ठान आहे म्हणून सांगितलें आहे. देहाला भोगायतन असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. तो मानवाचा देह मानवाला जवळचा तर वाटतोच, पण त्याच्यावर आपली सत्ता आहे असें वाटतें. आणि म्हणून कांहीं लोकांचें म्हणणें असें कीं, " देवाचें भजन करावयाचें ना, करूं पेन्शन घेतल्यावर, म्हातारपण आल्यावर ! " पण महत्त्वाची गोष्ट ही कीं, या देहावर आपली काडीचीहि सत्ता खऱ्या अर्थानें नाहीं, हें पुष्कळांना कळत नाहीं आणि त्याचा परिणाम दुःख, तळमळ, क्लेश. भजन कधीं होतच नाहीं.

सत्ता ती कीं जिचा उपयोग केव्हां, कोठें, किती आणि कसा करावयाचा याची स्वतंत्रता माणसाला असणें. लोक मुलगा मेला,

बायको मेली म्हणजे रडतात, शोक करतात. त्याला कारण त्यांना त्यांच्यावर आपली सत्ता आहे असें वाटतें. स्वतःच्या देहावर आपली सत्ता आहे असें समजणें हाच भ्रम. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :

" भ्रम धरसी या देहाचा । विठ्ठल म्हणे कां रे वाचा ॥ १ ॥
पडोनि जाईल हें कलेवर । विठ्ठल उच्चारी वा सार ॥ २ ॥

तुकाराममहाराजांनीं देहाच्या परकेपणावर फार सुंदर लिहिलें आहे. ते म्हणतात, ' मानवाचें शरीर हा माझा देश नाहीं, हा माझा वेष नाहीं. सहज आपला फिरत फिरत या देशाला आलों मजा पाहावयाला; पण अनुभव मात्र आला दुःखाचा. '

देश वेष नोहे माझा । सहज फिरत आलों ।
करूं सत्ता कवणावरी । कोठें स्थिर राहिलों ।
पाय डोळे म्हणतां माझे । तिहीं कसा मोकलिलों ।
परदेशीं नाहीं कोणी । अंध पांगुळ झालों ॥ १ ॥

मागच्या एका अभंग-संकीर्तनांत याचा विचार होऊन गेला आहे, म्हणून त्याची पुनरुक्ति करीत नाहीं.

या सत्तेचा विचार म्हणजेच परमार्थाचा विचार. लोकांची कल्पना अशी कीं, परमार्थाचा विचार करणें म्हणजे देव, परलोक वगैरे अदृश्य विषयाची चर्चा करावयाची, पण हें खरें नाहीं. अध्यात्माच्या विचाराच आरंभ ईश्वरापासून नाहीं. मानवी जीवनांतील मूल्यांचा विचार करणें हाच अध्यात्मशास्त्राचा विषय. मॅकेन्झी या इंग्रज ग्रंथकारानें पुढीलप्रमाणें अध्यात्मशास्त्राची उत्कृष्ट व्याख्या दिली आहे : Metaphysics is the science which seeks to deal with experience as a whole.

हें क्षेत्र व या शरीरांतील क्षेत्रज्ञ यांचा विचार हाच परमार्थाच विचार. गीतेच्या १३ व्या अध्यायांत हा विचार फार सुंदर सांगितला आहे :

" ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् ।" ( १३–४ )

या श्लोकावर लिहितांना ज्ञानेश्वरांनीं या शरीरावर कोणाची सत्ता आहे याचा विचार निरनिराळ्या वाद्यांचीं मतें देऊन केला आहे. त्यांत निसर्गवादी अथवा स्वभाववादी, प्रकृतिवादी, संकल्प-वादी, काळवादी व जीववादी आहेत. पण हे सर्व पूर्वपक्ष त्यांनीं केले आहेत व त्यांतच एकमेकांचें खण्डन दिलें आहे. जिवास वाटतें आपली सत्ता. मग तो मरतो कां ? मरण काय त्याला आवडतें ?

गीतेंत अर्जुनाला उपदेश करतांना मोठे छद्मी बोलून अर्जुनाचा अहंकार घालविण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञानेश्वरांची

**अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।**
**गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पंडिताः ॥** ( गीता २-११ )

यावरील टीका फार उत्कृष्ट आहे. ते म्हणतात :

**एक समर्थु एक आर्थी । तयापासोनी भूतें होती ।**
**तरी हें वायांचि काय बोलती । जगामाजीं ॥**
**हो कां सांप्रत ऐसें जालें । जे हे जन्ममृत्यु तुवां सृजिले ।**
**आणि नाशु पावे नाशिलें । तुझे नि कायी ॥**" (२.९६-९७)

यश आलें तरी देवाच्याच सत्तेनें, न आलें तरी देवाचीच सत्ता, ही ज्याची वृत्ति असेल तोच समाधानी राहूं शकेल. या सत्तेलाच आम्ही ईश्वर म्हणतों.

ज्ञानेश्वरमहाराजांनीं ईश्वराचें वर्णन पुढील ओंवींत फारच सुंदर केलें आहे :

**हें असो जलतरंगा । नाहीं सिनानपण जेवीं गा ।**
**तेवीं सत्ताकाश जगा । आपणाचि जो ।** ( १५-५५२ )

उपनिषदांत हेंच फार सुंदर रीतीनें सांगितलें आहे :

"यत् चक्षुशा न पश्यति येन चक्षुंपि पश्यति ।

तदेव ब्रह्म त्व विद्धि नेदं यदिदमुपासते ॥"
तमेव भान्तं अनुभाति सर्व तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥

या ईश्वराचें भजन करायला चुकूं नका असें तुकाराममहाराज सांगतात. तें भजन कोणतें ? तर अहंता टाकून, ईश्वरच आपल्या-कडून सर्व करवितो; म्हणजे ईश्वरच कर्ता आहे या भावनेनें विहित कर्म करून ईश्वराला अर्पण करणें हेंच ईश्वराचें भजन. गीताच सांगते :

"यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥"(१८·४६)

यावर टीका करतांना ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :

"तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागीं । ( १८-९१७ )
अगा जया जे विहित । तें ईश्वराचें मनोगत ।
म्हणौनि केलिया निभ्रांत । सांपडेचि तो " (१८-९११)

पण हें भजन करीत असतां भगवान् म्हणतात, "माझें स्मरण कर" ( तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च । -गीता ८-७ ) कर्म करीत असतां मनाची बैठक स्थिर होण्यासाठीं भगवंताच्या स्मरणाची फार आवश्यकता आहे.

आणि अशा रीतीनें जीव भगवंताच्या आनंदाचा एकदां भागीदार झाला कीं तो जगाला आनंद देणारा होतो. म्हणून हें भजन करण्यास चुकूं नका असें तुकाराममहाराज आग्रहानें सांगतात.

तात्पर्य, ईश्वराच्या सत्तेची जाणीव ठेवून आपल्या वांट्याला आलेलें विहित कार्य भगवंताचें स्मरण करून शरीर त्याच्या कार्यीं झिजविणें हेंच त्याचें भजन करणें होय. हें करण्यास चुकूं नका असा तुकाराममहाराजांचा या अभंगाद्वारां सर्वांना संदेश आहे.

•••

# देव घ्या कोणी, देव घ्या कोणी :६:

देव घ्या कोणी, देव घ्या कोणी । आइता आला घर पुसोनी ॥१॥
देव नलगे, देव नलगे । सांठवणेचे रुधले जागे ॥ २ ॥
देव मंदला, देव मंदला । भाव बुडाला काय करूं ॥ ३ ॥
देव घ्या फुका, देव घ्या फुका । नलगे रुका मोल कांहीं ॥४ ॥
दुबळा तुका भावहीन । उधारा देव घेतला ऋण ॥ ५ ॥

उपनिषदें 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' असें ज्याचें वर्णन करतात, पण ज्याच्या प्राप्तींत मनुष्यजन्माची सफलता आहे असा देव ज्याला हवा असेल त्याला मिळवून देऊं शकतात. असे महात्मे देशांत जन्माला येणें, हें त्या देशाचें मोठें भाग्य होय. कठोपनिषदच म्हणतें, 'आश्चर्योवक्ता' ( त्याचें व्याख्यान करणारा दुर्मिळ ! ) महाराष्ट्राचें भाग्य असें आहे कीं, त्याच्या वांट्याला देवाचें ज्ञान करून देणारे 'आश्चर्या' सारखे असणारे संत आले; एवढेंच नव्हे तर ज्यांना तो देव लोकांना भेटावा अशी कळकळ असून त्याच्याकरितां ज्यांनीं आपल्या घरादारांची राखरांगोळी केली असे श्रीज्ञानदेव-नामदेव-एकनाथ-समर्थादि महात्मे त्यांत जन्माला आले. केवढें महाराष्ट्राचें भाग्य! तुकारामबोवांनीं संतांच्या कार्याचें 'वासुदेवा' च्या रूपकानें फारच उत्कृष्ट वर्णन केलें आहे. मोराच्या पिसांची उंच उभी टोपी, अंगांत मळका पायघोळ अंगरखा, हातांत चिपळ्या व लहान टाळ घेऊन 'जेजुरीच्या खंडोबाला,' 'आळंदीच्या ज्ञानोबाला,' असें म्हणत आळीआळींतून, घराघरांतून, झोंपडीझोंपडींतून हिंडतांना अजूनहि खेडेगांवांतून व यात्रांतून 'वासुदेव' दिसतो. या वासुदेवाचें काम पहांटेच्या वेळीं घराजवळ जाऊन

आंतील लोकांना जागें करणें. तुकारामबुवा म्हणतात :

**वासुदेव करितो फेरा । वाडियांत बाहेर दारां । ....**
**हातीं टाळदिंडी मुखीं नाम गाणें । गजर होतो बहु मोठ्यानें ।**
**नाहीं निवडिलीं थोर-लहानें । नको निजों भिकेच्या भेणें गा ॥**

■ ■ ■

**रामकृष्ण वासुदेवा ।**
**जाणवी जनासी वाजवी चिपळिया ।**
**टाळघागऱ्याघोषें । रामकृष्ण वासुदेवा ×××× ॥**
**एक वेळां जाणविती । धरूनिया राहा चित्तीं ।**
**नेघे भार सांडी कामा हातीं । नीज घेऊनिया फिरती गा ॥**

तुकोबा वरील कडव्यांतून आपल्यासारख्या वारकरी संताच्या कार्याचें व त्याच्या पद्धतीचें वर्णन करीत आहेत असें म्हणण्यास बिलकूल हरकत नाहीं. तुकोबांनींच म्हटलें आहे :

**तुका म्हणे येथें काय तो संदेह ।**
**आमचे गौरव आम्ही करूं ॥**

इतकी प्रस्तावना करण्याचें कारण असें कीं, तुकोबांनीं स्वतः देव पाहिला होता येवढेंच नव्हे तर तो इतरांना दाखविण्याची त्यांची शक्ति होती. इतकेंच नव्हे तर तो इतरांना कळावा म्हणून अत्यंत तळमळ होती व त्याकरितां त्यांच्याच भाषेत सांगावयाचें म्हणजे त्यांनीं आपल्या 'संसाराच्या नांवें शून्य घातलें होतें.' देव लोकांना मिळावा तेवढ्याकरितां प्रयत्न करीत असतांना, त्यांना आलेला एक अनुभव त्यांनीं, आजच्या संकीर्तनाचा अभंग आहे, त्यांत ग्रथित केला आहे.

विक्रेता वस्तु लोकांसमोर मांडतो व गिऱ्हाइकांना हांक मारून तो घ्या म्हणून सांगतो. उदाहरणार्थ, बोर विकणारा ओरडतो, "अह-मदाबादी बोरं, स्वस्त लावलीं, घ्या !" तसेंच तुकारामबुवा म्हणतात,

" देव घ्या कोणी, देव घ्या कोणी ।
आइता आला घर पुसोनी " ॥ १ ॥

अहो लोक हो, कोणीतरी हा देवरूपी माल घ्या. तुमच्या आळीला गिऱ्हाईक लागेल या समजुतीनें आपल्या दरवाज्यावर आला आहे. तुम्हांला माल शोधायला जायला नको. आयता घराजवळ तयार माल आहे, घ्या.

पुढील कडव्याची मौज कळण्याकरितां एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, तुकारामबुवांच्या अभंगांत अनेक तऱ्हा आहेत. कित्येक अभंगांतून नुसतें कथन आहे. कित्येकांतून देवाशीं अथवा जनाशीं झालेल्या आपल्या संवादाचा अनुवाद आहे. त्यांतही दोन प्रकार आहेत. कित्येक ठिकाणीं ते देवाचे अथवा जनाचे उद्‌गार देत नाहींत. आपलेंच बोलणें देतात. येथें अर्थ करतांना वाचकांच्या बुद्धीस व कल्पनाशक्तीस पुष्कळच ताण द्यावा लागतो. कारण, तुकारामबुवांचीं जीं आपल्यासमोर कडवीं आहेत त्यांवरूनच देवाच्या अथवा जनाच्या म्हणण्याची कल्पना करावी लागते. टेलिफोनवरून दूरच्या स्नेह्याशीं बोलत असतांना टेलिफोन-वर बोलणाऱ्याजवळ जो बसलेला असतो त्याला टेलिफोनवरून जो बोलत असतो त्याचे शब्द ऐकूं येतात. पण दुरून आलेलें उत्तर त्याला ऐकूं येत नाहीं. तें पुन्हा टेलिफोनवरचा जें बोलेल त्यावरून अनुमानावें लागतें. तसेंच या ठिकाणीं होतें. तुकारामबुवांच्या पुढील उक्तीवरून मधल्याची कल्पना करावी लागते. शब्द सुट-लेल्या धड्याप्रमाणें येथें वाचकास उणीव आपल्या बुद्धीच्या व कल्पनेच्या सामर्थ्यानें भरून काढावी लागते. अर्थातच या अभंगाचा अर्थ लावणें कठीण पडतें. याचें सोपें उदाहरण म्हणून पुढील अभंग विचार करण्यासारखा आहे :

**तुजविण कोणा । शरण जाऊं नारायणा ।।**

पण दुसरे अभंग असे आहेत कीं, त्यांत तुकारामबुवा देवाच्या अथवा जनाच्या म्हणण्याचा अनुवाद करतात. देवाशीं बोलत असतां देवाच्या बोलण्याचा अनुवाद ज्यांत केला आहे त्याचें उदाहरण म्हणून खालील अभंग देतां येईल :

**हरिदासांचिये घरीं । मज उपजवा जन्मांतरीं ।। १ ।।**
**म्हणसी कांहीं मागा । हेंचि देगा पांडुरंगा ।। २ ।।**

प्रस्तुतच्या अभंगांत दुसऱ्या कडव्यांत तुकारामबुवांनीं लोकांना देव घ्या असें म्हटल्यावर त्या लोकांची जी प्रतिक्रिया झाली, लोक जें बोलले, त्याचा अनुवाद आहे.

**" देव नलगे, देव नलगे । सांटवणीचे रुधले जागे " ।। २ ।।**

तुकोबा मोठ्या कळकळीनें, " देव घ्या, देव घ्या, कोणीहि घ्या " असें म्हणतात.

**" यारे यारे लहानथोर । याती भलते नारीनर ।**
**करावा विचार । नलगे चिंता कोणासी ।। "**

पण लोकांना देव हवा आहे कोठें ! लोक बुवांना म्हणतात, " देव नको. कारण हा माल ठेवायला आमच्याजवळ सांठवण नाहीं. (रुधणें म्हणजे व्यापणें. सांटवणीचे जागे म्हणजे माल सांठवून ठेवण्याचीं भांडीं-पातेलीं, डबे वगैरे ) माल सांठवून ठेवूं अशा पातेलीं, डबे वगैरे सर्व जागा दुसऱ्या मालांनीं आधींच भरून गेल्या आहेत. "

येथें एकदोन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. लोक माल ठेवायला जागा नाहीं असें म्हणतात, याचें कारण त्यांना देव या मालाची किंमतच कळत नसली पाहिजे. आपण भरलेला जो माल त्यापेक्षां हा मोलवान् आहे, दुर्मिळ आहे व उपयोगी आहे असें जर

लोकांना पटतें तर त्यांनीं माल ओतून, भरलेलीं भांडीं रिकामीं करून हा माल भरला असता. देवमाल ज्यांत सांठवला जातो ती जागा म्हणजे प्रत्येक माणसाचें हृदय. तुकारामबुवाच एके ठिकाणीं म्हणतात :

संपुष्ट हें हृदयपेटी । करोनि पोटीं सांठवूं ।।

पण ह्या जागा तर विषयरूपी मालांनीं आधींच भरून गेल्या आहेत व त्या मालाची जिवांना गोडी लागल्यानें किंमत फार वाटते.

स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर । विषयीं पडिभर अतिशय ।।
××××× विषयांची खंती वाटे जना ।।
डिंकोनिया काय राहिले हे लोक । हेंचि कौतुक वाटे मज ।।
विषयओढीं भुलले जीव । आतां यांची कोण करील कींव ।।
नुपजे नारायणीं भाव । पावुनी ठाव नरदेह ।।

तात्पर्य, लोक देवमाल नको म्हणतात याचें कारण त्यांनीं दुसऱ्या मालाची आधीं सांठवण करून ठेवली व तो त्यांना मोलाचा वाटतो व म्हणून ते म्हणतात :

देव नलगे, देव नलगे ।

दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, तुकारामबुवांना हा जो अनुभव आला हा कांहीं नवीन नाहीं. खुद्द महाभारतकार व्यासादिकाच्यापासून ज्यांनीं ज्यांनीं लोकांच्यांत देवजागृति निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्या बहुतेक सगळ्यांचा हाच अनुभव आहे. व्यासच म्हणतात :

ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चित् शृणोति माम् ।

अशी गोष्ट सांगतात कीं, भिक्षा मिळेना म्हणून एका गांवांत मच्छिंद्रनाथ हातांत कटोरा घेऊन रस्त्यांतून ओरडत निघाले : "जो मला कटोराभर भिक्षा घालील त्याला मी ब्रह्म दाखवीन." लोकांनीं

त्यांना भिक्षा तर घातली नाहींच, उलट लोक म्हणूं लागले, "काय वेडा! ब्रह्म दाखविण्याची शक्ति असती तर हा भीक कां मागता? अहो, ब्रह्म काय वाटेवर पडलें आहे?" तात्पर्य, या मालाला गिऱ्हाईक फारच कमी. खरें असें आहे, शेंगदाण्याइतकें हिऱ्यामोत्याला गिऱ्हाईक कोठून असणार? तेव्हां लोकांकडून "देव नलगे" हें उत्तर कांहीं अनपेक्षित नाहीं. पण, सामान्यतः या उत्तराच्या श्रवणानें ऐकणाऱ्यावर प्रतिक्रिया व्हावयाची ती ही कीं, त्यानें "देव घ्या" म्हणण्याचा आग्रह सोडून द्यावयाचा. "मरेना जग! आपण प्रयत्न केला. त्याला नको असेल तर त्याचें नशीब. आपणच त्याचा उपभोग घेत बसूं!" असे विचार विक्रेत्याच्या अंतःकरणांत उत्पन्न व्हावयाचे. पण, तुकोबांचें हृदय वेगळ्या जातीचें होतें. त्यांत लोककल्याणाची तळमळ फार. म्हणून लोकांनीं देव नको म्हटल्यावर त्यांना जें वाटूं लागलें त्याचा ते अनुवाद करतात :

**"देव मदला, देव मंदला। भाव बुडाला काय करूं" ॥ ३ ॥**

काय करावें! देव या मालाची मागणी कमी झाली. भाव बुडाला. मला वाटलें कीं, या मालाला भाव चांगला येईल; पण भाव बुडालेला दिसतो. काय करावें (येथें 'भाव' हा शब्द द्व्यर्थी आहे हें सुज्ञ वाचकांस सांगण्याचें कारण नाहीं.) अभिप्राय असा कीं, देव कोणाला हवासा वाटेल? ज्याच्यांत देवाविषयीं भाव म्हणजे श्रद्धा असेल त्याला. तुकारामबुवांचे बंधु कान्होबा म्हणतात, देवाला जर कांहीं लागत असेल तर भाव लागतो :

> **देवाकारणं भाव तस्मात्।**
> **द्यावें नलगे फारसें वित्त।**
> **झालें एकचित्त तरी बहुत।**
> **येवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा॥**

तुकोबांना आढळून आलें कीं, देवावरील लोकांची श्रद्धा ( विश्वास ) कमी झाली. लोक हे जगावरच अधिक विश्वास ठेवून राहिले.

तुकारामबुवांना असें वाटलें कीं, देवाची मागणी कमी झाली. आपण हा माल लोकांनीं घ्यावा म्हणून कांहीं युक्ति योजूं. ती युक्ति म्हणजे मालाची किंमत स्वस्त करून तो विकणें. एवढ्याकरितां तुकारामबुवा माल स्वस्तांत लावतात. ते म्हणतात :

**" देव घ्या फुका, देव घ्या फुका।**
**नलगे रुका मोल कांहीं " ॥ ४ ॥**

देव फुकट घ्या. कांहींहि किंमत देऊं नका. एक रुका ( ६ पैचें नाणें ) सुद्धां नको. आतां यापेक्षां माल स्वस्तांत किती लावणार ! पण तुकोबांना असा अनुभव आला कीं, देव फुकटांत देतों म्हटलें तरी गिऱ्हाईक नाहीं. हरिकीर्तन श्रवण करण्यास दिडकीहि पडत नाहीं तरी तिकडे लोकांचें वळण नाहीं. आदरानें बोलाविलें तरी जायची पंचाईत. उलट सिनेमा-नाटकें-गाणीं यांच्याकरितां लोक पन्नास-पन्नास रुपये खर्च करून तिकिटें काढून जातात. हा जसा आजचा अनुभव तसाच त्या वेळचा.

कित्येक वेळां असें होतें कीं, स्वस्तांत पडतें आहे तेव्हां खपेल म्हणून दुकानदार धोतरजोडी खरेदी करतो. पण गांवीं गेल्यावर त्यास आढळून येतें कीं, माल स्वस्त असूनहि घ्यावयास कोणी गिऱ्हाईक तयार नाहीं. मग तो दुकानदार ती धोतरजोडी घरींच वापरण्यास काढतो. तसेंच येथेंहि झालें. तुकारामबुवांना आढळून आलें कीं गिऱ्हाईक नाहीं; तेव्हां त्यांनीं विचार केला कीं, कोणी गिऱ्हाईक हा माल घ्यायला तयार नाहीं, तेव्हां आतां घरांतच माल ठेवा.

"दुबळा तुका भावहीन। उधारा देव घेतला ऋण" ॥५॥

खपेल म्हणून माल जांगड आणलेला असतो. गिऱ्हाईक नाहीं मग घरींच माल ठेवायची पाळी आली म्हणजे दुकानदार पतीवरच ठेवतो व म्हणतो, "कांहीं दिवसांनीं घाडून देईन." तुकारामबुवा म्हणतात, माझ्याजवळ तरी देवाचें मोल होईल एवढा भाव कोठें आहे? मी भावहीन, दुबळा, गरीब आहें. (वास्तविक हा त्यांचा विनय आहे. देवाच्या प्राप्तीकरितां, "जाळूनी संसार बैसलों अंगणीं" असे त्यांचे उद्गार आहेत. वांटयाला आलेलीं खतें इंद्रायणींत बुडविलीं. प्रपंचाचा हवाला देवावर ठेवून भंडारा भामचंद्र यांवर चिंतन करीत काळ सारण्यास काय कमी भाव हवा? पण तुकारामबुवांना आपल्याजवळ जो भाव होता तो कमीच वाटत होता.) देवाचें मोल देण्याला पुरा भाव नसल्यामुळें तुकारामबुवा म्हणतात कीं, मीं देव उधारच घेतला व ऋणकरीच राहिलों.

येथपर्यंत अभंगाच्या भावार्थाचा विचार केला. आतां थोडें तपशिलांत शिरूं. याकरितां या अभंगाच्या प्रथम कडव्याचा थोडासा विचार करूं. "देव घ्या कोणी," या कडव्याचा विचार करूं लागलें असतां, देव म्हणजे काय? तो देतां येतो काय? मिळून त्याचा फायदा काय? आयता घर पुसोनी येतो म्हणजे काय? इत्यादि अनेक प्रश्न मनांत येतात. प्रस्तुतच्या संकीर्तनांत पहिल्या दोन प्रश्नांचा विचार करण्याचें योजिलें आहे. ते म्हणजे देव म्हणजे काय? व तो देतां येतो काय?

पहिला प्रश्न असा कीं, 'देव' म्हणजे काय? अनंत लोक देवळांत देवदर्शनाला जातांना दिसतात, भक्ति करतांना दिसतात. यावरून कोणी जर असा निष्कर्ष काढूं लागला कीं, या सर्वांना देवाच्या खऱ्या स्वरूपाची जाणीव आहे, तर तें अनुमान चुकीचें

होईल. पुष्कळ लोकांच्या क्रिया त्यांना देव काय आहे हें कळत नाहीं असेंच दाखवितात.

समर्थ एके ठिकाणीं म्हणतात :

'जगीं थोरला देव तो चोरलासे'

कित्येक माणसें देवळांत जातात. मूर्तीसमोर उभे राहून हात जोडण्याच्या वेळीं हातांत असलेली विडी टाकून देतात व हात जोडतात. काय प्रार्थना करावयाची असेल ती करतात, तोंड फिरवतात कीं लगेच विडी पेटवतात. त्यांना वाटतें, आतां देवाचें राज्य संपलें! देव म्हणजे कोनाड्यांत अथवा गाभाऱ्यांत बसवलेला आहे तेवढाच! कित्येक माणसें देवपूजेला बसलीं, कीं तास-अर्धा तास देवविषयक क्रिया करतांना दिसतात; पण देवपूजेंतून उठलीं कीं त्यांना खोटयानाटया गोष्टी करणें, लांडीलबाडी करणें यांत कांहीं गैर वाटत नाहीं. असल्या क्रियांवरून एक गोष्ट स्पष्ट होते. या लोकांना देवाचें खरें स्वरूप कळतच नाहीं. म्हणूनच कित्येक वेळां त्यांच्या मनाजोग्या गोष्टी घडून आल्या नाहींत कीं हे लोक देवाला नांवें ठेवतांना दिसतात. एखाद्याचा एकुलता एक मुलगा मेला कीं लगेच लोक म्हणतात, 'देवाला किनई तो बघवला नाहीं. काय देव दुष्ट आहे!' वगैरे.

यांपैकीं बहुतेकांनीं देवाचा 'मूर्ति' एवढाच संकोच केलेला असतो. देव म्हणजे पाषाण अथवा एखाद्या धातूची प्रतिमा एवढाच यांचा बोध असतो. यांपेक्षां जे कांहीं थोडे वेगळे देवावर विश्वास ठेवतात ते असें समजतात कीं, आपणांला हव्या असणाऱ्या सर्व गोष्टी देण्याची ज्याची शक्ति तो देव.

वास्तविक देव ह्या शब्दानें ज्या सत्तेनें हें विश्व चालतें व ज्याच्या प्रकाशानें तें प्रकाशलें जातें ती वस्तु दर्शविली जाते.

' तस्य भासा सर्वमिदं विभाति '
असें कठोपनिषदांत देवाचें वर्णन केलें आहे. गीतासुद्धां खालील श्लोकांतून असेंच वर्णन करते.

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ॥
यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ —अ. १५
ज्योतिषामपि तज्ज्योतिः तमसः परमुच्यते ॥ —अ. १३
' गतिभर्ता प्रभुः साक्षी ' —अ. ९

असें गीता परमेश्वराचें वर्णन करते. या नवव्या अध्यायांतील ' प्रभुः ' या पदावरील ज्ञानेश्वरांचें भाष्य खालीलप्रमाणें आहे :—

आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नावभरी उगें नसावें ।
पावकें दाहावें । वर्षावें जळें ॥
पर्वतीं बैसका नसंडावीं । समुद्रीं रेखा नोलांडावी ।
पृथ्वीया भूतें वाहावीं । हे आज्ञा माझी ॥
म्यां बोलविल्या वेदु बोले । म्यां चालविल्या सूर्यु चाले ।
म्यां हालविल्या प्राणु हाले । जो जगातें चाळिता ॥
मियांची नियमिलासांता । काळु ग्रासितसे भूतां ।
इयें म्हणियागतें पांडुसुता । सकळें जयाची ॥
जो ऐसा समर्थु । तो मी जगाचा नाथु ॥ — २८१–८५

उपनिषदांतूनहि ' भीषास्मात् वातः पवते भीषोदेति सूर्यः ' असें त्या आत्मसत्तेचें वर्णन आहे. तात्पर्य, देवाचें स्वरूप सांगावयाचें तर तें ज्ञानदेवांच्या खालील शब्दांत थोडक्यांत सांगतां येईल :

" ....तेवीं सत्ताप्रकाश जगा। आपणाचि जो " — अ. १५

अशा देवाच्या साक्षात्कारांत मनुष्यजन्माची सफलता आहे असें सर्व साधुसंतांचें मत आहे.

दुसऱ्या प्रश्नाचा विचार करतां असें आढळून येतें कीं, ' देव ' ही

वस्तु मुळांत 'अव्यवहार्य' आहे असें तिचें वर्णन करतात. कोणतीहि वस्तु हातांत आली तर तिची देवाण-घेवाण होते. देव हा असा आहे कीं, तो शब्दाच्याहि हातांत येत नाहीं, मग तो शब्द-द्वारां दुसऱ्यास देतां कसा येईल ?

या संकीर्तनाच्या आरंभींच उपनिषदांतील प्रसिद्ध वाक्य

**"यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह"**

दिलें आहे, त्याचा मथितार्थ असाच आहे कीं, देव हा मनवाणीला अगोचर आहे.

**यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते ।**
**तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ।।**
**यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् ।**
**तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ।।**

—केनोपनिषद् १. ४–५

ज्ञानेश्वरमहाराजहि असेंच वर्णन करतात :

**जेणें तेजें । वाचेसी वाच्य सुजे ।**
**तें वाचा प्रकाशिजे । हें कें आहे ।।** —अनुभवामृत
**जें मनाचें मन । जें नेत्राचे नयन ।**
**कानाचे कान । वाचेची वाचा ।।** —ज्ञानेश्वरी, अ. १२
**तेथींची मातु । न चढे बोलाच्या हातु ।**
**मग संवादाच्या गांवा आंतु । पैठीं कीजे ।।**

—ज्ञानेश्वरी, अ. ६

तात्पर्य, देव जर 'अशब्द' आहे तर तो देतां येईल व अर्थात् गिऱ्हाइकांकडून घेतला कसा जाईल, अशी आशंका उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. पण त्याचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, जीं उपनिषदें व जे संत देव 'अव्यवहार्य' आहे म्हणतात तेच म्हणतात कीं, तो सांगतां येतो.

न नरेणावरेण प्रोक्त एष सुविज्ञेयो बहुधा चिन्त्यमानः ।
अनन्यप्रोक्ते गतिरत्र नास्त्यणीयान् ह्यतर्क्यमणुप्रमाणात् ॥
नैषा तर्केण मतिरापनेया प्रोक्तान्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठ ॥
—कठोपनिषद् २. ८–९

देवाशीं अनन्य झालेल्या ज्ञात्यांना देव दुसऱ्यास दाखवितां येतो, म्हणूनच उपनिषदें खालीलप्रमाणें उपदेश करतात :

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः
श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥ —मुण्डक १–२–१२

अथवा

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ॥ —कठ ३. १४

साधु देव देतात म्हणजे काय करतात हें पुढील ज्ञानोबांच्या उक्तीवरून स्पष्ट होणार आहे :

मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे । हृदयीं स्वयंभचि प्रकाशे ॥ अ. ९

एकनाथमहाराज म्हणतात :

धन्य जागो गुरुमहिमा देहीं दाविला देव ।
निवारुनि भवरजाळें अवघा निरासिला भेव ॥

देव ही कांहीं हातांनीं उचलून दाखविण्याजोगी वस्तु नव्हे. देवाविषयक अज्ञान दूर करून त्याच्याकडे वृत्ति वळविणें हें कार्य साधूच करूं शकतात आत्मा मनोबुद्धीला अगोचर आहे याचा अर्थ तो अनुभवालाच येत नाहीं असा नव्हे. त्याचा अर्थ येवढाच आहे कीं, तो विषयत्वानें गोचर होत नाहीं. तसा झाला तर तो जड ठरेल. तो स्वयंप्रकाश आहे. ज्ञानेश्वरमहाराज पुढील ओव्यांतून हा विचार सुस्पष्ट सांगतात.

परि संतांसवें वसतां । योगज्ञानीं पसतां ।
गुरुचरण उपासितां । वैराग्येंसीं ॥

**येणेंचि सत्कर्में । अशेष हीं अज्ञान विरमे ।**
**जयाचें अहं विश्रामे । आत्मरूपीं ॥ × × × × ×**
**अगा सूर्योदयो जालया । सूर्ये सूर्युचि पहावा धनंजया ।**
**तेवीं मातें मियां जाणावया । मीचि हेतु ॥**

—ज्ञानेश्वरी अ. १५. ४२२–४४५

तात्पर्य, साधुमहात्मे देवाचें दर्शन करून देऊं शकतात.

तुकारामबुवा हे मोठे समर्थसंत होते. त्यांना वेदान्तशास्त्र अवगत होतें. एवढेंच नव्हे तर ते ब्रह्मनिष्ठ होते. त्यांच्या अभंगांतून देव हा 'अव्यवहार्य' आहे अशा अर्थाचीं कित्येक कडवीं आढळतात. उदाहरणार्थ,

**तुका म्हणे तूं ऐसा एक साचा। ऐसी तव वाचा झाली नाहीं ॥**
**मन वाचातीत तुझें हें स्वरूप । म्हणोनियां माप भक्ति केलें ॥**

अशीं आणखी किती तरी कडवीं देतां येतील. त्याचप्रमाणें अशा 'अदृश्य' देवाचें साधूच दर्शन करून देऊं शकतात हेंहि त्यांना ठाऊक होतें. ते म्हणतात :

**रवि दीप हिरा दाविती देखणें । अदृश्य दर्शनें संतांचिया ॥**

तुकाराममहाराज म्हणतात, 'समर्थांच्या मनांत आलें तर काय होणार नाहीं?'

**तुका म्हणे आलें समर्थाच्या मना ।**
**तरी होय राणा रंक त्याचा ॥**

तुकारामबुवा मोठे समर्थ जगद्गुरु. म्हणून ते सर्वांना हांक मारून म्हणतात :

**देव घ्या कोणी, देव घ्या कोणी ।**
**आइता आला घर पुसोनी ॥**

तिसरा प्रश्न – देव मिळून असा काय फायदा आहे कीं, लोकांना

नको असतां हे महात्मे बळेंच 'देव घ्या' असें म्हणतात? – हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. याचा विचार पुढील संकीर्तनप्रसंगीं करूं.

◆◆◆

# आपुला तो एक देव करूनि घ्यावा-६

आपुला तो देव एक करूनि घ्यावा ।
तेणेवीण जीवा सुख नव्हे ॥ १ ॥
येर तीं माइकें दुःखाचीं जनितीं ।
नाहीं आदिअंतीं अवसान ॥ २ ॥
अविनाश करी आपुलिया ऐसें ।
लावीं मना पिसें गोविंदाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे एका मरणेंचि सरे ।
उत्तमचि उरे कीर्ति मागें ॥ ४ ॥

मागील संकीर्तनांत साधुमहात्मे सर्व लोकांना – त्यांची इच्छा, आवड असो नसो – देव घ्या असा आग्रह कां करतात, असा देव-प्राप्तीपासून लाभ कोणता? असा प्रश्न उत्पन्न केला होता व त्याचा पुढील संकीर्तनांत विचार करूं असें म्हटलें होतें. त्याप्रमाणें तुकाराम-बोवांनीं त्या प्रश्नाला दिलेलें उत्तर ज्या अभंगांत आढळेल असा प्रस्तुतच्या कीर्तनाकरितां अभंग घेतला आहे.

या अभंगाला एक विशेष प्रकारचें महत्त्व आहे. कारण तुकाराम-बोवा या अभंगाच्या पहिल्या व तिसऱ्या कडव्यांतून देवाच्या प्राप्तींत ज्या वस्तूचा लाभ सुचवतात त्या अशा आहेत कीं, त्या

नकोत असें म्हणणारा प्राणी अजून जन्मास यावयाचा आहे. कोणालाहि न विचारतां त्याला काय हवें हें सांगावयाचें म्हटलें तर ज्यांचा निर्देश करतां येईल अशा त्या आहेत. त्यांपैकीं पहिली वस्तु ‘ सुख ’ व दुसरें ‘ अमरपद. ’

महाभारतांत म्हटलें आहे कीं, ‘ दुःखादुद्विजते जन्तुः सुखं सर्वाय रुच्यते । ’ श्रीएकनाथ भागवतांत म्हणतात :

**मजलागीं दुःख व्हावें । ऐसें कोणीं भावीना जीव ।....**

आपल्याला दुःख नसावें, आपण सदा सुखी असावें असें प्रत्येक प्राण्याला वाटतें. दुःखाकरितां देवाची कोणीं प्रार्थना केली आहे का ? मनुष्य सुखाकरितां प्रयत्न करतो. त्याला दुःख भोगावें लागतें. त्याचा नाइलाज आहे. सुखाचे दिवस कोणी मोजतो का ? दुःखाचा एक दिवस, एक ताससुद्धां माणसाला नकोसा वाटतो. मनुष्याला ताप आला व त्याला एक दिवस अंथरुणावरून उठतां आलें नाहीं कीं मनुष्य कुरकुर करतो. कोणी भेटावयास आला तर म्हणतो, “ काय करावें, दिवसभर अंग ठणकत आहे. अंथरुणावरून उठवत नाहीं. ” कल्पना करा, एखाद्या विक्षिप्त खेडवळ गृहस्थानें त्याला उत्तर दिलें, “ अहो, यांत कुरकुर करण्यासारखें काय आहे ? गेलीं कित्येक वर्षें तुम्ही हिंडत-फिरत होतांतच. एक दिवस अंग ठणकून नाहीं उठवलें तर त्यांत काय झालें ? ” असें म्हणणारा मनुष्य काय लायकीचा असेल हा प्रश्न येथें तूर्त विचार करण्याचा नाहीं. विचार करण्यासारखा महत्त्वाचा मुद्दा असा कीं, तीं वर्षें सुखाचीं, म्हणून हवीं अशीं असल्यानें माणसाचें लक्ष तिकडे जात नाहीं. तो तीं मोजीत नाहीं. नको तें दुःख सुरू झालें कीं त्यानें लगेच मनुष्याचें लक्ष वेधतें व म्हणून मनुष्य दुःखाचे दिवस काय, पण क्षणसुद्धां मोजतो. तात्पर्य, जीवाला सुख हवें आहे; कारण दुःख नको.

माणसें दुःखाकरितां दुःख सहन करीत नाहींत. पुढें सुख मिळावें म्हणून दुःख सहन करतात. उदाहरणार्थ, माणसें शरीरावर शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार होतात तीं काय त्यांना तज्जन्य दुःख गोड वाटतें म्हणून ? नव्हे, पुढें सुखाचे दिवस भोगावयास मिळावेत म्हणून इस्पितळांत पडण्यास तीं तयार होतात.

जसें दुःख नको तसें मरणहि नको. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :

**........न मरणें निर्विवाद । जगा पढिये ॥**

म्हातारीं माणसें तोंडानें 'माझी चिठ्ठी कोठें हरवली', 'देव मला घेऊन कसा जात नाहीं' वगैरे म्हणतांना आढळून येतात. यावरून जर कोणी भोळ्या मनुष्यानें अशी कल्पना केली कीं, या बोलणाऱ्यांना खरोखरच मरण हवें आहे तर ती कल्पना चुकीची ठरेल. ते तोंडानें बोलतात एवढेंच. प्रत्यक्ष मरण्याचा प्रसंग आला तर तें टाळण्याकरितां तरुणासारखाच तेहि प्रयत्न करतील. याविषयीं खालील गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे :

एक जरठ म्हातारा अंगावर कांहीं नाहीं, पायांत कांहीं नाहीं, डोक्यावर ओझ्याचा भार असा रस्त्यानें चालला होता. आकाशांत सूर्य तळपत असल्यानें अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या. अशा स्थितींत दुःखानें गांजल्यानें व ओझ्यानें भारावल्यानें त्यानें विक्रीकरितां डोक्यावरून चालविलेली लाकडाची मोळी रस्त्यांत टाकली व तो म्हणाला, "यमा, ये रे बाबा !" योग असा कीं, त्याची हांक ऐकून प्रत्यक्ष यम त्याच्या डोळ्यांसमोर आला व त्या म्हाताऱ्याला म्हणाला, "बाबा, मला कशाला बोलावलेंस ?" त्या म्हाताऱ्याच्या कल्पनेंतहि नव्हतें कीं, आपण यमाला हांक मारली. तो म्हणूं लागला, "तूं कोण ?" त्यावर यम म्हणाला, "सर्वांना घेऊन जाणारा यमधर्म म्हणतात तो मी. काय तुझें काम आहे ?"

यावर तो म्हातारा असें नाहीं म्हणाला कीं, “ बाबा, बरें केलेंस, तुझीच वाट पाहत होतों, या लोकांतून मला घेऊन जा ! ” तो म्हातारा म्हणतो, “ बा यमा, मी तुला बोलावलें त्याचें कारण हें ओझें जमिनीवर टाकलें तें द्यावयाला कोणी नाहीं म्हणून. तेवढें डोक्यावर दे आणि जा. ” या गोष्टीचें रहस्य असें आहे कीं, मृत्यु कोणालाहि नको !

तात्पर्य, दुःख व मरण नको ही गोष्ट इतकी स्पष्ट आहे कीं, त्याविषयीं जास्त लिहिण्याचें कारण नाहीं.

अर्वाचीन काळांतील महर्षि बाबू अरविंद घोष यांनीं आपल्या Divine Life या पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, वैदिककालीन ऋषींनीं मानवाच्या आकांक्षा जशा व्यक्त केल्या आहेत, त्यापलीकडे अजून कोणी गेला नाहीं व जाईल असें वाटत नाहीं. त्या आकांक्षा म्हणजे ‘ सत्, चित् व आनंद ! ’ माणसास हें हवें आहे.

तुकारामबोवांनीं जगाकडे पाहिलें व वरतीं जो निष्कर्ष मांडला तेंच त्यांना आढळून आलें. माणसें सुखाकरितां तळमळत आहेत, त्यांना मरण येऊं नये असें वाटतें; पण त्यांना जी प्रत्यक्ष परिस्थिति दिसून आली ती वेगळीच. माणसें सुखाकरितां मरत आहेत. पण हवें असें सुख फारच थोड्यांच्या पदरांत पडलेलें त्याना दिसलें. वरतीं माणसांना सुख हवें म्हणून जें म्हटलें आहे तें सुख हंगामी नको आहे. जीवांना टिकाऊ, शाश्वत असें सुख हवें आहे. तसें नसतें तर सुख भोगल्यावर माणसांनीं आनंदानें दुःख भोगलें असतें. माणसाला दुःख नकोच. कोणीं देवाची अशी प्रार्थना केलेली ऐकली अथवा वाचली आहे का कीं, “ देवा, आजपर्यंत तुझ्या कृपेनें फार आनंदाचे दिवस गेले, आतां दुःखाचे दिवस येऊं देत ! ” कोणास चारपांच लेकरें असून प्रपंच त्याच्या

दृष्टीनें सुखांत चालला असता तर तो देवाची अशी प्रार्थना करतो का कीं, "देवा, आजपर्यंत आनंद भोगला, आतां दशरथाला पुत्रशोक झाला होता असें पुराणांत सांगितलें आहे, मला चारपांच मुलें आहेत एक मरूं दे व पुत्रशोकाचा मला अनुभव येऊं दे." असें कोणी म्हणत नाहीं. तात्पर्य, जीवास ज्यांत दुःख नाहीं, ज्याच्यामागून दुःख नाहीं, असें टिकाऊ सुख हवें आहे.

पण तुकाराममहाराजांना असें आढळून आलें कीं, हवें असलेलें हें सुख फारच थोड्या लोकांच्या वांट्याला आलें आहे. बहुतेक लोक आतां पुढें आपण अधिक सुखी होऊं या आशेवरच चालले आहेत. तुकारामबोवा म्हणतात :

'सर्वसुखाचिया आशा जन्म गेला।'

सर्वसुखाचिया **भोगा** नव्हे. सर्वसुख भोगण्यांत जन्म जात नाहीं; तर आशेंत लग्न केलें कीं आपण पुरें सुखी होऊं, मुलगा झाला कीं होऊं इत्यादि प्रकारानें माणसें सुखाच्या आशेनें जगत आहेत.

हे सुखाभिलाषी जीव सुख मिळावें म्हणून प्रयत्न करतात, पण त्यांच्या पदरांत मात्र दुःख पडतें याचें कारण काय? असा जेव्हां तुकारामबोवा विचार करूं लागले त्या वेळीं त्यांना वाटलें कीं, हीं सुखाचीं गिऱ्हाइकें भलत्याच बाजारांत हिंडत आहेत व म्हणून त्यांना हवा तो माल मिळत नाहीं. हवे आहेत पेढे व शोध करीत आहेत मिरच्यांच्या बाजारांत! मिळणार कोठून? मिरच्यांच्या बाजारांत असा पेढ्यांचा शोध करणारा गृहस्थ पाहून एखादा दयार्द्र पुरुष त्यास असें सांगतो कीं, "बाबा, या बाजारांत पेढे नाहींत. पेढे हवे असले तर अमक्या बाजारांत अमक्याच्या दुकानीं मिळतील, इतर कोठें मिळणार नाहींत." तसेंच विषयाच्या बाजारांत सुख शोधणाऱ्या जीवांना तुकारामबोवा या अभंगाच्या प्रथम कडव्यांत सुखाचा पत्ता सांगतात :—

आपुला तो एक देव करूनि घ्यावा ।
तेणेंविण जीवा सुख नव्हे ॥ १ ॥

तो एक देव आपलासा करून घ्या. त्याशिवाय जिवाला सुख होणार नाहीं. त्याशिवाय सुख होणार नाहीं याचा अर्थ असा करावयाचा का कीं, देवाला सोडून जे इतर पदार्थ आहेत त्यांचा लाभ करून घेतला तर सुख होणार नाहीं ? असा प्रश्न केल्यास तुकारामबोवा त्याचें उत्तर पुढील कडव्यांत सकारण देतात :

येर तीं माइकें दुःखाचीं जनितीं ।
नाहीं आदिअंतीं अवसान ॥ २ ॥

येर म्हणजे देवाव्यतिरिक्त इतर. हीं सर्व मायाकार्य असल्यानें दुःखाला उत्पन्न करणारीं आहेत. कारण तीं आरंभीं व अंतीं नाहींत व म्हणून मध्यें भासत असलीं तरी अवसान म्हणजे शेवटीं नाहींतच. जें आदि नाहीं व अंतीं नाहीं तें दिसलें, भासलें तरी खोटेंच. वेदान्तशास्त्र जगास मिथ्या म्हणतें तें याच अर्थानें. सत्यनदीप्रमाणें मृगजळाची नदी जरी पाण्याच्या लाटांनीं भरून वाहत चाललेली दिसली तरी ती कोठें उगम पावली नाहीं व शेवटीं समुद्रास मिळाली नाहीं. म्हणून मध्यें जरी डोळ्यांना भासली तरी शेवटीं नाहीं हेंच खरें.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :

ब्रह्मगिरीहूनि न निघे । आणि समुद्रींही कीर न रिघे ।
माजीं दिसे वाउगें । मृगांबु जैसें ॥ —ज्ञा. १५–२३८

मृगजळ दिसे साचपणा ऐसें । खोटियाचे पिसें ऊर फोडी ॥
॥ तु. अभंग ॥

माण्डुक्योपनिषद्कारिकेंत गौडपादाचार्य असाच सिद्धांत मांडतात :

आदौ अन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत् तथा ॥

गीतेंतसुद्धां भगवान् अर्जुनाला म्हणतात, " अर्जुना, प्रपंचरूप वृक्ष

**' नान्तो न चादिर्नच संप्रतिष्ठा '**

असा आहे.

देवाव्यतिरिक्त सर्व नाशवंत फुटकें असल्यामुळें त्याचा लाभ तात्पुरता आनंद देणारा असला तरी अंतीं रडवणार. कारण, हें पदार्थ मुळांतच नाशिवंत आहेत. त्यांच्यामागें लागतो तो त्यांचीच गति पावणार. तुकारामबोवा म्हणतात :

**मरती मेली नेणों किती । तोचि लाभ तयाचे संगती ॥**
**म्हणोनि येतों काकुळतीं । धीर तो चित्तीं दृढ द्यावा ॥**

या विषयांच्यामागें लागलात तर शेवटीं मरणच पदरांत पडणार. उलट देव आपलासा केला तर तो जसा अविनाशी आहे तसा आपणास शरण येणाऱ्यांस तसें अविनाशी करील. हीच गोष्ट तिसऱ्या कडव्यांत तुकाराममहाराज सांगतात :

**अविनाश करी आपुलिया ऐसें । .... ॥ ३ ॥**

जो देव आपलासा करतो त्याला देव आपल्यासारखा अविनाशी करतो. यावर प्रश्न असा कीं, त्याला आपलासा करण्याचा उपाय काय? त्याचें उत्तर तुकारामबोवा याच तिसऱ्या कडव्याच्या उत्तरार्धांत देतात :

**.... लावी मना पिसें गोविंदाचें ॥ ३ ॥**

तूं मनाला गोविंदाचें वेड लाव. देवाला आपलासा करण्याचा सोपा उपाय देवावर प्रेम करा. प्रेमानें प्रेम वाढतें हा जगप्रसिद्ध नियम आहे.

देव अविनाशी करतो हें खरें, पण तो मृत्यु केव्हांपासून चुकवतो? याचें उत्तर शेवटच्या कडव्यांत तुकारामबोवा देतात :

**तुका म्हणे एका मरणेंचि सरे ।**
**उत्तमाचि उरे कीर्ति मागें ॥ ४ ॥**

ज्यानें देवाला आपलासा केला त्याला एकदां मरण आलें, कीं त्याच्या पाठीमागची जन्ममृत्यूंची परंपरा संपली.

**' तैसें येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे ।**
**किंबहुना येरझारे । चिरा पडे ॥ '**—ज्ञा. १२-१३६

या ज्ञानेशांच्या उक्तीप्रमाणें होतें. पुनः त्यास जन्मावें लागत नाहीं. मग तो उत्तम कीर्तिरूपानें कायमचा राहतो. अमरकीर्तीचा त्याला लाभ होतो. येथें भावार्थ संपला. आतां आपण थोडें तपशिलांत शिरूं.

आपण या अभंगांतील प्रथम कडव्याचा विचार करूं लागलों असतां प्रथम अशी कल्पना येते कीं, तुकारामबोवा जर नुसतें असें म्हणते कीं, देव आपलासा करून घेतलांत कीं तुम्हांला सुख मिळेल, तर त्यांचें म्हणणें पटावयास फारशी अडचण नव्हती. पण ते म्हणतात कीं, " त्याविना जिवाला सुख होणारच नाहीं. "

हें त्यांचें विधान तुमच्या - आमच्या सामान्य माणसांच्या - जगाच्या अनुभवाच्या अगदीं विरुद्ध दिसतें. आपला अनुभव जर आपण पाहूं लागलों तर देव न भेटूनसुद्धां किती तरी वस्तूंपासून आपणांस सुखलाभ झालेला दिसतो. उदाहरणार्थ, मनुष्य लग्न करतो त्या वेळीं काय त्याला दुःख होतें? निमंत्रणपत्रिका छापणें, जेवणें घालणें वगैरे जो तो सोहळा करतो यावरून विवाहांत त्याला सुखाचा लाभ होतो हें निश्चित. मुलगा झाला तर माणसें साखर अथवा पेढे वांटतात. यावरूनसुद्धां निष्कर्ष जर कांहीं काढतां येत असेल तर तो हा कीं, त्यायोगानें माणसाला सुख होतें. तात्पर्य, असे किती तरी पदार्थ जिवाला सुख देणारे दिसत असतांना व त्यांच्या प्राप्तींत जिवाला सुखाचा लाभ झालेला दिसत असतांना तुकारामबोवा अगदीं लोकविलक्षण सिद्धान्त मांडतात :

**" तेणेंवीण जीवा सुख नव्हे "**

वरें, जें तुम्हांआम्हां सामान्य माणसांना दिसतें तें तुकारामबोवांसारख्या थोर व्यवहारज्ञ संतास दिसत नव्हतें असें म्हणणें हेंहि धाडसाचें होईल. तेव्हां तुकारामबोवा वरीलप्रमाणें जो सिद्धान्त बांधतात त्याचा सुसंगत अर्थ जर लावावयाचा असला तर नुसता शब्दशः अर्थ करून भागणार नाहीं. त्याकरितां तुकारामबोवादिक संत 'सुख' कशास म्हणतात हें पाहणें अवश्य आहे. त्याची आपणांस समजूत पटली, कीं तुकारामबोवादि संतांच्या अनेक वचनांचा उलगडा होणार आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, तुकारामबोवादि संत आपण ज्याला सुख म्हणतों त्याला सुख म्हणायलाच राजी नाहींत. त्यांची सुखाची व्याख्याच वेगळी आहे. ज्ञानेश्वरमहाराज सुखाची व्याख्या खालीलप्रमाणें करतात :

किंबहुना सोये । जीव आत्मयाची लाहे ।
तेथ जें होये । तया नाम सुख ॥
आणि ऐसी हे अवस्था । न जोडतां पार्था ।
जीजें तेंचि सर्वथा । दुःख जाणे ॥ ज्ञा. १३. १३१–१३२

साधु ज्या निर्विषय सुखाचा अनुभव घेतात त्या सुखाशीं तुलना करतां विषयसुख हें त्यांना सुख म्हणण्याच्या लायकीचें वाटत नाहीं. ज्ञानेश्वरमहाराजांनीं खालील ओव्यांतून हा विचार दृष्टान्त देऊन पटवण्याचा मोठा उत्कृष्ट प्रयत्न केला आहे.

“ येऱ्हवीं विषयीं सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें नोहे ।
तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगामाजीं ॥
सांगे वात वर्ष आतपु धरे । ऐसें अभ्रच्छायाचि जरी सरे ।
तरी त्रिमाळिकें धवळारें । करावीं कां ॥
म्हणौनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे ।

ज्यानें देवाला आपलासा केला त्याला एकदां मरण आलें, कीं त्याच्या पाठीमागची जन्ममृत्यूंची परंपरा संपली.

**‘ तैसें येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे ।**
**किंबहुना येरझारे । चिरा पडे ॥’**—ज्ञा. १२-१३६

या ज्ञानेशांच्या उक्तीप्रमाणें होतें. पुनः त्यास जन्मावें लागत नाहीं. मग तो उत्तम कीर्तिरूपानें कायमचा राहतो. अमरकीर्तीचा त्याला लाभ होतो. येथें भावार्थ संपला. आतां आपण थोडें तपशिलांत शिरूं.

आपण या अभंगांतील प्रथम कडव्याचा विचार करूं लागलों असतां प्रथम अशी कल्पना येते कीं, तुकारामबोवा जर नुसतें असें म्हणते कीं, देव आपलासा करून घेतलांत कीं तुम्हांला सुख मिळेल, तर त्यांचें म्हणणें पटावयास फारशी अडचण नव्हती. पण ते म्हणतात कीं, “ त्याविना जिवाला सुख होणारच नाहीं. ”

हें त्यांचें विधान तुमच्या - आमच्या सामान्य माणसांच्या - जगाच्या अनुभवाच्या अगदीं विरुद्ध दिसतें. आपला अनुभव जर आपण पाहूं लागलों तर देव न भेटूनसुद्धां किती तरी वस्तूंपासून आपणांस सुखलाभ झालेला दिसतो. उदाहरणार्थ, मनुष्य लग्न करतो त्या वेळीं काय त्याला दुःख होतें ? निमंत्रणपत्रिका छापणें, जेवणें घालणें वगैरे जो तो सोहळा करतो यावरून विवाहांत त्याला सुखाचा लाभ होतो हें निश्चित. मुलगा झाला तर माणसें साखर अथवा पेढे वांटतात. यावरूनसुद्धां निष्कर्ष जर कांहीं काढतां येत असेल तर तो हा कीं, त्यायोगानें माणसाला सुख होतें. तात्पर्य, असे किती तरी पदार्थ जिवाला सुख देणारे दिसत असतांना व त्यांच्या प्राप्तींत जिवाला सुखाचा लाभ झालेला दिसत असतांना तुकारामबोवा अगदीं लोकविलक्षण सिद्धान्त मांडतात :

**“ तेणेंवीण जीवा सुख नव्हे ”**

बरें, जें तुम्हांआम्हां सामान्य माणसांना दिसतें तें तुकारामबोवांसारख्या थोर व्यवहारज्ञ संतास दिसत नव्हतें असें म्हणणें हेंहि धाडसाचें होईल. तेव्हां तुकारामबोवा वरीलप्रमाणें जो सिद्धान्त बांधतात त्याचा सुसंगत अर्थ जर लावावयाचा असला तर नुसता शब्दशः अर्थ करून भागणार नाहीं. त्याकरितां तुकारामबोवादिक संत 'सुख' कशास म्हणतात हें पाहणें अवश्य आहे. त्याची आपणांस समजूत पटली, कीं तुकारामबोवादि संतांच्या अनेक वचनांचा उलगडा होणार आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, तुकारामबोवादि संत आपण ज्याला सुख म्हणतों त्याला सुख म्हणायलाच राजी नाहींत. त्यांची सुखाची व्याख्याच वेगळी आहे. ज्ञानेश्वरमहाराज सुखाची व्याख्या खालीलप्रमाणें करतात :

**किंबहुना सोये । जीव आत्मयाची लाहे ।**
**तेथ जें होये । तया नाम सुख ॥**
**आणि ऐसी हे अवस्था । न जोडतां पार्था ।**
**जीजें तेंचि सर्वथा । दुःख जाणे ॥** ज्ञा. १३. १३१-१३२

साधु ज्या निर्विषय सुखाचा अनुभव घेतात त्या सुखाशीं तुलना करतां विषयसुख हें त्यांना सुख म्हणण्याच्या लायकीचें वाटत नाहीं. ज्ञानेश्वरमहाराजांनीं खालील ओव्यांतून हा विचार दृष्टान्त देऊन पटवण्याचा मोठा उत्कृष्ट प्रयत्न केला आहे.

**"येऱ्हवीं विषयीं सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें नोहे ।**
**तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगामाजीं ॥**
**सांगे वात वर्ष आतपु धरे । ऐसे अभ्रच्छायाचि जरी सरे ।**
**तरी त्रिमाळिकें धवळारें । करावीं कां ॥**
**म्हणौनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे ।**

**जैसे महुर कां म्हणिजे । विषकंदातें ॥**
**ना तरी भौमा नाम मंगळु । रोहिणीतें म्हणती जळु ।**
**तैसा सुखप्रवादु वरळु । विषयिकु हा ॥** " ज्ञा. ५. ११३-११६

मिल् यांचा नीतिशास्त्रविषयात्मक Utilitarianism ( उपयुक्त-वाद ) म्हणून उत्कृष्ट ग्रंथ आहे. त्यांतसुद्धां अशाच जातीच्या सुखासुखांत विवेक करणारा उत्कृष्ट विचार मांडलेला आहे. एतद्-विषयक मिल्चें पुढील वाक्य प्रसिद्ध आहे :

" It is better to be a Socrates dissatisfied than to be a pig satisfied. "

अनुकूल भोग मिळून प्राप्त होणाऱ्या सुखानें तुंद असणाऱ्या डुकरापेक्षां असंतुष्ट मानव होणें बरें.

याचा मथितार्थ असा आहे कीं, डुकरासहि अनुकूल विषयाचा योग झाला असतां आनंद होतो व असे योग त्याला पुष्कळ येतात, म्हणून डुकराचें कोणी भाग्य वर्णन करतो का ? अथवा डुकराचा जन्म मिळावा म्हणून कोणी प्रयत्न करतो का ?

तुकारामबोवा म्हणतात :

**' डुकरासी विष्ठा माने सावकाश '**

म्हणून मनुष्य त्याची इच्छा करीत नाहीं. इंद्रियांच्या व विषयांच्या सन्निकर्षांत होणारें सुख हें सर्वत्र सारखेंच. ज्ञानदेवांनीं इंद्रियांनीं दाखविलेले विषयोपभोग हेंच जन्माचें साफल्य समजणाऱ्या लोकांचें पुढील ओवींत वर्णन केलें आहे —

**इंद्रियाचें वेरिलें । चरोनि राखी जो जियालें ।**
**वैलातळीं लागले । गोचीड जैसे ॥** —ज्ञा. १८. ६६८

सांगण्याचा मुद्दा असा कीं, विषयांत सुख नाहीं असें म्हणतात, त्या वेळीं त्यांना लोक विषयसुख भोगतांना, त्याकरितां मरेपर्यंत प्रयत्न करतांना दिसत नाहींत असें नव्हे. महात्मे त्याला सुख

म्हणायलाच राजी नाहींत. कारण ते निर्विषय शाश्वत सुखाचा आनंद भोगतात :

देशें कालें वेदानुवादा । ज्या सुखाची न करवे मर्यादा ।
त्या सुखाची सुखसंपदा । मद्भक्त सदा भोगिती ।।-ए. भागवत

निळोबा म्हणतात :

नित्यानंदा पुढें आनंद तो कोण ।
विषयसुखबाई बापुडें तें क्षीण ।। .... किंवा
अर्जुना अनंत सुखाच्या डोहीं ।
एकसरा तळचि घेतला जिहीं ।
मग स्थिरावोनि तेंहि ।
तेंचि जाहले ।। —ज्ञानेश्वरी, अ. ५

असें अनंत निर्विषय देवाचें सुख महात्मे भोगतात. त्याच्याशीं तुलना करतांना वैषयिक सुखाकडे त्यांची वृत्तीहि यायला तयार नसते. म्हणून त्यांना तें सुखच वाटत नाहीं. याच अर्थानें साधूंच्या खालील वचनाकडे पाहिलें पाहिजे :

दुःखवांदवडी आहे हा संसार। सुखाचा विचार नाहीं कोठें।।तु.अ.
आपदुःखाचें केणें सुटलें । जेथ मरणाचे भरे लोटले ।
तिये मृत्युलोकींचिये असें घडलें । हाटवेळें येणें ।। ज्ञा.९–४९६

खुद्द गीताकार भगवान् श्रीकृष्णसुद्धां

' अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ' । अ. ९–३३ असेंच म्हणतात.

तात्पर्य, तुकाराममहाराज देवाविण सुख नाहीं असें विधान करतात. त्याचाहि वरच्या धोरणानें अर्थ करणें अवश्य आहे. देवावांचून इतर पदार्थ सुख कां देत नाहींत याचा उलगडा पुढील कडव्यांत जो केला आहे, त्यावरूनहि हा अर्थ स्पष्ट होणार आहे.

त्यांत तुकारामबोवा म्हणतात कीं, देवाव्यतिरिक्त सर्व सादि व सांत आहे. म्हणून शेवटीं ते आपणांस रडविणारच व म्हणून ते 'दुःखाचीं जनितें.' त्यांच्या प्राप्तींत तात्पुरतें सुख होत नाहीं असा म्हणण्याचा आशय नव्हे. तुकाराममहाराज या अभंगांतून जें सांगतात तें म्हणजे भगवद्गीतेंतील खालील श्लोकाचा मथितार्थच असें म्हटल्यास हरकत नाहीं.

**ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते।**
**आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥** अ. ५–२१

कठोपनिषदांतसुद्धां 'अनित्य वस्तूमध्यें जो नित्य आहे, जगाला चेतना देणाऱ्यांना जो चेतना देणारा आहे, स्वतः एक असून जो अनेकांना कर्मांचीं फळें देतो त्याला स्वतःच्या ठिकाणीं स्थित असा जे पाहतात त्यांनाच शाश्वत शांति प्राप्त होते, इतर कोणाला नाहीं,' असें म्हटलें आहे.

**नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानामेको बहूनां यो विदधाति कामान्**
**तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां शान्तिः शाश्वती नेतरेषाम् ।**

तसेंच खालीलप्रमाणें म्हटलें आहे :

**एकोवशी सर्वभूतान्तरात्मा एकं रूपं बहुधा यः करोति ।**
**तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम् ।**

एक, सर्व जगाचा स्वामी, सर्व भूतांचा अन्तरात्मा आणि एकच स्वरूप जो अनेक प्रकारांनीं दाखवितो अशा त्या ( परमेश्वरा ) ला आपल्या हृदयाकाशामध्यें स्थित असलेला जे ज्ञानी पुरुष पाहतात यांनाच शाश्वत सुख प्राप्त होतें, इतरांना नाहीं.

तुकारामबोवा तसेंच म्हणतात :

**आपुला तो एक देव करूनि घ्यावा ।**
**तेणेंविण जीवा सुख नव्हे ॥**

या कडव्याचा विचार करीत असतां आणखीहि विचार मनांत येण्यासारखा आहे. तो असा कीं, देव आपलासा करायचा केव्हां? जर तो आपलासा नसेल तर; पण वर जीं उपनिषदांतील वाक्यें दिलीं आहेत, त्यांवरून अथवा खालीलप्रमाणें जीं इतरत्र प्रमाणें आढळतात त्यांवरून तर तो आपल्या सर्वांत आहेच. मग तो आपलासा काय करावयाचा?

**एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ॥**

गीतासुद्धां असेंच सांगते :

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥** अ. १८-६१
**सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तःस्मृतिर्ज्ञानमपोहनं च ॥**
अ. १५-१५

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात :

**तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्व सुखाचा आरामु ।**
**कीं भ्रान्तासी कामु । विषयावरी ॥** ज्ञा. अ. ९
**सर्वांघटीं राम देहादेहीं एक ।**
**सूर्य प्रकाशक सहस्ररश्मी ॥** ज्ञा. हरिपाठ

हा वेदान्ताचा जगप्रसिद्ध सिद्धान्त न माहिती असण्याजोगे तुकारामबोवा अज्ञानी होते असें भारीच आहे! ते तर बहुश्रुत होते. ते म्हणतात :

**पाहिलीं पुराणें धांडोळिलीं दरुषनें ॥**
**वेदाचा तो अर्थ आम्हांसींच ठावा ।**
**येरांनीं वाहावा भार माथां ॥**

गीतेसंबंधानें त्यांना नितान्त आदर. ते म्हणतात,

**गीताभागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥**

**तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ।।**

देव सर्वांत आहे असें सांगणारीं त्यांचीं किती तरी कडवीं देतां येतील. उदाहरणार्थ :

**विश्वीं विश्वंभर । बोले वेदान्तींचा सार ।।**

हा सर्व अभंग पाहा.

तात्पर्य, 'आपुला तो एक देव करूनि घ्यावा' असें तुकाराम-बोवा जें म्हणतात, तें देव सर्वांत आहे हें जाणून, ही गोष्ट अर्थ लावतांना लक्षांत ठेवणें अवश्य आहे. मग प्रश्न उत्पन्न होतो, तुकारामबोवांना 'देव सर्वांत आहे' हें जर माहीत आहे तर मग त्याला 'आपलासा' करून घ्या असें ते कां म्हणतात ?

त्याचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, देव आपल्या आंत आहे, तो आपलासा नाहीं. तो आपलासा प्रयत्नानें करावा लागतो. देव आपणांजवळ असून आपणांस जर त्याचें ज्ञान नसेल, तो आपलासा केला नसेल तर काय उपयोग ? ज्ञानेश्वरमहाराज हीच गोष्ट दृष्टान्त देऊन फारच सुंदर रीतीनें सांगतात :

**पाहें पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदरा आड ।**
**परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्ध काइ न सेविती ।।**
**कां कमलकंदा आणि दर्दुरीं । नांदणूक तरी एकेचि घरीं ।**
**परि परागु सेविजे भ्रमरीं । येरां चिखलुचि उरे ।।**
**ना तरी निदैवाच्या परिवरीं। लोह्या रुतालिया आहाति सहस्रवरी ।**
**परि तेथ वसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ।।**
**तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्व सुखाचा आरामु ।**
**कीं भ्रान्तासी कामु । विषयांवरी ।।**
**बहु मृगजळ देखोनि डोळा । थुंकीजे अमृताचा गिळितां गळाळा ।**
**तोडिला परिसु बांधिला गळां । शुक्तिकालाभें ।।**

**तैसीं अहंममतेचिये लवडसवडी । मातें न पवतीचि वापुडीं ।**
**म्हणौनि जन्ममरणाचिये दुथडी । डहुळतें ठेलीं ।।**

ज्ञा. अ. ९. ५७–६२

देवळांत देवाचा पुजारी देवाच्याजवळ बसलेला असतो. पण काय उपयोग? त्याचें सर्व लक्ष दर्शनास येणाऱ्या भक्तानें देवापुढें टाकलेल्या पैशाकडे! तसेंच बहुतेक सर्व जीवांचें आहे. देव जवळ आहे, पण जीव देवाच्याच प्रकाशानें विषयोपभोग घेत आहेत व त्यांच्या लाभाकरितां अहोरात्र अविश्रांत श्रम करीत आहेत. तुकारामबोवा सुद्धां एके ठिकाणीं दृष्टान्त देऊन हीच गोष्ट सांगतात:

**देहीं असोनिया देव । वृथा फिरतो निदैव ।।**
**नाभीं मृगाचे कस्तुरी । मृग हिंडे वनांतरीं ।।**

तात्पर्य, देव जवळ असून उपयोग नाहीं. त्याचें ज्ञान हवें, विश्वास हवा, त्यावर सत्ता गाजवितां आली तर शाश्वत सुख मिळेल. म्हणून तुकारामबोवा म्हणतात:

**आपुला तो एक देव करूनि घ्यावा । ....**

देव हा सुखरूप आहे, नित्य आहे, म्हणून देवाला ज्यांनीं आपलासा केला त्यांना शाश्वत सुखाची प्राप्ति होते.

देव आपलासा करून घेण्याचा फार सोपा मार्ग तुकारामबोवा या अभंगांत सांगतात :

**.... लावी मना पिसें गोविंदाचें ।। २ ।।**

हा मार्ग सोपा म्हणण्याचें कारण माणसांत प्रेम हें आहेच; त्याला वळण वेगळें लावावयाचें एवढेंच त्यास करावयाचें आहे. योगादिक मार्ग हे निसर्गाच्या विरुद्ध वागावयास सांगत असल्यानें त्यांत कष्ट फार आहेत. या मार्गांत सुलभपणा आहे. देवावर प्रेम करणें हाच भक्तिमार्ग. नारदांनीं आपल्या भक्तिसूत्रांत भक्तीची व्याख्या पुढील-प्रमाणें केली आहे :

**सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा ॥**

तुकारामबोवा म्हणतात, प्रेमानें प्रेम वाढतें. देवावर आपण प्रेम करावयास शिकलों तर देव आपणांवर प्रेम करील.

**तुका म्हणे येथें पिसें । तेथें तैसें असेल ॥**

शेवटच्या कडव्यांत तुकारामबोवा ज्यांनीं देवाला आपलासा केला त्याचें दुःख कायमचें नाहींसें होतें, येवढेंच नव्हे तर ते कीर्तिरूपानें भूतलावर अमर होऊन राहतात, असें सांगतात.

सर्व दुःखाला कारण जन्म आहे. देव आपलासा ज्यानें केला त्याचें जन्ममरण देव नाहींसें करतो :

**जो मज होय अनन्यशरण । त्याचें निवारीं मी जन्ममरण ।**
**म्हणोनि शरणागता शरण्य । मीचि एकु ॥** ज्ञा.अ.९. २८८

भक्त हा कीर्तीकरितां देवाला आपलासा करीत नाहीं; पण देव आपलासा ज्यांनीं केला त्यांची तुकारामबोवा म्हणतात, 'कीर्ति वाढे चराचरीं.' लक्षांत घेण्याजोगी गोष्ट आहे कीं, राजेमहाराजे उदंड होऊन गेले. आज त्यांचीं नांवेंहि शिल्लक नाहींत; पण ज्ञानेश्वरमहाराज, तुकाराममहाराज, समर्थ यांच्या नांवांचा जयघोष करीत लाखों लोक त्यांच्या यात्रा पदरचें खाऊन करीत आहेत! केवढी ही कीर्ति !

**तुका म्हणे एका मरणेंचि सरे ।**
**उत्तमाचि उरे कीर्ति मागें ॥ ४ ॥**

देव आपलासा करण्यांत असे अनंत लाभ आहेत.

• • •

# अधिकार तैसा दावियेला मार्ग- : ७ :

अधिकार तैसा दावियेला मार्ग ।
चालतां हें मग कळों येतें ॥ १ ॥
जाळूं नये नाव पावलेनि पार ।
मागील आधार बहुतांचा ॥ २ ॥
तुका म्हणे रोग वैद्याचे अंगीं ।
नाहीं करी जगीं उपकार ॥ ३ ॥

प्रस्तुत संकीर्तनाचा अभंग हा तीन कडव्यांचा लहानसा असा आहे. पण तुकारामबोवांच्या एकंदर अभंगाचा सुसंगत अर्थ लावणें अथवा त्यांच्या शिकवणुकीचें मर्म पाहणें या दृष्टीनें याला फार महत्त्व आहे. मुख्यतः ख्रिश्चन मिशनरी व आपल्यांतील सुद्धां कांहीं लोक तुकारामबोवांवर विसंगततेचा आरोप करतात. ते म्हणतात, पाहा, तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात :

" जंव हें सकळ सिद्ध आहे । हात चालावया पाये ॥
तंव तूं आपलें स्वहित पाहें । तीर्थयात्रे जाये चुको नको ॥ "

तर तेच तुकारामबोवा दुसऱ्या अभंगांत म्हणतात :

" तीर्थीं धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥ "

या अभंगांत तुकोबांनीं सांगितलेल्या आपल्या शिकवणुकीच्या अत्यंत व्यवहारी तत्त्वाकडे त्यांचें जावें तसें लक्ष गेलें नाहीं म्हणून हे लोक वरील आरोप करतात. प्रस्तुतचा अभंग व असाच दुसराहि लहानसा अभंग :

" अधिकार तैसा करूं उपदेश ।
साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ "

यांत बोवांनीं आपल्या उपदेशाचें सूत्र सांगितलें आहे. त्याचा विचार केला म्हणजे तुकोबांच्या शिकवणींत विसंगतता कशी नाहीं हें लक्षांत येईल. अभंग सर्व एकाच पुस्तकांत छापल्यानें वाचणाऱ्यास असा भ्रम उत्पन्न होण्याचा संभव आहे कीं, हे सर्व जवळजवळ एकाच काळीं तयार केले असावेत; पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, ते एकाच काळीं तर नाहींतच; पण एकाच अधिकाराचे सर्व श्रोते आहेत अशी वेड्यासारखी समजूत करून घेऊनहि तयार केलेले नाहींत.

तुकोबा म्हणतात, मी माझ्याकडे येणारा ज्या अधिकाराचा असेल तो अधिकार पाहून त्याला झेपेल व त्याची उन्नति करील असा मार्ग त्याला शिकवला. तसेंच मेघवृष्टीनें उपदेश करतांनाहि लोकांत भिन्न भिन्न प्रकारचे लोक आहेत हें जाणून वेगवेगळ्या अधिकारांच्या माणसांकरितां वेगवेगळे मार्ग सांगितले.

**अधिकार तैसा दावियेला मार्ग ।**

हें मार्गदर्शन योग्य आहे किंवा नाहीं हें आपला अधिकार पाहून त्या मार्गानें चालूं लागल्यावर कळून येणार आहे.

**चालतां हें मग कळों येतें ॥ १ ॥**

अन्न शिजून तयार झाल्यावर पुनः जाळ पेटवत ठेवणें वेडेपणाचें !

**शिजल्यावरी जाळ । वायां जायाचें तें मूळ ॥**

तसें तुम्ही मुक्त झालांत असें तुम्हीच म्हणतां :

**काम नाहीं काम नाहीं । झालों पाहीं रिकामा ॥**

आतां तुम्हांला हा उपद्व्याप कोणीं सांगितला ? असा प्रश्न केल्यास तुकारामबोवा पुढील कडव्यांत दोन वेगवेगळे दृष्टान्त देऊन उत्तर देतात :

**जाळूं नये नाव पावलेनि पार ।**

**मागील आधार बहुतांचा ॥ २ ॥**

न्याय असा आहे कीं, नावेचा आश्रय करून जो परतीराला गेला त्यानें आपण परतीराला आलों, आतां करायची काय नाव, असें म्हणून नाव जाळूं नये. कारण आपण जरी परतीराला आलों तरी सगळें गांव कांहीं परतीराला त्याबरोबर आलें नाहीं. आपल्या मागून येणारे अनेक लोक आहेत, त्यांनाहि परतीराला यावयाचें आहे. तेव्हां नाव ही त्यांना पलीकडच्या तीराला नेण्याचें साधन असल्यानें त्यांच्याकरितां ती न जाळतां राखून ठेवणें अवश्य आहे. म्हणूनच या अभंगाच्या वर दिलेल्या दुसऱ्या कडव्यांत तुकारामबोवा म्हणतात, " पार म्हणजे नदीचें पलीकडचें तीर, त्याला पोंचलेल्यानें नाव जाळूं नये; कारण ती मागाहून येणारे जे अनेक लोक आहेत त्यांचा आधार आहे. "

हा झाला दृष्टान्त. तसेंच द्राष्टान्तीं, मुक्त झालेल्या पुरुषानें आपण ज्या साधनानें मुक्काम गांठला तो साधनमार्ग नाहींसा करूं नये; कारण अनंत साधकांना तो तारक होणार आहे. आपण मुक्त झाल्यावरहि मुक्त पुरुषानें साधन करीत राहावें, हें योग्य आहे.

दुसऱ्या एके ठिकाणीं तुकारामबोवा असाच दृष्टान्त देतात :

**तुका म्हणे नाव । जनांसाठीं उदकीं ठाव ॥**

नाव पाण्यांतच राहते. ती तर तरलेलीच आहे; पण ती पाण्यांत राहते ती इतरांना तारून नेण्याकरितां. दुसऱ्या दृष्टान्तानें तुकारामबोवा ह्याच गोष्टीची ( म्हणजे ध्येय गांठलें म्हणून स्वतः-पुरता कर्तव्यशून्य झालेला महात्मासुद्धां लोकसंग्रह कसा करतो याची ) स्पष्टता करतात :

**तुका म्हणे रोग वैद्याचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार ॥ ३ ॥**

नावेच्या दृष्टान्तांत नुसतें ' तारणें ' एवढेंच दाखविलें आहे.

त्या दृष्टान्तापेक्षां या दृष्टान्ताची मौज अशी आहे कीं, यांत सिद्ध-पुरुष हा वेगवेगळ्या साधनांचें आचरण वेगवेगळ्या अधिकाराच्या लोकांकरितां कां करतो, हें स्पष्ट दाखविलें आहे. तुकोबा म्हणतात, वैद्याला एकहि रोग नाहीं; पण तो डोकेंदुखी, पोटदुखी, ताप संग्रहणी आदि सर्व रोगांवरचीं औषधें आपल्याजवळ ठेवतो. कारण, या प्रकारचे रोगी जगतांत आहेत व त्यांना दुरुस्त करणारीं औषधेंहि हवीं आहेत. तसा पूर्णावस्थेस पोंचलेला सिद्ध पुरुष स्वतः अशुद्ध राहिलेला नसला, त्याला साधनाची गरज नसली, तरी जगांत मलिन वृत्तीचे लोक आहेत, त्यांना उपयोगी पडावें म्हणून तो साधन करीतच राहतो. लोकसंग्रहाकरितां तो कर्म करीतच राहतो. येथें भावार्थ संपला. आतां आपण थोडें तपशिलांत शिरूं.

तुकारामबोवा या अभंगांत आपण अधिकार पाहून मार्गदर्शन केलें असें म्हणतात. त्यासंबंधीं पुढील प्रश्न उत्पन्न होतात :

( १ ) कशाचे मार्ग ? ( २ ) कोणते मार्ग ? ( ३ ) अधिकार कोणता पाहिला व त्यांना अधिकारी किती प्रकारचे आढळले ? ( ४ ) तुकोबांच्या या अभंगावरून पूर्णावस्थेस पोंचलेल्या महात्म्याच्या राहणीसंबंधीं त्यांची काय कल्पना होती ? ( ५ ) त्यांनीं मार्गदर्शन कसें केलें ? इत्यादि.

आपण यांचा थोडक्यांत विचार करूं.

तुकोबांनीं मार्गदर्शन केलें हें खरें; पण वर लिहिल्याप्रमाणें पहिला व महत्त्वाचा मुद्दा ‘ कशाचें मार्गदर्शन ’ केलें ? म्हणजे कोठें जाण्याचा रस्ता दाखविला ? या प्रश्नाला त्यांच्याच शब्दांत उत्तर द्यावयाचें म्हणजे ‘ हिताचा मार्ग ’ त्यांनीं प्रत्येकाला त्याच्या अधिकाराप्रमाणें दाखविला.

**तुका म्हणे हित होय तो व्यापार ।**

करा काय फार शिकवावें ॥

■ ■ ■

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा ।
चित्तशुद्धि सेवा देवाची हे ॥
ऐके रे जना । तुझ्या स्वहिताच्या खुणा ॥
पंढरीचा राणा । मनामाजि स्मरावा ॥

अशीं कितीतरी त्यांचीं वचनें देतां येतील. परंतु ‘ हित म्हणजे काय ’ याची स्पष्टता होण्याकरितां तुकोबा ‘ हित ’ हा शब्द कोणत्या अर्थानें उपयोगांत आणतात याचें स्पष्टीकरण होणें अवश्य आहे.

तुकारामबोवांचा ‘ हित ’ हा शब्द उपनिषदांतील ‘ श्रेयस् ’ या शब्दाचा पर्याय आहे. कठोपनिषदांत खालील ऋचा आढळते :

**अन्यच्छ्रेयोऽन्यदुतैव प्रेयस्ते उभे नानार्थे पुरुष ँ सिनीतः ।**
**तयोः श्रेय आददानस्य साधु भवति हीयतेऽर्थाद्य उ प्रेयो वृणीते ॥**

— २. १.

प्रेयस् म्हणजे माणसाला जें गोड लागतें, आवडतें तें व श्रेयस् म्हणजे हित अथवा कल्याणकारक तें. सर्वांनाच आपलें खरें कल्याण आवडतें असें कोठें आहे ? आजारी मनुष्याच्या जिभेला ‘साखर-केळें ’ गोड लागतें, पण तें खाण्यांत त्याचें हित नसतें. शौचाच्या विकारांत रोग्याला अति तहान लागते व त्यामुळें पाणी फार गोड लागतें. पण उपयोग काय ? तो पाणी फार प्याला कीं त्याचें मरण जवळ आलें असें समजावें. तसें तुकारामबोवा म्हणतात, लोकांना “ लागतसे भाजधन गोड ” ( बायको व पैसा लोकांना आवडतो ) व त्याकरितां माणसें जीव टाकतात. पण यांत त्यांचें खरें हित म्हणजे कल्याण नाहीं. खरें हित हें टिकाऊ, शाश्वत स्वरूपाचें असतें. तुकोबांच्या मतें जीवाचें खरें हित परमेश्वरप्राप्तींत आहे. मनुष्यजन्माची सफलता याच्यांत आहे.

तुका म्हणे जन्मा आल्याचें सार्थक ।
विठ्ठलचि एक देखालिया ॥

व त्यांनीं जो मार्ग दाखविला तो 'परमेश्वर' अथवा 'देव' प्राप्तीचा. म्हणूनच ते सर्वांना देवाकडे चला अशी हांक मारतात :

देव पाहों देव पाहों । उंच ठायीं उभे राहों ॥

व 'देवच' लोकांच्यासमोर मांडतात :

देव घ्या कोणी, देव घ्या कोणी ।
आइता आला घर पुसोनी ॥

येथें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, त्यांच्या मतें सर्व मानवांचें — मग ते भारतांतील असोत वा आफ्रिका-अमेरिका इत्यादि देशांतील असोत, स्त्री असोत वा पुरुष असोत — सर्वांचें ध्येय एकच आहे. सर्वांना एकाच मुक्कामाला जाणें अवश्य आहे. असें जरी असलें तरी ते सर्वांना एकाच गोष्टीचा सारखा उपदेश करीत नाहींत. सर्वांच्या ठिकाणीं सारखाच चित्सूर्याचा उदय व्हावा येवढ्याकरितां जरी प्रयत्न करावयाचा असला तरी सर्वांचा सारखा अधिकार नाहीं. ही आपल्या ऋषिमुनींनीं विचारान्तीं व अनुभवानें ठरविलेली गोष्ट ते विसरले नाहींत व म्हणूनच त्यांनीं अत्यंत व्यवहारी असा मार्ग पत्करला व 'अधिकार' तैसा उपदेश केला. खरी स्थिति अशी आहे कीं, उपदेशाचा परिणाम होण्याकरितां ज्याला उपदेश ग्रहण करावयाचा त्याला तो ग्रहण करण्याचा अधिकार लागतो व जो उपदेश करणारा आहे त्याला तो करण्याचा अधिकार लागतो. तसें नसेल तर तें 'वेडेचार' करण्यासारखेंच होतें. तुकोबा म्हणतात :

नसतां अधिकार । उपदेशासी बलात्कार ।
तरी ते केले हो चार । माकड आणि गारोडी ॥ १ ॥
धनधान्य राज्य बोल । वृथा रजवणें फोल ॥

नाहीं तेथें ओल । बीज वेंची मूर्ख तो ॥ २ ॥
नये बांधो गांठीं । पदरा आणी ऐसी तुटी ॥
असोन कसोटी । शिष्टाचार अनुभव ॥ ३ ॥

नैष्ठिक ब्रह्मचर्याचा उपदेश करतो आहे व स्वतःचें सहावें लग्न जुळविण्याच्या खटपटींत आहे, त्याच्या नैष्ठिक ब्रह्मचर्याच्या उपदेशाचा काय परिणाम होणार ?

अशी गोष्ट सांगतात कीं, श्रीएकनाथांच्याकडे एक दिवस एक बाई आपल्या मुलाला घेऊन आली. नाथांनीं विचारलें, " बाई, कां आलांत ? " ती म्हणाली, " माझ्या मुलाला जंत झाले आहेत व किती सांगितलें तरी तो गोड खाण्याचें टाकीत नाहीं. पण नाथांनीं सांगितलें तर तो ऐकेल व गोड खाण्याचें टाकील; तुम्ही त्याला नाथांच्याकडे घेऊन जा, असें मला लोकांनीं सांगितलें. म्हणून मुलाला घेऊन आलें आहें. तुम्ही त्याला सांगा, गोड खाऊं नकोस म्हणून. " नाथ म्हणाले, " बरें आहे. " त्यांनीं मुलाला जवळ बोलाविलें व सांगितलें, " बाळ, गोड खाऊं नकोस बरें ! " व बाईला म्हणाले, " जा मुलाला घेऊन. तो गोड नाहीं खाणार. " पण मौज अशी झाली कीं, ती बाई आपल्या मुलाला घेऊन नाथांच्या घराचा उंबरठा ओलांडते न ओलांडते तोंच तिचा मुलगा म्हणूं लागला, " आई,मला गूळ हवा आहे." बाई मनांत म्हणाली, " बरें, पोरानें येथेंच मागितला, नाहीं तर घरापासून पुनः हेलपाटा पडला असता. " बाई मुलासह परत नाथांच्याकडे आली. त्या बाईला पाहून नाथ म्हणाले, " बाई, परत कां आलांत ? " ती म्हणाली, " अहो, मुलगा तुमच्या घराचा उंबराहि ओलांडूं देईना. त्यानें पाय बाहेर पडतांच गूळ मागितला. आतां घरीं जाऊन काय करणार ? म्हणून तुम्हांला विचारायला परत आलें. "

हें त्या बाईचें बोलणें ऐकून नाथ जरा अंतर्मुख झाले व आत्मनिरीक्षण करूं लागले. तेव्हां त्यांना आढळून आलें कीं, आपण देवाचा नैवेद्य म्हणून रोज पुरणपोळी खातों ( नाथांच्या देवाला रोज पुरणपोळीचा नैवेद्य असे ) व या मुलाला मात्र गोड खाऊं नको असा उपदेश करतों, तो कसा ऐकणार ? त्यांनीं त्या क्षणाला निश्चय केला कीं, गोड खावयाचें नाहीं; व बाईला सांगितलें, " जा बाई, आतां तो नाहीं गूळ मागणार. " त्याचा परिणाम झाला आणि मुलानें गोड खाण्याचें सोडून दिलें व त्याचा रोग बरा झाला ! गोष्टीचें तात्पर्य असें कीं, उपदेश करायला अधिकार लागतो. " आधीं केलें मग सांगितलें. " न करतां सांगणें यांत फजिती.

तसेंच उपदेश करणाऱ्यानें आपण जें सांगतों तें त्याला झेपेल किंवा नाहीं हें बघून उपदेश करावा असा न्याय आहे. खुद्द गीताकार एके ठिकाणीं म्हणतात :

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।**
**जोषयेत् सर्व कर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ।।** अ. ३–२३

ज्ञानोबारायांनीं या श्लोकावर लिहीत असतांना फार उत्कृष्ट दृष्टान्त देऊन या श्लोकांतील तत्त्व वाचकांच्यापुढें मांडलें आहे. ते म्हणतात :

**जें सायासें स्तन्य ( दूध ) सेवी । तें पक्वान्नें केविं जेवी ।।**
**म्हणौनि बाळका जैसीं नेदावीं । धनुर्धरा ।।**
**तैसी कर्मीं जया अयोग्यता । तयाप्रति नैष्कर्म्यता ।**
**न प्रगटावी खेळतां । आदिकरूनी ।।**

तुकारामबोवा म्हणतात :

**' नये बोलूं वर्म । जगीं असो द्यावा भ्रम ।। '**

याचें कारण आहे. तत्त्व चांगलें उत्तम आहे, पण तें समज-

ण्याची, पचवण्याची मानसिक, बौद्धिक तयारी हवी. ताक पचत नाहीं, त्याला वाघाचें दूध सकस म्हणून देऊन काय उपयोग? आईच्या अंगावरचें दूध पितां येत नाहीं त्या बालकाला जिलबी घालून काय उपयोग? प्रकृति सुधारणार नाहीं, तर उलट नवीन रोग उत्पन्न होईल. तुकारामबोवा पुढील दृष्टान्तानें हेंच तत्त्व सांगतात :

मुंगीवरी भार गजाचें पालाण ।
घालितां ते कोण कार्यसिद्धी ।।

गजाचें पालाण म्हणजे अंबारी. अंबारी शोभा आणणारी खरी; पण कोणाला? हत्तीला. तीच मुंगीवर ठेवली तर तिची पाठ मोडेल. तिचा फुकट प्राण जाईल. तसेंच अद्वैतज्ञान अति उत्तम हें खरें; पण अधिकार नसतांना त्याचा उपदेश केला तर अद्वैतानुभव तर बाजूलाच राहिला, स्वैराचारी मात्र मनुष्य बनेल. हें तत्त्व ही साधूमंडळी पूर्ण जाणत असल्यानें त्यांनीं वेगवेगळ्या प्रकारचा उपदेश वेगवेगळा अधिकार पाहून केला.

आतां त्यांना कोणते अधिकारी दिसले व त्यांनीं कोणता कोणता मार्ग दाखविला तें आपण थोडक्यांत पाहूं.

परमात्मप्राप्ति व तीहि सर्वांच्याकरितांच असल्यानें आमच्या ऋषिमुनींनीं व साधुसंतांनीं अधिकार ठरवतांना बाह्य देहादि उपाधि व त्यावर अवलंबून असणाऱ्या गोष्टी यांजकडे बघून अधिकार ठरविला नाहीं. परमार्थाचा व सूक्ष्म शरीराचा संबंध आहे म्हणून त्याकडे बघून त्यांनीं अधिकाऱ्यांचे तीन विभाग कल्पिले आहेत व त्याप्रमाणें तीन मार्ग – पण व्यापक दृष्टीनें बघितल्यास एकच मार्ग – तीन अधिकाऱ्यांकरितां सांगितले. ते तीन मार्ग म्हणजे ( १ ) कर्म ( २ ) उपासना, व ( ३ ) ज्ञान; आणि तीन अधिकारी म्हणजे ( १ ) कर्माचा, ( २ ) उपासनेचा, व ( ३ ) ज्ञानाचा.

श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंदांतील २० व्या अध्यायांतील खालील श्लोकांतून या मार्गांचा व अधिकाऱ्यांचा स्पष्ट उल्लेख आढळतो :

श्रीभगवानुवाच :

**योगास्त्रयो मया प्रोक्ता नृणां श्रेयो विधित्सया ।**
**ज्ञानं कर्म च भक्तिश्च नोपायोऽन्योऽस्ति कुत्रचित् ।**
**निर्विण्णानां ज्ञानयोगो न्यासिनामिह कर्मसु ।**
**तेष्वनिर्विण्णचित्तानां कर्मयोगस्तु कामिनाम् ।**
**यदृच्छया मत्कथादौ जातश्रद्धस्तु यः पुमान् ।**
**न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः ॥**

अ. २०–६–८

आपण मनुष्याच्या मनाकडे बघितलें तर त्यांत तीन प्रकारचे दोष आढळून येतात :

( १ ) मल, ( २ ) विक्षेप, व ( ३ ) आवरण. मल म्हणजे पापवासना — अत्यंत विषयासक्तीचा परिणाम, ( २ ) विक्षेप म्हणजे अन्तःकरणाची चंचलता, व ( ३ ) आवरण म्हणजे आत्मस्वरूपा-विषयीं अज्ञान.

हे सर्व ज्याच्या ठिकाणीं आहेत तो कर्माचा अधिकारी. नाथ-महाराज या अधिकाऱ्याचें थोडक्यांत एकाच ओवींत वर्णन करतात :

**जे कां केवळ अविरक्त । विषयालागीं कामासक्त ॥**
**त्यालागीं म्यां प्रस्तुत । कर्मयोग येथ प्रकाशिला ॥**

अन्तःकरणांतील हा मलदोष जाण्यास उत्तम उपाय म्हणजे आपल्या विहित कर्मांचें कर्तृत्वमद व फलास्वाद टाकून आचरण करणें. अन्तःकरणांतील घाण वासना शरीराला स्वच्छ केल्यानें जाणार नाहींत. तीर्थस्थानानेंसुद्धां त्या जातातच असा नियम नाहीं. खुद्द तुकारामबोवाच म्हणतात :

आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥
पाप गेलियाची काय खूण । नाहीं पालटले अवगूण ॥

तीर्थांत स्नान केल्यावर भावना अशी पाहिजे कीं, माझें पाप गेलें.

तीर्थीं भाव फळे । ..................

मळदोष जाण्याचा उत्तम उपाय स्वकर्म. ‘ यज्ञदानतपःकर्म ’ ( गी. अ. १८-५ ) या श्लोकावर लिहीत असतांना ज्ञानोबा-रायांनीं खालील सुंदर ओव्या लिहिल्या आहेत :—

तरी स्वाधिकारानुरूपें । तियें यज्ञदानें तपें ॥
अनुष्ठावींचि साक्षेपें । अधिकवर ॥
जें चालणें वेगावत जाये । तो वेगु बैसावयाचि होये ॥
तैसा कर्मातिशयो आहे । नैष्कर्म्यालागीं ॥
अधिकें जंव जंव औषधी । -सेवनेची मांडी बांधी ।
तंव तंव मुकिजे व्याधी । तयाचिये ॥
तैसीं कर्में हातोपातीं । जैं कीजती तथा निगुती ॥
तैं रज तमें झडती । झाडा देउनी ॥
कां पाटोवाटीं पुटें । भांगारा खारु देणें घटे ॥
तैं कीड झडकरी तुटे । निर्व्याज होय ॥
तैसें निष्ठा केलें कर्म । तें झाडी करूनि रजतम ॥
सत्त्वशुद्धीचें धाम । डोळां दावी ॥
म्हणौनियां धनंजया । सत्त्वशुद्धि गिंवासितया ॥
तीर्थांचिया सावाया । आलीं कर्में ॥
तीर्थें बाह्य मळ क्षाळे । कर्में अभ्यंतर उजळे ॥
एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेंचि ॥

—ज्ञानेश्वरी १८·१५३-६०

तुकारामबोवांनींसुद्धां आपल्या पद्धतीनें हाच विचार मांडला

आहे. ते म्हणतात, जोंपर्यंत भोगाची आसक्ति आहे तोंपर्यंत माणसानें आपलें घरदार सोडून वनांत जाऊं नये. ते म्हणतात :

आशा हे समूळ खणोनि काढावी ।
तरीच गोसावी व्हावें तेणें ॥
नाहीं तरी सुखें असावें संसारीं ।
फजिती दुसरी करूं नये ॥

कारण- अन्तःकरणांत जोंपर्यंत वासना आहे तोंपर्यंत तो विषय आपल्या जवळ आहेच. बाहेरून टाकलें असें दाखवलें तरी उपयोग काय ?

त्यजिलें आणोनि भेटवी वासना ।
दाविल्याचें जना काय काज ॥

आपला उद्योगधंदा सोडून भीक मागणाऱ्या लोकांचा त्यांनीं निषेध केला आहे. ते म्हणतात :

भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ॥
ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ॥
तुका म्हणे करी ब्रह्मांड ठेंगणें ।
हात पसरी जिणें धिक् त्याचें ॥

मनुष्यानें सन्मार्गानें पैसा मिळवावा व निष्कामबुद्धीनें त्याचा सत्कार्यीं विनियोग करावा. याच योगानें अन्तःकरण शुद्ध होऊन वैराग्य प्राप्त होईल.

जोडोनियां धन उत्तम व्यवहारें । उदास विचारें वेंच करी ॥

■ ■ ■

तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परम पदबळ वैराग्याचें ॥

तात्पर्य, जोंपर्यंत भोगाची वासना आहे तोंपर्यंत माणसानें भोगाच्या प्राप्तीकरितां आवश्यक असा अर्थ अवश्य मिळवावा. तो जर न्याय्य मार्गानें मिळाला नाहीं तर मनुष्याची अधर्माकडे — पापाकडे

प्रवृत्ति होते. म्हणून सर्व साधु वासना आहे तोंपर्यंत विहित मार्गानें भोग भोगावा असें म्हणतात. खुद्द गीतेंत —

'धर्माऽविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥'

असें भगवान् म्हणतात.

विहित कर्माच्या आचरणानें मळदोष नाहींसा होतो; पण तें कर्म कर्तृत्वमद व फलास्वाद ( म्हणजे मी कर्म करणारा असा अहंकार व या कर्मापासून अमुक एक फल प्राप्त व्हावें अशी इच्छा हे दोन्ही ) टाकून करावें लागतें.

असें निष्कामबुद्धीनें शुद्ध कर्माचरण करून ज्याची वासना गेली तो भक्तीचा अधिकारी होतो. वर जे भागवतांतील श्लोक दिले आहेत त्यांतील पुढील भागांत भक्तीचा अधिकारी सांगितला आहे —

न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगस्यासिद्धिदः ॥

विषयभोगांच्या वरवरच्या वासना नष्ट झाल्या; पण देवाच्या-करितां भोगाचा आत्यंतिक त्याग करण्याकरितां आवश्यक असणारें वैराग्य ज्यांच्यांत नाहीं त्यांना भक्तियोग हा लवकर फलद्रूप होतो. दगडाखालीं हात सांपडला आहे; पण तो उचलून फेंकून द्यावा अशी अंगांत ताकद नसल्यामुळें दगडाखालीं हात ठेवूनच मनुष्य तळमळत असतो. तसाच संसाराच्या भारानें दडपलेला, पण तो सोडण्याची ज्याची तयारी नाहीं असा जो साधक त्याकरितां भक्तियोग हा आहे. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात :

भय वाटे पर । न सुटे हा संसार ॥ १ ॥
ऐसा पडिलों कांचणीं । करी धांवा म्हणऊनी ॥ २ ॥

येवढ्याकरितां तुकारामबोवांनींसुद्धां

" करोनिया शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥"

असाच उपदेश केला आहे.

नुसत्या कीर्तनाला जाऊन काम भागत नाहीं. तसे तर हजारों लोक कीर्तन श्रवण करतात; पण अधिकारसंपन्न होऊन कीर्तन श्रवण करीत नसल्यानें त्या श्रवणाचा खरा व पुरा उपयोग होत नाहीं. भागवतांतील वर दिलेल्या श्लोकावर लिहितांना श्रीएकनाथ लिहितात :

**हरिकथा अवघेचि ऐकती । परी माझी श्रद्धा नुपजे चित्तीं ।।**
**कोणी एकाचिये अभिनवगती । श्रद्धाउत्पत्ती श्रवणीं होय ।।**

स्ववर्णाश्रमयोग्य कर्म करून इंद्रियनिग्रह व मनुःशुचिता साधली आहे, पण अजून अंतःकरणाचें चांचल्य गेलें नाहीं, विक्षेपता शिल्लक आहे, त्याकरितां भक्तियोग आहे. तात्पर्य, ज्याच्यामध्यें त्याग करावयास लागणारें निधडें वैराग्य नाहीं व ज्यास भोगांत रुचि वाटत नाहीं असा जो, तो भक्तीचा अधिकारी. श्री एकनाथ म्हणतात :

**यापरी जो नव्हे विषयासक्त । ना निधडा नव्हे विरक्त ।**
**त्यालागीं माझा भक्तिपंथ । मी बोलिलों निश्चित । वेदवाक्यें ।।**

कर्म-उपासना करून ज्यानें अंतःकरणाचे मळ व विक्षेप दोष घालवले आहेत व त्यामुळें अंतःकरणांत जळजळीत वैराग्य व ज्ञानाची तीव्र लालसा उत्पन्न झाली आहे तो ज्ञानाचा अधिकारी. साधु त्याला महावाक्यद्वारें आत्मज्ञानाचा उपदेश करतात.

**निर्विण्णानां ज्ञानयोगो........**

यावर नाथमहाराज लिहितात :

**' जे का ब्रह्मभुवनपर्यंत । साचार जीवीहूनि विरक्त ।**
**जे विधिपूर्वक संकल्पयुक्त । कर्म त्यागित संन्यासी ।।**
**ऐसिया अधिकाऱ्याकारणें । म्यां ज्ञानयोग प्रकट करणें ।**
**जे का निजज्ञानसाधनें । मज पावणें सायुज्यता ।।**

ऋषींच्या कालांतसुद्धां अधिकार पाहूनच ज्ञानाचा उपदेश करीत,

ग्रंथालय, ठाणे. नग्रांक ...... दि: ...... स्थळ ...... नों. दि:

असें दाखविणारीं कठोपनिषदांत पुढील सुंदर कथा आहे. वडिलांच्या शापामुळें नचिकेतस् यमाकडे गेला; पण यमाची व त्याची तीन दिवस गांठ पडूं शकली नाहीं. यामुळें तीन दिवसपर्यंत " अनश्नन् " असा नचिकेतस् राहिला. परत आल्यावर अतिथी सत्काराविना आपल्या घरीं राहिला हें बरें न वाटून यमराज त्याला म्हणूं लागले कीं, ' तूं तीन वर माग. ' पहिल्या दोन वरांनंतर तिसरा वर नचिकेतानें मागितला तो असा कीं, " मनुष्य मरण पावला म्हणजे आत्मा आहे असें कोणी म्हणतात, कोणी आत्मा नाहीं असेंहि म्हणतात. हा माझा एक संशय आहे. आपण तो दूर करावा. हा माझा तिसरा वर आहे. " हें ऐकल्यावर यमानें पूर्वीच्या दोन वरांप्रमाणें तिसरा वर एकदम दिला नाहीं. यम नचिकेताला म्हणाला, " नचिकेता, अरे, हा विषय कठीण आहे. मोठमोठ्यांच्याहि हा लक्षांत येत नाहीं. याचा नाद सोडून दे आणि दुसरा वर माग. " त्यावर नचिकेतस् म्हणाला, " तर मग मला हाच वर हवा. कारण हा देणारा तुझ्यासारखा दुसरा कोण मिळणार ? " त्यावर यमराज म्हणाले, " अरे, शंभर वर्षें असणारे पुत्रपौत्र माग; हत्ती, घोडे वगैरे पुष्कळ पशु, पुष्कळ सुवर्ण माग, मृत्युलोकांत जे जे दुर्लभ मनोरथ तुला पाहिजे असतील ते ते सर्व माग. " यावर नचिकेतस् म्हणाला, " हे सर्व भोग आज आहेत, उद्यां नाहींत, अशा प्रकारचे क्षणिक आहेत. मला हे नकोत. मला हें ज्ञानच हवें. " हें त्याचें वैराग्ययुक्त भाषण ऐकून यमराज प्रसन्न झाले व त्यांनीं त्याला आत्मज्ञान सांगितलें. सर्व संतमहात्मे ही जी वैदिक उपदेशाची रीत आहे तिला जाणूनच योग्य अधिकारी पाहून ज्ञानाचा उपदेश करीत.

संतांच्या उपदेशाची ही रीत आहे, हें कळण्याकरितां श्रीज्ञानदेव-एकनाथांचे कांहीं उद्गार पुढें देतों :—

ज्ञानेश्वरमहाराज एके ठिकाणीं म्हणतात :—

ग्रंथालय ठाणे
ग्र. क्र. १३५०९

तरी तया ज्ञानालागीं । कवणा पां योग्यता आंगीं ।
हे पाहतां जगीं । देखिला एकु ।।
जें पाताळींचेंहि निधान । दावील कीर अंजन ।
परि होआवे लोचन । पायाळाचे ।।
तैस मोक्ष देईल ज्ञान । येथ कीर नाहीं आन ।
परि तेंचि थारें ऐसें मन । शुद्ध होआवें ।।
तरी विरक्तीवांचूनि कहीं । ज्ञानासि तगणेंचि नाहीं ।
हें विचारूनि ठाईं । ठेविलें देवें ।। ज्ञानेश्वरी, अ. १५-३३-३६

नाथमहाराजहि असेंच म्हणतात :

आरिसां उपलब्धि तवां मसी । एकी जाती तव्या आरिसासी ।
तेवीं चित्तशुद्धि परमार्थासी । विकल्पवंतासी अभावो ।।
नित्यानित्यविवेकव्युत्पत्ती । इहामुत्रफळभोग विरक्ती ।
शमदमादि संपत्ती । अढळ चित्तीं दृढ होआवी ।।
येही अवस्था वरुती । निश्चयें वांछी निजमुक्ती ।
ती नांव मुमुक्षा म्हणती । चित्तशुद्धी चित्तीं मुमुक्षत्वें हें ।।

हस्तामलक ओ. १७६ – १७९

वैराग्य प्राप्त होऊन वासनारूपी मळ अंतःकरणामधील गेला नाहीं तर ज्ञानोपदेशाचा कांहींहि उपयोग नाहीं असें तुकारामबोवा खालील अभंगांत स्पष्ट लिहितात :

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ।। १ ।।
तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ।। २ ।।
वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ।। ३ ।।
वांझे न होती लेंकुरें । काय कीजे त्या भ्रतारें ।। ४ ।।
नपुंसका पुरुषासी । काय करील वाइल त्यासी ।। ५ ।।
प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ।। ६ ।।

तुका म्हणे जीवनेविण । पीक नव्हे नव्हे जाण ।। ७ ।।

येवढ्याचकरितां तुकारामबोवांनीं ठिकठिकाणीं ‘ चित्त शुद्ध करा ’ असा उपदेश केला आहे.

तात्पर्य, तुकारामबोवांनीं अधिकार पाहून जें मार्गदर्शन केलें त्याचा विचार करूं लागलें असतां आढळून येतें कीं, त्यांनीं अंतः-करणशुद्धीचा विचार करून यथाधिकार कर्म, उपासना व ज्ञान या मार्गांचा उपदेश केला. सर्वांना सरसकट एकच सांगत बसले नाहींत. अगदीं निकृष्ट अधिकारी म्हणजे स्वैर वर्तनाचा भोगलंपट मनुष्य त्यांना दिसला तर त्याला ते म्हणत :

चाल केलासी मोकळा । बोलें विठ्ठल वेळोवेळां ।।
तुज पापचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळी वसे ।।
पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां नलगे घडी ।।
केली मागें नको पाहों । तुज जमान आम्ही आहों ।।
करीं तुज जीं करवतीं । आणिक नामें घेऊं किती ।।
तुका म्हणे काळा । रीघ नाहीं निघती ज्वाळा ।।

याचा अर्थ तुकारामबोवांना पाप करावें व देवाचें नांव घ्यावें हें संमत होतें असें नव्हे. व्यसन सुटत नाहीं अशा व्यसनाधीन पुरुषास नामस्मरणाकडे, सन्तमार्गाकडे त्याचें मन वेधावें एवढ्याकरितां हीं रोचक वचनें आहेत. याच्याच योगानें हळके हळके त्याचें व्यसन सुटेल. असा जो थोडा सांवरला त्याला तेच तुकोबा म्हणतात :

इंद्रियासी नेम नाहीं । मुखीं राम म्हणोनि काई ।। १ ।।
जेवीं मासीसवें अन्न । सुख नेदी तें भोजन ।। २ ।।

याचा अर्थ असा आहे कीं, तुकोबा ध्येयावर नजर ठेवून आपल्याकडे येणारा, ध्येयाकडे नेणाऱ्या जिन्याच्या पायऱ्या अधिक अधिक लवकर कसा टाकील हें लक्षांत घेऊन उपदेश करीत.

त्यांचें मार्गदर्शन ह्या स्वरूपाचें होतें. म्हणूनच एके ठिकाणीं ते म्हणतात :

**तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी ।**
**प्रसंगीं ते काढी पारधी तो ॥**

फांसे ( पाश ), वाघुरा ( जाळें ), कुऱ्हाडी यांपैकीं ज्या वेळीं जें साधन उपयोगी पडेल त्याचा पारधी उपयोग करतो. जनावर पकडणें हें एकच साध्य; पण प्रसंगानुसार साधनें वेगवेगळीं. " साधनांची अनेकता " हें जें व्यवहारी तत्त्व तेंच परमार्थाच्या उपदेशांतहि लागू आहेच. कधीं प्रेमानें कुरवाळून तर कधीं शिव्या देऊन पण जीवाला रस्त्याला लावणें हें काम आपण करतों असें तुकारामबोवा म्हणतात.

येथपर्यंत आपण दुसऱ्या व तिसऱ्या प्रश्नांचा विचार केला. आतां पुढच्या दोन प्रश्नांचा विचार करूं.

त्यांना हा मार्गदर्शनाचा उपद्व्याप कोणीं सांगितला ? याचें उत्तर तुकारामबोवा या अभंगाच्या दुसऱ्या व तिसऱ्या कडव्यांत देतात. असा न्याय आहे कीं, आपण परतीराला गेलों तरी नाव जाळूं नये; कारण मागून पुष्कळ लोक नदींतून पलीकडे जाण्याकरितां येणारे असतात. त्यांना तिची गरज आहे. वैद्य स्वतःस रोग नसून अनेक औषधें आपणांजवळ ठेवतो. याचें कारण जगांत पुष्कळ रोगी असतात व त्यांना त्यांचा उपयोग असतो या दृष्टांतांनीं तुकोबा आपली लोकसंग्रहाची जबाबदारी आपण ओळखतों व म्हणून आपण जरी कृतकृत्य झालों, निष्काम झालों तरी साधनांचा त्याग न करतां मार्गदर्शन करीतच राहतों असें सुचवतात. पुढील अभंगांत तीन दृष्टान्त देऊन साधु मार्गदर्शन कां व कसें करतात तें सांगतात :

**अर्भकाचेसाठीं । पंतें हातीं धरली पाटी ॥ १ ॥**
**तैसे संत जगीं । क्रिया करूनि दाविती अंगीं ॥ २ ॥**

बाळकाचे चालीं । माता जाणुनि पाउल घाली ॥ ३ ॥
तुका म्हणे नाव । जनासाठीं उदकीं ठाव ॥ ४ ॥

यांपैकीं पहिल्या, तिसऱ्या व चौथ्या कडव्यांत ज्ञाते पुरुष लोकसंग्रह म्हणजे अज्ञानास मार्गदर्शन कां करतात हें सांगतात व दुसऱ्या कडव्यांत ते कसें मार्गदर्शन करतात हें सांगतात. ज्ञाते अथवा सिद्ध पुरुष ' आत्मतृप्त ' होऊनहि कर्म टाकीत नाहींत, याचें कारण त्यांनीं जर तें केलें नाहीं तर अज्ञानांना धर्म कळावयाचा नाहीं. ज्ञानोबाराय म्हणतात :

इहीं जरी ऐसें न कीजे । तरी अज्ञाना यया काय उमजे ॥

कारण त्यांची धर्माची कल्पना म्हणजे

येथ वडिल जें जें करिती । तया नाम धर्म ठेवती ।
तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ।

मुलें जशीं कित्ता पाहून अक्षरें काढतात तशीं अज्ञानी माणसें ज्ञात्याची क्रिया पाहून वागतात.

घडियाच्या अखरा । तळीं बाळ लिहे दातारा ।

म्हणून

ऐसें असे स्वभावें । म्हणौनि कर्म न संडावें ।
विशेषें आचरावें । लागे संतीं ।

म्हणूनच ते उत्कृष्ट दृष्टान्त देऊन सांगतात :

मार्गीं अंधासरिसा । नावेक देखणाहि चाले जैसा ।
अज्ञाना धर्म प्रकटावा तैसा । आचरोनि ॥

तुकोबा हेंच सांगतात कीं, संत नुमते बोलून मार्गदर्शन करीत नाहींत. तसें तर रस्त्यावरील रस्ता दाखविणारी पाटीहि मार्गदर्शन करते. ' सोलापूरचा रस्ता ' असें जिच्यावर लिहिलें आहे ती पाटीसुद्धां सोलापूरकडे जाणाऱ्या मार्गाचें दर्शन करते; पण स्वतः

जागा सोडीत नाहीं. संतांचें मार्गदर्शन तसें नव्हे. संत हे स्वतः कर्म आचरण करून दाखवितात.

म्हणूनच तुकारामबोवा म्हणतात :

**तैसे संत जगीं । क्रिया करूनि दाविती अंगीं ॥**

ज्ञानेश्वरमहाराजाहि म्हणतात :

**हे असो पंडित । धरोनि बाळकाचा हात ।**
**ओळी लिही सुव्यक्त । आपणचि ॥**
**जीवनमुक्त ज्ञानी । जरी झाले पावन ।**
**देव तीर्थ भजन । न संडिति ॥**

एकनाथमहाराज म्हणतात :

**उपासना जे जे मार्ग । दाविती अव्यंग भाविकां ॥**

तुकारामबोवांनीं असे विचार ठिकठिकाणीं मांडले आहेत. त्यांपैकीं वरती कांहीं आलेच आहेत. आणखी एक देऊन हा भाग आटपूं ते म्हणतात :

**आपें तेरे त्याकी कोण बराई । औरनकूं भलो नाम धराई ॥ १ ॥**
**काहे भूमि इतना भार राखे । दुभत धेनु नहिं दूध चाखे ॥ २ ॥**
**बरसते मेघ फलतेही बिरखा ।**
**कोन काम आपनी उन्होंति रखा ॥ ३ ॥**
**काहे चंदा सूरज खावे फेरा । खिन एक बैठत पावत घेरा ॥ ४ ॥**
**काहे परिस कंचन करे धातु । नहि मोल तुटत पावत धातु ॥ ५ ॥**
**कहे तुका उपकारहि काज । सब कर करराहिया रघुराज ॥ ६ ॥**

ज्ञात्या पुरुषानें कर्म करावें का न करावें याबाबत या साधूंचें मत होतें हें वरील चर्चेवरून स्पष्ट होतें.

प्लेटोच्या रिपब्लिक ( Republic ) नामक संवादांत ' गुहेची गोष्ट ' ( Fable of the Cave ) सांगितली आहे. तींतसुद्धां हेंच

तत्त्व सांगितलें आहे. अंधाराच्या गुहेंतून सुटून बाहेर आल्यामुळें ज्याला प्रकाशांत वावरणाऱ्या खऱ्या व्यक्ति दिसल्या त्याचें कर्तव्य असें आहे कीं, त्यानें अंधारांत वावरणारे व छायांनाच खरे समजणारे जे आपले बंधु त्यांना यथार्थ ज्ञान करून देण्याकरितां परत गुहेंत जाऊन त्यांना यथार्थ गोष्टीचें ज्ञान करून द्यावें.

ज्ञानेश्वरमहाराज — तुकाराममहाराजप्रभृति संतांचें असेंच म्हणणें आहे ज्ञात्या पुरुषावर फार जबाबदारी आहे. त्यानें साक्षेपानें कर्मांचें आचरण करावें व ज्ञाते पुरुष आपली जबाबदारी ओळखून कर्म करतातहि.

अशा प्रकारचें अधिकारपरत्वानें मार्गदर्शन करीत असतांनाहि सर्व संतांनीं भजनावरच जोर दिलेला आढळतो. तुकारामबोवासुद्धां

**सकळांसी येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिच्या नामें ॥**

असें म्हणतात. पण याचा अर्थ, सर्व धर्म व कर्म टाकून सर्वांनीं भजन करावें, असा त्यांचा हेतु होता असें मात्र नव्हे. तुकारामबोवा तर म्हणतात :

**कर्म आचरणें यातीचा स्वगूण । विशेष तो गूण काय येथें ॥**

आपण केलेलें कर्माचरण मोक्षप्रद व्हावें, फलेच्छा सुटावी, मनाला शांति मिळावी, येवढ्याकरतां ईश्वरभक्तीची सर्वांना सर्व अवस्थेंत गरज आहे. भगवंताचें स्मरण हें पूरक आहे. खुद्द भगवंतच गीतेंत ठिकठिकाणीं म्हणतात :

**मामनुस्मर युद्धय च ॥** — अ. ८।७

**मन्मना भव मद्भक्तो ।** .... — अ ९।३४, अ. १८।६५

भगवंताचा जो या श्लोकांतील माथितार्थ तो लक्षांत घेऊन सर्वांना जेथें अधिकार आहे असा भगवद्भजनाचा मार्ग त्यांनीं सर्वांकरतां दाखविला. आपल्याकडील संतांनीं या बाबतींतहि तोल सुटूं दिला नाहीं असेंच आढळून येईल.

ते ठिकठिकाणीं सांगतात, भजन कर; पण नीतीचा व्यवहार सुटतां कामा नये.

तुकारामबोवा म्हणतात :

**इंद्रियासी नेम नाहीं । मुखीं नाम म्हणोनि कायी ॥**
**भजन तें ओंगळवाणें । नरका जाणें चुकेना ॥**

नाथमहाराज म्हणतात :

**धर्माधर्म न विचारतां । म्हणती ईश्वराचि मोक्षदाता ।**
**हे भक्तपाखंडी कथा । स्थापूनि चिद्रूपता निवारी ॥**

लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, सिद्धावस्थेला पोंचलेल्या या पुरुषांना ते लोकसंग्रहार्थ कर्में करीत असतांना तीं कर्में बाधत नाहींत.

**तया लोकसंग्रहालागीं । वर्ततां कर्मसंगीं ।**
**तो कर्मबंधु आंगीं । वाजेलना ॥**
**जैसी बहुरुपीयाची रावोराणी । स्त्रीपुरुष भावो नाहीं मनीं ।**
**परि लोकसंपादणी । तैसेंचि कारितो ॥**

तुकारामबोवा हीच गोष्ट दृष्टान्तानें सांगतात :

**ठेविलिया दिसे रंगाऐसी शिळा । उपाधि निराळा स्फटिकमणि ।**

तसें ज्ञात्या पुरुषाकडून कर्म होत असलें तरी त्याचें अकर्तृत्व बिघडत नाहीं.

तात्पर्य, सिद्ध पुरुष स्वतः तरले तरी इतरांना तारण्याकरितां कर्म, उपासना, ज्ञान यांचें आचरण करीत राहतात. हेतु असा कीं, अज्ञानांना मार्गदर्शन व्हावें. संत हे तोंडानें उपदेश करून व स्वतः अंगानें क्रिया करून दोन्ही प्रकारांनीं यथाधिकार मार्गदर्शन करतात. तुकारामबोवांचे शिष्य निळोबा पुढील अभंगांत त्यांच्या या मार्गदर्शनाची महती वर्णन करतात तो देऊन हें अभंग-संकीर्तन आटपूं.

मार्ग दाऊनि गेले आधीं । दयानिधी संत ते ।। १ ।।
तेणेंचि पंथें चालों जातां । न पडे गुंता कोठें कांहीं ।। २ ।।
मोडोनिया नाना मत । देती सिद्धान्तसौरसु ।। ३ ।।
निळा म्हणे ऐसे संत । कृपावंत सुखसिंधु ।। ४ ।।

●●●

# संतांचिया पायीं हा माझा विश्वास :: ८ ::

संतांचिया पायीं हा माझा विश्वास ।
सर्वभावें दास जालों त्यांचा ।। १ ।।
तेचि माझें हित करिती सकळ ।
जेणें हा गोपाळ कृपा करी ।। २ ।।
भागलिया मज वाहतील कडे ।
त्यांचियानें जोडे सर्व सुख ।। ३ ।।
तुका म्हणे शप घेईन आवडी ।
वचन न मोडीं बोलिलें तें ।। ४ ।।

तुकारामबोवा या अभंगामध्यें आपलें हित कळण्याकरितां आपला विश्वास आपण कोणावर ठेवतों हें व्यक्त करतात. या अभंगाची पार्श्वभूमि खालीलप्रमाणें कल्पितां येईल—

त्यांच्याजवळ राहणारा गीतेचा वाचक असा एक गृहस्थ. त्याला असें आढळून आलें कीं, एके ठिकाणीं गीताकार म्हणतात :

श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ।। - गीता १७-३

यावर लिहितांना ज्ञानोबा म्हणतात :

**ऐसेनि हा सकळु । जगडंबर निखिळु ।**
**श्रद्धेचाचि केवळु । वोतला असे ॥** ज्ञा. १७-७२.

ज्याच्यांत श्रद्धाच नाहीं असा मनुष्य अजून निर्माण व्हावयाचा आहे. मनुष्यांत श्रद्धा नसते असें नव्हे; प्रत्येकांत श्रद्धा आहेच, फक्त श्रद्धेच्या विषयांत फरक असतो एवढेंच. कोणाची श्रद्धा पांडुरंगावर तर कोणाची खंडोबावर, कोणाची ज्ञानदेव-एकनाथांवर, तर कोणाची कार्ल मार्क्सवर; पण कोठेंच श्रद्धा नाहीं असा मनुष्यच असणें शक्य नाहीं. बरें, श्रद्धा हा एक असा महत्त्वाचा मनुष्यांत घटक आहे कीं, भगवान् म्हणतात :

**" यो यच्छ्रद्धः स एव सः । "**

तेव्हां तुकारामबोवांसारख्या थोर पुरुषांना विचारावें कीं, " महाराज, तुम्ही कोणावर विश्वास ठेवतां ? " असा प्रश्न त्या गृहस्थाकडून विचारला गेल्यावर तुकारामबोवा त्याला या अभंगांतून उत्तर देतात :

**संतांचिया पायीं हा माझा विश्वास ॥**

माझा हा विश्वास संतांच्या पायावर आहे, असें म्हटल्यानंतर किती, कोठल्या बाबतींत व काय म्हणून असे प्रश्न उत्पन्न होतात. तुकोबा या प्रश्नांचीं उत्तरें पुढील कडव्यांतून देतात :

" किती विश्वास ? " या प्रश्नास उत्तर प्रथम कडव्याच्या उत्तरार्धांत देतात :

**" सर्वभावें दास जालों त्यांचा ॥ १ ॥ "**

मी त्याच्यांवर इतका विश्वास ठेवतों कीं, सर्वभावानें म्हणजे काया-वाचा-मनानें त्यांचा झालों. असें अनन्य होणें हें विश्वासाचें लक्षण आहे असें म्हटलें तरी चालेल. ज्ञानेश्वरमहाराजांनीं " तस्मा-

च्छास्त्रं प्रमाणं ते " या गीतेच्या सोळाव्या अध्यायांतील २४ व्या श्लोकावर लिहितांना म्हटलें आहे :

" शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यहि तृण मानावें ।
जें घेववी तें न म्हणावें । विषहि विरु ।।
ऐसिया वैदकनिष्ठा ..........." ज्ञा.१ ६-४६०.

अशी निष्ठा असणें याला विश्वास म्हणतात. आपली ज्याच्यावर श्रद्धा आहे तो जें सांगेल तें, आपणांस गोड वाटो न वाटो, करण्याची तयारी असणें याला विश्वास म्हणतात. तुकारामबोवा म्हणतात, माझा संतचरणीं विश्वास असल्यानें ते सांगतील तें कायावाचामनानें मी करण्यास तयार आहें.

" इतका विश्वास आपण संतांच्यावर ठेवलात हा कोणत्या बाबतींत — कशाकरितां ? " या प्रश्नाचें उत्तर या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यांत देतात :

" तेचि माझें हित करिती सकळ ।
जेणें हा गोपाळ कृपा करी ।। २ ।।

श्रीगोपाळाच्या कृपेची प्राप्ति करून देऊन माझें खरें हित कोणी करतील तर ते संतच करतील, असा माझा विश्वास असल्यानें मी त्यांच्याच मार्गदर्शनावर सर्वस्वीं अवलंबून राहिलों.

मी त्यांच्यावर श्रद्धा ठेवून त्यांच्या चरणीं लीन झालों, याचें आणखी एक कारण असें आहे कीं, या परमार्थमार्गानें चालू लागलों असतां ज्या अडचणी निर्माण होतील त्यासुद्धां तेच दूर करतील. ते नुसतें मार्गदर्शन करून थांबणार नाहींत, तर मी हा पथ आक्रमण करीत असतां दमलों भागलों तर मला कडेवर घेतील व मुक्कामाला नेऊन पोंचवतील. त्यांच्या योगानेंच सर्व सुखाचा मला लाभ होईल असा माझा विश्वास आहे.

" भागलिया मज वाहतील कडे ।

त्यांचियानें जोडे सर्व सुख" ॥ ३ ॥

येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, परमार्थ करीत असतांना दमण्याचें काय कारण आहे? व श्रम झालेच तर कडेवर घ्यावयास संत कशास हवेत? असे प्रश्न तो करील कीं, त्याची परमार्थमार्गाची कल्पना अगदीं स्थूल आहे असें समजावें. भजनपूजन करणें, तीर्थयात्रा करणें इत्यादि जीं परमार्थाचीं बाह्य अंगें आहेत तेंच परमार्थाचें पुरें स्वरूप म्हणून समजणारासच असे प्रश्न करील. त्याच्या कल्पनेप्रमाणें भजन करतांना कोणी दमला तर दूध नाहीं तर कॉफी घेतली कीं त्याचे श्रम जातील व पुनः तो भजन करण्यास ताजातवाना होईल. परमार्थ करणें म्हणजे नुसतें भजन करणें, खिरापतीसारखा प्रसाद खाणें नव्हे. परमार्थ इतका सोपा नाहीं. तुकारामबोवा म्हणतात:

**परमार्थ नोहे लेंकुराच्या गोष्टी। तेथें व्हावा पोटीं अनुताप॥**

कठोपनिषदांत म्हटलें आहे कीं, परमार्थावर चालणें म्हणजे वस्तऱ्याच्या तीक्ष्ण केलेल्या धारेवरून (अनवाणी) पायानें चालण्यासारखें आहे:

**क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति॥**
—१.१४

परमार्थमार्गावरील मुख्य अडचण वैराग्याची आहे. वैराग्याविना परमार्थ होऊंच शकत नाहीं, व तें तर फार कठीण आहे. वैराग्य अंगीं बाणणें हें विष खाण्याइतकें कठीण आहे. ज्ञानेश्वरींत—

**"पहिलिया वैराग्यगरळा। धैर्यशंभु वोडवी गळां॥"** १८-७८९

असा वैराग्याचा उल्लेख आहे. तुकारामबोवा म्हणतात:

**बोल बोलतां वाटे सोपें। करणी करतां टीर कांपे॥ १॥**
**नोहे वैराग्य सोपारें। मज न बोलतां वाटे खरें॥ २॥**
**विष खावें ग्रासोग्रासीं। धन्य तोचि एक सोशी॥ ३॥**

तुका म्हणे करोनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥ ४ ॥

वैराग्यांतील मोठा कठिण भाग जर असेल तर तो म्हणजे मनाचा व इंद्रियांचा शब्दस्पर्शादि विषयांपासून निग्रह करणें. इंद्रियें हीं स्वभावतःच बाहेर विषयांकडे धांवणारी :

" या विषयांवांचूनि कांहीं । आणिक सर्वथा रम्य नाहीं ।
ऐसा स्वभावोचि पाहीं । इंद्रियांचा ॥ "

कठोपनिषदांत सांगितलें आहे कीं, " बहिर्मुख अशीं इंद्रियें ( फक्त ) परमेश्वरानें मारून टाकलीं आहेत; इतर कोणीं नाहीं. म्हणून मनुष्य बाहेर विषयांकडे पाहतो, अंतरात्म्याकडे पाहात नाहीं. एखादाच बुद्धिमान् मनुष्य मोक्षाची इच्छा करणारा होत्साता व सर्व इंद्रियें अंतर्मुख केलेला प्रत्यक् आत्म्याला पाहतो. – "

पराञ्चि खानि व्यतृणत्स्वयंभूस्तस्मात्पराङ् पश्यति नान्तरात्मन् ।
कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्षदावृत्त चक्षुरमृतत्वमिच्छन् ॥

कठो. २. १. १.

पाणी पूर्वेस जोरानें वाहत असतांना त्याच्या उलट पूर्वेकडून पश्चिमेस पोहून जाणें हें जसें कठिण आहे – अशक्य आहे, तसेंच बाहेर धांवणाऱ्या इंद्रियांना अन्तर्मुख करणें कठिण आहे. हें किती कठिण आहे हें ज्ञानेश्वरमहाराजांनीं एकापेक्षां एक असे अनेक चढते दृष्टान्त देऊन उत्तम विशद करून सांगितलें आहे :

जें सारसांहि बिघडतां । होय वोहांहूनि वत्स काढितां ।
नातरि भणंग दवडितां । भाणयावरुनी ॥
पैं मायेपुढूनि बाळक । काळें नेतां एकुलतें एक ।
होये कां उदक । तुटतां मीना ॥
तैसें विषयांचें घर । इंद्रियां सांडितां थोर ।
युगांत होये तें वीर । विराग साहाती ॥ ज्ञा. १८.७८५-८७.

विषय हे इंद्रियांचें जीवन बनलेले असतात. माणसें मरण पत्करतात पण विषय सोडावयाला तयार होत नाहींत, अशी विषयांनीं मनाची पकड घेतलेली असते. त्या पकडींतून इंद्रियांची व मनाची सोडवणूक करण्यास मोठें सात्त्विक धैर्य लागतें. फार कष्ट करावे लागतात व ते करीत असतांना बुद्धि थकते :

**विवेकश्रवणें खरपुसें । जेथ व्रताचरणें कर्कशें ।**
**करितां जाती मोकसे । बुद्धयादिकांचे ॥** ज्ञा. १८–७८३.

मुक्काम तर दिसत नाहीं व चालावयाचें तर खरें. 'अतारेविण' सती जाण्याचें दुःख भोगण्यासारखी ही स्थिति आहे. श्रम करूनहि कांहीं साध्य होत नाहीं असें अनुभवास येऊं लागलें कीं बुद्धीला ध्येयच सोडून द्यावेंसें वाटतें;असें वाटणें हाच थकवा. आपल्याला जमत नाहीं, तेव्हां नकोच हें असें वाटून साधक ज्या वेळेस साधना सोडण्याच्या बेतांत असतो, त्या वेळीं त्याला धीर देणारे संतच असतात. ते आपण केलेल्या साधनाची हकीकत सांगून त्यास धीर देतात व समर्थ असल्यास शक्तिपात करतात. याच अभिप्रायानें तुकोबा म्हणतात :

**" भागलिया मज वाहतील कडे ।**
**त्यांचियानें जोडे सर्व सुख ॥ ३ ॥ "**

शेवटच्या कडव्यांत तुकारामबोवा, आपला सर्व प्रकारें परमार्थांतील सांभाळ संत करतील असा आपला विश्वास असल्यानें आपण त्यांच्या चरणीं पूर्णपणें अनन्य झालों, असें दर्शवितात :

**" तुका म्हणे शेष घेईन आवडीं ।**
**वचन न मोडीं बोलिलें तें ॥ ४ ॥ "**

तुकोबा म्हणतात, मी त्याचें उच्छिष्ट आवडीनें घेईन. पानांतील उष्टें खाणें हें खरें उष्टें खाणें नव्हे. म्हणून तुकारामबोवा या

कडव्याच्या उत्तरार्धांत आपण उष्टें खाऊं म्हणजे काय करूं याची स्पष्टता करतात. उष्टें खाईन म्हणजे त्यांच्या तोंडांतून आलेले शब्द मी पाळीन. त्यांची आज्ञा खालीं पडूं देणार नाहीं. वचन पाळणें हेंच खरें उच्छिष्ट सेवन करणें होय. कारण संतांच्या मुखांतून आलेले शब्द हेहि त्यांचें उच्छिष्टच होत.

" संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें ।
काय म्यां गव्हारें जाणावें हें ॥ "

असें तुकोबाच म्हणतात. तात्पर्य, माझें खरें कल्याण संतच करतील असा माझा निश्चय झाल्यानें मीं त्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवला व त्यांचा अनन्यसेवक झालों, असें तुकारामबोवा म्हणतात. येथें भावार्थ संपला. आतां थोडें तपशिलांत शिरूं.

या ठिकाणीं दोन महत्त्वाचे प्रश्न उत्पन्न होतात : एक, ज्यांच्या चरणीं तुकारामबोवा विश्वास ठेवतात ते संत कोण ? व त्यांच्यावर विश्वास ठेवण्याची काय गरज ? स्वतःच्या बुद्धीनेंच मार्ग आक्रमीत गेलों तर इष्टप्राप्ति होणार नाहीं का ? यांतील संत कोणास म्हणावें हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. तुकारामबोवा संतांवर विश्वास ठेवतात व ठेवावा असें सांगतात; पण ते विश्वास अथवा श्रद्धा डोळस असावी अशा मताचे होते. ते म्हणतात :

हालवूनी खुंट । आधीं करावा बळकट ॥

दळणास आरंभ करण्याच्यापूर्वीं संसारदक्ष, व्यवहारक्षम स्त्री प्रथम जात्याचा खुंटा घट्ट बसला आहे कीं नाहीं हें पाहाते. खुंटा जर हालत असला तर तो ठोकून घट्ट करते व मग दळणास आरंभ करते. तसें श्रद्धा ठेवण्यापूर्वीं ज्या संतांच्यावर विश्वास ठेवा-वयाचा ते श्रद्धा ठेवण्यास योग्य आहेत कीं नाहींत हें तपासून पाहावें. नाहीं तर मागाहून पश्चात्ताप करण्याची पाळी येईल.

कै. जोगमहाराज म्हणत, "आपणांस रुपया घ्यावयाचा असला तर तो आपण वाजवून घेतों. संक्रान्तीच्या दिवशीं सार्टेलोटें करण्याकरितां लागणारें दोन पैशांचें सुगडसुद्धां बाई वाजवून घेते; मग इहपरलोकीं होणाऱ्या आपल्या कल्याणाकरितां ज्याच्यावर विश्वास ठेवावयाचा तो तपासून कां घेऊं नये?" श्रीरामकृष्णपरमहंस यांच्या चरित्रांत स्वामी विवेकानंदांनीं श्रीरामकृष्णांचीहि तपासणी केल्याच्या कथा वाचण्यांत येतात. एके रात्रीं श्रीरामकृष्ण हे अंथरुणावरून उठून पंचवटीकडे जाऊं लागले. स्वामी विवेकानंद हे त्यांच्यामागें जाऊन पाहूं लागले कीं परमहंस कोठें जातात. त्यांना आढळून आलें कीं, ते पंचवटींत ध्यान करीत बसले आहेत. तात्पर्य, संत हा परीक्षावा व मग त्यावर विश्वास ठेवावा. हें इतकें सांगण्याचें कारण बहुतेक लोक परीक्षा न करतांच अंधपणानें विश्वास ठेवतात.

**" अंधेनैव नीयमाना यथांधाः । "**

**" अंधळ्याच्या पाठीं लागले अंधळे । "**

अशीच बहुतेकांची स्थिति असते व याचा परिणामहि

**" घात एके वेळें मागेंपुढें ॥ "**

असाच होतो. कित्येक अडाणी लोक म्हणतात, आपणांस त्याच्या लक्षणाशीं काय करावयाचें आहे! आपला भाव असला म्हणजे झालें.

**" वाण्या घरीं गूळ आपणांपें काम । "**

वाणी कसा आहे त्याच्याशीं आपणांला काय करावयाचें आहे? आपणांस गूळ हवा तो मिळाला म्हणजे झालें. हा त्यांचा समज चुकीचा आहे. खुद्द ज्ञानेश्वरमहाराजच म्हणतात कीं, नुसत्या श्रद्धेनें, म्हणजे ती कशा प्रकारची आहे याचा विचार न करतां, आपण तरूं असे कोणी समजत असेल तर तो भोळा चुकीचा भाव आहे. गंगेचें

पाणी पवित्र आहे; पण तें जर दारूच्या भांड्यांतून आलें तर अपवित्र होत नाहीं काय ?

**गंगोदक जरी जालें । तरी मद्यभांडां आलें ।**
**तें घेवा ये कांहीं केलें । विचारी पां ॥** ज्ञा. १७-५२

तसेंच श्रद्धा चांगली; पण ती जर अयोग्य ठिकाणीं ठेवली तर तीहि नासेल. म्हणून श्रद्धा ठेवण्यापूर्वीं ज्याच्यावर श्रद्धा ठेवावयाची तो तपासून घ्यावा.

बहुतेक लोक परानुकरण करणारे असतात. त्यांची ही अनुकरण-वृत्ति पुढील गोष्टीनें वाचकांच्या चटकन् लक्षांत येईल, म्हणून ती थोडक्यांत सांगतों :

एकदां गजच्छायापर्वासारखें एक पर्व होतें. स्नानाकरितां शेंकडों लोक नदीवर येत होते. नदीच्या कांठावर पुष्कळसा वालुकामय प्रदेश होता. अशा प्रसंगीं एक मनुष्य स्नानाकरितां पंचा व झारी घेऊन निघाला; पण नदीवर आल्यावर त्याच्या लक्षांत आलें कीं, गर्दी आहे, पंचा व झारी ठेवून स्नानास कसें जावें ? कोणाजवळ ठेवावें तर ओळखीचें कोणी नाहीं. माणसांची नुकतीच ये-जा सुरू झालेली. अशा वेळीं त्याला एक युक्ति सुचली. आपण पंचा व झारी वाळूंत पुरून ठेवूं व खुणेकरितां वर लिंग करूं म्हणजे स्नानाहून आल्यावर आपणांला पंचा पुरलेली जागा दिसेल व आपलें सामान मिळेल. योग असा आला कीं, वाळूंत खड्डा खणून पंचा व झारी ठेवीपर्यंत त्याच्याकडे कोणीं पाहिलें नाहीं; पण हें सामान पुरल्यावर तो लिंग करीत असतां स्नानाला येणाऱ्या एका गृहस्थाचें तिकडे लक्ष गेलें. तेव्हां त्याला आढळून आलें कीं, या गृहस्थानें वाळूंत लिंग केलें व हा स्नानाला गेला. त्या बघणाऱ्या गृहस्थानें असा तर्क बांधला कीं, आजच्या पर्वाचा विधि असा

आहे कीं, वाळूंत लिंग तयार करून मग स्नान करावयाचें. झालें. त्यानेंहि लिंग तयार करण्यास आरंभ केला. त्याला लिंग तयार करतांना तिसऱ्यानें पाहिलें व जवळच तयार असलेलें लिंगहि त्याला दिसलें. त्यानेंहि वरच्याप्रमाणेंच तर्क केला व तोहि लिंग तयार करूं लागला. याचा परिणाम असा झाला कीं, पहिला गृहस्थ स्नान करून जो पाण्याबाहेर येतो तो सर्व पात्र त्याला लिंगमय आढळलें ! या गोष्टीचा मथितार्थ असा आहे कीं, कोणी मुळांत जाऊन शोध करीत नाहीं. बहुतेक लोक दुसरा करतो म्हणून आपण करावें अशा वृत्तीचे असतात.

एखाद्याला विचारावें, तुम्हीं अमक्यांना गुरु केलेंत; त्यांच्या अंगच्या अनुभवाचा, ज्ञानाचा कांहीं तपास केला का ? तो चटकन् म्हणतो, " अहो, त इंजिनियरसाहेब आहेत ना ? त्यांनीं त्यांना गुरु केलें आहे. " त्याच्या लक्षांत येत नाहीं कीं इंजिनियरला इमारत बांधावयास किती वरास खडी, दगड लागेल हें ठाऊक असतें; परमार्थ ठाऊक असतो असें नाहीं. तो गृहस्थ लौकिकांत जे मोठे त्यांचें अनुकरण करतो. असाच सर्व समाज. यास अपवाद थोडे. पण तुकारामबोवा म्हणतात :

" शुद्ध कसोनियां पाहावें । वरी रंगा न भुलावें ।.... "

म्हणून तुकारामबोवा संत कोणाला समजतात याचा विचार करणें अवश्य आहे. कारण तुकारामबावा यांतले तज्ज्ञ आहेत. ते म्हणतात :

तुका म्हणे मज कळते चांचणी ।
वडबडीची वाणी अथवा सत्य ॥

■ ■ ■

विकेल तेथें विका । माती नांव ठेवूनि बुका ॥

हा तो निवाड्याचा ठाव । खऱ्या-खोट्या निवडी भाव ।।

तुकारामबोवांचा या बाबतींत एक मोठा अभंगच आहे, तोच उद्धृत करणें बरें. कारण त्यांत संत नाहींत कोण व आहेत कोण या दोहोंचा ते स्पष्ट विचार सांगतात :

नव्हती ते संत करितां कवित्व ।
संतांचे ते आप्त नव्हती संत ।। १ ।।
तेथें नाहीं वेश सरतें आडनांव ।
निवडे घावडाव व्हावा अंगीं ।। २ ।।
नव्हती ते संत धरितां भोपळा ।
पांघरती वाकळा प्रावरणासी ।। ३ ।।
नव्हती ते संत करितां कीर्तन ।
सांगतां पुराण नव्हती संत ।। ४ ।।
नव्हती ते संत वेदाच्या पठणें ।
कर्म आचरणें नव्हती संत ।। ५ ।।
नव्हती ते संत करितां तपतीर्थाटण ।
सेविलिया वन नव्हती संत ।। ६ ।।
नव्हती ते संत माळामुद्रांच्या भूषण ।
भस्म उधळणें नव्हती संत ।। ७ ।।
तुका म्हणे नाहीं निरसला देह ।
तोंवरी अवघे हे सांसारिक ।। ८ ।।

संतांचीं लक्षणें दोन प्रकारचीं असतात : एक बाह्य व एक अंतर्. नुसत्या बाह्य लक्षणांनीं युक्त हा संत होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, माळा धारण करणें, गंध लावणें, फार काय पुराण सांगणें, कीर्तन करणें वगैरे हीं बाह्य लक्षणें आहेत. खरे संत हे गोपीचंदनाचा अथवा चंदनाचा टिळा लावीत असतील; भस्म लावीत असतील; गळ्यांत

तुळशीची अगर रुद्राक्षाची माळा घालीत असतील. म्हणून जो गंध लावील, भस्म फांशील अथवा तुळशीची अगर रुद्राक्षाची माळा घालील तो संत नाहीं. या सर्व गोष्टी बाजारांत पैसे टाकले कीं मिळतात व त्या पैसे टाकले म्हणजे कोणालाहि मिळतात. पण संतपण हें बाजारांत मिळत नाहीं. तुकारामबोवा म्हणतात :

**नाहीं संतपण मिळत तें हाटीं। हिंडतां कपाटीं रानींवनीं ॥**

संतपण बाजारांत मिळत नाहीं. पोटार्थी माणसें, लोकांनीं आपणांस साधु म्हणावें म्हणून या गोष्टी अंगावर धारण करतांना दिसतात. यांत संतपणा कोठून येणार ? संतपणा हा कांहीं बाह्य वेशावर अवलंबून नाहीं. नेहमींचे कपडे टाकून दिले आणि अंगावर चिंध्या घातल्या अगर भगवीं वस्त्रें परिधान केलीं तरी ता संत होत नाहीं. कारण वरचा वेष जरी चिंध्यांचा असला तरी त्याला आंतून नोटा अथवा होन शिवलेले असण्याचा संभवहि खराच !

औरंगजेबाची अशी गोष्ट सांगतात कीं, एकदां त्यानें आपल्या राज्यांतील फकिरांना जेवण केलें. मात्र अशी व्यवस्था केली कीं, जेवण झाल्यावर बाहेर पडण्याचा दरवाजा एकच व दरवाज्यांतून बाहेर पडतांना सक्तीनें जुना पोशाख काढून ठेवावयाचा व नवा, बादशहा देईल तो घालावयाचा. असें कांहीं घडेल याची कल्पनाच नसल्यानें बादशहाचें जेवण म्हणून गांवोगांवचे हजारों फकीर आपल्या नेहमींच्या पोशाखांत जमा झाले. जेव्हां जेवून बाहेर पडतांना जुना पोशाख उतरण्याची पाळी आली तेव्हां कांकूं करूं लागले; पण बादशहाचा सक्त हुकूम होता कीं, जुना पोशाख घेऊन परत कोणीहि जावयाचें नाहीं; यामुळें त्यांचें कांहीं चालेना. मोठ्या नाखुषीनें त्यांनीं आपले जुने पोशाख काढून ठेवले व नवे धारण केले. बादशहानें सर्व फकीर निघून गेल्यावर ते कपडे जाळले व असें म्हणतात कीं, त्यांत त्याला जें सोनें मिळालें तें कित्येक

स्वाऱ्यांच्या खर्चाला पुरलें ! यांतील अतिशयोक्तीचा भाग सोडून दिला तरीसुद्धां जें तात्पर्य आहे तें मौलिक आहे; व तें असें कीं, वरतून चिंध्या असणाऱ्या पोशाखांतून सुद्धां कित्येक वेळां आंतून सोन्याचे होन शिवलेले असतात. हातांत नरोटी व बँकेत कोटी, अशी स्थिति आढळून येते. सांगण्याचा इत्यर्थ असा कीं, संतत्व हें वरच्या पोशाखावर अवलंबून नाहीं. वेषावर काय आहे ? आंत शुद्धता पाहिजे. तुकोबा म्हणतात

**तुका बस्तर बिचारा क्या करे रे अंतर भगवा न होय ।**
**भातर मैला कब मिटे रे मरे उपर धोय ।।**

अंगावरील कपडे भगवे केले; पण आंत जर शुद्धपणा नसेल तर त्याचा काय उपयोग ? तुकाराममहाराज तर एके ठिकाणीं म्हणतात :

**भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ।।**

आडनांव संत असून काय उपयोग ? आडनांव ' वाघमारे ' आणि मांजराला भितात ! तसें आडनांव संत असून उपयोगी नाहीं. संतत्व हें अनुभवाची खूण आहे :

**येथें नाहीं वेष सरतें आडनांव ।**

कथाकीर्तन करून अथवा गळ्यांत माळ घालून संत होत नाहीं. कथाकीर्तन केलें तर तो कथेकरी अथवा कीर्तनकार होईल. गळ्यांत माळ घातली तर तो माळकरी होईल. संतपण हें कांहीं वेगळेंच आहे. पुष्कळ माणसें संताचा मुलगा हा संतच असला पाहिजे असें समजतात; पण हेंहि अज्ञानच आहे. संताच्या पोटाला आल्यानें संतत्व मिळत नाहीं. तुकारामबोवा म्हणतात :

**पोटीं जन्मती रोग । तरी कां म्हणावे आप्तवर्ग ।।**

साधूच्या पोटांत रोग झाला तर का त्याला कोणी साधु म्हणणार आहे ? संतत्व हें वडिलानें मुलाला देतां येण्याजोगी गोष्ट नव्हे.

ती काय मिराशीची जमीन आहे, तर वडिलांच्या मृत्यूनंतर अथवा त्यांच्या इच्छेप्रमाणें ते हयात असतांना ती मुलाच्या नांवावर चढेल? नाथमहाराज म्हणतात :

**आत्मानुभव नोहे मिराशी। जे वांटा लाभिजे गोत्रजासी।**
**हा लहाणा विरक्तांसी। जे देहभावीं सांडिले॥**

संतत्व मिळविण्याकरितां लढाई करावी लागते व लढाईंत जो टिकतो, शत्रूवर जय मिळवतो तो संत ठरतो:

**निवडे घावडाव व्हावा अंगीं॥**

कांहीं अडाणी लोक तर गटारावर बसलेला, कांहीं तरी खाणारा, रानोमाळ भटकणारा यालाच संत समजतात. एकदां मौज अशी झाली कीं, कै. जोगमहाराजांना एका गृहस्थानें म्हटलें, "महाराज, तुम्ही साधु. मग तुम्ही लोणी, भाकरी खातां ते?" जोगमहाराज मोठे विनोदी होते. ते म्हणाले, "तुझें काय म्हणणें आहे? अंबोण खाऊं? म्हणजे मग साधु म्हणशील ना? अंबोण तर म्हैस खातेच. मग ती जन्मतःच साधु!"

येथपर्यंत 'संत नाहीं कोण' याचा तुकोबांच्या कडव्यांच्या आधारें विचार केला. तो आणखीहि वाढवतां येण्याजोगा आहे; पण विस्तारभयास्तव येथेंच थांबणें बरें; कारण संत कोणास म्हणावें हें सांगितलें म्हणजे आपोआपच कोण नाहींत हें उघड होणार आहे.

संत या शब्दाचा धात्वार्थ सद्वस्तु असा आहे. तीनहि काळीं ज्याच्या स्वरूपांत बदल होत नाहीं, जिचा अभाव कोणत्याहि काळीं सिद्ध होत नाहीं, अशी जी वस्तु तिला 'संत' असें म्हणतात. म्हणूनच हा शब्द 'आत्मा' या अर्थानें वापरलेला आढळतो. भागवतामध्यें ( स्कंध ११, अध्याय ८, श्लोक ३० ) खालील पिंगलेचे फार उत्कृष्ट उद्गार आहेत. त्यांत तिनें संत हा शब्द आत्मा या अर्थानें वापरला आहे.

**संतं समीपे रमणं रतिप्रदं वित्तप्रदं नित्यमिमं विहाय ।**
**अकामदं दुःखभयादिशोकमोहप्रदं तुच्छमहं भजेऽज्ञा ।।**

श्रीएकनाथांनीं यावर पुढीलप्रमाणें सुंदर ओंव्या लिहिल्या आहेत :

**सत्पुरुषाची प्राप्ति । जवळी असतां नेणे असती ।**
**ज्यासी केलिया रती । कामानिवृत्ति तात्काळ ।।**
**काम निवर्तवूनि देख । अनिवार पुरवी नित्य सुख ।**
**वित्तदाता तोचि एक । अलौकिक पैं देणें ।।**
**सकळ ऐश्वर्य निजपदेसीं । संतोषोनि दे रतीसी ।**
**रमवूं जाणे नरनारीसी । रमणू सर्वांसी तो एकू ।।**

तात्पर्य, संत म्हणजे आत्मा व उपलक्षणानें ज्या पुरुषानें देहादि असत् उपाधींचें तादात्म्य सोडून वृत्ति सत् म्हणजे आत्मस्वरूप केली आहे त्यास ' संत ' असें म्हणतात. तात्पर्य संतत्व हे देहाहंकाराशीं लढून, त्याचा निःपात करून कार्यकारणउपाधीवर विजय मिळवून जो आत्मरूप बनला त्याला मिळणारी पदवी आहे.

ज्ञानेश्वरमहाराज संतांचें वर्णन असेंच करतात :

**आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझीं रूपडीं ।**

तुकाराममहाराज वर उद्धृत केलेल्या ( " नव्हती ते संत...." ) अभंगाच्या शेवटीं हेंच सांगतात :

**तुका म्हणे नाहीं निरसला देह । तोवरी हे अवघे संसारिक ।।**

जोंपर्यंत असंत जो देह त्याचा निरास झाला नाहीं म्हणजे तो अपरोक्षरीत्या मिथ्या असा अनुभव नाहीं, म्हणजे जोंपर्यंत मनुष्य आपणांस देह समजतो तोंपर्यंत तो संत होऊं शकत नाहीं. मग तो कांहीं करो; तो संसारिकच.

समर्थ रामदासांनीं सुद्धां ' मनाच्या श्लोकां ' त संतांचें असेंच लक्षण सांगितलें आहे :

करी वृत्ति जो संत तो संत जाणा ॥

तो वृत्ति संत ( संथ नव्हे ) करतो तो संत.

विमल आत्मज्ञान, शाश्वत स्वरूपाची ओळख हें संतांचें मुख्य लक्षण आहे. हें ज्ञान ज्याच्या ठिकाणीं उत्पन्न झालें त्याची क्रिया पालटते. त्याचे गुण बदलतात. आंत ज्ञानाचा प्रकाश पडला, कीं पूर्वींच्या दुर्वृत्ति जाऊन त्या ठिकाणीं सद्वृत्ति राहावयास येतात. यामुळें साधूच्या ठिकाणीं प्रकट होणारीं जीं लक्षणें आहेत त्यांपैकीं एका प्रमुख लक्षणाचा थोडक्यांत विचार करूं. कारण शुद्ध आत्मज्ञान हे जर साधूचे डोळे कल्पिले तर पुढें सांगितलें जाणारें हें लक्षण साधूचें नाक होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. तें लक्षण म्हणजे ‘ निरपेक्षता. ’ श्रीएकनाथ म्हणतात :

परमार्थीं मुख्य बीक । निरपेक्षता हें नाक ।
तेणेंविण तें निर्नासिक ॥........— भावार्थ रामायण

भागवतामध्यें —

“ निरपेक्षं मुनिं शान्तं निर्वैरं समदर्शनम् । ” अशी संतांची पंचलक्षणकथा भगवंतांनींच गायिली आहे. या लक्षणांनीं संपन्न असणाऱ्या पुरुषास भगवान् किती मानतात हे या श्लोकाच्या पुढील भागावरून कळून येणार आहे. भगवान् म्हणतात:—

अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥ —भा. स्कं. ११.१४-१६

या पंचलक्षणांपैकीं निरपेक्षतेचें श्रीएकनाथांनीं केलेलें व्याख्यान फारच उत्कृष्ट आहे, म्हणून तें पुढें देत आहों :

अनन्य करितां माझें भजन । माझ्या स्वरूपीं झगटलें मन ।
सकळ वासना गेल्या विरोन । वृत्तिशून्य अवस्था ॥
आटाटीविण न प्रार्थितां । अयाचित अर्थ हातां येतां ।
तोही हातीं घेवों जातां । निरपेक्षता बुडाली ॥

**अर्थ देखोनि जो लविन्नला । तो जाण लोभें वोणवा केला ।**
**तोही उपेक्षुनि जो निघाला । तो म्यां वंदिला सर्वस्वें ।।**
**मार्गी अर्थ पाडिला असतां । कोणी नाहीं माझा म्हणतां ।**
**तोही स्वयें हातीं घेतां । निरपेक्षता बुडाली ।।**

तात्पर्य, स्त्रीच्या सौंदर्यांत जसे डोळे व नाक तसेंच साधूच्या लक्षणांत ज्ञान व निरपेक्षता यांना स्थान आहे. याकरितांच भगवद्गीतेंत, भागवतांत साधूंचीं लक्षणें सांगत असतांना यांचा प्रामुख्यानें निर्देश केला जातो. गीतेंतहि बाराव्या अध्यायांत "अनपेक्षः शुचिर्दक्षः" असें भक्ताचें वर्णन केलें आहे.

तुकाराममहाराजांनीं आपल्या निःश्रेयसाकरितां ज्यांच्यावर विश्वास ठेवला ते संत म्हणजे 'परनिष्णात' महात्मे. त्यांनाच संत म्हणतात. श्रुतीमध्येंहि साधकानें 'शब्दपरनिष्णात' अशा महात्म्यास शरण जावें असेंच म्हटलें आहे.

**"तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः**
**श्रोत्रियंब्रह्मनिष्ठम् ।।"** – मुण्डक १-२-१२.

या लक्षणामध्यें 'ब्रह्मनिष्ठता' हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. श्रुतिसंपन्नता व ब्रह्मनिष्ठता असली तर उत्तमच; पण जर दोहोंतून एखादें कमी चालण्यासारखें असेल तर तें लक्षण म्हणजे 'श्रुतिसंपन्नता.' श्रीनामदेव-तुकोबा कोठें पढिक होते ? ब्रह्मनिष्ठते-विना संत होऊंच शकत नाहीं. भागवतामध्यें यासंबंधीं पुढील श्लोक स्पष्ट आहे :

**शब्दब्रह्माणि निष्णातो न निष्णयात्परे यदि ।**
**श्रमस्तस्य श्रमफलो ह्यधेनुमिव रक्षतः।।** –स्कं. ११, अ. ११-१८

ज्याच्यावर विश्वास ठेवावयाचा तो मनुष्य विश्वासार्ह लागतो. संतांच्यावर विश्वास ठेवावयास कांहींहि हरकत नाहीं. कारण

तुकोबांना आढळून आलें कीं, संतांचीं लक्षणें पाहिलीं तर साधकाचें पारमार्थिक कल्याण करावयास ते सर्वथा योग्य आहेत. ज्या कारणाकरितां शरणागति करावयाची त्यांतला तो तज्ज्ञ अधिकारी असावा, हा अगदीं प्राथमिक साधा नियम आहे. तसेंच तो निरपेक्ष असावा हेंहि आवश्यक आहे. त्याच्याजवळ आपल्याकडे येणाऱ्यास ती कला अथवा ज्ञान देण्याची तळमळ व सामर्थ्य असावें. हे जे सामान्य नियम ते लावून पाहिले असतां कोणाहि विचारवंताला आढळून येईल कीं, परमार्थाकरितां खऱ्या संतांवर विश्वास ठेवण्यास बिलकुल हरकत नाहीं. संत हा परमार्थरूप अथवा जीवांचें जें खरें हित त्यांत तद्रूप झालेला असतो. ज्ञानोबा-रायांच्या शब्दांत सांगावयाचें तर 'सकळ भूतांच्या हितीं अव्यक्तीं' अथवा परमार्थरूपी 'गूढ' होऊन तो राहिलेला असतो. म्हणूनच निळोबा त्यांचें खालीलप्रमाणें वर्णन करतात.

**शोधोनिया आले संत । हिताहित जगाचें ॥**

ते निरपेक्ष असतात, दयावान् असतात. तुकोबा म्हणतात —

**भूतांची दया हें भांडवल संतां। आपुली ममता नाहीं देहीं ॥**

व जो पुरा संत असतो त्याला हें ज्ञान दुसऱ्याच्या हातीं देण्याचें सामर्थ्यहि असतें.

**रवि दीप हिरा दाविती देखणें । अदृश्यदर्शनें संतांचिया ॥**

■ ■ ■

**गाढवाचे घोडे । आम्ही करूं दृष्टीपुढें ॥**

तात्पर्य, संत हे विश्वास ठेवण्यायोग्य आहेत, असा विचार करून तुकारामबोवांनीं ठरविल्यामुळेंच तुकारामबोवा या अभंगाच्या प्रथम कडव्यांत म्हणतात :

**संतांचिया पायीं हा माझा विश्वास ।**
**सर्वभावें दास जालों त्यांचा ॥**

या बाबतींत तुकारामबोवा किती काळजी घेत होते व त्यांची कसोटी काय होती यांचें गमक म्हणून त्यांचें एका प्रसंगाचें खालील उद्गार देतों. यांत एवढें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, यांत तुकारामबोवा हे पुढील उद्‌गार देवाशीं बोलतांना काढतात :

**करिसी तें देवा करा माझें सुखें ।**
**परि मी त्यासी मुखें न म्हणे संत ॥ १ ॥**
**जया राज्य द्रव्य करणें उपार्जना ।**
**वश दंभ माना इच्छें झाले ॥ २ ॥**
**जग देव परी निवडीन निराळे ।**
**ज्ञानाचे आंधळे भारवाही ॥ ३ ॥**
**तुका म्हणे भय न धरीं मानसीं ।**
**ऐसियाचे विशीं करतां दंड ॥ ४ ॥**

आतां थोडक्यांत दुसऱ्या प्रश्नांचा विचार करूं. थाडक्यांत म्हणण्याचें कारण, याविषयीं चर्चा करतां जें सांगावयास हवें त्यांतील कांहीं भाग "देव घ्या कोणी" या अभंगाच्या चर्चेंत येऊन गेला आहे. आपल्या बुद्धीनें आपण गेलों तर देवाची कृपा होऊन त्याचें दर्शन होणारच नाहीं असें म्हणणें कठिण आहे. कारण, मनुष्य देवाचीच प्रार्थना अखंड करीत बसला तर देवच गुरुरूपानें त्याला भेटणें शक्य आहे. तुकारामबोवा म्हणतात :

**माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥**

पण एकांतिक निष्ठा अथवा विश्वास देवावर तरी हवा, यांत शंकाच नाहीं.

विचार करून पाहिलें तर असें आढळून येईल कीं, नाव पाण्यांत ढकलली आहे. परतीराला नेणारा जाणता नावाडी नसेल तर नाव पलीकडच्या तीराला जाणारच नाहीं असें नाहीं; पण त्यांत धोके

फार हें खरें ! तसेंच परमार्थपथावर पावलं टाकूं लागलेला मुक्कामाला पोंचणारच नाहीं असें म्हणणें तत्त्वतः कठिण; पण व्यवहारतः बोलायचें तर पोंचणें अशक्य. सामान्य व्यवहारांतील गोष्टी कळण्याकरितां गुरु लागतो; मग हा तर परमार्थ आहे ! 'अव्यक्तोऽयमचिंत्योऽयम ।' म्हणून ज्याचें भगवंतासारखें वर्णन करतात तेथें आपल्या सामान्य मनुष्याचा काय पाड ! श्रीएकनाथ एके ठिकाणीं म्हणतात :

**प्रवृत्तिनिवृत्तिकृतकार्या । अवश्य पाहिजे आचार्या ।**
**आपमतीं भजतां राया । अनेक अपायामाजीं पडे ॥**

मोठमोठे श्रीरामकृष्णांच्यासारखे यांनाहि 'गुरू' करून ज्ञान संपादन करावें लागलें. नाथमहाराज म्हणतात

**रामराम स्मरतां घोष । जेणें तुटती भवपाश ।**
**तोही शरण श्रीवसिष्ठास । गुरुभक्तीसी सादर ॥**
**पूर्णब्रह्म श्रीकृष्णनाथ । तोही म्हणवी गुरुभक्त ।**
**दुर्वासऋषीची सेवा करित । नित्यमुक्तिलागोनि ॥**

तात्पर्य, अनुभवी संतांच्या कृपेविणा पारमार्थिक यथार्थ ज्ञान मिळणें कठिण; म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवणें अवश्य. आपण किती कल्पना करणार ? परमार्थ हा एक अनुभव आहे; तो कल्पनेनें नुसता कसा कल्पितां येईल ? सांगितलें तरी सुद्धां समजणें कठिण !

शिवाय हेंहि लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, जो विश्वास ठेवावा म्हणून शास्त्र व संत महात्मे सांगतात, तो आंधळा नव्हे अथवा कायमचा नव्हे. साधन सुरू करण्यास आवश्यक एवढा तरी विश्वास हवा ना ? तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात, एवढा विश्वास ठेवून तुम्ही साधनास आरंभ करा. मग

**............... । अनुभवें गोडी येईल कळों ॥**

भाकरी खाल्ली म्हणजे ओकाऱ्या थांबतील असें पित्तानें ओकाऱ्या

येणाऱ्या मुलाला आई सांगते. मुलगा म्हणतो, कशावरून ? आई म्हणते, खाऊन बघ. येरवीं कसें सिद्ध करूं ? तसेंच परमार्थामध्येंहि आहे. तो अनुभव आहे. तो नुसत्या तर्कानें कसा गोचर होणार ? साधन करून बघा; नाहीं अनुभव आला तर सोडून द्या. परमार्थी हा अनुभववादी आहे. एका तत्त्ववेत्त्यानें म्हटलें आहे, Mystics are the empiricists of empiricists. पण अनुभव घेण्यास प्रयत्न करणें अवश्य व त्यास प्रारंभ करण्यास जितका विश्वास लागतो तेवढाच संतमहात्मे ठेवा असें सांगतात. तात्पर्य, नुसत्या तर्कानें हें कळणारें नव्हे. म्हणून

'नैषा तर्केण मतिरापनेया प्रोक्तान्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठ॥ —कठ.

योग्य मार्गदर्शन करणाऱ्या संतांवर विश्वास हेंच परमार्थांतील भांडवल. विश्वास म्हणजे समज नव्हे. विश्वासांत क्रियेचा भाग येतो. ‘ विश्वास ठेवा ’ याचा अर्थ ‘ करून बघा. ’ भौतिक-शास्त्रांतसुद्धां असा विश्वास लागतोच.

तात्पर्य, विश्वासावांचून क्रिया नाहीं व संत हे अनुभवी, सत्यवक्ते, निरपेक्ष, दयावान् असे असल्यामुळें त्यांच्यावर विश्वास ठेवावा हेंच योग्य. हें जाणून तुकोबा आपण संतांच्या पायांवर विश्वास ठेवला असें म्हणतात :

संतांचिया पायीं हा माझा विश्वास ।
सर्वभावें दास जालों त्यांचा ॥

• • •

# सदा नामघोष करूं हरिकथा :: ८

सदा नामघोष करूं हरिकथा। तेणें सदा चित्त समाधान ॥ १ ॥
सर्व सुख त्यालों सर्व अलंकार। आनंदें निर्भर डुलतसों ॥ २ ॥
असो ऐसा कोठें आठवचि नाहीं। देहीच विदेही भोगूं दशा ॥३॥
तुका म्हणे आम्ही झालों अग्निरूप।
लागों नेदूं पापपुण्य अंगा ॥ ४ ॥

तुकोबांच्या जवळ राहणारा व तुकोबांच्याविषयीं कळकळ बाळगणारा एक गृहस्थ. त्याला तुकोबांच्या दिनचर्येकडे पाहून एक कोडें पडलें. त्याला असें आढळून आलें कीं, तुकारामबोवा देवाचें नामस्मरण व हरिकीर्तन यापरता दुसरा धंदाच करीत नाहींत. तेच एके ठिकाणीं म्हणतात :

दिनरजनीं हाचि धंदा। गोविंदाचे पवाडे ॥

◆ ◆ ◆

येऊनि संसारीं। मी तो एक जाणें हरि ॥ १ ॥
आणीक कांहीं नेणें धंदा। नित्य ध्यातसें गोविंदा॥ २ ॥

पुष्कळसे लोक रोज कीर्तन करतात. पण त्यांत प्रकार असतात. कित्येकांचा ' दिनका धंदा एक और रातका धंदा एक.' म्हणजे दिवसां पोटाचा उद्योग करावा, रात्रीं हरिकीर्तन करावें असें असतें. दुसरा एक प्रकार असा कीं, दिवसां कीर्तन व रात्रीं कीर्तन; पण तो एक पोट भरण्याचा व्यवसाय म्हणून. तुकोबांच्या दिनचर्येकडे पाहून त्याला कोडें पडलें, त्याचें कारण तुकोबा दिवसां आणि रात्रीं सारखें कीर्तनच करीत. जणूं काय ' सततं कीर्तयन्तो माम् ' या भगवंताच्या

उक्तीचें ते म्हणजे मूर्तस्वरूपच ! पण त्याला जें कोडें पडलें तें हें पाहून नव्हे, तर याचा तुकोबा पोट भरण्याकरितां बिलकुल उपयोग करीत नव्हते व पोट भरण्याचा दुसरा उद्योगहि करीत नव्हते म्हणून. तुकारामबोवा कीर्तनावर पैसा घेणें निंद्य मानीत. कीर्तनावर पैसा घेणारांचा त्यांनीं फार कडक शब्दांत निषेध केला आहे. या बाबतींतील त्यांचे कांहीं उद्गार खालीं देतों :

कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ।।

■ ■ ■

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ।। १ ।।
माळ घालूं नये गळां । बुका लावूं नये भाळां ।। २ ।।
तुका म्हणे देती । घेती ते नरकासी जाती ।। ३ ।।

■ ■ ■

मातेपरिस थोर कथा । भाड घेतां न लाजे ।।

लोकांना असा उपदेश करून स्वतः मात्र पैसे घेतील या वर्गांतले तुकारामबोवा नव्हते.

ते म्हणतात :

नव्हे पुराणिक । करणें सांगणें आणिक ।।

'सांगे आन करी आन' या वर्गाच्या अगदीं उलट तुकोबांचा वर्ग. आधीं वर्तावें व मग लोकां सांगावें. एखादा साधा महाराज हरिकीर्तनावर हजारों रुपये मिळवून इस्टेटी करून राहतो. तुकारामबोवांना वैकुंठास जातांना पोरांबाळांना पांच-पंचवीस हजार रुपये तरी ठेवतां आले नसते का ? पण या वर्गांतले तुकारामबोवा नव्हतेच ! तुकारामबोवांना वैकुंठाला नेण्याकरितां जेव्हां भगवान् आले, तेव्हांचे त्यांचे खालील उद्गार त्यांनीं जन्मभर पाळलेल्या कडकडीत वैराग्यव्रताचे निदर्शक आहेत :

**पाहुणे घरासी । आजि आले हृषीकेशी ।। १ ।।**
**काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ।। २ ।।**
**दरदरित कण्या । पाण्यामाजीं रांधिल्या ।। ३ ।।**
**मुखशुद्धि तुळशीदळ । तुका म्हणे मी दुर्बळ ।। ४ ।।**

त्या गृहस्थांना जें कोडें पडलें तें एवढ्याचकरितां कीं, हा बोवा कीर्तनावांचून दुसरा धंदा करीत नाहीं व कीर्तनावरहि दिडकी मिळवीत नाहीं. मग येवढा हा खटाटोप कशाकरितां ? त्याला हें उमगेना, म्हणून त्यानें बोवांना प्रश्न केला कीं, ' बोवा, हा नामघोष व ही कथा कशाकरितां ? त्याचें उत्तर तुकारामबोवा या अभंगांत विस्तृतपणें देतात :

**सदा नामघोष करूं हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान ।।१।।**

" भगवंताच्या नामाचा घोष ( मोठ्यानें उच्चार ) व हरीची कथा आम्ही येवढ्याकरितां करतों कीं, त्यायोगानें चित्ताला अखंड समाधान प्राप्त होतें. "

यावर तो गृहस्थ म्हणाला असावा कीं, " बोवा, चित्तसमाधानाचा काय उपयोग? " त्याचें उत्तर बोवा या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यांत देतात :

**सर्व सुख ल्यालों सर्व अलंकार । आनंदें निर्भर डुल्लतसों ।। २ ।।**

या कडव्यांतील पहिल्या अर्धाचा शब्दार्थ असा कीं, सर्व सुखाचे दागिने आम्हीं सर्व अंगावर धारण केले; पण त्याचा मथितार्थ असा आहे कीं, चित्त समाधानाला सर्व काळ पावल्यानें जो आंत सुखाचा लाभ झाला तो येवढा मोठा कीं, तें सुख आंत न मावतां बाहेरच्या इंद्रियांच्या द्वारां प्रकट होऊं लागलें. श्रीएकनाथांनीं कविप्रभृति नव जणांचें वर्णन करतांना अशाच अर्थाचे उद्गार काढले आहेत :

ब्रह्मानुभवें पूर्णत्वें पूर्ण । इंद्रियद्वारां विराजमान ॥
ते त्यासीं निजशांतिभूषण । मुकुट कंकण ते तुच्छ ॥

ज्ञानेश्वरीमध्येंहि ज्ञानदेवांनीं महात्म्याचें वर्णन करतांना

जे आववाचि करणीं । लेईलें शांतीचीं लेणीं ।
जयांचें चित्त गवणी । व्यापका मज ॥ ज्ञा. ९-१९३

असें दिसतें. कंदिलांत दिवा लागला कीं त्याचा प्रकाश आंत राहत नाहीं. तो बाहेर पडतो. तसेंच आंत का सुख वाढलें, कीं तें इंद्रियाच्या द्वारें बाहेर पडतें, इंद्रियांची कसमस मोडते, तळमळ हरते व त्यांना शान्ति प्राप्त होते. याचा परिणाम असा झाला कीं, तुकारामबोवा म्हणतात, मी आनंदांत निर्भर ( काळजीरहित ) डोलत राहतों.

देहभानरहित झुलक्या घेणारे अंमली लोक असतात, त्या प्रकारची ही आपली स्थिति नव्हे. ती कशी वेगळी आहे त्याचें लक्षण म्हणून तुकारामबोवा तिसऱ्या कडव्यांत या सुखानुभूतीचा खालीलप्रमाणें परिणाम व त्याचें लक्षण सांगतात :

असो ऐसा कोठें आठवचि नाहीं ।
देहींच विदेही भोगूं दशा ॥ ३ ॥

देहाशीं तादात्म्य करून असणारी वृत्ति आनंदाच्या अनुभूतींत विरून गेल्यानें हें शरीर कोठें आहे याचा आठवच राहिला नाहीं. पण देहाचा अनाठव हा दारू पिणारा, अफू खाणारा असा अंमल करणारा यासहि होतो. पण आमचा तसा नव्हे.

देहींच विदेही भोगूं दशा ॥

वेदान्तशास्त्रांत जी ' विदेह मुक्ति ' म्हणून वर्णन केली आहे त्या अवस्थेचा आम्हीं उपभोग घेत आहोंत.

गीता, भागवत आदि ग्रंथांत या स्थितीचें वर्णन आढळतें :

नैव किंचित् करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।
पश्यन् शृण्वन् स्पृशन् जिघ्रन् अश्नन् गच्छन् स्वपन् श्वसन् ॥
प्रलपन् विसृजन् गृण्हन् उन्मिषन् निमिषन्नपि ।
इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥ गी. अ.५, श्लोक ८।९

देहं च नश्वरमवस्थितमुत्थितं वा सिद्धो न पश्यति यतोऽध्यगतस्वरूपम् दैवादपेतमुत तद्दैववशादपेतं वासो यथा परिकृतं मदिरामदांधः ॥ —भा. स्कं. ११, अ. १३·३६

यावर श्रीएकनाथांनीं फारच उत्कृष्ट व्याख्यान केलें आहे. त्यांतील कांहीं भाग खालीं देतों :

जया देहाचेनि मज्जनें । माझें शुद्ध स्वरूप पावणें ।
त्या देहासि विसरिजे तेणें । मी माझेंपणें देखेना ।
जेवीं कां भाडियाचें घोडें । जेणें आणिलें निजधामा रोकडें ।
तें आहे कीं गेलें कोणीकडे । हें स्मरेना पुढें तो जैसा ॥
हो कां भेटावया भ्रतारासी । सवें मजूर आणी विश्वासी ।
ते पतीसि पहुडल्या राणिवेसी । त्या मजुरासी विसरली ॥
कां जो दैवयोग पालखी चढे । तो पूर्वील तुटके मोचडे ।
आहेत कीं गेले कोणीकडे । हें स्मरेना पुढें तेणें हरिखें ॥
हें काशीं कीं कैकटीं । नरकीं कीं वैकुंठीं ।
घरीं कीं कपाटीं । हेंही पोटीं स्मरेना तो ॥
ऐशी ज्ञात्याची निरभिमानता.... ॥

उन्मत्त मनुष्यास जसा वस्त्राचा विसर पडतो, तें अंगावर आहे किंवा नाहीं याचें भानहि राहत नाहीं, तसेंच शरीराचें सिद्धपुरुषास भान राहत नाहीं.

मदें मातें तया नाहीं देहभाव । आपुले अवयव आवरिती ॥

हीच आपली अवस्था झाली असें तुकारामबोवा सांगतात :

देहींच विदेही भोगूं दशा ॥

तुकारामबोवा या शेवटच्या कडव्यांत भगवद्भजनाचें जें फळ प्राप्त झालें, जी विदेहमुक्ति प्राप्त झाली तिची स्पष्टता करतात :

**तुका म्हणे आम्ही जालो अग्निरूप ।**
**लागों नेदी पापपुण्य अंगा ॥ ४ ॥**

तुकाराममहाराज म्हणतात कीं, आम्ही अग्निरूप झाल्यानें अंगाला पाप अथवा पुण्य कांहींच लागूं देत नाहीं असें झालों. तात्पर्य, आम्ही ब्रह्मरूप झालों. ज्ञानेश्वरीमध्यें महात्म्याचें वर्णन

**जळतीं कर्मफळें ते तो आगी ॥**

( ज्यांत कर्मफळें म्हणजे पापपुण्य जळतील असा अग्नि ) तो होतो असें केलें आहे. पापपुण्य सर्व जाळणारा असा एकच अग्नि आहे व तो म्हणजे ' ज्ञानाग्नि. ' गीता म्हणते,

**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुतेऽर्जुन ॥**

मोक्षाच्या दृष्टीनें पाप जसें वाईट तसें पुण्यहि वाईट. एकानें हीन तर दुसऱ्यानें उत्तम जन्म प्राप्त होतो. जन्माभावरूप मोक्ष प्राप्त होण्यास दोहोंच्याहि पलीकडे जाणें अवश्य आहे. तुकाराम-बोवा शेवटच्या कडव्यानें आपण ' पापपुण्ये विधूय ' अशी जी ब्रह्मस्थिति तीस प्राप्त झालों असें सांगतात. नामघोष व हरिकथा शोच्य जीवाला या उच्चतम गतीला नेऊन पोंचवतात.

**' सा काष्ठा सा परागतिः '**

ज्ञानेश्वरमहाराजांचे दृष्टान्त द्यावयाचे तर जसें देवळाच्या कामाचा शेवट कळस, अथवा गंगेची धांव म्हणजे समुद्र किंवा सोनें शुद्ध करूं लागलें असतां अत्यंत शुद्ध सोनें म्हणजे सोळा दराचें ( ज्ञानेश्वरींत पंधरा, साडेपंधरा, सोळा असे उत्कृष्ट सोन्याचे कस दिले आहेत ):

**देऊळाचिया कामा कळस । परम गंगेसी सिंधुप्रवेश ।**

कां सुवर्णशुद्धी कस । सोळावा जैसा ॥

तसें मलिन जो जीव तो ज्ञानानें शुद्ध होत होत ब्रह्मरूपतेपर्यंत वाढतो. त्याची शेवटची गति म्हणजे पापपुण्यातीत ब्रह्मस्थिति. तुकोबा म्हणतात, भगवद्भजनानें आम्ही या स्थितीस प्राप्त झालों. भावार्थ संपला. आतां थोडें तपशिलांत शिरूं.

या अभंगाचा विचार करूं लागलें असतां दोन प्रश्न प्रामुख्यानें उत्पन्न होतात. पहिला प्रश्न असा कीं, भगवद्भजनाचा -- नामघोष व हरिकथा – यांचा व चित्ताच्या समाधानीचा असा काय कार्य-कारणभावसंबंध आहे कीं, भगवद्भजन केलें असतां मनाला कायमचें समाधान, शान्ति प्राप्त व्हावी ? दुसरा प्रश्न, मनाच्या समाधानाचा व सुखाचा असा काय संबंध कीं, तुकारामबोवा म्हणतात त्याप्रमाणें मन समाधान पावल्यानें आंत न मावणारें असें सुख प्राप्त होऊन जीव हा आंतबाहेर सुखानें व्यापून जावा ?

आपण प्रथम दुसऱ्या प्रश्नाचा विचार करूं. माणसें सामान्यतः असें समजतात कीं, आपणांस जर सुखी व्हावयाचें असेल तर आपण निरनिराळे उत्तम उत्तम विषय आपल्या स्वाधीन करून घेतले पाहिजेत. राहावयास मालकीची तिमजली इमारत, घरांत रेडिओ, सुशिक्षित व आज्ञाधारक पत्नी व मुलें, नोकरचाकर, शेतीवाडी, पैसा या सर्व गोष्टींचा योग झाला म्हणजे आपण सुखी होऊं, असें मनुष्यास वाटतें. पण त्यांची ही समजूत अर्धसत्यावर उभारलेली असली पाहिजे. जीवनयात्रा उत्तम चालावयास माणसास यांपैकीं कांहींची आवश्यकता आहे हें खरें आहे. उदाहरणार्थ, दुपारची काळजी राहणार नाहीं इतकी धनाची साहाय्यता माणसास हवी. निवाऱ्यास बसलें असतां कोणी ऊठ म्हणणार नाहीं अशी जागा असावी हें खरें. खुद्द तुकारामबोवासुद्धां म्हणतात :

निर्वाहापुरतें अन्न आच्छादन ।

पण याचा अर्थ येवढ्यानेंच मनुष्य सुखी होईल असें नाहीं. एक तर या सर्व अनुकूल भोगसाधनांचा योग माणसास होईलच असें नाहीं.

**कोठ कांहीं कोठें कांहीं । एक आहे एक नाहीं ॥**

असें राहणारच व जें न्यून आहे तें हवें असें जर वाटून मनुष्याच्या मनाची तळमळ होत असेल तर त्याला सुख लागणार नाहीं. विचाराकरितां गृहीत धरलें कीं, प्रारब्धवशात् या सर्वांचा योग झाला तरी पुन: महत्त्वाचा प्रश्न शिल्लक राहतोच कीं, हे सर्व कायमचे भोग देण्याच्या स्थितींत राहून याला सारखें सुख देत राहणार का ?

तिसरा व महत्त्वाचा आणखी एक प्रश्न उद्भवतो व तो या प्रस्तुतच्या अभंगांतील प्रमेयाशीं निकट संबंधीचा आहे. बाह्य भोगसाधनें भोग देण्यास समर्थ व तयार आहेत; पण आपल्या-जवळील भोगसाधन भोग भोगण्याच्या स्थितींत आहे का ? तें जर तसें नसेल तर भोगसाधन जवळ व समर्थ असूनहि आपणांस सुखोपभोग होणार नाहीं. बहुतेक माणसें नेमकी हीच गोष्ट विसरतात. आपल्याजवळचेंच तें असल्यानें माणसास त्याचा विसर पडतो असें वाटतें. वस्तु जितकी जवळ तितकें तिजविषयीं आपलें अज्ञान, असा सामान्य नियम बांधण्यास हरकत नाहीं. माणसें विसरतात कीं, भोगसाधनें जरी अनुकूल असलीं तरी आपल्याला सुखोपभोग घडण्याकरितां आपल्याजवळचें साधन - म्हणजे आपलें मन - हें भोग घेण्याइतकें स्वस्थ अथवा शांत हवें.

तुकारामबोवा म्हणतात :

**देखावें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदु:खें कळों येतीं ॥**

एक-दोन उदाहरणांनीं ही गोष्ट सिद्ध करतां येईल. कल्पना करा कीं, एक मनुष्य कलकत्ता मेलनें प्रवास करीत आहे. ' एअर

कंडिशन्ड ’ डब्यांत प्रवास आहे. निजायला मऊ गादी आहे, वरती पंखा आहे, उत्तम प्रकाश आहे. फक्त पोटशूळ उठल्यामुळें पोटांत सारखी कळ येत आहे व त्यामुळें मन अतिशय अस्वस्थ आहे. अशा स्थितींत विचार करण्यासारखी गोष्ट आहे कीं, पंखा, मऊ गादी इत्यादि गोष्टी त्या मनुष्याला सुख देऊं शकतील का ? या प्रश्नाचें उत्तर नास्तिपक्षींच द्यावें लागेल. भोगसाधनें उपलब्ध आहेत, पण भोगणारें मन भोग घेण्याच्या स्थितींत नाहीं. तें अशक्त आहे. अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. उत्तम मेजवानीचा बेत आहे, मनुष्य जेवण्यास बसला आहे. इतक्यांत त्याला तार आली कीं, त्याचा मुलगा अत्यंत आजारी आहे. त्याचा परिणाम असा होतो कीं, पदार्थ पूर्वींचेच, पण गोडी घेणारें मन या दुष्ट बातमीनें अस्वस्थ झाल्यानें पूर्वींची रुचि, आनंद हा उरत नाहीं. पुढें वाढलेले पदार्थ तो दूर सारतो, नको म्हणतो. या सर्व सांगण्याचा मथितार्थ असा आहे कीं, भोग घेणारें आपलें साधन आपलें मन जर शांत, स्वस्थ नसेल तर भोगसाधनें आपणांस सुख देऊं शकत नाहींत.

याच अभिप्रायानें भगवंतांनीं गीतेंत मोठे महत्त्वाचे शब्द वापरले आहेत. भगवान् म्हणतात :

**अशान्तस्य कुतः सुखम् ॥** — गी. अ. २-६६

(ज्याच्या मनाला शान्ति नाहीं त्याला सुख कोठून मिळणार ?)

या श्लोकावर ज्ञानोबाराय खालीलप्रमाणें लिहितात :

**‘जेथ शान्तीचा जिव्हाळा नाहीं। तेथ सुख विसरोनि न रिघे कहीं।**
**जैसा पापियाचा ठायीं। मोक्ष न वसे ॥ ..........**
**म्हणौनि अयुक्तपण मनाचें। तेंचि सर्वस्व दुःखाचें ।**

तुकारामबोवा हीच गोष्ट पुढील कडव्यांतून सांगतात :

मनाच्या तळमळें । चंदनेंहि अंग पोळे ।

उलट मन जर शांत असेल तर बाह्य परिस्थिति जरी चांगली नसली तरीसुद्धां मनुष्याच्या सुखांत कमतरता करतां येणार नाहीं.

महात्मा गांधी दांडीच्या प्रवासांत असतांना त्यांचें वजन वाढलें. फांशीची शिक्षा झालेले राजगुरूंसारखे देशभक्त यांचें फांशीपूर्वी तुरुंगांत राहत असतांना वजन वाढलें असें प्रसिद्ध झालें आहे. हें अगदीं शक्य आहे. सुख हें बाह्यसाधनापेक्षां आपल्या मनावर फार अवलंबून आहे. " You cannot make a man happy. He must learn to be happy." असें इंग्रजींत म्हटलें आहे तें खरें आहे.

मौज अशी आहे कीं, भोगसाधन नसेल व मन प्रसन्न असेल तर मनुष्य सुखी राहील. उलट भोगसाधन जवळ आहे, पण मन प्रसन्न नसेल तर सुख लागणार नाहीं. या तत्त्वाला जाणणारे तुकोबा म्हणतात :

चित्तसमाधानें । तरी विष वाटे सोनें ॥
मन हें निश्चळ झालें एकेठायीं । तया उणे कांहीं निजसुखा ॥

या सर्व सांगण्याचा मथितार्थ असा कीं, चित्तसमाधानाचा व सुखाचा अतिनिकटचा संबंध आहे. चित्तसमाधानाविना सुख असंभवनीय. उलट चित्तसमाधान तर सुखाचा झराच त्याच्या आंत प्रकट झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. तुकारामबोवांचा असाच अनुभव होता. म्हणून तुकारामबोवा म्हणतात :

................ तेणें सदा चित्ता समाधान ॥ १ ॥
सर्व सुख ल्यालों सर्व अलंकार । आनंदें निर्भर डुल्लतसों ॥ २ ॥

येथपर्यंत दुसऱ्या प्रश्नाचा विचार झाला. आतां पहिल्या प्रश्नाचा — भगवद्भजनाचा व चित्तसमाधानाचा असा काय

कार्यकारणभावसंबंध आहे ? म्हणजे भगवंताचें नामस्मरण केलें असतां चित्त समाधानास पावतें याला प्रमाण काय, याचा विचार करूं.

सोट्यांतलें मोठें म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण. या बाबतींत प्रत्यक्ष म्हणजे ज्या महात्म्यांनीं प्रत्यक्ष या मार्गाचा — नामस्मरणाचा — अवलंब केला त्यांचा अनुभव. नाथमहाराजांनीं खालील ओव्यांतून आपला अनुभव फारच उत्कृष्ट रीतीनें मांडला आहे :

**सप्रेमसद्भावें संपूर्ण । नित्य करतां नामस्मरण ।**
**वृत्ती पालटती आपण । तेंही लक्षण ऐक राया ॥**
**नामासरिसाच हरी । रिघे हृदयामाझारीं ।**
**तेणें धाकें अभ्यंतरीं । हों लागे पुरी हृदयशुद्धी ॥**
**तेव्हां प्रपंच सांडोनि वासना । जडोनि ठाके जनार्दना ।**
**अहंकार सांडी अहंपणा । सोहंसदनामाजिं रिघे ॥**
**चित्त विसरोनि चित्ता । जडोनि ठाके भगवंता ।**
**मनाची मोडली मनोगतता । संकल्प विकल्पता करूं विसरे ॥**
**कृतनिश्चयेसी बुद्धी । होऊनि ठाके समाधि ।**
**ऐसी देखोनि हृदयशुद्धी । तेथोनि त्रिशुद्धी न रिघे हरी ॥**

—एकनाथी भा. अ. २, ओ. ७६८–७७२

वरील ओव्या इतक्या सरळ व सोप्या आहेत कीं, त्यांचें अधिक स्पष्टीकरण करण्याचें कारण नाहीं. यांचें तात्पर्य असें कीं, साधक जसजसें भगवंताचें नाम घेतो तसतसा भगवंत त्याच्या अंतरांत प्रवेश करतो. जसजसा भगवद्भाव प्रकट होतो तसतसे विकार नाहींसे होतात व चित्तास एकाग्रता प्राप्त होऊन चित्त अखंड समाधानाला पावतें, असा सर्व नामनिष्ठ संतांचा अनुभव आहे.

वारा सुटला असतां जशा पाण्यावर लाटा उत्पन्न होतात तसें चित्तांत रजोगुणमूलक वासना उठली कीं, शांत असणारें चित्त

अस्वस्थ होतें, हालं लागतें व माणसाची सुखमय स्थिति बिघडते. ही वासना अथवा काम नाहींसा करण्याचा गीतेंत सांगितलेला एक उपाय असा आहे कीं, ज्या इंद्रियांच्या द्वारां विषय आंत जावयाचा त्या इंद्रियांचें नियमन करणें. मन हें इंद्रियांच्या अधीन, इंद्रियें विषयांकडे धांवणारीं, यामुळें मनाचें स्वास्थ्य टिकणेंच कठीण. म्हणून भगवान् म्हणतात :

**तस्मात् त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।**
**पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥** —गी. अ. ३·४१

पण इंद्रियांचा निग्रह होणें फार कठीण आहे. भगवानच सांगतात :

**यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।**
**इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥** —गी. अ. २·६०

असा कठीण इंद्रियनिग्रह खरा; पण भगवद्भजनानें तो सुसाध्य होतो, असा सर्व साधुसंतांचा अनुभव आहे.

**एकाजनार्दनीं गातां हरिचें नाम ।**
**निमालीं इंद्रियें विषय विसरलीं काम ॥**

ज्ञानेश्वरमहाराज कीर्तनाचें माहात्म्य पुढील ओंव्यांतून फारच उत्कृष्ट वर्णन करतात :

**तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिलें व्यवसाय प्रायश्चितांचे ।**
**जें नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥**
**यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायांवरूनि उठविलीं ।**
**यमलोकींची खुंटली । राहाटी आघवी ॥**
**यमु म्हणे काय यमावें । दमु म्हणे कवणातें दमावें ।**
**तीर्थें म्हणतीं काय खावें । दोष वोखदासी नाहीं ॥**

—ज्ञा. अ. ९·१९७–९९

तुकाराममहाराजांचा स्वतःचा अनुभवहि असाच होता. मनोजय

व इंद्रियनिग्रह या दोन्ही गोष्टी भगवन्नामसंकीर्तनानें त्यांनीं साधल्या. ते म्हणतात:

**कोणी कांहीं तरी केलीं आचरणें । मज या कीर्तनेविण नाहीं ॥**
**भोगीं झाला त्याग । गीतीं गातां पांडुरंग ।**
**इंद्रियांचा लाग । आम्हांवरूनि चुकला ॥**
**कामक्रोध बंदिखानीं । तुका म्हणे दिले दोन्ही ।**
**इंद्रियांचे धनी । आम्ही जालों गोसावी ॥**
**महामळें मन होतें जें गादलें । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥**

काय केलेंत ? — उत्तर.

**जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥**

असा हा मोठा अनुभव त्यांचा असल्यामुळें तुकारामबोवा स्वानुभवानें म्हणतात :

**सदा नामघोष करूं हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान ॥**

भगवन्नामसंकीर्तनानें प्राप्त होणारें जें समाधान त्याचें मूल्य एका दृष्टीनें वरतीं सांगितलें आहे व तें हें कीं, त्या योगानें सर्व सुखाचा लाभ होतो. हें सर्वांना समजणारें मूल्य आहे. त्या समाधानाचेंच दुसरें मूल्य पण शास्त्रीय परिभाषेंत अर्थात् तात्त्विक दृष्ट्या सांगावयाचें म्हणजे हें ' समाधान ' हीच खरी ' समाधि ! '

तुकारामबोवाच म्हणतात :

**सर्व काळ नामचिंतन मानसीं । समाधान मनासी समाधि हे ॥**

शरीर ताठ होऊन मूर्च्छा आल्यासारखें पडणें ही समाधि वारकरी संतांना मौल्यवान् वाटत नाहीं. त्यांची समाधीची कल्पना वेगळी आहे व ती गीतेंत जी भगवंतांनीं अर्जुनाच्या प्रश्नावरून त्याला सांगितली त्या समाधीसारखी आहे.

गीतेंत सांगितलेली समाधि ही ' चालती बोलती ' समाधि

आहे. क्रिया होत असतांना ज्याची प्रज्ञा स्थिर आहे तो स्थितप्रज्ञ, तोच समाधिस्थ.

श्रीएकनाथांनीं आपल्या भागवतांत अ. २ मध्यें या समाधीचें फारच उत्कृष्ट विवरण केलें आहे. म्हणून तें खालीं देत आहों :

कर्माचरणीं समाधी । एक म्हणती न घडे कधीं ।
ते पावले नाहीं निजात्मबोधीं । जाण त्रिशुद्धी विदेहा ॥
ताटस्था नांव समाधी । म्हणे त्याची ठकली बुद्धी ।
ते समाधी नव्हे त्रिशुद्धी । जाणावी नुसती मूर्च्छा आली ॥
ताटस्थापासोनि उठिला । तैं तो समाधीस मुकला ।
तेव्हां एकदेशी भावो आला । मंदहि या बोला न मानिती सत्य ॥
समाधी आणि एकदेशी । बोलतां बोलणें ये लाजेशी ।
सत्य माना ते शब्दपिशी । शुद्ध स्वरूपाशीं अनोळख ॥
तेथें प्राचीन अतिसमर्थ । ते मूर्च्छा आणोनि करी तटस्थ ।
वाचोनि चालतेबोलते समाधिस्थ।जाण पां निश्चित वसिष्ठादिका।
पाहें पां देवर्षि नारदू । विनोदें न मोडे समाधिबोधू ।
याज्ञवल्क्याचा समाधिसंबंधू । ऋषींप्रसिद्धू परीक्षा केली ॥
स्वरूप देखोनि मूर्च्छित जाहला। तो आपणियां आपण तरला ।
स्वयें तरूनि जन उद्धरिला । तो बोध प्रकाशिला शुकवामदेव ॥
यालागीं समाधि आणि व्युत्थान । या दोन्ही अवस्थांसहित जाण
बुद्धि होय ब्रह्मार्पण । अखंडत्वें पूर्ण परम समाधी ॥
अर्जुना देऊनि समाधी । सवेंचि घातला महायुद्धीं ।
परि तो कृष्ण कृपानिधी । ताटस्थ त्रिशुद्धी नेदीच स्पर्शों ॥
सकल कर्मी समाधी । हेचि सद्गुरूचि बोधबुद्धी ।
तरी युद्धींहि त्रिशुद्धी । निजसमाधी न मोडे ॥

—अ. २, ओ. ४१६–४२५

भगवद्भजनाचें असें सामर्थ्य आहे कीं, त्या योगानें साधकास अखंड समाधि लागते. त्याच्या संघाताच्याकडून जगाचा संहार होण्यासारखें कर्म झालें तरी हा अलिप्तच राहतो !

या साधनाचा आणखी एक विशेष सांगून ही तपशिलाची चर्चा आटपूं.

भजनेतर बहुतेक साधनें हीं व्यक्तीचा उद्धार करतात. भगवत्कथा ही कथा करणारा व ती श्रवण करणारा या दोघांचा उद्धार करते. कीर्तन करणाऱ्यास समाधि, देवासहि समाधि व श्रवण करणाऱ्या माणसासहि समाधि ! असा कीर्तनाचा परिणाम आहे.

**तुका म्हणे कथा देवाचेंचि ध्यान ।**
**समाधि लागोन उभा तेथें ।**

तुकारामबोवा म्हणतात,कीर्तनश्रवणानें दुष्टांची बुद्धि नाहींशी होते.

**आम्हांसी विश्वास त्याचिया नामाचा ।**
**म्हणऊनी वाचा घोष करूं ।**
**करूं हरिकथा सुखाची समाधी ।**
**आणिकांची बुद्धि दुष्ट नसे ।।**

तुकारामबोवा खालील कडव्यांत वैष्णवांच्या कीर्तनाचा परिणाम सांगतात :

**लुब्धलीं नादीं लागली समाधी । मूढ जन नरनारी लोकां रे ।**
**पंडित ज्ञानी योगी महानुभव । एकचि सिद्ध साधकां रे ।।**

आणि म्हणूनच चंद्रभागेच्या कांठावर आम्ही वैष्णवजनांनीं हा हरिकथेचा खेळ मांडला असें ते म्हणतात.

या म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं, 'हरिकथा' हें जगदुद्धाराचें मोठें बलवत्तर साधन आहे हें जाणून महाराष्ट्रीय वैष्णव संतांनीं या साधनाचा अवलंब केला. नामदेवराय म्हणतात :

**नाचूं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगीं ।।**

हरिकथा ही कीर्तनकारास शुद्ध करणारी, श्रवण करणाऱ्या पतिताचा उद्धार करणारी असल्यामुळें तुकारामबोवा म्हणतात, आम्ही नेहमीं हेंच करीत राहूं:

सदा नामघोष करूं हरिकथा। तेणें सदा चित्ता समाधान ॥ १ ॥

•••

# भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग : १० :

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग।
ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥ १ ॥
देहाच्या निरसनें पाविजे या ठाया।
माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ २ ॥
उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक।
एकाविण एक कामा नये ॥ ३ ॥
तुका म्हणे मज कळते चांचणी।
बडबडीची वाणी अथवा सत्य ॥ ४ ॥

थोडक्यांत फार अर्थ प्रकट करणें हें तुकारामबोवांच्या अभंग-वाणीचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल. 'अल्पाक्षर बव्हर्थ' हें सूत्राचें लक्षण तुकोबांच्या वाणीसहि उत्तम लागू पडतें. या प्रकारच्या भाषेच्या ठेवणीमुळें त्यांच्या कित्येक उक्ती म्हणींप्रमाणें लोकांच्या तोंडांत सहज बसलेल्या आहेत. तसेंच कित्येक शब्दांच्या व्याख्या मोजक्या व ठसठशीत शब्दांत तुकारामबोवांच्या या मनाच्या विशिष्ट प्रकारच्या ठेवणीमुळें त्यांच्या अभंगांत दिलेल्या आढळतात.

वरील विधानाची सत्यता संपूर्ण पटवायला प्रस्तुतचा अभंग उदाहरण म्हणून देतां येईल. या अभंगांत पारमार्थिक जीवनांतील तीन महत्त्वाच्या मूल्यांच्या व्याख्या तुकारामबोवा अगदीं मोजक्या व समर्पक शब्दांत देतात. या व्याख्या करण्याचा प्रसंग बहुधा खालील कारणामुळें आला असावा.

बाजारांत नेहमीं वापरल्या जाणाऱ्या नाण्याचीच नक्कल होते. आज शिवाजीमहाराजांच्या वेळच्या नाण्याची नक्कल करण्यांत व्यवहारी मनुष्य आपला काळ व बुद्धि खर्च करणार नाहीं. वापरलें जाण्याची शक्यता ज्या नाण्याची आहे त्याची नक्कल होत असते. भक्ति, ज्ञान व वैराग्य यांना सदाच किंमत आहे. जगांत नास्तिकपणा वाढला आहे असें आपण म्हणतों; तरीहि भक्ति-ज्ञान-वैराग्य-या मूल्यांची किंमत कमी झालेली नाहीं. अशिक्षितच नव्हे तर सुशिक्षितसुद्धां किती तरी लोक भक्तिमान्, वैराग्यसंपन्न समजल्या जाणाऱ्यांच्या मागें लागतांना दिसतात. तुकारामबोवांचा काळ तीनशें वर्षांपूर्वींचा. त्या वेळीं या मूल्यांना थोडी अधिकच किंमत होती. तुकाराममहाराजांच्या अभंगांवरून असें दिसतें कीं, ढोंगी भक्त, ज्ञानी, विरक्त यांचा त्या काळीं समाजांत सुळसुळाट झाला असावा. ते म्हणतात,

**घरोघरीं अवघें झालें ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥**
**निरें कोणापाशीं होय एक रज । तरी द्या रे मज दुबळासी ॥**

आपल्या अभंगांतून असले ढोंगी भक्त, शब्दज्ञानी, सोंगाडे, त्यागी यांवर तुकारामबोवांनीं सपाटून कोरडे ओढले आहेत.

पण इथें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे व ती म्हणजे तुकारामबोवांनीं नुसतें विध्वंसक टीका करण्याचें कार्य केलें नाहीं; तर त्यांनीं टीकेबरोबरच विधायक, रचनात्मक कार्य केलें. अनेक

मूल्यांच्या यथायोग्य व्याख्या सांगितल्या आणि त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनीं आपलें जीवन तदनुसार जगून त्या खऱ्या आहेत असें पटवलें. याच प्रसंगांत जातां जातां एका परदेशीय थोर पुरुषाच्या वर्तनाशीं तुकारामबोवां यांची तुलना करून दाखविणें अवश्य वाटतें. ग्रीस देशांतील सॉक्रेटिस हाच तो थोर तत्त्ववेत्ता. त्याची व तुकाराममहाराजांच्या जीवनाची पुष्कळ वेळां तुलना केली जाते. त्यांच्यांतील साम्य दाखवितांना असें सांगतात कीं, दोघेहि सत्याचे भोक्ते व संशोधक होते. कोणी केव्हांहि व कुठेंहि भेटला तरी सॉक्रेटिस त्याच्याबरोबर तात्त्विक चर्चा करायला तयार. सॉक्रेटिसाच्या चर्चापद्धतीचा विशेष असा कीं, तो इतरांना वेगवेगळ्या कल्पनांच्या ( विशेषतः धैर्य, पावित्र्य इत्यादि नैतिक कल्पनांच्या ) व्याख्या विचारी व त्यांनीं केलेल्या व्याख्यांतील अपुरेपणा त्यांना प्रश्न विचारून तो मोठ्या चतुराईनें त्यांच्या निदर्शनास आणून देई. पण अशा प्रसंगांत जर एखाद्यानें त्याला आपल्या व्याख्येच्या चुकीची कबुली दिली व आपण बरोबर सांगा असें सांगितलें तर तो म्हणे, 'मला काय ज्ञान आहे ? मी अपत्यरहित सुइणीसारखा आहें. मला ज्ञान नाहीं; पण दुसऱ्यांना ज्ञान यावें येवढ्यासाठीं मी त्यांना मदत करूं शकतों.' या त्याच्या पद्धतीमुळें कित्येक त्याला ढोंगी समजूं लागले. त्यांना वाटे, याला समजूनच हा मुद्दाम अज्ञान पत्करतो. खरें मात्र तसें नव्हतें. सॉक्रेटिसानें खरोखरच तशा व्याख्या बनविल्या नव्हत्या. तशा बनविणें हें त्याला कदाचित् जमलें नसेल अगर त्याला ज्ञानाची गहनता बाणल्यामुळें त्यानें तें केलें नसेल. तुकारामबोवांची पद्धति अशी नव्हती. पावित्र्य, सोंवळेंओंवळें, वैराग्य इत्यादि-विषयक इतरांच्या कल्पना कशा कोत्या होत्या एवढेंच दाखवून ते

थांबले नाहींत तर स्वतःस योग्य वाटणाऱ्या व्याख्या त्यांनीं आपल्या अभंगांतून दिल्या.

प्रस्तुच्या अभंगांतील —

**तुका म्हणे मज कळते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥**

या शेवटच्या कडव्यावरून असें दिसतें कीं, त्यांना पुष्कळसे लोक खरें ज्ञान, खरी भक्ति, खरें वैराग्य कळून न आल्यानें बोलके ज्ञानी, दिखाऊ भक्त व ढोंगी विरक्त यांच्याच मागें लागलेले दिसले आणि म्हणून लोकांना खरी भक्ति, खरें वैराग्य, खरें ज्ञान म्हणजे काय हें कळावें यासाठीं त्यांच्या व्याख्या ते प्रथम चरणांतच करून मोकळे होतात :

**भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग ।**
**ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥ १ ॥**

भक्ति कशाला म्हणतात याचें उत्तर ते ‘नमनास’ भक्ति म्हणतात असें देतात. वैराग्य म्हणजे त्याग व ज्ञान म्हणजे शरीर ब्रह्मरूप होऊन ब्रह्माशीं समरस होऊन ब्रह्माचा भोग घेणें असें ते म्हणतात.

या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यांत हे तीनहि संपादन करण्याचा मार्ग एकच आहे असें ते म्हणतात.

**देहाच्या निरसनें पाविजे या ठायां ।**
**माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ २ ॥**

एकाच शब्दांत तीनहि गोष्टींचें उत्तर कसें देतां येतें याविषयीं एक दृष्टान्त दिला असतां कल्पना येईल. दृष्टान्त हा अर्थातच एकांगी असतो हें विसरतां कामा नये.

एका गांवीं एक पाटीलबुवा होते. चांगले वजनदार गृहस्थ असल्यानें अडीअडचणीला सल्ला विचारायला गांवांतील माणसें

त्यांच्याकडे येत. एकदां दिवेलावणीच्या वेळीं असें झालें कीं, दोन लोक त्यांच्याकडे आपली अडचण सांगायला आले. एक म्हणाला, " पाटीलबोवा, काय करावें, कुटुंब आटोपलें, घरांत सर्व अडचण. " दुसरा म्हणाला, " पाटीलबोवा, विहीर आटली; मळा जळून चालला ! काय करावें ? " इतक्यांत त्यांची मुलगी म्हणाली, दादा, दोनदां लावला तरी दिवा विझतो, काय करूं ? " पाटीलबोवांनीं सर्वांना एकच उत्तर दिलें. ते म्हणाले, ' पाट लावा. ' तेथें ' पाट लाव ' याचे वेगवेगळे अर्थ आहेत हें सुज्ञ वाचकांना सांगायला नको. मूळ द्राष्टान्तीं मात्र तसें नाहीं. तुकारामबोवा भक्ति, ज्ञान, वैराग्य यांच्या प्राप्तीचा एकच उपाय सांगतात. कारण, अंतिम स्वरूपांत या तिघांत फारसा भेद नाहीं. तुकाराममहाराज दुसऱ्या कडव्यांत म्हणतात कीं, भक्ति ज्ञान, वैराग्य या ठिकाणांना प्राप्त होण्याचा मार्ग देहाचा निरास करणें हा आहे. निरास करायचा म्हणजे काय करायचें या शंकेचें उत्तर ते या चरणाच्या उत्तरार्धांत देतात, " माझी ऐसी काया जंव नव्हे. " हें शरीर माझें नाहीं असें जोंपर्यंत पटलें नाहीं तोंपर्यंत शरीराचा निरास झाला नाहीं व तोंपर्यंत ज्ञानादि प्राप्त होणार नाहींत. देह म्हणजे शरीर, याचा निरास करायचा म्हणजे नाश करायचा नाहीं. कारण त्याचा नाश झाल्यावर भक्ति कोण करणार ? व कशी होणार ? त्याचा निरास करणें म्हणजे तो ' मिथ्या, ' ' खोटा ' आहे असें अपरोक्षरीत्या जाणणें. खोटें खोटेपणानें जाणलें कीं त्याचा निराळा नाश करावा लागत नाहीं.

तिसऱ्या कडव्यांत तुकारामबोवा पारमार्थिक जीवनांत भक्ति, ज्ञान, वैराग्य या तिहींची कशी सारखीच आवश्यकता आहे हें दृष्टान्तानें सांगतात.

**उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक ।**

**एकाविण एक कामा नये ॥ ३ ॥**

नुसतें धान्य असलें तरी पक्वान्न तयार होणार नाहीं. तें खाल्लें तर पोट भरेल. कच्चें अन्न खाऊन जगणारे लोक आहेत; पण पक्वान्नाची गोडी त्याला येणार नाहीं. पक्वान्नांकरितां नुसतें पाणी, नुसता अग्नि अथवा नुसतें धान्य पुरें पडणार नाहीं. या तिहींचा योग व्हावा लागतो. तसेंच पारमार्थिक जीवनांतील उत्कृष्ट रसाचा आस्वाद घेण्यास भक्ति, ज्ञान, वैराग्य या तिहींची आवश्यकता आहे. तुकारामबोवा हें सांगत असतां भागवतांतील,

**भक्तिः परेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष त्रिक एककालः ।**
**प्रपद्यमानस्य यथाऽश्नतःस्युस्तुष्टिः पुष्टिः क्षुदपायोनुघासम् ॥**

—भा. अ. २.४२

हा श्लोक त्यांच्या डोळ्यांसमोर असावा. महाराष्ट्रावर या भागवत-धर्मीयांनीं वैराग्यज्ञानयुक्त भक्तीचा प्रसार करून महान् उपकार करून ठेवले आहेत. त्याचा परिणाम असा कीं, महाराष्ट्रामध्यें बंगालमधील 'सहजीया' सारखे पंथ निर्माण झाले नाहींत. महाराष्ट्रांतील भागवतधर्माची शाखा फार सोंवळी राहिली, हा या संतांच्या शिकवणुकीचा परिणाम आहे. महाराष्ट्रांतील संतांच्या शिकवणुकीचा विशेष जो समन्वय तो याठिकाणींहि दिसून येतो. नुसती भावना-प्रधान भक्ति या संतांनीं शिकविली नाहीं. पायाविना तांतडीची भिंत तशी वैराग्यज्ञानाविना भक्तीची स्थिति होईल हें ते जाणून होते.

**न सरे ते भक्ति विठोबाचे पायीं ।**
**उपरति नाहीं जेथें चित्ता ॥ ३ ॥**

वैराग्याविना ज्ञान लंगडें व ज्ञानाविना वैराग्य आंधळें आहे. नाथमहाराज एके ठिकाणीं म्हणतात,

**विवेकवीण वैराग्य आंधळें । वैराग्यावीण विवेक पांगळे ।**

जेविं धृतराष्ट्रा ज्येष्ठत्व आलें । नेत्रेंविण गेलें स्वराज्य ॥

पाक तयार होण्यासाठीं भक्ति, वैराग्य व परेशानुभाव या तिन्हींचा संयोग असला पाहिजे.

तुकाराममहाराजांना जणूं श्रोत्यानें विचारलें असावें कीं, तुम्ही भक्ति, ज्ञान, वैराग्य यांच्या व्याख्या करतां व पाक होण्यास या तिघांची आवश्यकता आहे म्हणतां, तर हें सांगण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ?

याला उत्तर म्हणून ते शेवटच्या कडव्यांत म्हणतात :

तुका म्हणे मज कळते चांचणी ।
बडबडीची वाणी अथवा सत्य ॥ ४ ॥

ते म्हणतात, आम्ही या शास्त्रांतले पारखी आहोंत.

तुका म्हणे आम्ही तेथील पारखी ।....
तुका पंखि बहिर न मानूं । वोहि जनावर बाग ।
असन्तनकू सन्त न मानूं । दे वर्मकू दाग ।

■ ■ ■

विकेल तेथें विका । माती नांव ठेवुनि बुका ।
हा तो निवाड्याचा ठाव । खऱ्या खोट्या निवडी भाव ।
गऱ्हवारे हा विधी । पोट वाढवलें चिंधी ॥
लावूं जाणे विल्हे । तुका साच आणि कल्हे ॥

■ ■ ■

पुष्कळशा लोकांना या शास्त्रांतलें कांहीं समजत नाहीं. लोकांत किती अज्ञान असतें हें खालील गोष्टीवरून दिसून येईल.

एका गांवीं एक मेळा भरला होता. त्यांतील अनेक कार्यक्रमांपैकीं एक नकलांचा होता. नकला करणाराचा कार्यक्रम जेव्हां सुरू झाला तेव्हां त्यानें कोंकराच्या ओरडण्याची नक्कल केली.

लोकांनीं त्या नकलेची फार तारीफ केली. तेव्हां तेथें जमलेल्या प्रेक्षकांपैकीं एक शेतकरी उठला व म्हणाला, ‘ सज्जनहो तुम्ही या नकलेची तारीफ केलीत हें ठीक आहे; पण तुम्ही उद्यां येथें पुन्हा या ठिकाणीं या. मी हीच नक्कल यापेक्षां उत्तम करून दाखवीन.’ सर्व जमलेले लोक म्हणूं लागले, ‘अशक्य!’ तो म्हणाला, “ तुम्ही या तर खरें; मग पाहूं. ” याचा परिणाम असा झाला कीं, दुसरे दिवशीं आदल्या दिवशींपेक्षां अधिक लोक जमा झाले. दुसऱ्या दिवशीं आखाड्यावर जातांना त्या शेतकऱ्यानें एक क्लृप्ति लढविली. त्यानें अंगावर एक मोठें घोंगडें घेतलें व त्याच्याखालीं खरो-खरीचें एक कोंकरूं घेतलें. लोक जमा झाल्यावर नक्कल करण्याकरितां तो घोंगडीखालील कोंकरासह लोकांच्या पुढें झाला व वांकून तोंड उघडून आपणच जणूं कांहीं आवाज काढतों असें त्यानें दाखविलें. पण हें करीत असतांना त्यानें घोंगडीखालीं असलेल्या कोंकराचा कान करकचून पिरगळला व त्या कोंकरास ओरडावयास लावलें. कोंकरूं ओरडलें, पण प्रेक्षकवर्ग म्हणूं लागला, ‘ छे ! काल़च्यासारखी आजची नक्कल नाहीं. कालचीच उत्तम झाली ! ’ यावर त्या शेतकऱ्यानें घोंगडीखालीं आणलेलें कोंकरूं दाखविलें व तो म्हणूं लागला, ‘ तुम्ही खूप गाजरपारखी दिसतां ! खरें कोंकरूं ओरडलें तर ती चांगली नक्कल नाहीं म्हणतां, याला काय म्हणावें ? ’ या गोष्टीचें तात्पर्य असें आहे कीं, बहुजनसमाजांत खऱ्याखोटयाची पारख करण्याचें सामर्थ्य नसतें. बहुतेक लोक वरच्या रंगावर भुलतात. म्हणून तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात :

**शुद्ध कसोनिया पहावें । वरी रंगा न भुलावें ।....**

जसा आचारी हा शिजण्याकरितां चुलीवर ठेवलेल्या तपेल्यां-तील एकदोन शितें बाहेर काढतो व तीं चांचपून सांगतो कीं,

भात तयार झाला कीं नाहीं. तसेंच तुकारामबोवा म्हणतात, मला भक्ति–ज्ञानाच्या गप्पा मारणाऱ्याच्या तोंडून एकदोन शब्द ऐकले म्हणजे कळतें कीं, ह्याची ही पोकळ बडबड आहे का खरा अनुभव आहे. तुकाराममहाराज हे ' भक्तिज्ञानवैराग्याची ' चालती-बोलती मूर्तीच असल्याने त्यांना खरी भक्ति, खरें वैराग्य, खरें ज्ञान हें सहजच कळून येत होतें.

भावार्थ संपला.

आतां या अभंगांतील प्रथम कडव्याचा थोडासा विचार करूं. थोडासा म्हणण्याचें कारण असें कीं, या कडव्यांत जीं तीन पदें आहेत त्यांपैकीं प्रत्येक पद असें आहे कीं, त्यावर ग्रंथ लिहितां येईल. आपण ओळीनें एकेका व्याख्येचा विचार करूं.

तुकारामबोवा प्रथम भक्तीची व्याख्या करतात. ते म्हणतात, ' भक्ति ' म्हणजे ' नमन. ' ही व्याख्या इतकी थोडक्यांत दिली आहे व भक्तीची जी लोकांत सामान्य कल्पना प्रसृत आहे त्याहून इतकी वेगळी आहे कीं, सामान्य वाचकांस हें वाचून थोडेंसें गूढ वाटेल. भक्ति म्हणून लोक जें करतात त्याचा विचार केला तर असें आढळून येईल कीं, त्यांत अनंत प्रकार दिसतात. देवविषयक वेगवेगळ्या कल्पना बनवून त्यांवर त्यांनीं देवांचे अनंत प्रकार उभारलेले आढळून येतात. अर्थात् तद्विषयक केल्या जाणाऱ्या ज्या क्रिया त्यांचेहि अनंत प्रकार आढळून येतात. आपल्या हिंदूंच्या भक्तींत तर तेहेतीस कोटि देवांचे प्रकार जणूं कांहीं पुरे पडत नाहींत म्हणून त्यांत पिराच्या उपासनेचीसुद्धां भर घातली जाते. या बहुतेक ' भक्त्या ' देवांचा संकोच करून उभारलेल्या असतात. आपणांला पुष्कळ वेळां मोठीं मजेशीर दृश्यें दिसतात. एखादा माणूस देवळांत शिरला कीं तो हातांतील विडी टाकून देतो व हात जोडून

त्याला काय गुणगुणायचें असेल तें प्रार्थनेच्या निमित्तानें गुणगुणतो; मग प्रार्थना संपली व देवाकडे पाठ फिरली कीं तो लगेच विडी पेटवतोच. देव म्हणजे देवघरांत असणारा तेवढाच, अशीच त्यांची कल्पना हाच नाहीं का त्यांच्या वागणुकीचा अर्थ! कट्टर वैष्णव व कट्टर शैव यांमधील तंटेसुद्धां देवाच्या स्वरूपाच्या संकोचावरच उभारलेले आहेत.

पुष्कळ वेळां भक्ति म्हटली म्हणजे आपल्या डोळ्यांसमोर प्रल्हादाची खालील उक्ति उभी राहते :

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

देवळांत पुराणश्रवण करण्यास जाणें, देवाचें भजन-पूजन करणें, देवाला नमस्कार करणें वगैरे गोष्टींना आपण भक्ति असें समजतों. या सर्व क्रिया आहेत व त्यांचा उपयोगहि आहे; पण त्या ज्या ज्ञानानें व प्रेमानें आपण करूं त्यावर त्यांचें मूल्य अवलंबून आहे. उदाहरणार्थ, मनुष्य कीर्तन अथवा पुराण-श्रवणाला बसलेला दिसला, कीं साहजिकच तो श्रवणभक्ति करीत आहे असें वाटतें; पण तसें असतेंच असें नाहीं. कारण, कित्येक वेळां त्याला देवविषयक गोष्टी आवडतात म्हणून तो तिथें बसतो असें नसून तो ज्या घरांत राहतो त्याच्या मालकाला कीर्तनश्रवणाची आवड असल्यानें त्याला खूष करण्यासाठीं त्यानें 'चला कीर्तनाला' असें म्हटल्यामुळें स्वतःला न आवडूनहि तो तिथें जाऊन श्रवण करतो. अशा प्रकारचें श्रवण हें भक्तींत जमा होईल असें कुणींच म्हणणार नाहीं. आणखी एक उदाहरण द्यायचें, तर पूजा करीत असलेल्या माणसाचें. पूजा करीत असलेल्या कोणा एखाद्या माणसाला सहजगत्या कुणीं, 'काय पूजा आटोपली का?' असें विचारलें व त्याचेकडून

'घातलें एकदां देवाच्या डोंबल्यावर पाणी व झालों मोकळा!' असें उत्तर आलें, तर ती भक्ति होणार नाहीं, हें काय सांगायला पाहिजे?

जिला श्रेष्ठ भक्ति म्हणतात तिचें अंतरंग 'प्रेम' आहे. नारदमुनींनीं भक्तीची व्याख्या करतांना 'सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा' असें म्हटलें आहे. हें प्रेम भगवंताच्या यथार्थ व्यापक स्वरूपाच्या ज्ञानावर अधिष्ठिलेलें असतें.

ईश्वराचें खरें स्वरूप धार्मिक ग्रंथांतून खालीलप्रमाणें वर्णिलें आहे:

सभूमिं विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठत् दशांगुलम् ।
ईशावास्यमिदं सर्वम् ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ।
बहिरन्तश्चभूतानामचरंचरमेव च ।

अशीं किती तरी प्रमाणें देतां येतील. विष्णुसहस्रनामांतील विष्णूचें पहिलें नांव 'विश्व' असें आहे हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

तुकारामबोवांना भगवंताच्या या यथार्थ स्वरूपाची कल्पना, नव्हे अनुभूति होती. त्यांचे एतद्विषयक खालील उद्गार याविषयीं साक्ष देत आहेत:

हरि व्यापक सर्वगत। हें तंव मुख्यत्वें वेदान्त।
चिंतनासी चित्त। असों द्यावें सावध॥
विश्वीं विश्वंभर। बोले वेदांतींचा सार॥ १॥
जगीं जगदीश। शास्त्रें वदती सावकाश॥ २॥
व्यापिलें हें नारायणें। ऐसीं बोलतीं पुराणें॥ ३॥
जनीं जनार्दन। संत बोलती वचन॥ ४॥
भूतीं भगवद्भाव। मात्रासहित जीव।
अद्वैतीं तो ठाव। निरंजनीं एकला॥

■ ■ ■

भूतीं देव म्हणोनि भेटतो या जना । नाहीं हे भावना नरनारी ॥

■ ■ ■

देव जाले अवघे जन । दोष गुण हारपले ॥
सुपात्रीं सर्वभाव । मी तो सर्व वासुदेव ।

जाणती कृपाळु-संतमहानुभव । जया भिन्न भेद नाहीं ठाव गा ॥

तुकारामबोवांना हें ईश्वरविषयक यथार्थ ज्ञान असल्यानें भक्तीची व्याख्या देतांना ते स्वाभाविकच या ज्ञानावर उभारलेली व गीता, भागवत या ग्रंथांना मान्य असलेली भक्तीची व्याख्या देतात.

भगवद्गीतेंतील खालील श्लोकांमध्यें दैवी प्रकृतीचा आश्रय केल्यानें ज्या महात्म्यांच्यांत यथार्थ ज्ञानाचा प्रकाश पडला ते भगवंताचें यथार्थ ज्ञान प्राप्त झाल्यानें त्याच्याशीं अनन्य होऊन कसें भजन करतात, त्याचे प्रकार भगवान् सांगतात :

**सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।**
**नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥** अ. ९, श्लोक १४

या श्लोकांतील ' नमस्यन्तः ' या पदावरील श्रीज्ञानदेवांच्या खालील ओव्या फारच बहारीच्या आहेत. ओव्या महत्त्वाच्या व उत्कृष्ट असल्यानें सर्व देत आहोंत :

" तरी दोन्ही पालववेरी । जैसा एक तंतू अंबरीं । तैसा मी वांचूनि चराचरीं । जाणती ना ॥ आदि ब्रह्मा करुनी । शेवटीं मशक धरूनी । माजीं समस्त हें जाणोनि । स्वरूप माझें ॥ मग वाडधाकुटें न म्हणती । सजीव निर्जीव नेणती । देखिलिये वस्तु उजू लुंटिती । मीच म्हणोनि ॥ आपलें उत्तमत्व नाठवे । पुढील योग्यायोग्य नेणवे । एकसरें व्यक्ति-मात्राचेनि नांवें । नमूंचि आवडे ॥ जैसें उंचीं उदक पडलें । तें तळवटवरी ये उगलें । तैसें नमिजे भूतजात देखिलें ।

ऐसा स्वभावोचि तयांचा ।। कां फळलिया तरूची शाखा । सहजें भूमीसी उतरे देखा । तैसें जीवमात्रां अशेखां । खालावती ते ।। अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची विनय हेचि संपत्ती । जें जयजयमंत्रें अर्पिती । माझ्या ठायीं ।। नमितां मानापमान गळाले । म्हणोनि अवचितां मीचि जहाले । ऐसे निरंतर मिसळले । उपासिती ।। अर्जुना हे गुरवी भक्ती । सांगितली तुजप्रती ।।....... ओव्या २२०–२२८

हें व्याख्यान डोळ्यांसमोर ठेवूनच तुकारामबोवांनीं भक्तीची 'भक्ति तें नमन' अशी थोडक्यांत व्याख्या केली असावी.

ज्ञानेश्वरी अध्याय १० मध्यें भक्तीच्या याच स्वरूपाचें वर्णन आहे :

ऐसिया व्यापका मातें । मानुनी जे भजती भलतेथें । परि साचोकारें उदितें । प्रेमभावें ।। देशकाळ वर्तमान । आघवें मजसी करूनि अभिन्न । जैसा वायु होऊनि गगन ।। गगनींचि विचरे ।। ऐसेनि जे निजज्ञानी । खेळत सुखें त्रिभुवनीं । जगद्रूपा मनीं । सांठऊनि मातें ।। जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ।।

ओव्या ११५-११८

श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधांतील अध्याय २ मधील खालील श्लोकांत हीच भक्ति सांगितली आहे :

खं वायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्त्वानि दिशो द्रुमादीन् ।
सरित्ससमुद्रांश्च हरेः शरीरं यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः ।।अ. २.४१

'सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः'

असेंच भागवतोत्तमाचें वर्णन आहे.

तुकारामबोवाहि म्हणतात :

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।। १ ।।

**एका जी तुम्ही भक्तभागवत । कराल तें हित सत्य करा ॥ २ ॥**

... निळोबा म्हणतात :

**नमस्कारी भूतें विसरोनि यती । तेणें आत्मास्थिति जाणितली ॥**

तात्पर्य, यथार्थ ज्ञानावर अधिष्ठित अशी ही ' नमन ' रूपी उच्च भक्ति सर्वमान्य असल्यानें तुकारामबोवा थोडक्यांत भक्तीचें स्वरूप ' नमन ' म्हणून सांगतात :

**भक्ति तें नमन —**

जातां जातां येथें एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे. ' नमन ' म्हणजे लोटांगण घालणें नव्हे. नामदेव ' नमना ' ची व्याख्या पुढील कडव्यांत सुंदर करतात :

**नमन ते नम्रता न देखे गुणदोष ।**
**अंतरीं प्रकाश आनंदाचा ॥**

आतां आपण प्रथम कडव्यांतील दुसऱ्या पदाचा म्हणजे ' वैराग्याचा ' विचार करूं. तुकारामबोवा याची व्याख्या ' त्याग ' अशी देतात. त्याचा विचार सांगण्यापूर्वी एक गोष्ट सांगणें अवश्य आहे कीं, तुकारामबोवांनीं वैराग्याला ' भक्ति ' आणि ' ज्ञान ' यांच्यामध्यें जें स्थान दिलें आहे तें अगदीं योग्य आहे. वैराग्याविना भक्ति व ज्ञान दोन्ही व्यर्थच आहेत. तुकारामबोवा म्हणतात :

**न सरे ते भक्ति विठोबाचे पायीं । उपरति नाहीं जेथें चित्ता ॥**

◆ ◆ ◆

**कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ । केली पद्मनाभ सेवा ऋणी ॥**

त्याचप्रमाणें ज्ञानहि वैराग्याविना पांगळें आहे. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, वैराग्ययुक्त ज्ञानाभ्यास करणारा भाग्यवान्.

**सवैराग्य । ज्ञानाभ्यास तो सभाग्य । ....**

वैराग्याचें किती महत्त्व वर्णन करावें ? परमार्थातील कोणताहि मार्ग साधक आक्रमण करो. ज्या सोवळ्यावर विसंबून वसण्यास

हरकत नाहीं व ज्याच्याविना मार्ग कंठला जाणार नाहीं असा साधकाचा या मार्गांतील खरा सोबती कोणी असेल तर वैराग्य. ज्ञानोबाराय म्हणतात :

वीतरागतेसारिखा । जोडूनि ठेविला सखा ।
जो आघवियाचि भूमिका । सवें चाले ॥

ज्ञानेश्वरमहाराज एके ठिकाणीं म्हणतात, वैराग्य म्हणजे आत्मलाभाचें भाग्य आहे :

' तें हें विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य ।
जेणें ब्रह्मानंदा योग्य । होती जीव ॥ '

या वैराग्याच्या वेगवेगळ्या लोकांनीं वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत.

' इहामुत्रफलभोगविरागः '
' दृष्टानुश्रविकविषयावितृष्णस्य वशीकारसंज्ञा वैराग्यम् '
या संस्कृतांतील व

ऐहिकिचे कां स्वर्गींचे । भोग पाइक जालिया इच्छेचे ।
परि भोगावें हें न रुचे । मनामाजि ॥
देत सर्व स्नेहा मिठी । अंगीं ऐसे वैराग्य उठीं ।
स्वर्गसंसारा काटी । काढितचीं ॥

इत्यादि मराठींतील व्याख्या प्रसिद्ध आहेत. तसेंच वैराग्याचे जिहासा व जिज्ञासा, अथवा राजस, तामस, सात्त्विक इत्यादि प्रकारहि प्रसिद्ध आहेत. त्यामुळें ते सर्व सांगून जागा अडवीत नाहीं.

वैराग्य याचा मुख्य अर्थ अनासक्ति, वीट, त्याग. पण त्यागाचें मर्म समजलें नाहीं तर साधक ज्याचा खरा त्याग करावयास पाहिजे त्याचा न करतां दुसऱ्याच गोष्टीचा करतो व त्याला वैराग्याचें खरें फळ मिळत नाहीं. कोणी घरदार सोडून भीक मागण्यांत अगर

अरण्यांत जाण्यांतच वैराग्य समजतात. अशा अडाणी त्याग्यास ज्ञानोबाराय खालील अभंगांत सुंदर उपदेश करतात :

**घरदार वोखटें त्यजूं म्हणसी तरी शरीरा येवढें जाड ।**
**मायबाप वोखटीं त्यजूं म्हणसी तरी अहंकार अविद्येचें कोड ।**
**बंधु सखे त्यजूं म्हणसी तरी कामक्रोधमदमत्सर अवघड ।**
**बहिणी पाठीच्या त्यजूं म्हणसी आशातृष्णामायांचें बंड रया ॥१॥**
**त्यजिलें तें काय कासया म्हणिजे सांग पा मजपाशीं ऐसें ।**
**जया भेणें तूं जासी वनांतरा तें तंव तुजाचि सरिसें रया ॥ २ ॥**

त्याग हा आंतून असावा; पण कशाचा? तर तुकारामबोवा मुळाशीं जाऊन सांगतात :

**त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावें ॥**

ज्ञानेश्वरमहाराजांनीं गी. अ. १६–२ श्लोकामधील ' त्याग ' या पदाचें व्याख्यान करतांना हेंच सांगितलें आहे. ते म्हणतात :

**आतां मृत्तिकात्यागें घटु । तंतुत्यागें पटु । त्यजिजे जेविं वटु । बीज त्यागें ॥ कां त्यजूनि भितिमात्र । त्यजिजे आघवेंचि चित्र । कां निद्रात्यागें विचित्र । स्वप्नजाळ ॥ नाना जळत्यागें तरंग । वर्षात्यागें मेघ । त्यजिजे जैसे भोग । धनत्यागें ॥ तेविं बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडून पाहीं । सांडिजे अशेषही । संसारजात ॥** ओ. १३१-३४.

' देहाहंकाराचा त्याग ' हा खरा त्याग. तो झाला कीं सर्व संसाराचा त्याग झाला. कारण जसें तळचें गाडगें फुटलें कीं वरची उतरंड आपोआप फुटते; तसें ' देह ' हें प्रपंचांतलें तळचें गाडगें आहे. ज्ञानोबारायांनीं म्हटलें आहे,

**' देहादि संसारें । मांडलेंसें जें गुंफिरें ॥ .......'**

देहाकरितांच सर्व. त्यावरचीच प्रीति नाहींशीं झाली, कीं

बाकीच्यावरचें प्रेम आपोआपच नाहींसें होतें. म्हणूनच सर्व परमार्थी, मुख्य त्याग देहाहंकाराचा, असेंच प्रतिपादन करतात.

नाथमहाराज एके ठिकाणीं म्हणतात :

**सर्व त्यागाचें त्यागितेपण । उद्धवा तुज मी सांगेन पूर्ण ।**
**तरी सर्वस्वें सांडावा । अभिमान ॥**

तुकारामबोवा हे वैराग्याचें वर्म जाणूनच या अभंगांत थोडक्यांत वैराग्याची ' त्याग ' अशी व्याख्या करतात.

आतां राहिलेल्या तिसऱ्या ' ज्ञान ' पदाचा विचार करूं.

तुकोबा म्हणतात :

**' ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥ ३ ॥ '**

तुकारामबोवा म्हणतात, ' ज्ञान ' म्हणजे शाब्दिक ज्ञान नव्हे. तोंडानें मी ब्रह्म आहें असें म्हटल्यानें मनुष्य ज्ञानी होत नाहीं. ते म्हणतात :

**नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां हें सिद्ध ।**
**जंव हा आत्मबोध नाहीं चित्तीं ॥ १ ॥**
**काय करिसी वांया लटिकांचें पाल्हाळ ।**
**श्रम तो केवळ जाणिवेचा ॥ २ ॥**
**मीच देव ऐसें सांगसी या लोकां ।**
**विषयांच्या सुखा ठाकोनियां ॥ ३ ॥**
**अमृताची गोडी पुढिलां सांगसी ।**
**आपण उपवासी मरोनियां ॥ ४ ॥**
**तुका म्हणे जरी राहिल तळमळ ।**
**ब्रह्म तें केवळ सदोदित ॥ ५ ॥**

■ ■ ■

**शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा ॥१॥**

पंडित हे ज्ञानी करतील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥२॥
तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही ।
देतील हे नाहीं ठावी वस्तु ॥ ३ ॥

■ ■ ■

तुका म्हणे येथें पाहिजे अनुभव । शब्दाचें गौरव कामा नये ॥
असे कितीतरी अभंग देतां येतील. पण खालील दोन अभंगांत तुकारामबोवांनीं उत्कृष्ट उदाहरणें देऊन शब्दज्ञान्यांची फार फजिती केली आहे. तेवढे अभंग देऊन हा भाग आटपूं.

चिरगुटें घालुनी वाढविलें पोट । गऱ्हवार बोभाट जनांमध्यें ॥१॥
लटिकेचि डोहळे दाखवी प्रकार । दूध स्तनीं पोर पोटीं नाहीं॥२॥
तुका म्हणे अंतीं वांझहि ते खरी । फजिती दुसरी जनांमध्यें॥३॥

◆ ◆ ◆

वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण । चिरगुटें घालून वाथयाला॥१॥
तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूनिया॥२॥
बोलाचीच कढी बोलाचाचि भात। जेवूनियां तृप्त कोण झाला॥३॥
कागदीं लिहितां नामाची साखर। चाटितां मधुर गोडी नेदी॥४॥
तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं आठवण॥५॥

भागवतामध्यें म्हटलें आहें कीं, जर ब्रह्मानुभव नसेल तर नुसती शब्दनिष्णातता हा केवळ श्रम होय.

शब्दब्रह्मणि निष्णातो न निष्णायात् परे यदि ॥
श्रमस्तस्य श्रमफलो ह्यधेनुमिव रक्षतः

अशा वक्त्याच्या मुखांतून येणारे शब्द श्रवण करून सात्त्विक श्रोत्याचें कार्य होईल, पण बोलणारा तसाच कोरडा राहील. नाथांनीं हीच गोष्ट दृष्टान्त देऊन पुढील ओवींत सुंदर सांगितली आहे :

जेवीं गुळउसाचा घाणा । तोंडींचा रस भरे मांदणा ।

**शब्दसोपटें भरोनि वदना । करी परिभ्रमणा करकरितु ॥**

ज्ञान म्हणजे आपल्या समोरील दृश्य सर्व जगत् ब्रह्मरूप पाहणें एवढेंच नव्हे तर आपल्यासकट – असार म्हणून टाकलेल्या देहासकट – सर्व ब्रह्म आहे असा अनुभव घेणें याला ज्ञान म्हणतात.

ज्ञानेश्वरमहाराजांनींसुद्धां ज्ञान्याचें वर्णन करतांना असेंच लिहिलें आहे :

**मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंदु । मीचि एकु स्वतः सिद्धु ।**
**जो आपणेनसी भेदु । नेणोनियां जाणे ॥**

म्हणून तुकारामबोवा ज्ञानाची व्याख्या ' ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ' अशी करतात.

आतांपर्यंत आपण

**भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥ १ ॥**

या प्रथम कडव्याचा विचार केला. आतां अगदीं थोडक्यांत दुसऱ्या कडव्याचा विचार करूं व हें संकीर्तन समाप्त करूं.

देहाचा निरास करणें म्हणजे तो मिथ्या असें जाणणें हें वर सांगितलेंच आहे. तुकारामबोवांनीं खालीलप्रमाणें उद्गार कितीतरी ठिकाणीं काढले आहेत :

**देह आधीं काय खरा । देह संबंध पसारा ।**
**बुजगावणें चोरा । रक्षणमें भासतें ॥**

एकदां शरीर हें जाणारें, नाशिवंत असें पटलें, कीं देहाहंकाराचा निराळा नाश करावयास नको. देह हा सत्य आहे या समजुतीमुळें आपण देहाला चिकटलेले असतों, त्याचें तादात्म्य घेतों. एकदां देह खोटा असें कळलें, कीं तादात्म्य संपलेंच.

असा देहाचा निरास होऊन अहंकाराचा त्याग होणें हेंच वैराग्य हें वरतीं सांगितलेंच आहे.

देहतादात्म्यामुळें आत्मदर्शन होत नाहीं. आत्म्यावरील देह-तादात्म्याचें आवरण दूर झालें, कीं सूर्यावरील डाग गेल्यानें सूर्य जसा प्रकाशित होतो तसें आत्मज्ञान प्रकाशमान होतें.

ज्ञानोबाराय म्हणतात :

**तैसा देहाहंकारु नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला ।**
**तोचि परमात्मा संचला । आधींचि आहे ॥** अ. ६–८४
**हा विचारूनि अहंकार सांडिजे । मग असतीच वस्तु होइजे ।**
**तरी आपली स्वस्ति सहजें । आपण केली ॥** अ. ६–७१

या तत्त्वाला तुकारामबोवा जाणत असल्यानें ते असेंच म्हणतात :

**देव नव्हे मी हे सर उरला उरें विठ्ठल ॥**

देहातादात्म्य नाहींसें होऊन मी परमात्मा आहें असें ज्ञान ज्याला होतें त्यालाच सर्वत्र परमात्मा दिसूं लागतो.

**होईल जाला अंग देव जो आपण । तयासी हे जन अवघे देव ॥**

मगच त्याच्याकडून ‘ नमन ’ भक्ति संभवते.

तात्पर्य, ‘ भक्तिज्ञानवैराग्य ’ हीं हातास येण्याकारितां प्रथम देहाचा निरास होणें अवश्य. म्हणून तुकारामबोवांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे :

**कोणाहि नलगे साधनाचा पांग । करणें केला त्याग देहबुद्धि ॥**

म्हणून तुकारामबोवा तेथें सांगतात :

**देहाच्या निरसनें पाविजे या ठाया ।**
**माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ २ ॥**

तिसऱ्या कडव्यांत या तिघांची आवश्यकता सांगून शेवटच्या कडव्यांत तुकारामबोवा आपण येथले परीक्षक आहोंत असें मोठ्या आत्मविश्वासानें सांगतात. अशा आशयाचे त्यांचे पुष्कळसे उद्गार आहेत. कांहीं भावार्थांत दिले आहेत. आणखी एकदोन देऊन हें संकीर्तन पुरें करूं.

म्हणविती ऐसे आइकतों संत ।
न देखिजे होत डोळां कोणी ॥ १ ॥
ऐसियांचा कोण मानितें विश्वास ।
निवडे तो रस घाईंडाईं ॥ २ ॥
पर्जन्याचे काळीं वोहळाचे नद ।
ओसरतां बुंद न थारेचि ॥ ३ ॥
हिऱ्याऐशा गारा दिसती दुरोन ।
तुका म्हणे घण न भेटे तों ॥ ४ ॥
तोंवरि तोंवरि माळामुद्रांचीं भूषणें ।
जंव तुक्याचें दर्शन झालें नाहीं ॥
तोंवरि तोंवरि सांगती संतांचिया गोष्टी ।
जंव नाहीं भेटी तुक्यासवें ॥

•••

## हेंचि दान दे गा देवा :: ११ ::

हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी । हेंचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
नलगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

कीर्तन श्रवण करणाऱ्या बहुतेक सर्व लोकांच्या पाठांत या अभंगाचें प्रथम कडवें असतें असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. कारण, कथेच्या सरतेशेवटीं हा अभंग म्हटला जात असल्यानें हा अभंग म्हणजे कीर्तनाच्या समासीची

सूचनाच होऊन बसला आहे. कित्येक वेळां श्रोत्यांचें लक्ष बोवा " हेंचि दान दे गा देवा...." केव्हां म्हणतात इकडे लागलेलें असतें तें याचकरितां.

आतां हा अभंग शेवटीं म्हणतात हें जरी खरें आहे व हें जरी सर्व लोकांना ठाऊक आहे तरी तो शेवटीं कां म्हटला जातो याचें कारण फारच थोड्या लोकांना माहीत असतें. हा अभंग ' मागण्याचा ' आहे; म्हणजे यांत देवाजवळ मागणें मागितलें आहे व तेंहि 'क्षेमाचें' आहे. यामुळेंच हा कीर्तनाच्या शेवटीं म्हटला जातो. हें जें कारण सांगितलें त्याचासुद्धां थोडा अधिक खुलासा करणें अवश्य वाटतें.

कांहीं वेकार लोक सदाच हात पसरतात. ही गोष्ट सोडून दिली तर सामान्यतः नीतियुक्त व्यवहाराचा नियम असा कीं, सेवा केल्यानंतर मेवा मागण्याचा अधिकार प्राप्त होतो. अशी म्हण आहे, चाकरी तर भाकरी. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात कीं, चाकरी न करतां वेतन खाणें हें अनुचित आहे.

**चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥**

देवाची सेवा केल्यावर मगच त्याच्याजवळ मागणें ही न्याय्य रीत होय. कीर्तन ही भगवंताची सेवाच आहे. तुकाराममहाराज म्हणतात :

**सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेद काम सारोनियां ॥**
**तुका म्हणे देवा । चिंतन हे तुझी सेवा ॥**

ही कीर्तनरूपी सेवा केल्यावर त्याच्याजवळ मागणें योग्य असल्यानें, कीर्तनाच्या शेवटीं हा ' मागण्याचा ' अभंग म्हणण्याचा संप्रदाय आहे.

' क्षेमाचें ' मागणें म्हणजे काय याचा विचार पुढें होणार असल्यानें तूर्त एवढेंच सांगतों कीं, क्षेम याचा अर्थ जतन, रक्षण

असा आहे. तेव्हां जतन करा अशी विनवणी ' योगा ' नंतर संभवते. म्हणूनहि हा ' क्षेमा ' च्या मागणीचा अभंग कीर्तनाच्या शेवटीं म्हटला जातो.

येथपर्यंत कीर्तनाच्या शेवटीं या अभंगास स्थान कां प्राप्त झालें याचा विचार सांगितला. आतां या अभंगाची भूमिका काय असावी याचा थोडासा विचार करूं. तुकारामबोवा हे सामान्य भक्ताप्रमाणें ' हातपसरे ' भक्त नव्हते. देवासमोर दोन विड्याचीं पानें, एक गुळगुळीत पैसा व त्यावर कुजकी सुपारी यांचें उदक सोडायचें व मागणें मागायचें,

**' अस्माकं सकुटुंबानां सपरिवाराणां द्विपदचतुष्पदसहितानां क्षेमस्थैर्यायुरारोग्यैश्वर्याभिवृद्धि समस्त अभ्युदय '** व्हावा

अशी जशी भोळ्याभाबड्या भक्तांची रीत असते तशी तुकोबांची नव्हती. ते म्हणतात, खरे भक्त हे सेवा करतांना जीव देण्याचा प्रसंग आला तर जीवसुद्धां देवाकरितां देतात, इतकी देवाची सेवा करतात; पण त्याच्याजवळ कांहीं एक मागत नाहींत.

**तुका म्हणे जीवभाव देवापायीं । ठेवूनियां कांहीं न मागती ।।**

तुकारामबोवा स्वतःविषयीं असेच उद्‌गार काढतात,

**कांहीं मागणें हें आम्हां अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ।।**

देवाच्याजवळ कांहीं न मागणें हा आमच्या वाडवडिलांच्यापासून चालत आलेला बाणा, असें देवाला सांगणारे तुकारामबोवा देवाजवळ नुसतें मागत नाहींत तर आग्रहानें म्हणतात, ' हेंचि दान दे गा देवा. ' तेव्हां असा कोणता प्रसंग उत्पन्न झाला असावा कीं, तुकारामबोवांनीं कांहींहि न मागण्याची आपली रीत सोडून मागणें मागितलें, याचा विचार होणें अवश्य आहे. या अभंगाच्या रचनेवरून तो प्रसंग खालील असावा : व्यवहारांत असें दिसतें कीं,

जो मागत नाहीं पण सचोटीनें वागतो त्याच्या मागें सावकार आपली रक्कम त्यानें घ्यावी म्हणून लागतो. बुडविणारें कूळ आलें व तें जास्त व्याज द्यावयास तयार असलें तरी व्यवहारदक्ष सावकार त्याला पैसे देत नाहीं, तर 'तुम्ही उशीरा आलांत, आतांच पैसे अमक्याला दिले;' अशी कांहीं तरी सबब सांगून त्याला पैसे न देतां परत पाठवितो. उलट, चांगलें कूळ पैसे परत करावयास आलें तर त्याला तो म्हणतो, 'अहो, पैसे परत कां करतां ? व्याज कमी द्या, आणखी पैसे घेऊन जा !' असा त्याला आग्रह करतो. देव-भक्त यांच्यांतील व्यवहारांतहि असाच न्याय असावा. आमच्यासारख्या 'आपुलाल्या हिताचेनि लोभें' देवाला झोंबणारे जे भक्त आहेत त्यांना देव काय देत असेल तें देवाला ठाऊक! पण जे न मागणारे भक्त आहेत त्यांच्यामागें कांहीं तरी घ्या असा देव लागला असला पाहिजे. पुराणांतरीं अशी कथा आहे कीं, प्रल्हादाकरितां श्रीनारसिंहाचा अवतार झाला व नरसिंह प्रल्हादाला म्हणूं लागले :

**प्रल्हाद भद्र भद्रं ते प्रीतोऽहं तेऽसुरोत्तम ।**
**वरं वृणीष्वभिमतं कामपुरोस्म्यहं नृणाम् ।।**

अरे प्रल्हादा, कांहीं माग. सर्व प्राण्यांच्या कामना पूर्ण करणारा मी आहें. यावर प्रल्हाद म्हणाले :

**यस्त आशिष आशास्ते न स भृत्यः स वै वणिक् ।।**

'आपल्याकडून कांहीं लाभाची आशा करणारा हा खरा सेवक नाहीं. माल देऊन पैसे घेणारा तो वाणी आहे. मी तसा नव्हें.' तुकारामबोवा कांहीं मागतील म्हणून देवांनीं वाट पाहिली असावी. तुकारामबोवा म्हणतात :

**मागण्याची वाट पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ।।**

पण देवाला असें आढळून आलें कीं, तुकारामबोवा कांहीं मागेनात. तेव्हां देवच त्यांना आग्रह करूं लागले असावेत कीं,

‘ तुकोबा, कांहीं तरी माग. मीं अनेकांना दान दिलें आहे. भूमि, संतान, द्रव्य काय पाहिजे तें माग. मी देतों.’ यावर प्ऱ्हादाप्रमाणेंच तुकोबांनीं सांगितलें असावें :

**कांहीं मागणें हें आम्हां अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ।।**

इतकें तुकोबांनीं निक्षून सांगितल्यावरहि भगवान् त्यांना कांहीं मागावें म्हणून आग्रह करीतच असावेत. असा फार आग्रह झाल्यावर प्ऱ्हादाप्रमाणेंच तुकारामबोवांनीं विचार केला असावा कीं, समर्थांनीं सारखा वारंवार आग्रह करावा व आपण तो तोडून टाकावा यांत समर्थांची अमर्यादा होते. तेव्हां त्यांचा मान राखण्याकरितां एखादे वेळेला मागावें. तुकारामबोवा एके ठिकाणीं म्हणतात :

**म्हणसी कांहीं मागा । हेंचि दे गा पांडुरंगा ।।**

असाच प्रसंग येथेंहि असावा. तुकोबा देवाला म्हणत असावेत, ‘ तुमचा फारच आग्रह आहे मग हेंच द्या ’ :

**हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ।। १ ।।**

अहो देवा, हेंच दान द्या कीं, आपला विसर पडूं नये. ‘हेंच’ म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं, इतर दिलेंत तर घेणार नाहीं. तुकोबांना ठाऊक होतें कीं, देवाला भक्तांच्या तोंडावर भोग टाकून आपण दूर राहावयाची संवय आहे. बिभीषणाला लंका दिली, ध्रुवाला अढळपद दिलें, अशा अनेक गोष्टी अनेकांना देऊन देवांनीं त्यांना चाळवलें. म्हणून तुकोबा मागण्याचा आरंभच असा करतात,

**‘ हेंचि दान दे गा देवा । ’**

देवांनीं म्हटलें असावें कीं, तुला माझा सारखा आठव ठेवला व विसर पडला नाहीं तर तूं करणार काय ? तुकोबा त्याचें उत्तर पुढील कडव्यांत देतात :

**गुण गाईन आवडीं । हेचि माझी सर्व जोडी ।। २ ।।**

आपला सतत आठव राहिला तर मी दुसरें कांहीं करणार नाहीं; फक्त आवडीनें आपले गुण वर्णन करीन. असें अखंड गुणवर्णन करणें हाच मी मोठा लाभ समजतों. येथें मोठा उत्कृष्ट असा योग आहे कीं, ज्याचें वर्णन करावयाचें त्या देवाचे गुण अनंत आहेत व तुकोबांसारखे भक्त ते आवडीनें गावयास उत्सुक आहेत. तुकोबाच म्हणतात :

**सकल गुणें संपन्न । एक देवाचें लक्षण ।।**

त्यांपैकीं सहा महत्त्वाच्या गुणांचा निर्देश ज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या ज्ञानेश्वरींतून व अभंगांतून केला आहे.

**' आइका यशश्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ।**
**हे साही गुणवर्य । वसती जेथ ।। म्हणौनि तो भगवंत ।.... '**

अध्याय ६·३७–३८

घोंगडीच्या रूपकानें भगवंताच्या देहाचें वर्णन करतांना ज्ञानोबा म्हणतात :

**स्वगत सच्चिदानंदें मिळोनि शुद्ध सत्त्वगुण विणली रे ।**
**षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुंदरा शोभली रे ।**
**कान्हा तुझी घोंगडी चांगली चांगली ।।**

ज्ञानोबारायांनीं ज्ञानेश्वरींत एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, या देवाचे गुण संपूर्ण आकलन करणें फार कठीण आहे. कारण यांतला अगदीं प्रारंभींचा जो ' यश ' हा गुण त्याचें यथास्थित वर्णन अनंत जो वेद त्याच्याच्यानें होईना.

**प्रणवाचिये पेठें । जाहलें शब्दब्रह्म माजिठें ।**
**तें जयाचिया यशा धांकुटें । वेढूं न पुरे ।।** अ. ६–१०९

असा येथें वर्ण्य विषय म्हणजे भगवंताचे अनंत गुण. हे गुण तुकोबा म्हणतात, मी आवडीनें गाईन. उगाच

**‘ मोलें घातलें रडाया । नाहीं आसूं आणि माया ।।**
असें नव्हे.

आवडीची जातच अशी आहे कीं,

**‘ आवडी जेथ पडे । तयाची अवसरी पुढें पुढें ।**
**रिगो लागे हें घडे । प्रेम ऐसें ।। ज्ञा.**

ज्या विषयाची आवड आहे तोच विषय पुनः पुनः पुढें यावा असें वाटतें. असें वाटणें हीच आवड असल्याची खूण.

**पढियंते सदा तेंचि । परि भोगी नवी नवी रुचि ।।**
—अनुभवामृत

आवडीचा पदार्थ तोच; पण भोग घेतांना उत्पन्न होणारी चव ही दर खेपेस वेगळीच असते. भोगानें ती कमी न होतां उलट वाढतच जाते; म्हणून भोगलेलाच विषय पुन्हा भोगावासा वाटतो. तुकारामबोवांच्या ठिकाणीं भगवद्गुणगानासंबंधानें आवड असल्यानें गुणगान करून तृप्ति होतच नव्हती. देवाचे गुण गातच राहावें असें त्यांस वाटे. ते म्हणतात :

**धणी न पुरे गुण गातां । रूप दृष्टि न्याहाळितां ।।**
**बरवा बरवा पांडुरंग । कांति सावळी सुरंग ।।**

नारदांनीं आपल्या भक्तिसूत्रांतहि भक्ताचें वर्णन असेंच केलें आहे,

**तत्प्राप्य तदेवावलोकयति तदेव शृणोति तदेव चिंतयति ।**

तिसऱ्या कडव्यांत तुकोबा ज्याच्या योगानें भगवंताच्या झालेल्या आठवणीचा जो लाभ त्याचें जतन होईल अशा गोष्टीची मागणी करतात.

**नलगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ।। ३ ।।**

‘ देवा. तुझी मुक्ति मला नको, संपत्ति मला नको, मला संतांची अखंड संगति दे. ’

पैसा व मोक्ष या दोन्ही गोष्टी भगवंताचा प्रेमरस भोगण्याच्या आड येणाऱ्या आहेत. पैसा असला व त्यायोगानें अनेक प्रकारचे विषयोपभोग मिळत असले तर मग देवाकडे मन कशास जाईल ? मोक्षांत देवाशीं ऐक्य होतें. मग भजन कसें होणार ? व भजनानन्द कोण भोगणार ? भोग घेण्यास, भोग्य विषयाहून भोक्ता निराळा असावा लागतो. तुकारामबोवाच म्हणतात:

**जळ न खाती जळा । वृक्ष आपुलिया फळा ।।**
**भोक्ता निराळा । तेणें गोडी निवडली ।।**

भजन करण्यास शरीर लागतें; मुक्त झाला, कीं त्याला पुन: जन्म नाहीं. म्हणून तुकारामबोवा म्हणतात कीं, पैसा नको व मोक्ष नको. मग काय द्या ? तर सत्समागम द्या !

**संतसंग देईं सदा ।। ३ ।।**

संतांचा समागम तुकारामबोवा मागतात; कारण त्या योगानें भगवंताचा झालेला आठव कायम राहील. कारण संतांना भजनाची आवड असते व ते अखंड भजन करीत असतात. यामुळें त्यांच्या सहवासांत देवाची आठवण कायम राहील.

**सहज तया जना छंद । वाचे गोविंद गोविंद ।।**
**कृष्ण विष्णु हरी गोविंद । या नामाचे निखिल प्रबंध ।**
**माजी आत्मचर्चा उदंड । विशद गाती ।।**
**तेथें रामनाम होईल श्रवण । घडेल भोजन उच्छिष्टाचें ।।**

शेवटच्या कडव्यांत तुकोबा म्हणतात, तुम्ही मला तुमचा आठव आणि सत्समागम दिलात, कीं मग मला जन्माला घातलेंत तरी माझी ना नाहीं. आपण मला खुशाल जन्माला घालावें.

**तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ।।**

जन्माला भिणारे आम्ही नाहीं. ते 'मुनि'. तुकोबा म्हणतात :

**मुनि मुक्त झाले भेणें गर्भवासा । आम्हां विष्णुदासा सुलभ तो ।।**

तात्पर्य, आपण मला जन्माला घाला. तुमचा विसर होऊं देऊं नका व सत्समागम द्या. मग कोणत्याहि जन्माला घातलेंत तरी माझी ना नाहीं.

भावार्थ संपला. आतां या अभंगाच्या प्रथम कडव्याचा थोडासा तपशीलवार विचार करूं.

हा अभंग क्षेमाचा आहे असें वर म्हटलें आहे. तेव्हां प्रथम क्षेम या शब्दाच्या अर्थाचा विचार करूं.

क्षेम हा शब्द बहुधा ' योगक्षेम ' अशा प्रयोगांत येतो व सामान्य व्यवहारांत योगक्षेम याचा अर्थ ' चरितार्थ ' असा पुष्कळ वेळां होतो. उदाहरणार्थ, एखादा मनुष्य आपल्या स्नेह्याला विचारतो, " तुमचा योगक्षेम कसा काय चालला आहे ? " म्हणजे चरितार्थ कसा चालला आहे ? त्या अर्थानें येथें क्षेम हा शब्द उपयोगांत आणलेला नव्हे. योग व क्षेम या दोन शब्दांच्या व्याख्या खालीलप्रमाणें देतां येतील :

**' आप्राप्तस्य प्राप्तिः ' योगः ; ' प्राप्तस्य परिपालनं ' क्षेमः**

योग म्हणजे जी वस्तु जवळ नाहीं तिचा लाभ होणें व क्षेम म्हणजे मिळालेल्या वस्तूचें रक्षण अथवा जतन होणें. हा अभंग ' क्षेमाचा ' असें म्हणण्याचें कारण तुकारामबोवा या अभंगांत ' तुझा विसर न व्हावा ' असें म्हणतात. याचा खोल जाऊन अर्थ बघितला तर असा आहे कीं, ' तुझा आठव मला झालेला आहे त्यावर आतां विसराचें झांकण पडूं देऊं नकोस. ' जर त्यांना देवाचा आठव नसता तर त्यांनीं ' तुझा आठव मला दे ' असें मागितलें असतें. तसें त्यांचें मागणें नाहीं. मागणें ' विसर पडूं देऊं नकोस ' असें आहे. तात्पर्य, यांत भगवंताच्या कृपेनें त्याचा झालेला आठव टिकावा असें मागणें असल्यानें त्याला क्षेमाची मागणी असें वर म्हटलें आहे.

यावर पहिला प्रश्न उत्पन्न होतो कीं, ' देवाचा विसर पडला '

तर काय बिघडतें? घटकाभर मान्य केलें कीं, देवाचा विसर होण्यांत जीवाचें नुकसान आहे, तर दुसरा प्रश्न उत्पन्न होतो कीं, क्षेमाकरितां देवाला त्रास देण्याची आवश्यकता आहे का? आपण केल्यानें तो होणार नाहीं का? व तिसरा व महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आपण क्षेमाकरितां देवाकडे जाणें आवश्यक म्हटलें तरी देव आमच्या 'योगक्षेमाचें' ओझें घेण्यास तयार आहे का? इत्यादि प्रश्न संभवतात. येथें वरील तीन प्रश्नांचा थोडक्यांत विचार करूं.

आतां पहिल्या प्रश्नाचा विचार करूं तुकारामबोवांच्या मतानें देवाला विसरण्यांत फार मोठें नुकसान आहे. ते म्हणतात :

**विसरलीं तयां थोर झाली हानी ।**

जे देवाला विसरले त्यांची मोठी हानि झाली. पण व्यवहारांत आपणांला उलट दिसतें. जे देवाला विसरून प्रपंच करण्यांत दंग झाले त्यांची हानि तर झाली नाहीं, उलट ते लाखों रुपये कमवून गबर झाले. उलट जे देवाचा आठव धरून बसले ते मात्र गरिबीचें दुःख भोगीत राहिले. पैसा मिळविणें, लग्न करणें, मानमरातब वाढणें याला देवाच्या आठवाची गरज नाहीं. उलट, त्याचा छंद विसरून यांच्या छंदास जे लागले ते लौकिकांत सुख पावून प्रतिष्ठा पावले. आपणांस तर असें दिसतें व तुकारामबोवा म्हणतात, 'विसरले तयां थोर झाली हानि'. तेव्हां तुकारामबोवांना विचारूं या कीं, देवाला विसरण्यांत कोणती मोठी हानि झाली? तर ते याच कडव्याच्या उत्तरार्धांत सांगतात कीं,

**'पचतील खाणी चौऱ्याशींच्या'**

जे देवाला विसरले त्यांना चौऱ्याशीं लक्ष जन्मखाणींत फिरावें लागतें.

हें ऐकून वाचक हंसतील व म्हणतील, 'ओहो! मोठी हानि,

मोठी हानि ती हीच का ? यांत कसली हानि ?' मौज अशी आहे कीं, हानि मोठी अथवा लहान कशी आहे हें बघणाऱ्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, पहिल्या वर्गांत परीक्षा उत्तीर्ण होणारा एक विद्यार्थी तिसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाला व त्याला तशी तार आली. ती तार वाचून तो विद्यार्थी खिन्न झाला. त्याला वाटलें, नापास झालों असतों तरी परवडलें असतें. कारण, पुनः परीक्षेला बसतां आलें असतें. आतां सर्वच खुंटलें ! त्या विद्यार्थ्याला तार वाचून खिन्न झालेला पाहून पोस्टमास्तर म्हणूं लागले, 'अहो, तुम्ही परीक्षा पास झालांत ना ? मग तुम्हांला आनंद कां झाला नाहीं ? तुम्ही खिन्न कां ?' यावर तो विद्यार्थी म्हणाला, "तुम्हांला कळणार नाहीं. मी पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होण्याची अपेक्षा करीत होतों." येथें विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, नापास होणाऱ्या विद्यार्थ्यास तिसऱ्या वर्गांत कां होईना, परीक्षा उत्तीर्ण झाली तर आनंद होतो. त्याला तो लाभ वाटतो. हानि वाटत नाहीं. उलट, जो विद्यार्थी पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होण्याची अपेक्षा करतो त्याला तिसऱ्या वर्गांत उत्तीर्ण होणें ही हानि वाटते. जो पिढीजात श्रीमंत आहे, त्याला लोकांच्या दरवाज्यांत भीक मागण्याचा प्रसंग आला तर हानि वाटते. भीक मागणाऱ्याच्या पोटींच जन्म झालेल्या बालकास भीक मागण्यांत हानि वाटणार नाहीं. तसेंच याहि ठिकाणीं आहे. "जन्माला येणें यांत जीवाची केवढी हानि आहे हें जीवाचें ( म्हणजे आपलें सर्वांचें ) मूळ स्वरूप काय होतें, तेथें आपण काय ऐश्वर्य भोगीत होतों याचें ज्यांना ज्ञान असेल त्यांनाच या हानीची कल्पना येईल. सर्व जीवांच्या मूळ स्वरूपीं जन्ममरण कालत्रयींहि नाहीं.

तुकारामबोवांना हें वेदान्तमत मान्य होतें. तें म्हणतात :

**जीव न देखे मरण । ............ ॥**

देवाचि बरे देवचि बरे । तुका म्हणे खरे तुम्ही ॥
अमर आहां अमर आहां । खरें कीं पहा खोटें हें ॥

हें ज्ञान संतांच्या संगतींत बसून होतें. कारण,

चंद्र तेथें चंद्रिका । शंभु तेथें अंबिका ॥
संत तेथें विवेका । असणेंचि कीं ॥

सत्समागमानें जीवास कळतें कीं जन्मांत दुःख आहे.

जो जन्माला आला त्याच्यामागें गर्भवासापासून तों मरणा-पर्यंतचें दुःख लागतें.

प्रथम केला गर्भी वास । काय ते सांगावे सायास ॥
दुःख भोगलें नवही मास । आलों जन्मास येथवरी ॥

मरण हें दुःखप्रद आहे हें व्याख्यान करून सिद्ध करण्याचें कारण नाहीं.

गीतेंत भगवान् ज्ञानाच्या लक्षणांत,

'जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्'

असें ज्ञानाचें लक्षण सांगतात ज्ञानोबाराय या श्लोकावर व सोळाव्या अध्यायांतील ट्र-ऱ्या श्लोकांतील 'ऱ्हीः' पदावर लिहि-तांना म्हणतात कीं, सज्जन व निर्मळ लोकांना शरीराच्या रूपानें अवतीर्ण होऊन वारंवार जन्माला येऊन मरणें याची लाज वाटते; असें जन्मण्यांत ते आपली मोठी हानि समजतात. कारण आपण जन्ममरणविरहित नित्य, शुद्ध चिद्रूप असतांना आपल्याला हें भोगावें लागतें.

वैर जन्मांतरीचें । सर्पा मनौनि न वचे । तेंवि अतीता जन्मांचें । उणें जो वाहे ॥ डोळा हरळ न विरे । घाईं कोत न जिरे । तैसें काळीचें न विसरे । जन्मदुःख ॥ म्हणे पूयगर्ते रिगाला । अहा मूत्ररंध्रें निघाला । कटा रे मियां चाटिला । कुचस्वेदु ॥ ऐस-

ऐसियां परी । जन्माचा कांटाळा धरी । म्हणे आतां तें मी न करी । जेणें ऐसें होय ॥ हारी उमचावेया । जुवारी जैसा येडाया । कीं वैरा बापाचेया । पुत्र जचे ॥ मारिलियाचेनि रागें । पाठीचा जेंवि सूड मागे । तेणें आक्षेपें लागे । जन्मापाठीं ॥ परी जन्मती ते लाज । हें न सांडीं जयाचें निज । संभाविता निस्तेज । न जिरे जेंवि ॥ अ. १३, ओ. ५३८ ते ५४४

आतां पराजयें राजा । जैसा कदर्थिजे लाजा । कां मानिया निस्तेजा । निकृष्टास्तव ॥ नाना चांडाळमंदिराशीं । अवचटें आलिया संन्यासी । मग लाज होय जैसीं । उत्तमां तया ॥ क्षत्रियां रणीं पळोनि जाणें । तें कोण साहे लाजिरवाणें । कां वैधर्व्यें पाचारणें । महासतीयेतें ॥ रूपसा उदयलें कुष्ठ । संभावितां कुटीचें बोट । तया लाजा प्राणसंकट । होय जैसें ॥ तैसें ओटहातपणें । जें शव होऊनी जिणें । उपजों उपजों मरणें । नांवां नांवां ॥ तियें गर्भमेदमुसे । रक्तमूत्ररसे । वोतीव होऊनी असें । तें लाजिरवाणें ॥ हें बहु असों देहपणें । नामरूपासी येणें । नाहीं गा लाजिरवाणें । तयाहूनि ॥ ऐसऐसियां अवकळा । घेपें शरीराचा कांटाळा । ते लाज पैं निर्मळा । निसुगा गोड ॥ अ. १६, ओ. १७५ ते १८२

तुकाराममहाराज हे निर्मळांपैकीं असल्यानें, त्यांना हे जन्ममृत्यु डांचत होते व त्यांनीं जेव्हां विचार केला कीं, आपल्या स्वरूपीं हें नसतांना जन्मावांचून जन्मावयाचें व मरणावांचून मरावयाचें ही कटकट कां लागली? तेव्हां त्यांना कळून आलें कीं, याला कारण 'विसर.' ज्ञानेश्वरमहाराज भगवद्गीता, अ. १५, श्लोक ६ यावर लिहितात :

तें अज्ञान एक रूढें । तेणें कोहं विकल्पांचे मांडे ।

**मग विवरूनि कीजे फुडे। देहो मी ऐसें ॥** ज्ञा. ओ. ३४२

तुकोबांच्या डोळ्यांसमोर हें असल्यामुळें नित्य, शुद्ध, मुक्त असणाऱ्या आपणांस घाणीनें भरलेला देह घेऊन जन्ममृत्यूचें दुःख भोगावें लागतें. याचें कारण जो 'विसर' तो जर झाला तर आपली मोठी हानि झाली असें त्यांस वाटे. आपली आनंदरूपता नाहींशी होऊन नसलेलें अनिवार दुःख भोगावें लागतें याला कारण 'जन्ममृत्यु' असें ते समजत होते.

**'सकळदुःखधामें। भुंजीजती जियें मृत्युजन्में ॥'**

व त्याला कारण देवाचा – आत्मस्वरूपाचा – विसर – तेव्हां तो होण्यांत मोठी हानि आहे हें जाणून तुकोबा देवाजवळ मागणी मागतात :

**हेंचि दान दे गा देवा। तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥**

आम्हीं वर जी हानि दाखविली ती हानि मानणें व या अभंगांतील शेवटचें मागणें

**तुका म्हणे गर्भवासीं। सुखें घालावें आम्हांसी ॥**

या दोन्ही गोष्टी वर वर पाहतां विसंगत दिसतील; पण सूक्ष्म विचार करून पाहिलें असतां यात विसंगति नाहीं. कारण, तुकारामबुवा यामध्यें नुसता जन्म मागत नाहींत, ते देवाचे स्मरणपूर्वक जन्म मागतात. जेथें देवाचें स्मरण आहे तेथें जन्म घेतांना दुःख होत नाहीं. तुकारामबुवा म्हणतात :

**गर्भवासीं दुःख नाहीं येतां जातां। हृदयीं असतां नाम तुझें ॥**

तुकारामबोवांनींच हा अभिप्राय एक दृष्टान्त देऊन सांगितला आहे. ते म्हणतात :

**पालखी बैसतां मारगाची चिंता। नाहीं उसंतिता कोस पेणी ॥**

जो पालखींत बसला त्याला किती कोस मार्ग आक्रमिला याची चिंता करण्याचें कारण नाहीं; तसेंच भगवंताचें नाम ज्याच्या

हृदयांत आहे त्याला कितीहि जन्म घ्यावे लागले तरी त्याला त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं. कारण, पालखींत बसलेल्याचे पाय दुखत नाहींत, त्याचप्रमाणें ज्याची चित्तवृत्ति भगवद्भजनांत नाहींशी झाली त्याला देहावर येणारीं दुःखें भासत नाहींत. म्हणून देवाचें स्मरण असतांना जन्म घेण्यांत दुःख नाहीं; उलट असें करण्यांत पुरुषार्थ आहे व म्हणूनच तुकारामबुवा एके ठिकाणीं प्रतिज्ञा करतात,

**घेईन मी जन्म याजसाठीं देवा। तुझी चरणसेवा साधावया ॥**

आतां मान्य केलें कीं, विसर होण्यांत हानि आहे, तर पुढचा दुसरा प्रश्न उत्पन्न होतो – झालेल्या योगाचा क्षेम होण्यासाठीं देवाकडे कशाला जायला पाहिजे ? त्याचें उत्तर असें आहे कीं, योग होणें सोपें आहे; पण त्याचा क्षेम होणेंच फार कठीण आहे. व्यवहारांत लक्षाधीश भिक्षाधीश होतांना आढळतात. मरतांना बापानें चिरंजीवाला ठेवलेला पैसा बापाच्या वर्षश्राद्धापर्यंत टिकत नाहीं. सुखी संसाराचें दारुण दुःखांत रूपांतर होतें. पैसा, प्रतिष्ठा मिळतात; पण त्या टिकविणें हें फार कठीण आहे. तुकोबा म्हणतात,

**कठीण योगाहुनी क्षेम । ओकाञ्जिया होय श्रम ॥**

क्षेम होणें हें किती कठीण आहे याचें मोठ्यांत मोठें उदाहरण देवदानवांनीं केलेलें ' अमृतमंथन ! ' अमृत निघालें, पण त्याचा लाभ कोठें झाला दैत्यांना ? राहूनें वेष घेऊन देवांच्या रांगेंत बसून तें पिण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम तो अमर तर झाला नाहींच, उलट तें त्याच्या मरणाला कारणीभूत झालें.

ज्ञानोबाराय म्हणतात :

**तरी निधान जोडावया। भाग्य घडे धनंजया। परी जोडिलें भोगावया। विपायें होय॥ पैं क्षीरसागराएवढें। अविरजी दुधाचें भांडें। सुराअसुरां केवढें। मथितां जालें॥ तें सायासही फळा आलें। जें अमृतही**

डोळां देखिलें। परी वरिचिली चुकलें। जतनेतें ॥ तेथ अमरत्वां वोगरिलें। तें मरणाचि लागीं जालें। भोगीं नेणतां जोडलें। ऐसें आहे ॥ नहुषु स्वर्गाधिपति जाहला। परी राहटीं भांबावला। तो भुजंगत्व पावला। नेणसी कायी ॥ अ १८, ओ. १४७५-७९

तिसरा प्रश्न — या योगक्षेमाकरितां देवाजवळ आपण मागणें मागितलें तर हें ओझें घेण्यास देव तयार आहे का? त्याचें उत्तर, होय. देव तयार आहे. तो स्वतःच म्हणतो,

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।

तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ अ. ९-२२

या श्लोकावर ' योगक्षेम ' याचा अर्थ करतांना ज्ञानेश्वरमहाराजांनीं ' योगक्षेम ' चालवतो म्हणजे चरितार्थ चालवतो असा अर्थ केला नाहीं. ते म्हणतात, भक्त दोन प्रकारचे आहेत. एकांना ' सायुज्य ' आवडतें, दुसऱ्यांना ' सेवा ' आवडते. सायुज्य व सेवा यांपैकीं ते जो जो भाव धरतील तो तो मी पुरा करतों.

तया माझिया सायुज्याची चाड। तरी तेंचि पुरवी कोड। कां सेवा म्हणती जरी आड। प्रेम सूयें ॥ ऐसा मनीं जो जो धरिती भावो। तो तो पुढांपुढां लागे तया देवो। आणि दिधलियाचा निर्वाहो। तोहि मीचि करीं ॥ हा योगक्षेमु आघवा। तयांचा मजचि पडिला पांडवा। जयांचिया सर्वभावां। आश्रयो मी ॥

तात्पर्य, भगवंतच भक्ताच्या पारमार्थिक योगक्षेमाची आपण काळजी वाहतों असें सांगतात. म्हणून तुकारामबोवाहि एके ठिकाणीं म्हणतातः

योगक्षेम त्यांचें जाणें जडभारी। वाट दावी करीं धरोनिया ॥

तुकारामबोवांना सेवा प्रिय असल्यानें व सेवा करावी या बुद्धीचा क्षेम हा आपल्या प्रयत्नानें होणें कठीण हें पूर्वींच्या लोकांच्या अनुभवांवरून स्पष्ट होत असल्यानें तुकाराममहाराज एका अभंगांत देवाजवळ, 'आपण जें दान दिलें त्याचें रक्षण करा' अशी मागणी करतात.

केलियाचें दान । करा आपुलें जतन ॥

तसेंच या अभंगांत म्हणतात,

'हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा' ॥

नामदेव, तुकारामबोवा यांच्यासारखे भक्त जन्माला भीत नाहींत. उलट, ते भगवंताच्या सेवेचें सुख मिळावें म्हणून जन्म घेण्याला उत्सुक असतात. तुकारामबोवा आपली सेवेची वासना किती तरी ठिकाणीं या प्रकारें व्यक्त करतात :

घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥
घेईन जन्मांतरें । हेंचि करावया खरें ॥

नामदेवरायांच्या अशाच प्रकारच्या मागण्याचा एक उत्कृष्ट अभंग देऊन हें अभंगसंकीर्तन पुरें करूं.

मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ १ ॥
श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ २ ॥
पक्षी करिसी तरी चारियाचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ३ ॥
झाड करिसी तरी तुळसीचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ४ ॥

वृक्ष करिसी तरी मंडपमेखाचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ५ ॥
पाषाण करिसी तरी रंगशिळेचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ६ ॥
उदक करिसी तरी सडियाचेनि मिषें
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ७ ॥
नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0013509
REFBK-0013509

# ईश्वरवाद

( लेखक : प्रा. **सोनोपंत दांडेकर**, दुसरी आवृत्ति, पृष्ठसंख्या २७० )

वादविवेचनमालेंतील ‘ईश्वरवाद’ हें एक महत्त्वाचें पुष्प होय. त्याची ही सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति सुमारें २० वर्षांनंतर प्रसिद्ध होत आहे. पाश्चात्य आणि पौरस्त्य तत्त्वज्ञानांचे आजन्म निष्ठावंत अभ्यासू प्राध्यापक सोनोपंत दांडेकरांनीं हा ग्रंथ लिहिला आहे. तत्त्वज्ञानाच्या सूक्ष्म अभ्यासाबरोबरच संतवाङ्मयाच्या परिपूर्ण अध्ययनाची पुण्याई प्रा. सोनोपंतांच्या पदरीं असल्यानें त्यांच्याइतका या विषयावर लिहिण्याचा अधिकार फार थोडयांचाच आहे असें म्हटलें असतां अप्रस्तुत आणि वावगें होणार नाहीं. अर्वाचीन काळांत ईश्वराविषयीं उत्पन्न होणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा समजण्यास मराठी वाचकांची भूमिका तयार करावी एवढाच उद्देश ’ प्रस्तुत ग्रंथ लिहितांना ग्रंथकर्त्याच्या दृष्टीपुढें आहे. तरीपण ईश्वराच्या अस्तित्वाची शंका घेणारे विचारवंत प्राचीनकाळापासून असल्यामुळें श्रद्धा, आप्तवाक्य, प्रत्यक्षादिप्रमाणें, धर्म, भौतिकशास्त्रें, साक्षात्काराचे अनुभव यांसारखे अनेक विषय ईश्वरवादाशीं अगदीं संलग्न होतात आणि मूळ विषयाचा व्याप ध्यानांत येतो. या सर्व विषयांची प्रमाणभूत चर्चा करून ग्रंथकर्त्यानें ईश्वराचें अस्तित्व साधार सिद्ध केलें आहे.

पूर्वीच्या पहिल्या आवृत्तींत प्रकरणांची संख्या बारा होती. या सुधारून वाढविलेल्या आवृत्तींत पुढील तीन नवीन प्रकरणें भरीस घालून विषयाच्या विवेचनाला पूर्णता आणिली आहे. **‘देवाधर्माचें भवितव्य’, ‘ईश्वरदर्शन अथवा साक्षात्कारपथ’, ‘प्रार्थना’** हीं तीं तीन नवीन प्रकरणें होत. ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या वाचकांच्या श्रद्धेला या ग्रंथाच्या वाचनानें तत्त्वविचाराची उत्तम बैठक लाभेल आणि ईश्वरावर श्रद्धा न ठेवणाऱ्या वाचकांनाहि आपली विचारसरणी नीट तपासून पाहण्याची अनमोल संधि या ग्रंथाच्या वाचनानें प्राप्त होईल.

मूल्य रु. ५. पोस्टेज १ रुपया.

**प्रसाद प्रकाशन**, ६८९/२३, सदाशिव पेठ, पुणें २

वृक्ष करिसी तरी मंडपमेखाचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ५ ॥
पाषाण करिसी तरी रंगशिळेचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ६ ॥
उदक करिसी तरी सडियाचेनि मिषें
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ७ ॥
नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषें ।
तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३५०९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
REFBK-0013509
REFBK-0013509

# ईश्वरवाद

( लेखक : प्रा. **सोनोपंत दांडेकर**, दुसरी आवृत्ति, पृष्ठसंख्या २७० )

वादविवेचनमालेंतील ‘ ईश्वरवाद ’ हें एक महत्त्वाचें पुष्प होय. त्याची ही सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति सुमारें २० वर्षांनंतर प्रसिद्ध होत आहे. पाश्चात्य आणि पौरस्त्य तत्त्वज्ञानांचे आजन्म निष्ठावंत अभ्यासू प्राध्यापक सोनोपंत दांडेकरांनीं हा ग्रंथ लिहिला आहे. तत्त्वज्ञानाच्या सूक्ष्म अभ्यासाबरोबरच संतवाङ्मयाच्या परिपूर्ण अध्ययनाची पुण्याई प्रा. सोनोपंतांच्या पदरीं असल्यानें त्यांच्याइतका या विषयावर लिहिण्याचा अधिकार फार थोडयांचाच आहे असें म्हटलें असतां अप्रस्तुत आणि वावगें होणार नाहीं. अर्वाचीन काळांत ईश्वराविषयीं उत्पन्न होणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा समजण्यास मराठी वाचकांची भूमिका तयार करावी एवढाच उद्देश ’ प्रस्तुत ग्रंथ लिहितांना ग्रंथकर्त्यांच्या दृष्टीपुढें आहे. तरीपण ईश्वराच्या अस्तित्वाची शंका घेणारे विचारवंत प्राचीनकाळापासून असल्यामुळें श्रद्धा, आप्तवाक्य, प्रत्यक्षादिप्रमाणें, धर्म, भौतिकशास्त्रें, साक्षात्काराचे अनुभव यांसारखे अनेक विषय ईश्वरवादाशीं अगदीं संलग्न होतात आणि मूळ विषयाचा व्याप ध्यानांत येतो. या सर्व विषयांची प्रमाणभूत चर्चा करून ग्रंथकर्त्यानें ईश्वराचें अस्तित्व साधार सिद्ध केलें आहे.

पूर्वीच्या पहिल्या आवृत्तींत प्रकरणांची संख्या बारा होती. या सुधारून वाढविलेल्या आवृत्तींत पुढील तीन नवीन प्रकरणें भरीस घालून विषयाच्या विवेचनाला पूर्णता आणिली आहे. **‘ देवाधर्माचें भवितव्य ’, ‘ ईश्वरदर्शन अथवा साक्षात्कारपथ ’, ‘ प्रार्थना ’** हीं तीं तीन नवीन प्रकरणें होत. ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या वाचकांच्या श्रद्धेला या ग्रंथाच्या वाचनानें तत्त्वविचाराची उत्तम बैठक लाभेल आणि ईश्वरावर श्रद्धा न ठेवणाऱ्या वाचकांनाहि आपली विचारसरणी नीट तपासून पाहण्याची अनमोल संधि या ग्रंथाच्या वाचनानें प्राप्त होईल.

मूल्य रु. ५. पोस्टेज १ रुपया.

**प्रसाद प्रकाशन**, ६८९/२३, सदाशिव पेठ, पुणें २

# अध्यात्मदर्शन अर्थात् सुखी जीवनाची रूपरेषा

( लेखक : प्रा. के. वि. बेलसरे, पृष्ठसंख्या ५३६ )

मानवाच्या जीवनाचा सुसंगत व समग्र अर्थ जगांतील प्राचीन व अर्वाचीन थोर तत्त्वज्ञ आणि आत्मज्ञानी पुरुषांनीं लाविला आहे. त्यांनीं लाविलेल्या त्या अर्थालाच अध्यात्मदर्शन अथवा संतदर्शन असें नांव आहे. तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, भौतिकशास्त्रें, संतवाङ्मय इत्यादि विषयांच्या प्रमाणग्रंथांचें प्रा. बेलसऱ्यांनीं गेलीं कित्येक वर्षें केलेलें सूक्ष्म परिशीलन या ग्रंथाच्या पाना-पानांत पाहावयास मिळतें. तत्त्वज्ञान किंवा अध्यात्म या सामान्य जिज्ञासू वाचकाला आपाततः अवघड वाटणारा विषय लेखकानें आपल्या सुबोध पण तर्कशुद्ध, सोदाहरण प्रतिपादनानें आणि सोप्या भाषेनें अगदीं सहज आकलन होण्याइतका आवाक्यांत आणून ठेविला आहे. अशा रीतीनें या ग्रंथांत एक समग्र तत्त्वज्ञान प्रा. बेलसऱ्यांनीं मांडिलें आहे.

या ग्रंथांतील अध्यायांची संख्या २० आहे. त्यांतील कांहीं अध्यायांचीं नांवें अशीं आहेत :

**अध्यात्मदर्शनाची व्याख्या, ज्ञानाचें स्वरूप, सत्य आणि भ्रम, ईश्वर, साधकावस्था, सिद्धावस्था, आदर्श संत : श्रीतुकाराम.**

मूल्य रु. १०. पोस्टेज १॥ रुपया.

य. गो. जोशी, प्रसाद प्रकाशन, ६८९/२३ सदाशिव, पुणें २